# प्रकरण तीन

## ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

**3.468 मौजे दिवे अंजूर नळ पाणी पुरवठा योजना पाईप लाईन विस्तारीकरण करणे. तालुका भिवंडी.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर योजनेकरीता रक्कम रुपये 14,98,208/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ठेकेदाराने अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.63 टक्के कमी दराने म्हणजे रुपये 15,06,390/- एवढया रक्कमेस निविदा स्विकारलेली असल्याचे दिसून येते. सदरच्या रक्कमेवर सुरक्षा अनामत, कामगार कल्याण उपकर, विमा निधी या रक्कमा कपात न करता कामावर प्रत्यक्ष झालेल्या खर्चावर सदरच्या रक्कमा कपात केल्याचे दिसून येतात. सदरच्या रकमा शासन निर्णयानुसार कपात करुन शासन खाती भरणा करावा.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम (1)(क) प्रमाणे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी सदर कामाची 5 टक्के किंवा त्याहून अधिक कामांची तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी सदर कामांची 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. याबाबत तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1098/प्र.क्र.425/ पा.पु., दिनांक 11/01/1999 परि.क्रमांक 40 नुसार पाईप व इतर साहित्याचे शासकीय प्रयोगशाळा किंवा महाविदयालयाकडून गुणवत्ता चाचणी अहवाल घेण्यात आलेले आहेत. तथापि, सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची चाचणी फी ची पावती नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

4) मौजे दिवे-अंजूर येथे नळ पाणी पुरवठा योजने विस्तारीकरण करणे या कामावर रक्कम रुपये 14,98,208/- खर्च करण्यात आलेले आहेत. परंतु, एस्टीमेट व मुल्यांकन दाखल्यावर किती किलोमीटर किंवा किती मीटर अंतरापर्यंत नळ पाणी पुरवठा पाईप लाईन विस्तारीत करण्यात आलेली आहे, असा उल्लेख आढळून आलेला नाही. त्यामुळे सदर योजना राबवितांना जी.आय.पाईप व इतर साहित्याची खरेदी कशाच्या आधारे करण्यात आलेली आहे, याबाबत खुलासा करावा.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968, नियम 118(3) नुसार संरचनात्मक फेरफार असल्यास त्यास पूर्व मंजूरी घेणे आवश्यक होते. तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच नियम 120(2) नुसार कामामध्ये एखादया बाबीवर होणारी बचत ही, इतर बाबींवर खर्च करता येत नाही. तथापि, सदर कामामध्ये बचतीची रक्कम इतर बाबींवर खर्च केल्याचे दिसून येत आहे.

6) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि/10/1009/ख, दिनांक 11/02/2010 अन्वये गौण खनिजासाठीचे स्वामित्वधन वसूल करणे आवश्यक आहे. सबब कामावर वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची रक्कम कपात करण्यात आली नसल्याचे कामाच्या नस्तीसोबत गौण खनिज स्टेटमेंट जोडलेले नाही. गौण खनिजाच्या बाबतीत प्रत्यक्ष संचिकेत झालेल्या कामाच्या बाबनिहाय लेखापरीक्षण केले असता, गौण खनिज वापरल्याचे दिसून येते. त्यावरील गौण खनिजाच्या रक्कमा वसुल करण्यात आलेल्या दिसून येत नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968, नियम 146 नुसार कार्यादेश देणेपूर्वी मक्तेदाराकडून करारनामा करुन घेऊन त्या मक्तेदाराकडून काम सुरु केव्हा होईल व काम पूर्ण कधी होईल, अशा प्रकारच्या निविदा अटी शर्ती नमूद करणे आवश्यक आहे. तसेच नियम 148(2) करारातील अटी शर्तींच्या भंग केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतूद करारनाम्यात करण्यात यावी. तथापि, अशी पध्दत अवलंबिण्यात आलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 2010/प्र.क्र.81/ पंरा-7/ दिनांक 08/06/2009 अन्वये कामाच्या ठिकाणी 5 X 4 फुटाचे लोखंडी नामफलक लावणे आवश्यक असतांना संचिकेत नामफलक लावणेबाबतचे नस्तीसोबत प्रमाणपत्र नाही.

9) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडे ठेकेदाराने दिनांक 24/01/2017 रोजी रुपये 14,982/- कामगार उपकर कपात करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक 19/01/2017 रोजी रुपये 6,261/- विमा कपात करणेत आलेला आहे. सदरचा विमा निधी हा कामाच्या मुदतीपर्यंतच भरणा करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, शासकीय विमा निधी यांचे पत्र क्रमांक प्रविनी-2305/डब्ल्युसीxxxvii/ संकीर्ण, दिनांक 15/12/2005 नुसार निविदा रक्कमेच्या 1 टक्का कामाचा व कामगाराचा विमा वसूल करण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा करावा.

10) कार्यारंभ आदेशातील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात आल्याचे दिसून येत नाही. कार्यारंभ आदेश देतानांच आगाऊ स्वरुपात भरणा करुन घेऊन त्याचे भरणा चलन देयकासोबत सादर करणे अनिवार्य असतांना उपकर दिनांक 24/01/2017 रोजी व विमा निधी दिनांक 19/01/2017 रोजी भरणा करण्यात आला. म्हणजेच चुकीच्या पध्दतीने कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**3.469 मौजे घोटसई मगरपाडा येथील नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदर योजनेकरीता रक्कम रुपये 11,51,928/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 प्रमाणे नमुना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगती नोंदवहीत सदर कामाची नोंद असलेबाबत नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. नियम 197 नुसार बांधकामाची नोंद नमुना 69 मध्ये घेतलेबाबत पडताळणी करता आलेली नाही.

2) सदर काम करतेवेळी जुने पाईप व इतर जुने निरुपयोगी साहित्याची नोंद निर्लेखन नोंदवहीत घेण्यात आलेबाबत निर्लेखन नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नसल्याने सदर निरुपयोगी साहित्याबाबत कोणतीही खात्री करता आलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम (1)(क) प्रमाणे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, यांनी सदर कामाची 5 टक्के किंवा त्याहून अधिक कामांची तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी सदर कामांची 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. याबाबत तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1098/प्र.क्र.425/ पा.पु., दिनांक 11/01/1999, परि.क्रमांक 40 नुसार पाईप व इतर साहित्याचे शासकीय प्रयोगशाळा किंवा महाविदयालयाकडून गुणवत्ता चाचणी अहवाल घेणेत आलेले आहेत. तथापि, सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची चाचणी फी ची पावती नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाही.

5) मौजे घोटसई मगरपाडा येथे नळ पाणी पुरवठा योजने अंतर्गत दुरुस्ती करणे या कामावर रक्कम रुपये 11,51,928/- खर्च करण्यात आलेले आहेत. परंतु, एस्टीमेट व मुल्यांकन दाखल्यावर किती किलोमीटर किंवा किती मीटर अंतरापर्यंत नळ पाणी पुरवठा पाईप लाईन विस्तारीत करण्यात आलेली आहे, असा उल्लेख आढळून आलेला नाही. त्यामुळे सदर योजना राबविताना जी.आय.पाईप व इतर साहित्याची खरेदी कशाच्या आधारे करण्यात आलेली आहे, याबाबत खुलासा करावा.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 118(3) नुसार संरचनात्मक फेरफार असल्यास त्यास पूर्व मंजूरी घेणे आवश्यक होते. तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच नियम 120(2) नुसार कामामध्ये एखादया बाबीवर होणारी बचत ही इतर बाबींवर खर्च करता येत नाही. तथापि, सदर कामामध्ये बचतीची रक्कम इतर बाबींवर खर्च केल्याचे दिसून येत आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 नुसार कार्यादेश आदेश अंदाजपत्रकीय दरापेक्षा ठेकेदाराने 12 टक्के दराने म्हणजेच रुपये 12,71,357/- या रक्कमेवर शासन निर्णयानुसार सुरक्षा अनामत, विक्रीकर, आयकर, कामगार उपकर, विमा निधी कपात करण्यात आल्याचे दिसून येत नाही. शासन निर्णयानुसार कपात करुन शासन भरणा करणेत यावी.

8) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि/10/1009/ख, दिनांक 11/02/2010 अन्वये गौण खनिजासाठीचे स्वामित्वधन वसूल करणे आवश्यक आहे. सबब कामावर वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची रक्कम कपात करण्यात आली नसल्याचे कामाच्या नस्तीसोबत गौण खनिज स्टेटमेंट जोडलेले नाही. गौण खनिजाच्या बाबतीत प्रत्यक्ष संचिकेत झालेल्या कामाच्या बाबनिहाय लेखापरीक्षण केले असता, गौण खनिज वापरल्याचे दिसून येते. त्यावरील गौण खनिजाच्या रक्कमा वसुल करण्यात आलेल्या दिसून येत नाही, याबाबत खुलासा करावा.

**3.470 सातपाटी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेची पाईप लाईन दुरुस्ती करणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 29,83,807/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दैनिक सकाळमध्ये जाहिरात दिल्याचे टिपणीत नमूद आहे. जाहिरातीचे कात्रनाची प्रत नस्तीला जोडलेली नाही. त्यामुळे सदर कामाची निविदा जाहिरात दिली किंवा कसे, निविदा कालावधी किती, याबाबतची खात्री करता आली नाही. तसेच जाहिरात प्रासिद्ध करणेबाबतचे कळविण्याचे पत्राची प्रत नस्तीला जोडलेली नाही. तरी याबाबतचा खुलासा करावा.

2) सदर कामाचे करारपत्रावर ठेकेदाराची स्वाक्षरी आहे. परंतु, करारपत्र करून घेणारे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांची स्वाक्षरी नाही.

3) सदर कामाचे नस्तीला निविदा सुचनांची प्रत जोडलेली नाही. निविदा सुचनांची प्रत दांडी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेची पाईप लाईन दुरुस्तीची प्रत जोडली आहे.

4) सदर कामाचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेत 200 mm dia DIK 9 पाईप चा दर रूपये 2,008/- तर 150 mm dia DIK 9 पाईपचा दर रूपये 1,492/- नोंदला आहे. सदरचा दर दरसूची 2012-2013 (PWD/MGP) मध्ये आढळून आला नाही. तरी सदरचा दर बरोबर नोंदला असल्याची खात्री करावी.

5) सदर कामाचे विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य अधिसूचना विसआ (मुख्य)**1** /मुवक/2005/97/दिनांक 29/08/2005 व महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 04/04/2012 नुसार रूपये 5 लाखाचे वरील कामांचे देयकातून मूल्यवर्धित कराची (VAT) रक्कम सरसकट 5 टक्के वसूल करावयाची आहे. असे असताना सदर देयकातून रूपये 1,49,190/- वसूल करावयाची असताना 2 टक्के रक्कम रूपये 59,677/- वसूल केली आहे. तरी कमी वसूल केलेली रक्कम रूपये 89,513/- संबधितांवर जबाबदारी निश्चित करून वसूल करून अनुपालन लेखा तपासणीस दाखवावे.

6) भारतीय आयकर अधिनियम सेक्शन 194 (सी) नुसार वसूल केलेल्या आयकराचे रक्कमेवर 15 टक्के सरचार्ज वसूल करावयाचा आहे. तथापि, अशी रक्कम देयकातून वसूल केलेली नाही. अशी कमी वसूल रक्कम रूपये 8,952/- वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

7) शासन महसूल व वन विभाग निर्णय क्रमांक गौखनि-10/0206/ प्रक्र.-57ख, दिनांक 15/12/2006 नुसार बांधकामावर वापरलेल्या रेती खडी, मुरूम, डबर यांचे रूपये 70.67 प्रती घ.मी. (रूपये 200/- प्रती ब्रास) दराने स्वमित्वाधानाची रक्कम वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. स्वमित्वाधानाची रक्कम शासन खाती भरणा केल्याच्या पावत्या प्रमाणकासोबत जोडलेल्या नाहीत. सदर पावत्या घेऊन सादर कराव्यात अन्यथा अशी कमी वसूल केलेली रक्कम रूपये 2,13,406/- ठेकेदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 नुसार प्रत्येक कामाचा करारनामा नमूना नंबर 48 मधील नोंदवहीत नोंदवून मक्तेदाराला दिलेल्या रक्कमेच्या नोंदी घेणे आवश्यक असताना विभागाने अशी कार्यवाही केली नाही.

**3.471 अनविर ठाकरपाडा नळ पाणीपुरवठा योजना तयार करणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,18,351/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती2012/प्र.क्र.273/39, दिनांक 26/11/2014 नुसार 3 लाखापेक्षा अधिक खर्चाचे कामांना ई - निविदा कार्यपद्धत लागू केली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती 2012/प्र.क्र.273/39, दिनांक 18/12/2014 नुसार व त्यानंतरचे सुधारित आदेशांनुसार शासनाचे सर्व विभाग सर्व शासकीय विभागांची अधिनस्त  कार्यालये, ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था याना बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच काम वाटपाला एक वर्ष विलंब झालेला असताना उपरोक्त शासन आदेशानुसार ई  - निविदा मागविण्याची कार्यवाही न करता ग्रामपंचायतीला काम दिले आहे. तरी शासन आदेशानुसार कार्यवाही न करता कामाचा कार्यादेश कसा दिला, याबाबतचा  खुलासा करावा.

2) सदर कामास तांत्रिक मंजुरी कार्यकारी अभियंता TZP/WSD/PB-5/34, दिनांक 09/12/2013 प्राप्त झालेली असताना काम वाटप मात्र कार्यकारी अभियंता ठाजिप/पापुवि/निविदा दिनांक 30/03/2015 ने दोन वर्ष विलंबाने केले आहे. तरी याबाबतचा खुलासा करावा.

3) सदर कामाचा करारनामावर दिनांक नमूद नाही. कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी केली नाही. त्यामुळे कामाचा करारनामा कधी केला, याबाबतची पडताळणी करता आली नाही.

4) नस्तीसोबत जोडलेल्या ग्रामपंचायतीने भरलेल्या निविदेत Tender for work मध्ये सदर काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयार आहे किंवा कसे, याबाबतची नोंद नाही. तसेच सदर नोंदीवर कार्यकारी उपअभियंता  यांची स्वाक्षरी नाही.

5) शासन महसूल व वन विभाग, निर्णय क्रमांक गौखनि-10/0206/ प्रक्र.-57ख, दिनांक 15/12/2006 नुसार बांधकामावर वापरलेल्या रेती खडी, मुरूम, डबर यांचे रूपये 70.67 प्रती घ.मी.(रूपये 200/- प्रती ब्रास) दराने व महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-अ दिनांक 11/05/2015 नुसार बांधकामावर वापरलेल्या रेती खडी, मुरूम, डबर यांचे रूपये 141.34 प्रती घ.मी. (रूपये 400/- प्रती ब्रास) नुसार स्वमित्वाधानाची रक्कम वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. स्वमित्वाधानाची रक्कम शासन खाती भरणा केल्याच्या पावत्या प्रमाणकासोबत जोडलेल्या नाहीत. सदर पावत्या घेऊन सादर कराव्यात अन्यथा अशी कमी वसूल केलेली रक्कम रूपये 1,785/- ठेकेदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

6) मोजमाप पुस्तिकेत बाब क्रमांक 52 मध्ये MSEB चार्जेस रूपये 2,200/- भरल्याचा खर्च नोंदला आहे. नस्तीला MSEB ला रक्कम भरल्याची पावती जोडली नाही. पावती सादर करणे आवश्यक आहे.

7) मोजमाप पुस्तिकेत बाब क्रमांक 1 नुसार YIELD TESTING CHARGES रूपये 3,000/- भरल्याचा खर्च नोंदला आहे. नस्तीला YIELD TESTING चा रिपोर्ट जोडलेला नाही.  तरी YIELD TESTING  अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार नमूना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवली नाही.

**3.472 शिलोंडा गांगडपाडा नळ पाणीपुरवठा योजना करणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,32,689/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाची पहिला ई - निविदा कॉल दिनांक 05/11/2014 रोजी प्रसिद्ध करण्यात येऊन दिनांक 20/11/2014 पर्यत (तीन कॉल मध्ये) 15 दिवसांची मुदत देण्यात आली. सदर पहिल्या कॉलमध्ये निविदा प्राप्त न झाल्याने त्यानंतर दुसरा ई - निविदा कॉल दिनांक 13/12/2014 ते 26/12/2014 या कालावधीत (तीन कॉलमध्ये ) मागविण्यात आला असून मागविण्यात आला असून त्यामध्ये दोन निविदा असून ती निविदा श्री.हरेश बोअरवेल यांची होती व दुसरी निविदा श्री. रामा दशरथ कोरे यांची आहे. श्री. रामा दशरथ कोरे यांचे कागदपत्र अपूर्ण असल्याने ती

अपात्र ठरवण्यात आली आहे. त्या नंतर विभागाने तिसरा निविदा कॉल न देता श्री.हरेश बोअरवेल यांची निविदा मंजूर केली आहे. तरी विभागाने शासन निर्णय क्रमांक निविदा 2012/प्र.क्र.97/परा-**7**दिनांक 23/09/2013 मधील अनुक्रमांक 3(3) प्रथम मुदतवाढी नंतरही तीन पेक्षा कमी निविदा धारकांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास अनुक्रमांक 3(2) मध्ये नमूद केले प्रामाणे पुन्हा वेळीच शुद्धीपत्रक प्रसिद्ध करून 7 दिवसांची पुन्हा मुदतवाढ द्यावयाची आहे. (अशी दोन वेळा मुदतवाढ न देता) तथापि, अशी कार्यवाही विभागाने न करता दुसऱ्या निविदा कॉलमध्ये प्राप्त झालेल्या निविदाधारक श्री.हरेश बोअरवेल यांची निविदा नियमबाह्यपणे मंजूर केली आहे. तरी याबाबत खुलासा करावा.

2) सदर कामाची टेंडर नोटीस व वर्तमान पत्रात निविदा प्रसिद्ध केल्याची पेपरच्या कात्रणाची प्रत नस्तीला जोडलेली नाही.

3) सदर कामास तांत्रिक मंजुरी कार्यकारी अभियंता TZP/WSD/PB-5/57, दिनांक 16/03/2013 व प्रशासकीय मंजुरी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, डहाणू यांचे जा.क्र .ठबायो/ 2093प्र.क्र./ का.4(2)/ 1443, दिनांक 21/02/2014 ने प्राप्त झाली आहे. तरी प्रशासकीय मंजुरी पूर्वी तांत्रिक मंजुरी कशी घेण्यात आली, याबाबतचा खुलासा करावा.

4) सदर कामास तांत्रिक मजुरी कार्यकारी अभियंता TZP/WSD/PB-5/57, दिनांक 16/03/2013 ला घेण्यात आली असून निविदा प्रसिद्ध मात्र दिनांक 05/11/2014 लाएक ते दीड वर्ष विलंबाने केली आहे, याबाबतचा खुलासा करावा.

5) सदर कामाचे देयकातून विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य अधिसूचना विसआ (मुख्य)**1** /मुवक/2005/97, दिनांक 29/08/2005 व महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 04/04/2012 नुसार 5 लाखांचे वरील कामांचे देयकातून मूल्यवर्धित कराची (VAT)रक्कम (ठेकेदार नोंदणी झालेला आहे. याचा विचार न करता) सरसकट 5 टक्के वसूल करावयाची आहे. असे असताना सदर देयकातून रूपये 36,634/- वसूल करावयाची असताना 2 टक्के रक्कम रूपये 14,654/- वसूल केली आहे. तरी कमी वसूल केलेली रक्कम रूपये 21,980/- संबधितांवर जबाबदारी निश्‍चित करून वसूल करून अनुपालन लेखा तपासणीस दाखवावे.

6) भारतीय आयकर अधिनियम सेक्शन 194(सी) नुसार वसूल केलेल्या आयकराचे रक्कमेवर 15 टक्के सरचार्ज वसूल करावयाचा आहे. तथापि, अशी रक्कम देयकातून वसूल केलेली नाही. अशी कमी वसूल रक्कम रूपये 2,198/- (14,654 चे 15 टक्के) वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

7) मोजमाप पुस्तिकेत YIELD TESTING CHARGES रूपये 2,000/- भरल्याचा खर्च नोंदला आहे. नस्तीला YIELD TESTING चा रिपोर्ट जोडलेला नाही. तरी YIELD TESTING अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार नमूना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 नुसार प्रत्येक कामाचा करारनामा नमूना नंबर 48 मधील नोंदवहीत नोंदवून मक्तेदाराला दिलेल्या रक्कमेच्या नोंदी घेणे आवश्यक असताना विभागाने अशी कार्यवाही केली नाही.

**3.473 कळमदेवी लहांगेपाडा लघु नळ पाणीपुरवठा योजना करणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत रक्कम रुपये 9,89,906/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाची पहिला ई - निविदा कॉल दिनांक 06/11/2014 रोजी प्रसिद्ध करण्यात येऊन दिनांक दिनांक 06/11/2014 ते 20/11/2014 पर्यत (तीन कॉलमध्ये) **15** दिवसांची मुदत देण्यात आली. सदर पहिल्या ई - निविदा कॉल एक निविदा प्राप्त झाली असून ती श्री.हरेश बोअरवेल यांची होती. त्यानंतर विभागाने दुसरा निविदा कॉल न देता श्री.हरेश बोअरवेल यांची निविदा मंजूर केली आहे. तरी विभागाने शासन निर्णय क्रमांक निविदा

2012/प्र.क्र.97/परा-**7**, दिनांक 23/09/2013 मधील अनुक्रमांक 3(3) प्रथम मुदतवाढी नंतरही तीन पेक्षा कमी निविदा धारकांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास अनुक्रमांक 3(2) मध्ये नमूद केलेप्रमाणे पुन्हा वेळीच शुद्धीपत्रक प्रसिद्ध करून 7 दिवसांची पुन्हा मुदतवाढ द्यावयाची आहे. (अशी दोन वेळा मुदतवाढ न देता) तथापि, अशी कार्यवाही विभागाने न करता पहिल्या निविदा कॉलमध्ये प्राप्त झालेल्या निविदाधारक श्री.हरेश बोअरवेल यांची निविदा नियमबाह्यपणे मंजूर केली आहे. तरी याबाबत खुलासा करावा.

2) शासन निर्णय क्रमांक निविदा 2012/प्र.क्र.97/परा-**7**, दिनांक 23/09/2013 मध्ये नमूद केलेप्रमाणे रूपये 5 लाख ते 50 लाखापार्यंताची कामासाठी निविदा सुचना कालावधी प्रथम कॉलसाठी 15 दिवस, दुसरा कॉलसाठी 08 दिवस व तिसरा कॉल साठी 05 दिवसांची मुदत द्यावयाची असतांना विभागाने पहिल्या कॉलसाठी दिनांक 06 ते 12/11/2014 दुसरा कॉलसाठी दिनांक 12 ते 17/11/2014 व तिसरा कॉलसाठी 17 ते 20/11/2014 अशी एकूण 15 दिवसात तीन कॉल देऊन नियमबाह्य कार्यवाही केली आहे. त्यामुळे शासन आदेशानुसार कार्यवाही झाली नाही. याबाबतचा खुलासा करावा.

3) सदर कामाची टेंडर नोटीस व वर्तमान पत्रात निविदा प्रसिद्ध केल्याची पेपरच्या कात्रणाची प्रत नस्तीला जोडलेली नाही. त्यामुळे टेंडर नोटीस व जाहिरात दिली किंवा कसे, त्यातील निविदाची कालावधी, अंतिम मुदत निविदा उघडण्याचा कालावधी निविदेच्या अटी व शर्ती याबाबतची पडताळणी करता आली नाही.

4) सदर कामाचे देयकातून विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य अधिसूचना विसआ (मुख्य)**1** /मुवक/2005/97, दिनांक 29/08/2005 व महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 04/04/2012 नुसार 5 लाखाचे वरील कामांचे देयकातून मूल्यवर्धित कराची (VAT) रक्कम सरसकट 5 टक्के वसूल करावयाची आहे. असे असताना सदर देयकातून 5 टक्के रूपये 49,495/- वसूल करावयाची असताना 2 टक्के रक्कम रूपये 19,798/- वसूल केली आहे. तरी कमी वसूल केलेली रक्कम रूपये 29,697/- संबधितांवर जबाबदारी निश्चित करून वसूल करून अनुपालन लेखा तपासणीस दाखवावे.

5) भारतीय आयकर अधिनियम सेक्शन 194(सी) नुसार वसूल केलेल्या आयकराचे रक्कमेवर 15 टक्के सरचार्ज वसूल करावयाचा आहे. तथापि, अशी रक्कम देयकातून वसूल केलेली नाही. अशी कमी वसूल रक्कम रूपये 2,970/- वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

6) मोजमाप पुस्तिका बाब क्रमांक 14 providing and fixing in position ms/HYSD/TMT/steel bar re inforcement of various dia for rcc pipe caps footing, foundation slab beams चे एकूण 0.496 MT असताना 0.723 नोंदविले आहे. त्यामुळे रक्कम रूपये 14,573/- जादा प्रदान झाले आहे. तरी सदराची जादा प्रदान रक्कम संबधीतांकडून वसूल करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

7) मोजमाप पुस्तिका RCC PLATFORM -बाब क्र.5 providing & lying in situ c.c. in M250 trap/ granite in mortal of RCC work ची क्वान्टीटी 1.32 असताना 1.87 नोंदली आहे. म्हणजेच रक्कम रूपये 3,868/- चे ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. तरी सदरची जादा प्रदान रक्कम संबधीतानकडून वसूल करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

8) मोजमाप पुस्तिका RCC PLATFORM - बाब क्रमांक 6 P&L in situ c.c. in M250 all typesऑफ columns trap metal for RCC work चे क्वान्टीटी 2.12 घ.मी. असताना 3.65 नोंदविली आहे. म्हणजेच रक्कम रूपये 13,274/- चे ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. तरी सदरची जादा प्रदाण रक्कम संबधीतांकडून वसूल करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार नमूना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवली नाही.

**3.474 कळमदेवी पाटीलपाडा लघु नळ पाणीपुरवठा योजना करणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,07,723/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाची पहिला ई - निविदा कॉल दिनांक 06/11/2014 रोजी प्रसिद्ध करण्यात येऊन दिनांक 06/11/2014 ते 20/11/2014 पर्यत (तीन कॉलमध्ये) **15** दिवसांची मुदत देण्यात आली. सदर पहिल्या ई - निविदा कॉलमध्ये एक निविदा प्राप्त झाली असून ती श्री.हरेश बोअरवेल यांची होती. त्यानंतर विभागाने दुसरा निविदा कॉल न देता श्री. हरेश बोअरवेल यांची निविदा मंजूर केली आहे. तरी विभागाने शासन निर्णय क्रमांक निविदा 2012/प्र.क्र.97/परा-**7**, दिनांक 23/09/2013 मधील अनुक्रमांक 3(3) प्रथम मुदतवाढी नंतरही तीन पेक्षा कमी निविदा धारकांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास अनुक्रमांक 3(2) मध्ये नमूद केलेप्रमाणे पुन्हा वेळीच शुद्धीपत्रक प्रसिद्ध करून 7 दिवसांची पुन्हा मुदतवाढ द्यावयाची आहे. (अशी दोन वेळा मुदतवाढ न देता) तथापि, अशी कार्यवाही विभागाने न करता पहिल्या निविदा कॉलमध्ये प्राप्त झालेल्या निविदा धारक श्री.हरेश बोअरवेल यांची निविदा नियमबाह्यपणे मंजूर केली आहे. तरी याबाबत खुलासा करावा.

2) शासन निर्णय क्रमांक निविदा 2012/प्र.क्र.97/परा-**7**, दिनांक 23/09/2013 मध्ये नमूद केलेप्रमाणे रूपये 5 लाख ते 50 लाखापार्यताची कामासाठी निविदा सुचना कालावधी प्रथम कॉलसाठी 15 दिवस, दुसरा कॉलसाठी 08 दिवस व तिसरा कॉलसाठी 05 दिवसांची मुदत द्यावयाची असतांना विभागाने पहिल्या कॉलसाठी दिनांक 06 ते 12/11/2014 दुसरा कॉलसाठी दिनांक 12 ते 17/11/2014 व तिसरा कॉलसाठी 17 ते 20/11/2014 अशी एकूण 15 दिवसात तीन कॉल देऊन नियमबाह्य कार्यवाही केली आहे. त्यामुळे शासन आदेशानुसार कार्यवाही झाली नाही. याबाबतचा खुलासा करावा.

3) सदर कामाची टेंडर नोटीस व वर्तमान पत्रात निविदा प्रसिद्ध केल्याची पेपरच्या कात्रणाची प्रत नस्तीला जोडलेली नाही. नस्तीला जोडलेल्या टिपणीत कोणत्या वृत्तपत्रात जाहिरात दिली, याचा उल्लेख नाही. त्यामुळे टेंडर नोटीस व जाहिरात दिली किंवा कसे, त्यातील निविदाची कालावधी, अंतिम मुदत निविदा उघडण्याचा कालावधी निविदेच्या अटी व शर्ती याबाबतची पडताळणी करता आली नाही.

4) सदर कामाचे देयकातून विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य अधिसूचना विसआ (मुख्य)**1** /मुवक/2005/97, दिनांक 29/08/2005 व महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 04/04/2012 नुसार 5 लाखाचे वरील कामांचे देयकातून मूल्यवर्धित कराची (VAT) रक्कम सरसकट 5 टक्के वसूल करावयाची आहे. असे असताना सदर देयकातून 5 टक्के रूपये 35,386/- वसूल करावयाची असताना 2 टक्के रक्कम रूपये 14,154/- वसूल केली आहे. तरी कमी वसूल केलेली रक्कम रूपये 21,232/- संबधितांवर जबाबदारी निश्चित करून वसूल करून अनुपालन लेखा तपासणीस दाखवावे.

5) भारतीय आयकर अधिनियम सेक्शन 194(सी) नुसार वसूल केलेल्या आयकराचे रक्कमेवर 15 टक्के सरचार्ज वसूल करावयाचा आहे. तथापि, अशी रक्कम देयकातून वसूल केलेली नाही. अशी कमी वसूल रक्कम रूपये 2,123/- वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

6) मोजमाप पुस्तिका RCC PLATFORM - बाब क्रमांक 9 providing fixing in position MS/HYSD/TMT steel bar reinforcement of various dior for RCC pite, caps,footing, foundation, slab, beams & colums etc.ची एकूण क्वान्टीटी 0.316 MT येत असताना 0.723 MT नोंदली आहे. म्हणजेच 0.407 MT जादा नोंदलेली आहे. त्यामुळे ठेकेदारास रक्कम रूपये 26,129/- चे जादा प्रदान झाले आहे. तरी सदरची जादा प्रदान रक्कम संबधीतांकडून वसूल करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

7) प्राकलनातील RISING & DISTRIBUTION SYSTEEM मधील बाब क्रमांक 18 providing & constructing two teps stand post as par type design साठी 6 स्टँड पोस्ट ची तरतूद केलेली असताना प्रत्यक्षात 12 स्टँड पोस्ट बांडलेले आहेत. त्यामुळे सदर बाबीवर रक्कम रूपये 52,536/- चा जादा खर्च झाला आहे.

8) सदर योजनेस प्रशासकीय मान्यता दिनांक 21/02/2014 रोजी प्राप्त झालेली आहे व निविदा मंजुरी दिनांक 03/12/2014 झालेली असताना कामाचा कार्यादेश मात्र दिनांक 25/02/2015 रोजी 3 महिने विलंबाने दिला आहे. कामाची मुदत 6 महिने असल्याने सदर योजनेचा लाभ गावातील लोकांना सन 2014 व सन 2015 चे उन्हाळ्यात झाला नाही. याबाबतचा खुलासा करावा.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 118 नुसार कोणत्याही मंजूर केलेल्या किंवा प्रमाण संकल्प चित्रात कार्यकारी अभियंत्याच्या मान्यतेशिवाय उपाभियंता बांधकाम पार पडतेवेळी कोणतेही महत्वाचे फेरफार करणार नाहीत. जादा खर्च लागेल असा कोणताही महत्वाचा फेरफार करणे आवश्यक आहे, असे वाटत असल्यास सुधारित किवा पूरक अंदाज मंजुरीसाठी सादर करण्यात येतील. दिरंगाई गैरसोयीची होत असेल, अशा निकडीच्या बाबतीत वरिष्ठ प्राधिकाऱ्यास परिस्थितीचे तात्काळ निवेदन करण्यात येईल व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. असे असताना अशी कार्यवाही संबंधितांनी केलेली नाही. त्यामुळे जादा झालेला खर्च रक्कम रूपये 52,536/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार नमूना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवली नाही.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 नुसार प्रत्येक कामाचा करारनामा नमूना नंबर 48 मधील नोंदवहीत नोंदवून मक्तेदाराला दिलेल्या रक्कमेच्या नोंदी घेणे आवश्यक असताना विभागाने अशी कार्यवाही केली नाही.

**3.475 ग्रामपंचायत आसे अंतर्गत धामणी तालुका मोखाडा विहीर खोलीकरण करणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,31,336/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती2012/प्र.क्र.273/39, दिनांक 26/11/2014 नुसार 3 लाखापेक्षा अधिक खर्चाचे कामांना ई - निविदा कार्यपद्धत लागू केली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती 2012/प्र.क्र.273/39, दिनांक 18/12/2014 नुसार व त्यानंतरचे सुधारित आदेशांनुसार शासनाचे सर्व विभाग, सर्व शासकीय विभागांची अधिनस्त कार्यालये, ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना बंधनकारक करण्यात आले आहे. उपरोक्त शासन आदेशानुसार कार्यवाही न करता ग्रामपंचायतीला कामाचे वाटप करण्यात आले आहे.

2) कामाचे करारनामावर करारनामा केल्याचा दिनांक नमूद नाही. त्यामुळे कामाचा करारनामा कधी केला, याबाबतची पडताळणी करता आली नाही.

3) सदर कामाचे देयकासोबत ग्रामपंचायतीचे PAN व TIN कार्ड ची प्रमाणीत प्रत जोडलेली नाही.

4) शासन महसूल व वन विभाग, निर्णय क्रमांक गौखनि-10/0206/ प्रक्र.-57ख, दिनांक 15/12/2006 नुसार बांधकामावर वापरलेल्या रेती खडी, मुरूम, डबर यांचे रूपये 70.67 प्रती घ.मी. (रूपये 200/-प्रती ब्रास) दराने व महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-अ दिनांक **11/05/2015** नुसार बांधकामावर वापरलेल्या रेती खडी, मुरूम, डबर यांचे रूपये 141.34 प्रती घ.मी. (रूपये 400/- प्रती ब्रास) नुसार स्वमित्वाधानाची रक्कम वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. स्वमित्वाधानाची रक्कम शासन खाती भरणा केल्याच्या पावत्या प्रमाणकासोबत जोडलेल्या नाहीत. सदर पावत्या घेऊन सादर कराव्यात अन्यथा अशी कमी वसूल केलेली रक्कम रूपये 18,099/- ठेकेदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

5) सदर कामाचे नस्तीसोबत जोडलेल्या cement Consumption statement नुसार 180 सिमेंट बँग वापरल्याचे नमूद आहे. परंतु, देयकासोबत सिमेंट खरेदीच्या पावती जोडलेली नाहीत. त्यामुळे तितकेच सिमेंट खरेदीचे प्रमाणीत होत नाही.

6) सदर कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल सादर न केल्यामुळे R.M. रूपये 12,003/- देयकातून कापून ठेवली आहे. कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल सादर न केल्यामुळे कामावर योग्य दर्जाचे साहित्य वापरल्याचे प्रमाणीत होत नाही.

7) WATER SAMPALE TESTING रिपोर्ट देयकासोबत जोडलेला नाही. त्यामुळे सदर बांधलेल्या विहिरीचे पाणी पिण्यायोग्य असल्याची खात्री होत नाही. WATER SAMPALE TESTING रिपोर्ट देयकासोबत जोडणे आवश्यक आहे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार नमूना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवली नाही.

9) काम पूर्णत्वाचे दाखल्यावर दिनांक नमूद नाही. त्यामुळे काम कधी पूर्ण झाले, याची खात्री होत नाही.

10) सदरचे काम महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत असल्याने सदर कामाचा कार्यादेश उन्हाळ्यात देणे आवश्यक आहे. विहीर खोलीकरणासारखे काम पावसाळ्यात कसे चालू केले, याबाबतचा खुलासा करावा. शासकीय दिरंगाईमुळे जनतेस पिण्याच्या पाण्यासारख्या महत्वाच्या सुविधेपासून उन्हाळा 2015 मध्ये वंचित रहावे लागले.

**3.476 ग्रामपंचायत डोल्हारा तालुका मोखाडा येथे पिण्याचे पाण्याची विहीर खोलीकरण करणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 24) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,99,443/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती2012/प्र.क्र.273/39, दिनांक 26/11/2014 नुसार 3 लाखापेक्षा अधिक खर्चाचे कामांना ई - निविदा कार्यपद्धत लागू केली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती 2012/प्र.क्र.273/39, दिनांक 18/12/2014 नुसार व त्यानंतरचे सुधारित आदेशांनुसार शासनाचे सर्व विभाग सर्व शासकीय विभागांची अधिनस्त कार्यालये, ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना बंधनकारक करण्यात आले आहे. उपरोक्त शासन आदेशानुसार कार्यवाही न करता कामाचे वाटप करण्यात आले आहे, याबाबतचा खुलासा करावा.

2) कामाचे करारनामावर करारनामा केल्याचा दिनांक नमूद नाही. त्यामुळे कामाचा करारनामा कधी केला, याबाबतची पडताळणी करता आली नाही.

3) सदर कामाचे देयकासोबत ग्रामपंचायतीचे PAN व TIN कार्ड ची प्रामाणीत प्रत जोडलेली नाही.

4) सदर कामाचे प्राकलनाप्रमाणे मोजमाप पुस्तिकेत बाब क्रमांक 2 providing & lying in c.c. in praportion M20 चा DSR दर रूपये 4,547/- आहे. त्यात 10 टक्के धरल्यानंतर रूपये 5,001.70 घ्यावयाचा असताना रूपये 5,868/- घेतला आहे. म्हणजेच रूपये 866.30 जादा घेतला आहे. मोजमाप पुस्तिकेत बाब क्रमांक 2 मध्ये 5.57 घ.मी. घेतले आहेत. म्हणजेच रूपये 4,825/- चे जादा प्रदान झाले आहे.

5) मोजमाप पुस्तिकेत Excavation for foundation in hard rock 98.90 घ.मी. घेतले आहे. त्यातून Available serviceable material will be deducted 20 टक्के हार्ड रॉक 98.90 घ.मी. चे 20 टक्के 19.78 x 425.21 = रूपये 8,410.65 देयकातून वजा न केल्याने रक्कम रूपये 8,411/- चे ठेकेदाराला जादा प्रदान झाले आहे. सदर रक्कम वसूल करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

6) महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-अ दिनांक 11/05/2015 नुसार बांधकामावर वापरलेल्या रेती खडी, मुरूम, डबर यांचे रूपये 141.34 प्रती घ.मी. (रूपये 400/- प्रती ब्रास) नुसार स्वमित्वाधनाची रक्कम वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. स्वमित्वाधनाची रक्कम शासन खाती भरणा केल्याच्या पावत्या प्रमाणकासोबत जोडलेल्या नाहीत. सदर पावत्या घेऊन सादर कराव्यात अन्यथा अशी कमी वसूल केलेली रक्कम रूपये 21,382/- ठेकेदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

7) सदर कामाचे देयकातून भारतीय आयकर अधिनियम सेक्शन 194(सी) नुसार वसूल केलेल्या आयकराचे रक्कमेवर 15 टक्के सरचार्ज वसूल करावयाचा आहे. तथापि, अशी रक्कम देयकातून वसूल केलेली नाही. अशी कमी वसूल रक्कम रूपये 1,198/- वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

8) सदर कामाचे मोजमाप पुस्तिकेत aditional S.D. रूपये 30,000/- वजा करण्यात आली आहे. परंतु, सदर रक्कम देयाकांतून वसूल केलेली नाही. तरी सदर रक्कम का वसूल करण्यात आली नाही, याबाबतचा खुलासा करावा. तरी सदर रक्कम रूपये 30,000/- वसूल करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

9) सदर कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल देयकासोबत जोडलेला नाही. कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल जोडलेला नसताना देयक कशाच्या आधारे प्रदान करण्यात आले, याबाबतचा खुलासा करावा.

10) मोजमाप पुस्तिकेत व काम पूर्णत्वाचे दाखल्यावर (form no. 65) दिनांक नमूद नाही. त्यामुळे काम कधी पूर्ण झाले, याची खात्री होत नाही.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार नमूना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवली नाही.

**3.477 ग्रामपंचायत किनिस्ते तालुका मोखाडा येथील विहीर खोलीकरण व नुतनीकरण करणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,95,598/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती2012/प्र.क्र.273/39, दिनांक 26/11/2014 नुसार 3 लाखापेक्षा अधिक खर्चाचे कामांना ई - निविदा कार्यपद्धत लागू केली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती 2012/प्र.क्र.273/39, दिनांक 18/12/2014 नुसार व त्यानंतरचे सुधारित आदेशांनुसार शासनाचे सर्व विभाग सर्व शासकीय विभागांची अधिनस्त कार्यालये, ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था याना बंधनकारक करण्यात आले आहे. उपरोक्त शासन आदेशानुसार कार्यवाही न करता कामाचे वाटप करण्यात आले आहे. याबाबतचा खुलासा करावा.

2) कामाचे करारनामावर करारनामा केल्याचा दिनांक नमूद नाही. त्यामुळे कामाचा करारनामा कधी केला, याबाबतची पडताळणी करता आली नाही.

3) सदर कामाचे देयकासोबत ग्रामपंचायतीचे PAN व TIN कार्ड ची प्रमाणीत प्रत जोडलेली नाही.

4) सदर कामाचे प्राकलनाप्रमाने मोजमाप पुस्तिकेत बाब क्रमांक 2 providing & lying  in c.c. in Proportion M20 चा DSR दर रूपये 4,547/- आहे. त्यात 10 टक्के धरल्यानंतर रूपये 5,001.70 घ्यावयाचा असताना रूपये 5,868/- घेतला आहे. म्हणजेच रूपये 866.30 जादा घेतला आहे. मोजमाप पुस्तिकेत बाब क्रमांक 2 मध्ये 5.57 घ.मी.घेतले आहेत. म्हणजेच रूपये 4,825/- चे जादा प्रदान झाले आहे.

5) मोजमाप पुस्तिकेत Excavation for foundation in hard rock 76.14घ.मी. घेतले आहे. त्यातून Available serviceable material will be deducted 20 टक्के हार्ड रॉक 98.90 घ.मी.चे 20 टक्के 15.22 x 425.21 = रूपये 6,472/- देयकातून वजा न केल्याने रक्कम रूपये 6,472/- चे ठेकेदाराला जादा प्रदान झाले आहे. सदर रक्कम वसूल करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

6) शासन महसूल व वन विभाग, निर्णय क्रमांक गौखनि-10/0206/ प्रक्र.-57ख, दिनांक 15/12/2006 नुसार बांधकामावर वापरलेल्या रेती खडी, मुरूम, डबर यांचे रूपये 70.67 प्रती घ.मी.(रूपये 200/- प्रती ब्रास) दराने स्वमित्वधनाची रक्कम वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. स्वमित्वाधानाची रक्कम शासन खाती भरणा केल्याच्या पावत्या प्रमाणकासोबत जोडलेल्या नाहीत. सदर पावत्या घेऊन सादर कराव्यात अन्यथा अशी कमी वसूल केलेली रक्कम रूपये 18,298/- ठेकेदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

7) सदर कामाचे देयकातून भारतीय आयकर अधिनियम सेक्शन 194(सी) नुसार वसूल केलेल्या आयकराचे रक्कमेवर 15 टक्के सरचार्ज वसूल करावयाचा आहे. तथापि, अशी रक्कम देयकातून वसूल केलेली नाही. अशी कमी वसूल रक्कम रूपये 887/- वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

8) सदर कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल देयकासोबत जोडलेला नाही. कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल जोडलेला नाही. देयक काय आधारे प्रदान करण्यात आले, याबाबतचा खुलासा करावा.

9) मोजमाप पुस्तिकेत कामाची मोजमापे मान्य असलेबाबत ठेकेदाराची स्वाक्षरी घेतली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार नमूना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवली नाही.

**3.478 मौजे सावरसई आश्रमशाळा येथे साठवण बंधारा बांधणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत रक्कम रुपये 19,46,331/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) काम सुरु होण्यापूर्वी व चालू असताना कामाची स्थिती दर्शविणारे छायाचित्र नस्तीसोबत जोडणे आवश्यक असताना छायाचित्र (फोटो) जोडण्यात आलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपर 2009/प्र.क्र.-180/परा-8, दिनांक 04/07/2009 अन्वये कामाच्या ठिकाणी कामाच्या नावाचा फलक लावणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची अधिसुचना दिनांक 04/04/2012 अन्वये कामाच्या देयकातून 5 टक्के विक्रीकर कपात करणे आवश्यक असताना ते 2 टक्के विक्रीकर कपात केली आहे. सदर कमी कपात रक्कम रुपये 58,390/- वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

4) करारनामावर दिनांक नमूद केलीली नाही. त्यामुळे करारनामा कधी केला, याची पडताळणी करता आली नाही. तसेच करारनामावर कामाचे अटी व शर्ती नमूद करणे आवश्यक असताना नमूद केलेली नाही. त्याचप्रमाणे साठवण बंधारामध्ये एक पावसाळापर्यंत त्याची क्षमता तसेच बंधाऱ्यामध्ये गळती होत नाही, याबाबत खात्री करून ठेकदाराची पुर्ण रक्कम देणे अपेक्षीत होते. अटी व शर्तीनुसार Defecet liability Period करीता ठराविक रक्कम राखून ठेवणे आवश्यक होते. यामूळे कामाचा दर्जा योग्य राखण्याबाबत खात्री झाली असती. तथापि, असे दिसून आले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधिल नियम 87 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये खडी, मुरुम, सिमेंट, स्टील इत्यादी साहित्याचे शासकिय प्रयोगशाळा चाचणी साहित्य वापरापुर्वी प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना सदर कामासाठी वापरलेली साहित्य सिमेंट, स्टील यांची चाचणी केली नाही.

6) बी- 1 फॉर्मच्या पान क्रमांक 4 ते 15, 20 ते 72 यावर कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरी नाहीत.

7) निविदा दिनांक 04/06/2016 रोजी मंजूर केली आहे. कामाचे कार्यादेश दिनांक 03/08/2016 रोजी दिली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिका परिच्छेद क्रमांक 217 नुसार निविदा मंजूर झालेपासून तीस दिवसाच्या आत कामाचा आदेश देणे आवश्यक असताना कामाचे कार्यादेश विलंबाने देण्यात आली आहे. विलंब का केला, याचा तपशील नाही.

8) बाब क्रमांक 06 नुसार पंपाची रुपये 28,872/- मोजमापाप्रमाणे मुल्यांकन व रक्कम अदा केल्याची दिसून येते. महाराष्ट्र शासन, लघुपाटबंधारे विभाग परिपत्रक क्रमांक IW/एल.आय., दिनांक 06/10/2009 अन्वये पाणी उपसा करण्यासाठी वापरलेल्या पपांचे लॉगबुक ठेवणे आवश्यक आहे. परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे झालेले मुल्यांकन रक्कम बरोबर असल्याची तपासणी करता आली नाही.

9) बाब क्रमांक 05 ने खोदाई केलेली डबराचे काय केले, ते मोजमाप पुस्तकामध्ये नमूद नाही. तसेच सदर डबराचे स्वामित्वधनाची (रॉयल्टी) रक्कम वसूल केलेली नाही. ते करणे आवश्यक आहे.

10) बाब क्रमांक 11 ने केलेल्या कामाचे स्वामित्व धनाची (रॉयल्टी) रक्कम वसूल केलेली नाही. ते करणे आवश्यक आहे.

11) कामाच्या मोजमापाच्या तारखा व प्रत्यक्षात काम करणेची पध्दत यामध्ये विसंगती आढळून येते. उदा;- पहिले कामाची जागाची साफसफाई, खोदाई, पाणी उपसणे इत्यादी कामानंतर काँक्रीट करणे आवश्यक असताना तसे न करता पहिले स्टील व कॉक्रेट काम व नंतर कामाची जागाची साफसफाई, खोदाई, पाणी उपसणे इत्यादी काम केल्याची दिसून येते.

12) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र. 44/33, दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मापन पुस्तिकेत नोंदी घेतल्यानंतर दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिकेत बाबनिहाय दिनांकित स्वाक्षरीच्या नोंदी नसल्याने तसेच मंजुर दैनंदिनी

उपलब्ध न झाल्यामुळे मोजमाप पुस्तिकेतील नोंदी जागेवर घेऊन कामाची गुणवत्ता व दर्जा राखण्यासंबधी योग्य सनियंत्रण केले किंवा कसे, याची खात्री होत नाही.

**3.479 डबेवाडी ते कातळपाडा येथील नाल्यास संरक्षक भिंत बांधकाम.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत रक्कम रुपये 3,04,592/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) काम सुरु होण्यापूर्वी व चालू असताना कामाची स्थिती दर्शविणारे छायाचित्र नस्तीसोबत जोडणे आवश्यक असताना छायाचित्र (फोटो) जोडण्यात आलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपर 2009/प्र.क्र.180/ परा-8, दिनांक 04/07/2009 अन्वये कामाच्या ठिकाणी कामाच्या नावाचा फलक लावणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा साहिंता 1968 चे 148 नुसार करारनामा करताना करारनाम्यात कामाचे अटी व शर्ती नमूद करणे आवश्यक असताना नमूद केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र. 44/33, दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मापन पुस्तिकेत नोंदी घेतल्यानंतर दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिकेत बाबनिहाय दिनांकित स्वाक्षरीच्या नोंदी नसल्याने तसेच मंजुर दैनंदिनी उपलब्ध न झाल्यामुळे मोजमाप पुस्तिकेतील नोंदी जागेवर घेऊन कामाची गुणवत्ता व दर्जा राखण्यासंबधी योग्य सनियंत्रण केले किंवा कसे, याची खात्री होत नाही.

5) बी- 1 फॉर्मच्या पान क्रमांक 4 ते 14, 16 ते 19, 22 ते 28, 30 ते 72 यावर कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरी नाहीत.

6) सदर देयकासोबत जोडलेल्या स्वामित्वधनाची विवरणपत्राप्रमाणे 108.49 ब्रासचे रुपये 400/- प्रमाणे एकूण 43,356/- वसूल करणे आवश्यक असताना केलीली नाही. सदरची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

7) सदर कामाची पहिले देयक (प्रमाणक) उपलब्ध न झाल्यामुळे सदर देयकाने अदा केलेली रक्कम किती होती, देयकातून कोणकोणते कपाती केल्या आहेत, याबाबत तपासणी करता आली नाही.

8) सदर कामाच्या नस्तीत उपलब्ध काम पूर्ण झाल्यानंतरची फोटोची व मोजमाप नोंदवहीनुसार नोंद केलेली बाब क्रमांक 5 चे काम याची पडताळणी केली असता मोजमाप नोंदवहीनुसार नोंद केलेली बाब क्रमांक 5 चे काम झाले नसल्याची फोटोवरून दिसून येते. सदरबाबत चौकशी करून सदरबाबत खर्च रक्कम 54,513/- वसूल करणे आवश्यक आहे.

**3.480 मौजे शिर टाकेवाडी येथे नळ पाणी योजना करणे. तालुका गुहागर.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,15,097/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सहकारी संस्थेतील सभासद किमान 75 टक्के कामगार असले पाहीजेत. याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 137(4) मध्ये संस्थेचे किमान 75 टक्के सभासद कामगार असले पाहिजे असतांना तसे होते किंवा कसे, याबाबत योग्य तो खुलासा करावा व पुर्तता अनुपालन सादर करावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 166 अ मध्ये 3 मधील चार मध्ये करारनामा क्रमांक व दिनांक या बाबींची नोंद मोजमाप पुस्तिकामध्ये घेणे आवश्यक आहे.

3) काम सुरु करण्यापुर्वी कामाचा विमा व कामगारांचा विमा हा विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे उतरविणे आवश्यक आहे. प्रशासकीय मान्यता देतांना सदर बाबीच्या अधीन राहुन प्रशासकीय मान्यता

दिलेली असतांना सदर विम्याची रक्कम कामाच्या प्रथम देयकाच्या वेळी कपात करण्यात आलेली आहे. याबाबत खुलासा करावा.

4) ग्रामपंचायत काम करण्यास तयार नसल्याचे कागदपत्रे नस्तीसोबत ठेवण्यात आलेले नाहीत. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2004/प्र.क्र.18/वित्त-9, दिनांक 30/06/2004 नुसार ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील करावयाची कामे प्राधान्याने ग्रामपंचायतीला देण्यात यावे असे असतांना ग्रामपंचायतीची असहमती असेल, तरच कामे मंजुर सहकारी संस्थांना किंवा सुशशिक्षित बेरोजगार अभियंता यांचा विचार करावा. असे असतांना ग्रामपंचायत काम करण्यास तयार नसलेबाबतची कागदपत्रे का घेण्यात आलेली नाहीत, याबाबत योग्य तो खुलासा करावा.

5) वरील कामासाठी 23 बॅग सिमेंट वापरले आहे. सदर सिमेंट चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही. महाराष्ट्र शासन, गामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/03/2010 नुसार सिमेंट खरेदी करुन प्रत्यक्ष बांधकामासाठी वापरण्यापुर्वी शासकीय प्रयोगशाळेकडुन गुणवत्ता चाचणी घेणे आवश्यक होते. मात्र तसे केलेले नाही.

6) अंदाजपत्रकामध्ये बाब क्रमांक 5 मध्ये स्युईस व्हॉल नग 2 त्यांची किंमत रुपये 10,160/- इतका खर्च दाखविली आहे. परंतु, मोजमाप पुस्तिकेत त्यांची नोंद नाही. सदर साहित्याचा प्रत्यक्षात का वापर झालेला नाही, याबाबत योग्य तो खुलासा करावा.

7) सदर नळपाणी योजनेसाठी 3 एच. पी. पंप वापर करण्यात आलेला आहे. सदर पंप आय.एस.आय.मार्क असलेबाबत पडताळणी करता आली नाही.

8) वरील काम पुर्ण झालेनंतर ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करणे आवश्यक होते. परंतु, तसे केलेले नाही. हस्तांतरीत केलेबाबतची कागदपत्रे नस्तीमध्ये जोडण्यात आलेले नाहीत. प्रशासकीय मंजुरी देतांना सदर अटींच्या अधिन राहुनच मंजुरी दिलेली असतांना तसे का करण्यात आले नाही, त्याबाबत खुलासा करावा.

9) सदर काम यापुर्वी कोणत्या योजनेतून झाले किंवा कसे, याबाबत खुलासा करावा.

10) काम सुरु होण्यापुर्वी, काम सुरु असतांना टप्याटप्याने काम झालेबाबतचे छायाचित्र घेण्यात आलेले नाहीत.

**3.481 तुरळ पाचकलेवाडी येथे विहीर बांधणे तालुका संगमेश्वर.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 6,00,047/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील कामासाठी जागा ही बक्षीसपत्राने केलेली आहे. सदरच्या जागेबाबत ग्रामपंचायतीच्या नावे सातबारा मध्ये नोंद घेण्यात आलेली नाही. ती घेऊन पुर्तता अनुपालन सादर करावे.

2) ग्रामपंचायत काम करण्यास तयार नसल्याचे कागदपत्रे नस्तीसोबत ठेवण्यात आलेले नाहीत. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2004/प्र.क्र.18/वित्त-9, दिनांक 30/06/2004 नुसार ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील करावयाची कामे प्राधान्याने ग्रामपंचायतीला देण्यात यावे, असे असतांना ग्रामपंचायतीची असहमती असेल, तरच कामे मजूर सहकारी संस्थांना किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना द्यावीत. असे असतांना ग्रामपंचायत काम करण्यास तयार नसलेबाबतची कागदपत्रे का घेण्यात आलेली नाहीत, याबाबत योग्य तो खुलासा करावा.

3) सदर कामासाठी एकूण 218 पिशव्या सिंमेट वापरलेल्या आहेत. महाराष्ट्र शासन, गामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट 1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/03/2010 नुसार सिमेंट खरेदी करुन प्रत्यक्ष बांधकामासाठी वापरण्यापुर्वी शासकीय प्रयोगशाळेकडुन गुणवत्ता चाचणी अहवाल घेणे आवश्यक होते. मात्र तसे केलेले नाही.

4) काम सुरु करण्यापुर्वी कामाचा विमा व कामगारांचा विमा हा विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे उतरविणे आवश्यक आहे. प्रशासकीय मान्यता देतांना सदर बाबीच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता दिलेली असतांना सदर विम्याची रक्कम कामाचे प्रथम देयकाच्या वेळी कपात करण्यात आलेली आहे.

5) काम सुरु होण्यापुर्वी, काम सुरु असतांना टप्या टप्याने काम झालेबाबत छायाचित्र घेण्यात आलेले नाहीत.

6) ई-निविदेबाबत वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आलेली नाही. ती का देण्यात आली नाही, याबाबत खुलासा करावा.

**3.482 लाजुळ गोवळकरवाडी येथे विहीर बांधणे तालुका रत्नागिरी.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-17 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 89,225/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सरपंच ग्रामपंचायत लाजुळ यांच्या काम मागणी अर्जावर तसेच यंत्रे व अवजारे असलेबाबत दाखल्यावर दिनांक व जावक क्रमांक नमुद नाही.

2) काम पुर्णत्वाचा दाखला नमुना नंबर 65 मध्ये घेण्यात आलेला नाही. त्यावर कार्यालयाचा जावक क्रमांक व दिनांक नमुद नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एस.1099/ प्र.शा.58/ 08, दिनांक 20/05/2004 च्या तरतूदीनुसार रुपये 20,000/- च्या वरील खर्चाच्या कामासाठी कामाच्या ठिकाणी 5” x 4” आकाराचा लोखंडी नामफलक लावणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. याबाबत खुलासा करावा.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/ प्र.क्र.1864/33, दिनांक 14/11/2001 नुसार ग्रामपंचायत काम करणेस तांत्रिकदृष्टया सक्षम असलेबाबतचा उपअभियंता यांचा दाखला घेणे आवश्यक असतांना तो घेतलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक सिंमेट/1099/प्र.क्र.56, दिनांक 30/06/2010 अन्वेय कामासाठी जे साहीत्य वापराचे त्याचा चाचणी अहवाल कामास सुरुवात करणेपुर्वी घेणे आवश्यक असतांना तसा चाचणी अहवाल तपासणीस उपलब्ध झालेला नाही.

6) शासन निर्णय क्रमांक जिपर-2000/प्र.क्र.337/35, दिनांक 08/05/2002 नुसार कामास सुरुवात करणेपुर्वी मक्तेदाराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक असून तसे न करता देयकातुन रक्कम रुपये 825/- कपात केलेली आहे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 12/10/2000 अन्वये मोजमाप घेताना कनिष्ठ अभियंता व ते तपासतांना उपअभियंता यांच्या दिनांकित स्वाक्षरी मोजमाप वहीत आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.483 तुळशी देवांचा डोंगर येथे गावतळी बांधणे. तालुका खेड**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-17 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदर बाबत रक्कम रुपये 7,21,070/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) स्टील, मेटल व सिंमेट चाचणी अहवाल काम पूर्ण दिनांक 18/01/2017 रोजी झाल्याच्या दिवशी देण्यात आलेला आहे. वरील अहवाल काम चालू असतांना का घेण्यात आला नाही, याबाबत खुलासा करावा.

2) वरील कामाच्या ई-निविदेची जाहीरात वर्तमानपत्रात दिली किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आली नाही. सदर कामाची व्यापक जाहीरात महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/275/प्र.क्र.172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 अन्वये जिल्हास्तरावर व्यापक प्रसिध्दी देणे आवश्यक होते. तसे केलेबाबत पडताळणी करता आली नाही.

3) सदर जागेची किंवा तळीची नोंद सातबारामध्ये नोंद केलेली नाही. ती नोंद घेऊन पुर्तता करावी.

4) कामाची ई-निविदा दिनांक 10/03/2016 रोजी मागविली आहे. निविदा मागणी करण्याचा अंतिम दिनांक 16/03/2016 असा 6 दिवसांचा कालावधीत देण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक क्रमांक निविदा-2012/प्र.क्र.97/पंरा-7, दिनांक 23/11/2013 मधील 4 मध्ये 2 ई-निविदा कालावधी नमुद करण्यात आलेला आहे. रूपये 5 लाख ते 50 लाखांपर्यंत प्रथम निविदा मागविण्यासाठी 15 दिवस कालावधी देण्यात आलेला असतांना तसे का करण्यात आले नाही, याबाबत खुलासा करावा.

5) मजुर सहकारी संस्थाची नोंदणी प्रमाणपत्राची मुदत संपल्यानंतर संबंधितांच्या निविदा मंजुर करण्यात आलेल्या आहेत. विघ्नहर्ता मजुर सहकारी संस्था, मंडणगड या संस्थेची नोंदणीपत्राची मुदत दिनांक 20/03/2016 रोजी संपलेली आहे. प्रगती मजुर सहकारी संस्था मर्यादीत, खेड या संस्थेची मुदत दिनांक 20/03/2016 रोजी संपलेली आहे. सुयोग मजुर सहकारी संस्था मर्यादीत, खेड संस्थेची मुदत दिनांक 18/03/2016 रोजी संपलेली आहे. कामांची बीड ओपन दिनांक 23/03/2016 अशी आहे. सदर संस्थांची मुदत संपलेली असतांना काम कसे देण्यात आले व फेरनिविदा का काढण्यात आलेली नाही, याबाबत खुलासा करावा.

6) विविध टप्यातील कामांचे फोटो व व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आलेबाबत पडताळणी करता आली नाही. सदर फोटो घेतले किंवा कसे, याबाबत पुर्तता करावी.

7) नामफलकाबाबत खर्च अंदाजपत्रकात नोंदविण्यात आलेला नाही. तो का नोंदविण्यात आला नाही, याबाबत खुलासा करावा.

**3.484 कोळपे मानेवाडी येथे नळपाणी पुरवठा योजना विशेष दुरुस्ती करणे.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 21) -** कोळपे मानेवाडी येथे नळपाणी पुरवठा योजना विशेष दुरुस्ती करणेकरिता रक्कम रूपये 3,74,690/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेचे नादुरुस्त साहित्य ग्रामपंचायतच्या ताब्यात असलेबाबत आवश्यक तो सरपंच यांचा दाखला कार्यनस्तीमध्ये आढळुन आला नाही.

2) कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक 26/06/2015 रोजी म्हणजेच पावसाळा कालावधीत देण्यात आलेला असून कामाची मुदत 30/06/2015 अशी आहे. सदर कामासाठी चार दिवसांची अल्प मुदत का देण्यात आली, याचा खुलासा करावा.

3) MSEB work साठी रक्कम रूपये 89,100/- खर्च दर्शविलेला असून त्याचे MSEB कडे रक्कम भरणा केल्याचे चलन कार्यनस्तीत उपलब्ध नाही. सदरचे चलन नसताना संबंधित मक्तेदारास प्रदान केलेली रक्कम रूपये 89,100/- संबंधिताकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

4) लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

5) जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 नुसार मुदतवाढ अर्ज विहीत मुदतीत सादर न करता 9 महिने विलंबाने सादर केलेला आहे.

6) सदर कामासाठी वापरलेली वाळू, खडी व जांभा दगडाची रक्कम रूपये 1,060/- गौण खनिज वसूल केलेले आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग 11/05/2015 पासुन सदर गौण खनिजाची वसुली रूपये 400/- प्रमाणे करणे बंधनकारक आहे. तरी संबधित मक्तेदार यांचेकडून रक्कम रूपये 1,060/- वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

**3.485 हातपंप खरेदीतील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 29) -** हातपंप खरेदीकरिता रक्कम रूपये 12,46,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश 785 दिनांक 05/12/2016 दिलेला असून त्या अनुषंगाने करारनामा तपासला असता करारनाम्यावर तारीख नमुद नाही. मात्र करारनाम्यासाठी वापरण्यात आलेला स्टँम्प पेपर दिनांक 16/12/2016 रोजी खरेदी करण्यात आलेला आहे. त्यामुळे पुरवठा आदेश दिल्यानंतर करारनामा करण्यात आलेल्याचे दिसून येते.

2) करारनाम्यातील अट क्रमांक 18 नुसार पुरवठा केलेल्या साहित्याचा जोखीम कालावधी सहा महिन्यांचा आहे. त्या अनुषंगाने साठा व वितरण रजिस्टर तपासले असता दिनांक 02/09/2014 रोजी खरेदी केलेल्या पंपापैकी 24 पंप मार्च 2017 अखेर शिल्लक आहेत तसेच आता दिनांक 05/12/2016 च्या पुरवठा आदेशाने खरेदी केलेले 100 पंप सर्वच्या सर्व शिल्लक आहेत. त्यामुळे खरेदी केलेल्या पंपाचा जोखिम कालावधी पंप वापरण्याच्या अगोदरच संपत असलेचे दिसून येते.

3) अट क्रमांक 14 नुसार पुरवठा आदेशाचे वेळेस 3 टक्के एवढी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून जिल्हा परिषद खाते क्रमांक 34 मध्ये भरणा करणे आवश्यक होते. परंतु, तशी ती न भरता ती रक्कम दिनांक 31/03/2017 च्या देयकातून कपात करुन दिनांक 13/04/2017 रोजी खाते क्रमांक 34 मध्ये भरणा केलेली आहे. सदरची कार्यवाही अटी शर्तीचे उल्लंघन करुन करण्यात आलेली आहे.

4) दिनांक 02/05/2016 चे टिप्पणीत 200 पंपांची आवश्यकता नमुद आहे. परंतु, वित्त विभागाने 100 पंपाना मान्यता देऊन त्या प्रमाणे खरेदी करण्यात आले. तरीही वित्तीय वर्षाचे अखेर व लेखापरीक्षण कालावधीपर्यंत त्यापैकी एकाही पंपाचा विनियोग करण्यात आलेला नाही. म्हणजे आवश्यकता नसताना साहित्य खरेदी करुन 100 टक्के निधी खर्च केलेला आहे. मात्र कामाचे उद्दिष्ट 100 टक्के साध्य झाल्याचे दिसून येत नाही.

### 3.486 चिंचवड 1 तालुका त्र्यंबकेश्वर येथे जनावरांना पिण्याच्या पाण्याचा हाळ बांधणे.

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** जिल्हा परीषद, नाशिक अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात चिंचवड 1, तालुका त्र्यंबकेश्वर येथे जनावरांना पिण्याच्या पाण्याचा हाळ बांधणे या कामाची पडताळणी केली असता, सदर कामाबाबत रक्कम रुपये 1,50,047/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सदर कामाचे बाबतीत जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मान्यतेच्या अटी व शर्ती नुसार

1) अट क्रमांक 3 नुसार सदरची कामे शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेवरच घेणे आवश्यक असतांना ज्या ठिकाणी काम करण्यात आलेले आहे, ती जागा शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचा दाखला अथवा प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही.

2) अट क्रमांक 8 नुसार सदरची कामे ग्रामपंचायतीची परवानगी अथवा ना हरकत दाखला प्राप्त झाल्याशिवाय करू नये, असे स्पष्ट आदेश असतांना तसा दाखला नस्तीसोबत जोडलेला नाही.

3) अट क्रमांक 12 नुसार मंजूर बांधकामाच्या आकारमानात कोणताही बदल करण्यात येऊ नये, असे असतांना अंदाजपत्रकीय कामाचे परिमाण व प्रत्यक्ष कामाचे परिमाण यांत तफावत आढळून आली.

4) एक बाबीवरील बचत दुसऱ्या बाबीवर वापरण्यात आलेली आहे. निविदा कलम 38 (1) नुसार एखादया बाबीवर अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा 25 टक्के किंवा रुपये 5,000/- (या पैकी जी कमी असेल ती) पेक्षा जास्त खर्च होण्याची शक्यता असल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 152(2) नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेतलेली नसल्याने अनुक्रमांक 1 बाब तपशील - Providing and laying PCC साठी जास्तीचा झालेला खर्च रुपये 52,872/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

5) मोजमाप पुस्तिकेतील बाब क्रमांक 6 - (Reinforcement) चा दर दरसूची नुसार रुपये 57,087/- प्रती MT असतांना रुपये 57,965/- प्रती MT असा जादाचा घेऊन मुल्यांकन केल्याने रुपये 308/- चे जादा प्रदान झाले आहे. सदर जादा प्रदानाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

6) अट क्रमांक 16 नुसार शासन नियमाप्रमाणे कामांना आवश्यक असणाऱ्या खानिजापोटी स्वामित्वधनाचा भरणा करणे आवश्यक असतांना स्वामित्वधनाची मोजमाप पुस्तिकेत गणना केलेली नाही. स्वामित्वधनाची रक्कम रूपये 2,197/- वसूल करावी.

7) अट क्रमांक 17 नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या देखभाल व परीरक्षणाचे हमीपत्र प्राप्त झाल्याशिवाय कामास सुरुवात करू नये. परंतु, या बाबत हमीपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही.

8) कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी संबंधित कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमापत्राची प्रत जिल्हा परिषदकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

9) लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार साहित्य चाचणी अहवाल हा शासकीय प्रयोगशाळेकडून काम सुरु करण्याअगोदर घेणे आवश्यक आहे. तथापि, सदर कामाचा साहित्य चाचणी अहवाल हा काम पूर्ण झाल्यानंतर घेण्यात आलेला आहे.

**3.487 जनावरांना पिण्याच्या पाण्याचा हाळ बांधणे.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12,13,14,15,16,17) -** जिल्हा परीषद, नाशिक अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात हट्टीपाडा (दलपतपूर), जातेगाव बु., कडूगल्ली, चिंचवड 2, खोरीपाडा, भगरेपाडा, तालुका त्र्यंबकेश्वर येथे जनावरांना पिण्याच्या पाण्याचा हाळ बांधणे या कामाकरिता रक्कम रूपये 8,81,534/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सदर कामाचे बाबतीत जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मान्यतेच्या अटी व शर्ती नुसार.

1) अट क्रमांक 3 नुसार सदरची कामे शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेवरच घेणे आवश्यक असतांना ज्या ठिकाणी काम करण्यात आलेले आहे. ती जागा शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचा दाखला अथवा प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही.

2) अट क्रमांक 8 नुसार सदरची कामे ग्रामपंचायतीची परवानगी अथवा ना हरकत दाखला प्राप्त झाल्याशिवाय करू नये, असे स्पष्ट आदेश असतांना तसा दाखला नस्तीसोबत जोडलेला नाही.

3) अट क्रमांक 12 नुसार मंजूर बांधकामाच्या आकारमानात कोणताही बदल करण्यात येऊ नये, असे असतांना अंदाजपत्रकीय कामाचे परिमाण व प्रत्यक्ष कामाचे परिमाण यांत तफावत आढळून आली.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 120(2) प्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबींचे काम न केल्यामुळे अथवा कमी केल्यामुळे होणारी बचत इतर बाबींवर खर्च करता येणार नाही. तसेच नियम 153(1) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्याची जबाबदारी मक्तेदाराची तसेच अंदाजपत्रकाप्रमाणे काम करुन घेण्याची जबाबदारी अभियंत्यांची आहे. असे असतांना देखील वरीलप्रमाणे एखादया बाबीच्या परिमाणात बदल करुन अन्य बाबीवर अधिक खर्च केलेला आहे. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे एके बाबीवरील बचत दुसऱ्या बाबीवर वापरण्यात आलेली आहे. निविदा कलम 38 (1) नुसार (बाब निहाय) एखादया बाबीवर अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा 25 टक्के किंवा रुपये 5,000/- (या पैकी जी कमी असेल ती) पेक्षा जास्त खर्च होण्याची शक्यता असल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 152(2) नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेतलेली नसल्याने जास्तीचा झालेला खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. सबब रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

4) मोजमाप पुस्तिकेतील बाब क्रमांक 6 - (Reinforcement) चा दर दरसूची नुसार रुपये 57,087/- प्रती MT असतांना रुपये 57,965/- प्रती MT असा जादाचा घेऊन मुल्यांकन केल्याने रुपये 308/- चे जादा प्रदान झाले आहे. तरी सदर जादा प्रदानाची रक्कम रूपये 1,848/- वसूल होणे आवश्यक आहे.

5) अट क्रमांक 16 नुसार शासन नियमाप्रमाणे कामांना आवश्यक असणाऱ्या खानिजापोटी स्वामित्वधनाचा भरणा करणे आवश्यक असतांना स्वामित्वधनाची मोजमाप पुस्तिकेत गणना केलेली नाही. तरी बाब क्रमांक 1 व 2 करिता स्वामित्वधनाची परिगणना करून रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

6) अट क्रमांक 17 नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या देखभाल व परीरक्षणाचे हमीपत्र प्राप्त झाल्याशिवाय कामास सुरुवात करू नये. परंतु, याबाबत हमीपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही.

7) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास /1098/प्र.क्र.29/98 शासन हमी, दिनांक 19/08/1998 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक जि.प.2/2000/प्र.क्र. 837/पं.रा. 8(35), दिनांक 15/09/2003 तसेच विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविनि/1/1801/सीआर/जि.प.संकीर्ण, दिनांक 30/07/2002 नुसार कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी संबंधित कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमापत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8) लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार साहित्य चाचणी अहवाल हा शासकीय प्रयोगशाळेकडून काम सुरु करण्या अगोदर घेणे आवश्यक आहे. तथापि, सदर कामाचा साहित्य चाचणी अहवाल हा काम पूर्ण झाल्यानंतर (दिनांक 20/04/2016) घेण्यात आलेला आहे.

9) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 150 नुसार तांत्रिक मंजुरी देण्यापुर्वी तपशीलावर नकाशे व अंदाज तयार करुन त्यांच तंत्र शाखेत परीनिरीक्षण करणे आवश्यक आहे. तथापि, तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.488 ग्रामीण पाणीपुरवठा योजना खामखेडा - थाळनेर तालुका शिरपूर जिल्हा धुळे कामातील उणिवांबाबत जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 32,56,609/- इतका खर्च झालेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/275/ प्र.क्र.172/परा-7, दिनांक 19/10/2011 अन्वये दिनांक 01/01/2012 पासून ई-निविदा कार्यप्रणाली अवलंबविण्यात आलेली असतांना उपरोक्त कामाची निविदा करतांना ई-निविदेचा अवलंब का करण्यात आला नाही? त्यामुळे स्पर्धात्मक दराचा संस्थेला फायदा झालेला नाही. तसेच निविदा प्रक्रिया परिपूर्ण राबविण्यात आलेली नाही. एकच ठेकेदाराची निविदा नस्तीसोबत लावण्यात आलेली आहे. त्यामुळे निविदी प्रक्रिया राबविण्यात आली किंवा कसे? याची खात्री करता आली नाही.

2) कामाची रक्कम रूपये 31,33,818/- असतांना करारनामा फक्त रूपये 100/- चा करण्यात आलेला आहे. सदर कामासाठी रूपये 2,200/- च्या मुद्रांकावर कार्यकरारनामा करणे आवश्यक असतांना रूपये 100/- चा केल्यामुळे रूपये 2,100/- चे मुद्रांक शुल्क वसुल करावे.

3) लोकवर्गणी ऐवजी श्रमदान केल्यास ठेकेदारास प्रदान करतांना श्रमदानाची रक्कम कमी करणे आवश्यक असतांना वरील कामाबाबत याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. मोजमाप पुस्तिका क्रमांक 733 पान क्रमांक 14 वर श्रमदान रक्कम रुपये 1,07,000/- व पान क्रमांक 15 वर रूपये 31,772.66/- एकुण रूपये 1,38,772.66/- श्रमदानाची रक्कम संबंधीत ठेकेदारास प्रदान करण्यात आली आहे. रक्कम रूपये 1,38,773/- संबंधीतांकडून वसुल करावी.

4) प्रस्तावीत योजनेच्या नकाशानुसार उध्दरण वाहिनी 90mm 6 kg प्रस्तावीत नवीन कुपनलिका 900 मीटर व जुनी कुपनलिका 1,650 मीटर एकुण 2,550 मीटर अंतर योजनेच्या वाहिनीची लांबी प्रस्तावीत असतांना अंदाजपत्रकात व मोजमाप पुस्तिकेनुसार 2,580 लांबी दाखविण्यात येऊन रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. एकुण 30 मीटर लांबीचे जादा प्रदान वसुल करावे.

5) Sub work No 6 Distribution system मधील Providing and supplying pvc pipes 110mm Dai pvc 4kg नकाशानुसार 690 मीटर अंतर असतांना अंदाजपत्रकात 732 मीटर घेण्यात आले आहे व मोजमाप पुस्तिकेनुसार 742 मीटर घेण्यात आलेले आहे. म्हणजे एकुण 52 मीटरचे काम जास्त दाखविण्यात आले आहे. रक्कम रूपये 6,032 चे अतिप्रदान झालेले आहे. अतिप्रदान वसुली करण्यात यावी.

6) 75 mm Dia PVC 4 kg नकाशानुसार 1,815 Qty दाखविण्यात आली आहे. अंदाजपत्रकानुसार 3,156 Qty घेण्यात आली आहे. तसेच प्रत्यक्ष मोजमाप पुस्तिकेनुसार 3,180 Qty घेण्यात आलेली आहे. म्हणजेच 1,365 Qty चे काम जास्त दाखविण्यात आलेले आहे. रक्कम रूपये 83,265/- चे जादा प्रदान झालेले आहे. अतिप्रदान वसुल करावे.

7) Excavation for pipe trenches साठी एकुण 2,548 Qty परिगणित केलेली आहे. तथापि, अंदाजपत्रकानुसार Soil, Hard Murum, Soft Rock साठी वेगवेगळे दर असतांना मोजमाप पुस्तिकेत वरील तीनही दरांची सरासरी काढून रूपये 213.29 दर घेऊन रूपये 5,43,477.85/- प्रदान केलेले आहेत. सरासरी प्रदान केल्यामुळे अतिप्रदान झालेले आहे. मटेरियलनुसार दरांची विभागाणी करुन अतिप्रदान वसुल करावे.

8) Lowering, Laying and Joining PVC pipes 75 mm dia PVC Qty अंदाजपत्रकानुसार 1,815 घेण्यात आलेली आहे व मोजमाप पुस्तिकेनुसार 3,175 Qty चे प्रदान करण्यात आलेले आहे. दुपटीने जादा काम कसे झाले? याचा खुलासा करावा व जादा 1,360 Qty चे प्रदान रूपये 28,424/- वसुल करण्यात यावेत.

9) कामाची निविदा रक्कम रूपये 31,49,707/- आहे व त्याप्रमाणे विमा रक्कम रूपये 31,497/- चा विमा काढणे आवश्यक असतांना विमा काढण्यात आला नाही व अंतीम देयकामधूनही सदर रक्कम वसुल केलेली नाही. विमा रक्कम रूपये 31,497/- वसुल करावी.

10) कामाचा उपकर कपात करण्यात आलेला नाही. कामाचे एकुण मुल्य रूपये 31,49,707/- उपकर रक्कम रूपये 31,497/- वसुल करावी.

11) महाराष्ट्र राज्य मुल्यवर्धीत कर अधिनियमानुसार नोंदणीकृत ठेकेदारासाठी 2 टक्के व अनोंदणीकृत ठेकेदारासाठी 4 टक्के मुल्यवर्धीत कर वसुल करणे आवश्यक आहे तसेच दिनांक 01/04/2012 पासून अनोंदणीकृत ठेकेदरासाठी 5 टक्के मुल्यवर्धीत कर वसुल करणे आवश्यक असतांना मुल्यवर्धीत कर वसुल केलेला नाही. कामाचे मुल्य रूपये 31,49,707/- च्या 5 टक्के रूपये 1,57,485/- वसुल करावी.

ठेकेदाराकडून कामाच्या मुल्याच्या 2 टक्के दराने रूपये 64,884/- आयकर कपात करणे आवश्यक असतांना आयकर वसुल करण्यात आलेला नाही. आयकर अधीनियम 1961 चे कलम 201 नुसार टीडीएस कपात करणे ही आहरण व संवितरण अधिकारी यांची वैयक्तीक जबाबदारी आहे. त्यासाठी 12 ते 18 टक्के पर्यत दंडनीय व्याजाची तरतूद आहे.

12) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1109/प्र.क्र.104(अ)/ पापु-07, दिनांक 17/03/2010 व अर्थिक मान्यतेतील अट क्रमांक 8 नुसार गाव 100 टक्के हगणदारीमुक्त झाल्यानंतर योजनेच्या अनुदानाचा दुसरा हप्ता देण्यात येईल, अशी तरतूद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता गाव 100 टक्के हगणदारीमुक्त नसतांना दुसरा हप्ता अदा करण्यात आलेला आहे. याबाबत खुलासा करावा.

13) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार खरेदी केलेल्या साहित्याची चाचणी शासकीय प्रयोगशाळेकडून करुन घेणे आवश्यक असतांना खरेदी केलेल्या साहित्याची तपासणी बापूसाहेब शिवाजी देवरे पॉलीटेक्नीक संस्था, धुळे या खाजगी संस्थेकडून केल्याचे अहवाल नस्तीसोबत लावण्यात आलेले आहेत.

**3.489 मौजे दरखेडा तालुका शिंदखेडा जिल्हा धुळे नळ पाणीपुरवठा योजना कामातील उणिवांबाबत. (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन 2011-2012)**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 23,67,198/- इतका खर्च झालेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लोकवर्गणी ऐवजी श्रमदान केल्यास ठेकेदारास प्रदान करतांना श्रमदानाची रक्कम कमी करणे आवश्यक असतांना वरील कामाबाबत याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. Subwork - Rising main मधील B-Labour Section मधील item No 1 Excavation for pipe Qty 708.75 चे काम श्रमदानातून केलेले असतांना रक्कम ठेकेदारास प्रदान केलेली आहे. रूपये 1,19,607/- अतिप्रदान वसुल करुन शासन खाती जमा करण्यात यावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114,118,120 व 152(2) नुसार व निविदा शर्त क्रमांक 14 व 15 अन्वये अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुसऱ्या बाबीवर वापर करु नये. तसेच एखादया बाबीतील तरतुदीमध्ये 25 टक्के पेक्षा जादा वाढ होत असेल किंवा खर्चात रूपये 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले

अधिकारी यांची निरिक्षण टिपणीव्दारे पुर्वमान्यता घेऊनच काम करणे आवश्यक आहे. तथापि, 4 बाबींमध्ये अंदाजपत्रकातील मंजुरीपेक्षा जादा रकमेची कामे केलेली आहेत.

3) 3 बाबींमधील कामे अंदाजपत्रकात मंजुर असतांना करण्यात आली नाहीत. कामांची आवश्यकता नसतांना अंदाजपत्रकात का मंजुर करुन घेतली? याचा खुलासा करावा. सदर बचतीचा खर्च इतर कामांवर करण्यात आलेला आहे. बचत कोणत्या प्राधिकारान्वये वापरण्यात आली? हे स्पष्ट करण्यात यावे.

4) 1 टक्के उपकर वसुल करुन महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे. तथापि, उपरोक्त कामाचा उपकर कपात करण्यात आलेला नाही. उपकर रक्कम रूपये 23,672/- वसुल करावी.

5) दिनांक 01/04/2012 पासून अनोंदणीकृत ठेकेदरासाठी 5 टक्के मुल्यवर्धीत कर वसुल करणे आवश्यक असतांना मुल्यवर्धीत कर वसुल केलेला नाही. रूपये 1,18,360/- वसुल करुन शासन खाती भरणा करावे.

6) ठेकेदाराकडून कामाच्या मुल्याच्या 2 टक्के दराने रक्कम रूपये 48,764/- आयकर कपात करणे आवश्यक असतांना आयकर वसुल करण्यात आलेला नाही. आयकर अधिनियम 1961 चे कलम 201 नुसार टीडीएस कपात करणे ही आहरण व संवितर अधिकारी यांची वैयक्तीक जबाबदारी आहे. त्यासाठी 12 ते 18 टक्के पर्यत दंडनीय व्याजाची तरतूद आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार खरेदी केलेल्या साहित्याची चाचणी शासकीय प्रयोगशाळेकडून करुन घेणे आवश्यक असतांना पाईप खरेदीचे थर्ड पार्टी टेस्टींग करण्यात आलेले नाही. त्यामुळे पाईप योग्य दर्जाचे वापर केला किंवा कसे? पाईप खरेदीच्या 2 टक्के रक्कम वसुल करण्यात यावी व दर्जाबाबत खात्री पटवावी.

8) आर्थिक मान्यता आदेशानुसार सदर काम हे 50 टक्के राज्य निधी व 50 टक्के केंद्र निधीमधून प्रस्तावीत करण्यात आलेले आहे. तथापि, खर्च करतांना त्याप्रमाणे करण्यात आलेला नाही. राज्य निधीमधून रूपये 23,67,198/- व केंद्र निधीमधून रूपये निरंक खर्च करण्यात आलेला आहे. एकुण खर्चापैकी 50 टक्के खर्च रूपये 11,83,599/- प्रमाणे खर्च करणे आवश्यक असतांना राज्य निधीमधून रूपये 11,83,599/- जास्त खर्च करण्यात आलेला आहे. सदर खर्च निर्धारण करुन केंद्र निधीमधून समायोजीत करुन अनुपालन दर्शवावे.

9) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक गौणखनिज 10/1009/प्र.क्र.309/ब, दिनांक 11/02/2010 (मुंबई गौण खनिज उत्खनन नियम 1955 अनुसुची 1 व 2) व महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन अधिसुचना दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्व धन रुपये 400/- प्रती ब्रास याप्रमाणे वसुल करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामावर वापरण्यात आलेले गौण खनिजाची परिगणना करुन गौण खनिजाची रक्कम शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषरद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148(1)नुसार कामाचे मुदत संपण्यापर्वी 15 दिवस अगोदर मुदतवाढीचा अर्ज सादर करणे आवश्यक आहे. वरील कामाचे कार्यरंभ आदेश नस्तीत आढळून आला नाही. कामाची मुदत 2 महिने आहे. काम पुर्ण दिनांक 26/08/2015 रोजीचा आहे. यावरुन काम विलंबाने झाले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148 शर्त क्रमांक 2 नुसार किमान 1 टक्के दंड व जास्तीत जास्त 10 टक्के दंड आकारणी करण्याची तरतूद आहे. त्यानुसार कार्यवाही करुन रक्कम वसुल करावी.

**3.490 मौजे तोरणकुंडी तालुका साक्री जिल्हा धुळे नळपाणिपुरवठा योजना दुरुस्तीकामातील उणिवांबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,85,261/- इतका खर्च झालेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषरद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148(1)नुसार कामाचे मुदत संपण्यापर्वी 15 दिवस अगोदर मुदतवाढीचा अर्ज सादर करणे आवश्यक आहे. सदर कामास मुदत वाढही घेण्यात आलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148 शर्त

क्रमांक 2 नुसार किमान 1 टक्के दंड व जास्तीत जास्त 10 टक्के दंड आकारणी करण्याची तरतूद आहे. त्यानुसार संबंधीतांकडून विलंब आकार 10 टक्के रूपये 37,901/- वसुल करण्यात यावेत.

2) कनिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण विभाग, जिल्हा परिषद, धुळे यांचे पत्र क्रमांक दिनांक 23/05/2016 नुसार नळ पाणीपुरवठा योजनेच्या उदभवाची क्षमता चाचणी नुसार उद्भव विहिरीची खोली 12 मीटर आहे. तथापि, देयक प्रदान करतांना 15 मीटर खोलीचे प्रदान केले आहे. याबाबत एकुण रूपये 30,606/- वसुली करण्यात यावी.

3) Dewatering 15 मीटर कामासाठी रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. विहिर खोलीकरण 12 मीटर असल्याने एकुण 6 मीटर खोलीसाठी 810 BHP Dewatering करण्यात आली आहे. त्यानुसार 3 मीटरने काम कमी झाल्याने 810/6x3= 405 x 61.60(rate) Total रूपये 24,948/- वसुली करावी.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विकास विभाग, परीपत्रक क्रमांक संकीर्ण-2009/प्र.क्र.123/ पंरा7, दिनांक 30/10/2009 अन्वये 1 टक्के उपकर वसुल करुन महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे. तथापि, उपरोक्त कामाचा उपकर कपात करण्यात आलेला नाही. उपकर रक्कम रूपये 3,792/- वसुल करावी.

5) अनोंदणीकृत ठेकेदरासाठी 5 टक्के मुल्यवर्धीत कर वसुल करणे आवश्यक असतांना मुल्यवर्धीत कर वसुल केलेला नाही. रूपये 18,958/- वसुल करुन शासन खाती भरणा करावे.

6) वरील कामासाठी लागणारे साहित्य हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अथवा जिल्हा परिषद मान्यताप्राप्त यादीतील उत्पादक / पुरवठादाराकडून भारतीय मानक संस्थेच्या निकषानुसार असलेल्या स्पेसिफिकेशनुसार उच्च प्रतीचे खरेदी करणे आवश्यक असतांना समितीने स्थानिक पुरवठादाराकडून साहित्य खरेदी केलेले आहे.

**3.491 ठक्कर बाप्पा योजनातंर्गत ग्रामपंचायत तारापाडा तालुका नवापुर येथे आदिवासी वस्तीत भुमीगत पाईप गटार कामातील अनियमितता**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 87, दिनांक 10/02/2017 अन्वये रक्कम रुपये 8,22,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे एकुण रक्क्म रूपये 8,22,000/- इतकी असुन वजाती रूपये 1,85,181/- इतकी असुन निव्वळ प्रदान रूपये 6,36,819/- इतकी आहे. सदर कामाचे अंतिम मुल्यांकन रूपये 7,62,430/- (अंदाजपत्रकाच्या मर्यादेत रुपये 7,54,605/-) इतकी आहे. मुल्याकंनाच्या रक्कमेतुन एकुण वजाती रुपये 1,85,181/- वजा करुन कंत्राटदारास रुपये 5,77,249/- इतके प्रदान करणे आवश्यक असतांना रुपये 6,39,819/- प्रदान केल्याने रुपये 59,570/- इतके जादा प्रदान झालेले आहे. तरी सदरची जादा प्रदान वसुल करावी.

2) सदर कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक 1188 लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न दिल्याने सदर कामावरील अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार खर्च झाल्याची तपासणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146 व 148 नियमान्वये करारनाम्यावर ग्रामसेवक, सरपंच, कार्यकारी अभियंताची स्वाक्षरी नाही. असा करारनामा कायदेशीरदृष्टया विधीग्राहय होत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 152(3) नुसार कंत्राटदाराने अंदाजपत्रकानुसार काम करण्याची जबाबदारी असतांना अंदाजपत्रकीय व प्रत्यक्ष कामावरील कमी जादा खर्चास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता न घेता प्रदान केलेले आहे. सदर नियमानुसार काम करुन घेण्याची जबाबदारी उपअभियंता यांची असतांना कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक जी.आर.-34/सा-4/ 5999, दिनांक 08/01/2007 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी त्यांचा गुणवत्ता व दर्जाबाबतचा प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करणे, असे निर्देश आहेत. परंतु, संचिकेत चाचणी अहवाल नाही. चाचणी अहवाल प्राप्त नसतांना नियमबाहयरित्या देयकाचे प्रदान केले आहे.

6) ग्रामविकास जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक व्हीपीएम-2010/प्र.क्रं.156/पंरा-3, दिनांक 05/07/2014 अन्वये कंत्राटदार ग्रामपंचायतीने कामावरील खर्च रक्कमेस ग्रामसभेव्दारा मान्यंता घेवुन देयकासोबत जोडणे आवश्यक असतांना जोडलेला नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 50 नुसार ग्रामपंचायतीकडुन सदर प्रदान रक्कमेची पोच पावती नमूना नंबर 7 घेतलेली नाही.

8) सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक सीएटी-1087/सीआर-94/इमा-2, दिनांक 14/06/1989 नुसार कामाचा दोष निवारण कालावधी निर्देशित करणे आवश्यक आहे. परंतु, सदरचे प्रमाणपत्र नस्तीत नाही.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक संकिर्ण-2014/प्र.क्रं.172/पंरा-7, दिनांक 24/10/ 2014 नुसार 1 लाखावरील साहित्य खरेदी ई - निवीदा प्रणालीव्दारे खरेदी केलेली असुन सदर साहित्य पुरवठा करण्याबाबतचे आदेश ग्रामपंचायतीने देणे आवश्यक असतांना सदरचे आदेश संचिकेत नसल्याने सदर कामावरील साहित्य कसे खरेदी केले, याची खात्री करता आली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 168 नुसार उपअभियंता यांनी प्रत्येक देयकाच्या 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी कामाच्या 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, अशा तपासण्या केलेल्या नाहीत.

**3.492 ठक्कर बाप्पा योजनातंर्गत ग्रामपंचायत अजेयपुर तालुका नंदुरबार येथे आदिवासी वस्तीत भुमीगत पाईप गटार कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 54, दिनांक 23/11/2016 अन्वये रक्कम रुपये 3,59,478/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक 1148 लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न दिल्याने सदर कामावरील अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार खर्च झाल्याची तपासणी करता आली नाही.

2) कामाचा नमूना नंबर 65 पुर्णत्वाचा दाखल्यावरील कामाचे मुल्यांकन रूपये 3,61,188/- इतका असुन संचिकेतील कामाच्या मोजमाप पुस्तिकेची छायांकित प्रत जोडलेली असुन सदर प्रतीनुसार कामाचे मुल्याकंन रूपये 3,29,797/- इतके म्हणजे रुपये 31,391/- कमी असतांना कामाचे रुपये 2,78,516/- निव्वळ प्रदान केलेले आहे. तरी सदर तफावती असल्यास जादा प्रदानाची रक्कम रुपये 29,681/- वसुल करावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 152(3) नुसार कंत्राटदाराने अंदाजपत्रकानुसार काम करण्याची जबाबदारी असतांना कामावर रुपये 42,736/- इतका कमी खर्च केलेला आहे. म्हणजे कामाचे अंदापत्रक प्रत्यक्ष स्थळाची पाहाणी न करताच अंदाजपत्रक केल्याचे दिसुन येते.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146 व 148 नियमान्वये करारनाम्यावर कार्यकारी अभियंताची स्वाक्षरी नाही, असा करारनामा कायदेशीरदृष्टया विधीग्राहय होत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक जी.आर.-34/सा-4/ 5999, दिनांक 08/01/2007 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी त्यांचा गुणवत्ता व दर्जाबाबतचा प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करणे, असे निर्देश आहेत. परंतु, संचिकेत चाचणी अहवाल नाही. चाचणी अहवाल प्राप्त नसतांना नियमबाहयरित्या देयकाचे प्रदान केले आहे.

6) ग्रामविकास जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक व्हीपीएम-2010/प्र.क्रं.156/पंरा-3, दिनांक 05/07/2014 अन्वये कंत्राटदार ग्रामपंचायतीने कामावरील खर्च रक्कमेस ग्रामसभेव्दारा मान्यंता घेवुन देयकासोबत जोडणे आवश्यक असतांना जोडलेला नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 50 नुसार ग्रामपंचायतीकडुन सदर प्रदान रक्कमेची पोच पावती नमूना नंबर 7 घेतलेली नाही.

8) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक संकिर्ण-2014/प्र.क्रं.172/पंरा-7, दिनांक 24/10/ 2014 नुसार 1 लाखावरील साहित्य् खरेदी ई - निवीदा प्रणालीव्दारे खरेदी केलेली असुन सदर साहित्य पुरवठा करण्याबाबतचे आदेश ग्रामपंचायतीने देणे आवश्यक असतांना सदरचे आदेश संचिकेत नसल्याने सदर कामावरील साहित्य कसे खरेदी केले, याची खात्री करता आली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 168 नुसार उपअभियंता यांनी प्रत्येक देयकाच्या 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी कामाच्या 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, अशा तपासण्या केलेल्या नाहीत.

**3.493 मौजे जोंधनखेडा तालुका मुक्ताईनगर येथील शासकीय आश्रमशाळेत नळ पाणीपुरवठा योजना करणे.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 20,87,397/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदा जाहिरात प्रसिद्धीबाबत विभागाचे पत्र क्रमांक 173, दिनांक 28/01/2016 अन्वये दै.लोकमत नागपूर, दै.सामना पुणे, सायंदैनिक साईमत जळगांव, साप्ताहीक शिवाजी समाचार, साप्ताहीक ओम शांती विचार इ. वृत्तपत्रांना पत्र देण्यात आलेले आहे. तथापि, जाहिरात प्रसिद्ध झाल्याबाबतची वृत्तपत्र कात्रणे नस्तीबद्ध करण्यात आलेली नाही. त्यामुळे निविदेस व्यापक प्रसिद्धी दिली असल्याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही. परिणामी निविदेस स्पर्धात्मक दरांचा लाभ झालेला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 149(1) नुसार आदेश देणेपूर्वी करारनामा करुन घेऊन त्यात मक्तेदारांकडून कामाची सुरुवात करणे व ते केंव्हा पूर्ण होईल अशा विविध प्रकारच्या अटी/ शर्ती करणे आवश्यक आहे. तसेच करारातील कोणताही अटी / शर्तीचा भंग केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतूद करारनाम्यात करण्यात यावी. तसेच रुपये 1,900/- रकमेच्या मुद्रांकावर कार्यकरार करणे आवश्यक होते. तथापि, विभागाने संबंधित कंत्राटदारासोबत करारनामा केलेला दिसून येत नाही. तरी मुद्रांक शुल्क रक्कम रुपये 1,900/- संबंधितांकडून वसुल करुन शासन सदरी योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28/98, दिनांक 19/08/1998 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम कपात करुन विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार 1 टक्के रक्कम धावते देयकातुन कपात केलेली आहे. सदर रक्कमेचा भरणा काम सुरु करण्यापुर्वी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने उद्देश सफल झालेला नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 118 नुसार कार्यकारी अभियंत्याच्या मान्यतेशिवाय फेरफार करणार नाही. तसेच नियम 153(1)(2) व नियम 156 अन्वये मक्तेदाराने प्राकलनानुसार काम करणे आवश्यक आहे. नियम 120 नुसार एका कामात झालेली बचत इतर कामासाठी वापरता येत नाही, असे असतांना देखील वाढ/घट तक्त्यानुसार एका बाबीवरील बचत इतर बाबींवर अधिक खर्च पुर्व परवानगीशिवाय करण्यात आलेला आहे. तथापि, त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेण्यात आलेल्या नाहीत. कामाची अंदाजित किंमत रूपये 25,20,670/- अशी होती. तथापि, प्रत्यक्ष काम रुपये 20,87,395/- इतक्या रकमेचे झालेले असून कामावर रुपये 4,33,275/- इतकी निव्वळ बचत झालेली दिसून येते.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.फी.एम - 1099/प्र.क्रं.54/08, दिनांक 22/12/2000 नुसार काम पुर्ण झाल्यावर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे. तथापि, काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंदविण्यात आलेला नाही.

6) कामाचे आदेशानुसार कामासाठी लागणारे पाईप हे आयएसआय मार्कचे असावे व त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मान्यता प्राप्त व नोंदणीकृत त्रयस्थ संस्थंकडून तपासणी करणे बंधनकारक राहील व अशाप्रकारे तपासणी केलेली नसल्यास पाईप किंमतीच्या 0.5 टक्के रक्कम कपात करण्यात येईल, अशी अट नमुद असतांनाही कामावर वापरण्यात आलेल्या पाईपांचे तपासणी अहवाल लेखापरीक्षणात आढळून आले नाही. तरी

तपासणी केलेली नसल्यास अटी/शर्तीनुसार पाईप किंमतीच्या 0.5 टक्के रक्कम परिगणीत करुन संबंधितांकडून वसुल करण्यात यावी.

7) सदर कामाचे प्रथम धावते देयक अदा करतेवेळी प्रत्यक्ष काम झालेले नसतांनाही कामाची मापे नोंदवून कंत्राटदारास नियमबाह्यपणे एकूण रक्कम रूपये 1,81,468/- अदा करण्यात आलेली आहे. त्यानंतर अंतिम मोजमापे घेतांना सदर कामांवरील जादा प्रदान रक्कम रूपये 1,36,214/- अंतिम देयकामध्ये समायोजित केलेली आहे,

8) निविदेतील अटी/शर्तीनुसार सुरक्षा अनामत रक्कम 5 टक्के प्रमाणे रूपये 1,04,370/- वसुल करणे आवश्यक असतांना 4 टक्केप्रमाणे रूपये 1,00,805/- कपात केलेली आहे. म्हणजेच रूपये 3,565/- इतकी कमी कपात करण्यात आलेली आहे.

**3.494 मौजे वलठाण तालुका चाळीसगांव येथील शासकीय आश्रमशाळेत पाणीपुरवठा योजना करणे**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 45,58,835/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदा जाहिरात प्रसिद्धीबाबत विभागाचे पत्र क्रमांक 174, दिनांक 28/01/2016 अन्वये दै.नवभारत जळगांव, दै.सामना मुंबई, दै.देशदूत जळगांव, दै.पुण्यनगरी जळगांव, साप्ताहीक साईमत जळगांव व साप्ताहीक जनसत्याग्रही जळगांव इ. वृत्तपत्रांना पत्र देण्यात आलेले आहे. तथापि, जाहिरात प्रसिद्ध झाल्याबाबतची वृत्तपत्र कात्रणे नस्तीबद्ध करण्यात आलेली नाही. त्यामुळे निविदेस व्यापक प्रसिद्धी दिली असल्याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही. परिणामी निविदेस स्पर्धात्मक दरांचा लाभ झालेला नाही.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28/98 दिनांक 19/08/1998 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम कपात करुन विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार 1 टक्के रक्कम धावते देयकातुन कपात केलेली आहे. सदर रक्कमेचा भरणा काम सुरु करण्यापुर्वी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने उद्देश सफल झालेला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 118 नुसार कार्यकारी अभियंत्याच्या मान्यतेशिवाय फेरफार करणार नाही. तसेच नियम 153(1)(2) व नियम 156 अन्वये मक्तेदाराने प्राकलनानुसार काम करणे आवश्यक आहे. नियम 120 नुसार एका कामात झालेली बचत इतर कामासाठी वापरता येत नाही, असे असतांना देखील वाढ/घट तक्त्यानुसार एका बाबीवरील बचत इतर बाबींवर अधिक खर्च पुर्व परवानगीशिवाय करण्यात आलेला आहे. तथापि, त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेण्यात आलेल्या नाहीत. कामाची अंदाजित किंमत रूपये 51,15,228/- अशी होती. तथापी प्रत्यक्ष काम रूपये 45,58,835/- इतक्या रकमेचे झालेले असून कामावर रूपये 5,56,393/- इतकी निव्वळ बचत झालेली दिसून येते.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.फी.एम - 1099/प्र.क्रं.54/08, दिनांक 22/12/2000 नुसार काम पुर्ण झाल्यावर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे तथापि, काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंदविण्यात आलेला नाही.

5) कामाची निविदा ही अंदाजपत्रकीय रकमेच्या 0.05 टक्के कमी दराने स्विकृत करण्यात आलेली आहे. त्यानुसार झालेले काम हे रूपये 45,58,835/- इतक्या रकमेचे झालेले असून सदर रकमेमधून 0.05 टक्के नुसार रुपये 2,279/- कपात करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कपात करण्यात आलेली नाही. तरी संबंधितांकडून सदर रक्कम रूपये 2,279/- वसुल करण्यात येऊन शासन सदरी भरणा करण्यात यावी.

**3.495 देखभाल दुरुस्ती जलमापक यंत्रक बसविणेबाबत**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 17,46,125/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रथम निवीदेनुसार कमी दराची मे. संकेत एन्टरप्रायजेस, नेवासा यांची 22 टक्के कमी दराची निवीदा वाटाघाटीनंतर 12 टक्के सुरक्षा अनामत व नियमीत 2 टक्के अनामत भरणा करण्यात यावी, असे नमूद करुन

निवीदा मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानुसार निवीदा धारकाने रक्कम रुपये 1,95,879/- भरणा करणे आवश्यक असतांना त्यांनी सदर रक्कमेचा भरणा न केल्याने त्यांना या कार्यालयाकडील पत्र क्रमांक ग्रापापू निवीदा 229, दिनांक 08/04/2015 नुसार सुरक्षा अनामत रक्कमेचा भरणा न केल्याने कामाची निकड पाहता सदर निवीदा रद्द करण्यात आली. तथापि, संबंधीत मक्तेदार यांनी बी - 1 निवीदेतील अटी शर्ती नुसार काम केलेले नसल्याने त्यांची निवीदा करिता भरणा केलेली इशारा रक्कम रुपये 13,991/- जप्त करावी व नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

2) प्रथम निवीदा रद्द केल्याने उपरोक्त अनुक्रमांक 1 मधील तांत्रीक मंजूरीची रक्कम रुपये 14,43,421/- असतांना नवीन निविदा सादर करतांना नवीन तयार केलेले अंदाजपत्रक मागणी करुनही उपलब्ध करण्यात आलेले नाही. सदर कामामध्ये केलेला बदल शेड्युल बी नुसार दिसून येतो. त्यानुसार रक्कम रुपये 17,46,125/- नमूद असल्याने अंदाज पत्रकातील परिमाणात बदल होत असल्यास त्याचा सविस्तर प्रस्ताव कारणासह सादर करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 118 नुसार फेरफार करणे आवश्यक आहे, असे वाटल्यास सुधारीत किंवा पुरक अंदाजपत्रक मंजूरीसाठी सादर करण्यात येईल, असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) योजना मंजूर होवून प्रथम धावते देयक दिनांक 04/11/2015 रोजी रक्कम रुपये 9,80,534/- देखभाल दुरुस्ती जिप संकेतांक 09967 या लेखाशिर्षाखाली पारित करण्यात आलेले आहे. काम पुर्ण दिनांक 15/09/2015 ला झालेले असतांना जिल्हा नियोजन समितीला पुनःश्च ( दुबार ) याच योजनेचा प्रस्ताव सादर करुन कामाकरीता जिल्हाधिकारी यांचेकडील प्रशासकिय आदेश क्रमांक- जिनिस/जिवायो/15-16/प्रमा/संस-4/2746, दिनांक 07/11/2015 मधील परिशिष्ट अ चे अनुक्रमांक 1 नुसार उपरोक्त कामास प्रशासकीय मंजूरी मिळून अनुदान प्राप्त झालेले आहे त्यानुसार अंतीम देयक पारित करतांना शासकिय लेखाशिर्षाखाली रक्कम रूपये 7,65,591/- पारीत करण्यात आलेले आहे. सबब शासन निधीचे प्राप्त अनुदान रक्कम रूपये 17,64,000/-शासनास परत करावे.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28/98, दिनांक 19/08/1998 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम रुपये 17,461/- कपात करुन विमा संचालनालयाकडे भरणां करणे आवश्यक असतांना, त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने रक्कम रुपये 17,461/- कमी भरणा केल्याने उद्देश सफल झालेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीए 12007/ प्र.क्र.788/ कामगार 7, दिनांक 21/04/2008 अन्वये कामाच्या एकूण मुल्याच्या 1 टक्का कामगार उपकर कपात करण्याबाबत सूचना आहेत. तथापि, सदर कामाच्या प्रदानामधून सदर उपकराची रक्कम रुपये 17,461/- कपात करण्यात आलेली नसल्याने कपात करण्यात येऊन शासन खाती भरणा करण्यात यावी.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 149(1) नुसार आदेश देणेपूर्वी करारनामा करुन घेऊन त्यात मक्तेदारांकडून कामाची सुरुवात व ते केंव्हा पूर्ण होईल, अशा विविध प्रकारच्या अटी/ शर्ती करणे आवश्यक आहे. करारातील कोणतेही अटी / शर्तीचा भंग केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतूद करारनाम्यात करण्यात यावी, तशी पध्दत अवलंबण्यात आलेली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका 1984 नियम 193(1) नुसार कंत्राटाच्या अटी नेमक्या व सुनिश्चित असल्या पाहिजेत. विभागाने हया नियमाप्रमाणे परीपूर्ण असा करारनामा न करता अत्यंत त्रोटक अशा प्रकारचा करार करुन घेतलेला आहे.

7) ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक लेखाप-3391/तृटी/उपाययोजना/प्र.255/52, दिनांक 31/05/1991 नुसार मोजमाप नोंदवहीत नोंदलेली मापे क्रॉस(X)केलेली नाहीत.

8) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद-132 तसेच महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक -1098/ प्र.क्र. 211, दिनांक 14/12/1998 नुसार विशेष दुरुस्ती करतांना, दुरुस्तीबाबतची मागणी व त्यानुसार करावयाच्या कामाचे निरीक्षण करुन स्थळ निरिक्षण अहवाल देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम-1099/ प्र.क्र.54/ 08, दिनांक 20/05/1999 मधील परीच्छेद क्रमांक (ब) नुसार सर्व प्रकारच्या नविन व दुरुस्तीच्या कामाच्या ठिकाणी माहीती फलक लावणे आवश्यक आहे. तथापि, फलक लावल्याचे दिसुन आले नाही.

10) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.फी.एम - 1099/प्र.क्रं.54/08, दिनांक 22/12/2000 नुसार काम पुर्ण झाल्यावर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.496 निगांव गांगर्डा व 17 गांवे जँकवेल पंपींग मशनरी दुरुस्ती करणेबाबत**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 88, दिनांक 14/10/2016 रक्कम रुपये 2,64,484/- खर्च करण्यात आला आहे. याबाबतीत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28/98, दिनांक 19/08/1998 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम कपात करुन विमा संचालनालयाकडे भरणां करणे आवश्यक आहे. त्यानुसार 1 टक्के रक्कम अंतीम देयकातुन कपात केलेली आहे, सदर रक्कमेचा भरणा काम सुरु करण्यापुर्वी करणे आवश्यक असतांना, त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने उद्देश सफल झालेला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 149(1) नुसार आदेश देणेपूर्वी करारनामा करुन घेऊन त्यात मक्तेदारांकडून कामाची सुरुवात व ते केंव्हा पूर्ण होईल अशा विविध प्रकारच्या अटी/ शर्ती करणे आवश्यक आहे. करारातील कोणतेही अटी / शर्तीचा भंग केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतूद करारनाम्यात करण्यात यावी. तशी पध्दत अवलंबण्यात आलेली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका 1984 नियम 193(1) नुसार कंत्राटाच्या अटी नेमक्या व सुनिश्चित असल्या पाहिजेत विभागाने हया नियमाप्रमाणे परीपूर्ण असा करारनामा न करता अत्यंत त्रोटक अशा प्रकारचा करार करुन घेतलेला आहे.

3) 75 क्षमतेच्या दोन पंप दुरुस्ती करण्यात आलेले असुन सदर दुरुस्तीमध्ये प्रत्येक पंपानुसार 40 किलो ग्रॅम कॉपरवायरचे मोजमापे नमूद आहे. तथापि, जून्या भंगार कॉपर वायर बाबत मोजमापे नमूद नाही. सदरची कॉपर वायर बाजारभावाप्रमाणे विक्री केली असता, पर किलो ग्रॅम रुपये 275/- ने विक्री केली असता (80x275) रक्कम रूपये 22,000/- कपात करुन रक्कम प्रदान करणे आवश्यक होते. तथापी, त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने रक्कम रुपये 22,000/- चे जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदानाची रक्कम वसुल करुन भरणा करावी.

4) ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक लेखाप-3391/तृटी/उपाययोजना/प्र.255/52, दिनांक 31/05/1991 नुसार मोजमाप नोंदवहीत नोंदलेलली मापे क्रॉस(X)केलेली नाहीत.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद-132 तसेच महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक -1098/ प्र.क्र. 211/ दिनांक 14/12/1998 नुसार विशेष दुरुस्ती करतांना सदर करावयाच्या कामाचे निरीक्षण करुन स्थळ निरिक्षण अहवाल देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम-1099/ प्र.क्र.54/ 08, दिनांक 20/05/1999 मधील परीच्छेद क्रमांक (ब) नुसार सर्व प्रकारच्या नविन व दुरुस्तीच्या कामाच्या ठिकाणी माहीती फलक लावणे आवश्यक आहे. तथापी, फलक लावल्याचे दिसुन आले नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.फी.एम1099/प्र.क्रं.54/08, दिनांक 22/12/2000 नुसार काम पुर्ण झाल्यावर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.497 शेवगांव पाथर्डी व 50 गावे प्रादेशीक नळ पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापन करणे जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** महाराष्ट्र जीवन प्राधीकरणामार्फत 1998 मध्ये सदरची योजना पुर्ण करणेत आलेली असून दिनांक 01/04/1999 पासून महाराष्ट्र जीवन प्राधीकरणकडून सदरची योजना देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परीषदेकडे हस्तांतरीत करणेत आलेली आहे. सदर योजना राबविणेकरीता निवीदा प्रसिद्धी देवून संकेत एन्टरप्रायजेस यांना दिनांक 23/07/2008 ते 31/08/2009 पर्यंत चालविणेस मंजूर देणेत आलेली होती. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापु/1002/प्र.क्र.639/पापु-07, दिनांक 22/05/2003 व महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो/प्र.क्र.52/ पापु -07, दिनांक 17/10/2014 नुसार प्रादेशीक पाणी पुरवठा योजनेच्या दैनिक व्यवस्थापनासाठी देखभाल व दुरुस्ती जिल्हा परीषदेने पार पाडावयाची असलेस ग्रामपंचायत / पाणी पुरवठा स्वच्छता समिती यांचेकडून जिल्हा परीषदेने करारनामा करणे आवश्यक आहे व त्या करारानुसार जिल्हा परीषदेस वेळोवेळी निधी उपलब्ध करुन दयावा लागेल, असे स्पष्ट निर्देश असताना जिल्हा परीषदेने कोणताही करारनामा न करता योजना ताब्यात घेवून चालविलेली आहे.

2) कामाच्या आदेशाप्रमाणे दिनांक 31/07/2009 पर्यंत योजना चालविणेची मुदत असताना प्रथम मुदत वाढ दिनांक 09/07/2009 अन्वये दिनांक 01/08/2009 ते 31/01/2010 पर्यत 6 महीन्यांकरीता देणेत आलेली आहे व दुसरी मुदतवाढ दिनांक 01/02/2010 अन्वये पुढील आदेश होईपर्यंत देणेत आलेली आहे. यावरुन दरवर्षी निविदा प्रसिध्द करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करता मुदत वाढ देवून योजना चालू ठेवणेत आलेली आहे जिल्हा परीषद सर्वसाधारण सभेत मुदतवाढीचा ठराव होत असताना निवीदा प्रसिध्द करणे आवश्यक आहे, असे मत विभाग प्रमुख व त्यांचे नियंत्रक अधिकारी यांनी मांडणे आवश्यक होते. पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन न झालेची कारण नमूद करुन वर्षानुवर्षे निविदेस मुदतवाढ जिल्हा परीषद सर्वसाधारण सभेने दिलेली आहे पाणी पुरवठा स्वच्छता समिती स्थापन न होणे तसेच मुदत वाढ देणेस संयुक्तीक बाब नाही.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापु/1002/प्र.क्र.639/पापु-07, दिनांक 22/05/2003 व महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो/प्र.क्र.52/ पापु -07, दिनांक 17/10/2014 नुसार देखभाल दुरुस्तीवर ग्रामपंचायत / पाणी पुरवठा स्वच्छता समिती यांनी 100 टक्के देखभाल दुरुस्ती करावयाची आहे अथवा जिल्हा परीषदेकडे वर्गणीचा भरणा करणे आवश्यक आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही न करता योजना अंतर्गत गावे व नगरपालिका यांचेवर मोठया प्रमाणात थकबाकी दिसून येते.

4) पाणी पुरवठा योजनां दैनंदीन व्यवस्थापन, देखभाल दुरुस्ती यांची संपुर्ण व भवीष्यात योजनेचे आयुष्य संपल्यावर तिची पुन:बांधणी करणेसाठी भांडवली गुंतवणुकीपैकी किमान 10 टक्के खर्चाची जबाबदारी ग्रामपंचायतीची असलेने त्याप्रमाणे कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 149 नुसार कार्यारंभ आदेश देणेपुर्वी करारनामा करुन अटी शर्ती सुनिश्चीत करणे आवश्यक होते. तसेच वारंवार येणा-या आर्थिक वर्षाकरीता योजना चालविणेकरीता प्रत्येक वर्षी नवीन करारनामा करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6) उपरोक्त योजनेमध्ये पाथर्डी नगरपालिकेससुध्दा पाणी पुरवठा होत असलेचे नमूद आहे तथापि, नगरपरीषदेच्या हददीत जिल्हा परीषदेने पाणी पुरवठा करणेचे कर्तव्य नाही. तरी संबंधीत नगरपालिकेशी तसा करारनामा /आदेश झालेला असलेस तो नस्तीसोबत दिसून आला नाही.

7) पाणी पुरवठा योजनेतील समावीष्ट ग्रामपंचायतीचे किमान कर्मचारीवर्गाचा सदर कामाकरीता प्रशिक्षण देउन वापर केला असता तर जिल्हा परीषदेची खर्चात बचत झाली असती.

8) दरमहा रक्कम ठरवून दुरुस्ती निवीदा घेतलेली असून ठेकेदारास रक्कम प्रदान करणेत येत आहे परंतू, प्रदान करतेवेळी नमूद केलेल्या निवीदेतील बाबी प्रमाणानुसार व नमूद दर्जानुसार केल्या जातात याबाबतचे कोणतेही नोंदी निदर्शनास नाही.

**3.498 शेवगावं पाथर्डी व 54 गावे 200 एच पी पंप व मोटार नवीन बसविणे व विदयुत उपांगे बसविणे अमरापुर तालुका शेवगांव.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** शेवगावं पाथर्डी व 54 गावे अंतर्गत 200 एच पी पंप व मोटार नवीन बसविणे व विदयुत उपांगे बसविणे अमरापुर येथे बसविणेकामी प्रमाणक क्रमांक 77, दिनांक 14/03/2016 रक्कम रुपये 7,05,144/-, प्रमाणक क्रमांक 815 दिनांक 31/03/2016, रुपये 19,49,353/- व प्रमाणक क्रमांक 49, दिनांक 09/06/2016 रुपये 2,94,944/- प्रमाणे खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामास वापरणेत आलेले 200 एच पी पंपाचे वॉरंटी कार्ड व बीजके इत्यादी कोणतेही अभिलेखे नस्तीसोबत उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे कामावर वापरणेत आलेले पंप मोटार किती एचपी ची वापरली, याचा बोध होत नाही.

2) सदर 200 एच पी पंप व मोटार व विदयुत उपांगे बसविलेचे फोटो नस्तीसोबत दिसून आले नाहीत

3) सदर कामाचे प्राकलन व मोजमाप पुस्तीकेतील कामाच्या मोजमाप नोंदी तसेच जिल्हा दरसूची तपासल्या असता खालीलप्रमाणे उणीवा दिसून आल्या:-

बाब क्र.2 (providing & erecting & test & trial of Motor of foot mounted SPDP motor 1500 rpm centrifugal Pump 215 HP) साठी प्राकलनात 215 HP ची मोटारीची तरतूद असताना मोजमाप पुस्तिकेत 200 HP ची मोटार बसविणेत आलेली आहे. प्रत्यक्ष पाहता नमूद काम हे 200 HP मोटारीचे असताना प्राकलनात 215 HP ची तरतूद कोणत्या आधारे करणेत आली, याचा खुलासा करावा.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक पंरास1001/प्र.क्रा 40/जल-03, दिनांक 19/10/2001 अन्वये संबंधीत काम करणारी संस्था/मक्तेदाराने एक वर्षाची देखभालीची हमी देण्यात यावी. तसेच 10 टक्के निधी 1 वर्षासाठी देण्यात येवू नये. तो राखून ठेवावा, असे आदेश असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली दिसुन येत नाही.

5) महाराष्ट जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 124 अन्वये वरीष्ठ व कनिष्ठ अभियंत्याने मक्तेदाराकडे सोपविणेत आलेले प्रत्येक कामाचे कार्यादेश पुस्तक ठेवावे व त्यामध्ये कार्यकारी अभियंता यांचे आदेश, कामातील बदल, सूचना, यांचे नोंदी कार्यकारी अभियंता यांनी तपासाव्यात. सदर बुक ठेवण्यात आलेले नाही.

**3.499 मौजे पारगांव - माळशिरस तालुका पुरंदर येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्तीचे काम करणे.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** मौजे पारगांव - माळशिरस तालुका पुरंदर येथील नळ पाणी पुरवठा योजनेवर रक्कम रूपये 24,92,326/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 166 प्रमाणे मोजमाप पुस्तिकेमध्ये मापे नोंद करुन त्याचा गोषवारा काढुन देयक तयार करुन देयक अदा केलेनंतर नियम 180 प्रमाणे लाल शाईने त्यावर कर्ण रेषा ओढणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता देयक आदा केलेनंतर लाल शाईने त्यावर कर्ण रेषा ओढणेत आलेली नाही. सदरची बाब नियम बाहय असुन त्यामुळे दुबार देयक अदा होणेची शक्यता नाकारता येत नाही. आता देयक आदा केलेबाबत कर्ण रेषा ओढुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 97 नुसार सदर कामाची नोंद घेतलेली स्थावर मालमत्ता नोंदवही रजिस्टर नमूना क्रमांक 39 लेखापरीक्षणास सादर करण्यात यावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 नुसार मंजूर करण्यात आलेला प्रत्येक करारनामा नमुना नंबर 48 मधील नोंदवहीत नोंदवून नियम 148 नुसार बांधकामाच्या प्रारंभाचा व ते पूर्ण केल्याच्या वेळेचा तसेच इतर आवश्यक अटी शर्तीचा करारनाम्यात उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच नियम 146 व 148 नुसार करारनाम्यात संपूर्ण तपशिल देणे आवश्यक असताना तसेच नियम 116 (2) नुसार सदर

करारनामा जिल्हा परिषदेच्या सामान्य मुद्रेने मोहोरबंद करणे आवश्यक आहे. कामाच्या निविदेसोबत Schedule B नाही. त्यामुळे करारनामे करताना वरील तरतुदीचे योग्य पालन केलेले नाही. त्यामुळे सदर करारनामा विधीग्राह्य ठरत नाही.

4) विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविनि 2307/जिप/सातारा/विमा संकिर्ण अभि-2, दिनांक 16/11/2007 जिल्हा परिषद, पुणे बांधकाम विभागाचे परीपत्रक क्रमांक जिप/बां./प्र.क्र.793, दिनांक 25/03/2011 नुसार कामाचा व कामगाराचा विमा काम सुरु करणेपुर्वी उतरविणे आवश्यक आहे. तथापि, काम सुरु करण्यापुर्वी विमा न उतविल्यास पहील्या धावत्या देयकातुन 1 टक्के रक्कम रूपये 24,923/- वसुल करणे आवश्यक असतांना रक्कम रूपये 12,462/- वसुल केली आहे. परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही. आता कमी वसुली रक्कम रुपये 12,461/- संबंधीताकडुन वसुल करुन विमा संचालनालयाकडे भरणा करुन विमा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी

5) हस्तांतरण सुचीमध्ये योजनेतील पुर्वीचे निकामी मोटर पंप हस्तांतरीत केल्याबद्दल उल्लेख नाही सदर बाबतीत पंप निर्लेखीत करुन रक्कम भरणा केल्याचे चलन सादर करावे.

6) Tender Form Opening Inviting Authority तुलनात्मक दर तक्त्यावर Tender Opening Committee च्या स्वाक्षऱ्या नाहीत.

7) उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा यांच्या सर्वसाधारण माहीती अहवालानुसार सदर योजनेसाठी 50 HP पाणबुडी पंप व 150 HP मोटार पंपाची आवश्यकता आहे. सदर बाबीसाठी DSR मध्ये दर उपलब्ध नसल्यामुळे कोटेशन हे SB व Cemense Co चे यांच्याकडुन घेतल्याबाबत माहीती नोंदविलेली आहे. परंतु, सदर योजनेसाठी 41.00 BHP चे 2 नग व 150 BHP चे 2 नगासाठी देयक अदा करण्यात आलेले आहे. खरेदी पंपासाठी तपासणी अहवाल दप्तरी दाखल नाही.

8) B-1 निविदा सुचना क्रमांक 2015-16 ( तांत्रिक लिफाफासाठी ) अट क्रमांक (ड) प्रमाणे Pre-Qualification Criteria मध्ये विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र व विक्रीकर प्रमाणपत्र (वॅट प्रमाणपत्र) तसेच शासकीय निमशासकीय संस्थेकडे केलेल्या Pre-Qualification Criteria मध्ये नमुद केलेप्रमाणे पुर्ण कामाचे विहीत नमुन्यात कार्यकारी अभियंता तथा समकक्षीय अधिकारी यांचे स्वाक्षरी असलेले दाखले स्कॅन करुन अपलोड करावे लागेल, अशी अट आहे. त्याचप्रमाणे Pre-Qualification Criteria मधील अट क्रमांक 5 मध्ये 'The Contractors shall have experience supplying erecting commissioning testing & completion of 25.00 HP Submersible Pump set and 75.00 H.P centrifugal pump set is required" अशी अट कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरीने आहे. सदर अटीस अनुसरुन कंत्राटदार यांनी दिनांक 01/07/2015 रोजी प्रमाणपत्र दिलेले आहे व सदर प्रमाणपत्रामध्ये सदर कंत्राटदार यास फक्त 30 H.P Pump पुरवठयाचा अनुभव असल्याचे उपअभियंता यांचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदर बाबतीत कंत्राट कामासाठीच्या अटी शर्ती मंजुर नसताना कंत्राटदार यांस काम मंजुर केलेले आहे व सदर बाबतीत अनियमितता झाली आहे.

9) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 01/12/2016 अन्वये रुपये 3 लाखाच्या आतील रकमेची खरेदी खुल्या बाजारातुन कमीत कमी 3 पुरवठादार/उत्पादक यांच्याकडुन दरपत्रके प्राप्त करुन घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. परंतु, सदर खरेदी प्रक्रियेमध्ये फक्त दोनच पुरवठादाराकडुन दरपत्रके प्राप्त करुन घेतलेली आहेत. तसेच प्राप्त केलेली दरपत्रके ही उपरोक्त शासन निर्णयातील परीच्छेद क्रमांक 3.2.3 मधील अटी प्रमाणे उपलब्ध न करता खरेदी प्रकीया पार पाडण्यात आलेली आहे. सदर बाबतीत खुलासा करावा.

10) अंदाजपत्रकामध्ये Item No. 2 वर 41.00 HP Pump Set करीता प्रत्येकी दर रूपये 1,65,000/- हे 5 टक्के VAT सहित असल्याचा उल्लेख केलेला आहे. परंतु, देयकातुन एकुण खरेदी नग 2 साठी दर रुपये 1,65,000/- प्रमाणे एकुण रुपये 3,30,000/- वर 2 टक्के प्रमाणे रूपये 6,600/- VAT ची रक्कम कपात करण्यात आलेली आहे. आता VAT ची कमी कपात उर्वरीत 3 टक्के ही एकुण खरेदी रुपये 3,30,000/- वर रूपये 9,900/- संबधीत कंत्राटदार यांच्याकडुन वसुल करुन भरणा केल्याचे चलन सादर करावे.

11) 150 HP च्या 1 नगासाठी अंदाजपत्रकामध्ये दर प्रत्येकी रुपये 6,56,475 + 5 टक्के VAT रूपये 32,824/- = रूपये 6,89,298/- प्रमाणे एकुण 02 नगासाठी रूपये 11,71,806/- वर 2 टक्के प्रमाणे रूपये

23,436/- VAT ची रक्कम देयकातुन कपात करण्यात आलेली आहे. आता VAT ची कमी कपात उर्वरीत 3 टक्के ही एकुण खरेदी रुपये 11,71,806/- वर रूपये 35,154/- संबधीताकडुन वसुल करुन भरणा केल्याचे चलन सादर करावे.

**3.500 मौजे गाडकवाडी तालुका खेड येथे खडकात टाकी बांधणे कामातील अनियमितता**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 30) -** मौजे गाडकवाडी तालुका खेड येथे खडकात टाकी बांधणे कामावर रक्कम रूपये 9,87,610/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अ) निविदा शर्त क्रमांक 14 व 15 व महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114, 118, 120 व 152(2) अन्वये अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुस-या बाबीवर वापरु नये. तसेच एखादया बाबीतील तरतुदीमध्ये 25 टक्के पेक्षा जादा वाढ होत असेल किंवा खर्चात रूपये 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्यास कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्वमान्यता घेवूनच काम करणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही. सदरबाबत सक्षम प्राधिका-याची मंजुरी न घेतलेने सदरचा खर्च रक्कम रूपये 1,63,611/- लेखापरिक्षणात आक्षेपाधीन करणेत येत आहे. खालील बाबींवर अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्च केलेला आहे.

ब) तसेच खालील बाबींच्या परिमाणात बचत ही 10 पेक्षा अधिक आहे. महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधिल नियम क्र.152(3) नुसार कामातील बचत ही अन्य बाबीच्या कामावरील खर्च करणेकरीता वापरणे अनियमिततेचे आहे.त्यामुळे बचत कोणत्या प्राधिकारान्वये वापरण्यात आली हे स्पष्ट करण्यात यावे.तो पर्यंत सदर बाबीवरील बचतीची रक्कम पुर्व परवानगी न घेता वापरल्याने रक्कम रूपये 243176/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी-1087/सीआर-94/इमारती-2, दिनांक 14/07/1989 अन्वये व निविदा बी-1 क्लॉज 20 मध्ये दोष दायित्वाचा कालावधी निश्चित करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. सदरबाबत नियमबाहयता झाली आहे.

3) योजनेचे काम सुरु करण्यापुर्वी उपलब्ध पाण्याचा स्तोत्र लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेसा असल्याबाबत जिल्हा परिषद भूजल तज्ञाचा अहवाल घेण्यात आलेला नाही.

4) निविदा बी 1 वर बाब क्रमांक 5 Providing and fixing in position for steel bar reinforcement of various dia for rcc work या बाबीसाठी दर रुपये 50,688.90 प्रती एम टी साठी घेण्यात आलेला आहे. परंतु, सदर बाबीच्या कामाचे देयक प्रदान करताना मात्र दर रुपये 55,205/- एवढा घेण्यात येऊन कंत्राटदारास रक्कम प्रदान करण्यात आल्यामुळे जादा दर प्रदान रुपये 4,516.10 प्रति एम टी प्रमाणे पुरवठा 1.43 एम टी साठी रुपये 6,458/- जादा प्रदान करण्यात आलेले आहे. सदर जादा प्रदान रक्कम रुपये 6,458/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रुपये 6,458/-

5) बाब क्रमांक 8 च्या माहिती फलकासाठी बी 1 निविदेमध्ये दर रुपये 2,446/- एवढा घेण्यात आलेला आहे. तथापि, सदर बाबीचे दर रुपये 5,000/- एवढा प्रदान देयकामध्ये घेण्यात आल्यामुळे कंत्राटदारास रुपये 2,554/- जादा रकमेचे प्रदान करण्यात आलेले आहे. सदर जादा प्रदान संबधीत ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावे.

वसुलपात्र रक्कम रुपये 2,554/-

6) मंजुर निविदा ही रक्कम रुपये 10,55,440/- ची असताना एकुण देयक रक्कम रुपये 10,56,897/- चे काम करण्यात आलेले आहे. जादा कामाबाबत संबधीत सक्षम अधिकारी यांची मंजुरीविना जादा काम लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. जादा खर्च रक्कम रुपये 1,457/- लेखा परीक्षणात वसुलपात्र करण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रुपये 1,457/-

7) सदर काम ज्या ठिकाणी केले, ती जागा ग्रामपंचायत मालकीची असलेबाबतचे अभिलेखे (नमुना नंबर 8 अ) नस्तीसोबत उपलब्ध झाले नाही. खडकात टाकी खोदणे हे काम करण्यापुर्वीचा फोटो नस्तीसोबत जोडलेला नाही.

8) महाराष्ट्र शासन, बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ठ 24 मधील नियम 15 प्रमाणे नोंदविण्यात आलेली मोजमापे स्विकारल्याचे दर्शक म्हणून मक्तेदाराची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही दिसून आली नाही. खुलासा करुन पुर्तता दाखवावी.

**3.501 मौजे भोसे येथील वितरण व्यवस्थेचे काम करणे तालुका खेड 2016-2017**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 31) -** मौजे भोसे येथील वितरण व्यवस्थेचे काम करणेकरिता रक्कम रूपये 11,98,627/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अ) निविदा शर्त क्रमांक 14 व 15 व महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114, 118, 120 व 152(2) अन्वये अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुस-या बाबीवर वापरु नये. तसेच एखादया बाबीतील तरतुदीमध्ये 25 टक्के पेक्षा जादा वाढ होत असेल किंवा खर्चात रूपये 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्यास कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्वमान्यता घेवूनच काम करणे आवश्यक होते परंतु, working estimate वरील दिनांक म्हणजेच सदरबाबत सक्षम प्राधिका-याची मंजुरी उशिरा घेतलेने सदरचा खर्च रक्कम रूपये 1,55,722.73/- लेखापरिक्षणात अक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

ब) तसेच खालील बाबींच्या परिमाणात बचत ही 10 पेक्षा अधिक आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधिल नियम क्रमांक 152(3) नुसार कामातील बचत ही अन्य बाबीच्या कामावरील खर्च करणेकरीता वापरणे अनियमिततेचे आहे. त्यामुळे बचत कोणत्या प्राधिकारान्वये वापरण्यात आली? हे स्पष्ट करण्यात यावे. तोपर्यंत सदर बाबीवरील बचतीची रक्कम पुर्व परवानगी न घेता वापरल्याने रक्कम रूपये 63,775/- अक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

2) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग एक मध्ये उपविभाग विभाग विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील दिनांक 04/04/2012 च्या अधिसुचनेनुसार अधिसुचना क्रमांक विसआ (मुख्या) 1/मूवक/ 2005/97, दिनांक 29/08/2005 मध्ये सुधारणा करत असतांना अनोंदणीकृत मक्तेदारांना 4 टक्के विक्रीकर ऐवजी 5 टक्के विक्रीकर कपात करण्यात यावा, असे नमूद केलेले आहे. वरील नमूद केलेनूसार बांधकामाच्या प्रथम देयकाची एकुण रक्कम रूपये 11,98,627/- एवढ्या रकमेवर 5 टक्के मूल्यवर्धित कर रक्कम रूपये 59,931/- वसूल करणे आवश्यक असताना रक्कम रूपये 23,973/- एवढी वसुल केलेली आहे. तरी कमी वसुल केलेली एकुण रक्कम रूपये 35,958/- वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन खाती भरणा केल्याची पुर्तता दाखविणे आवश्यक आहे

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 नुसार मंजूर करण्यात आलेला प्रत्येक करारनामा नमुना नंबर 48 मधील नोंदवहीत नोंदवून नियम 148 नुसार बांधकामाच्या प्रारंभाचा व ते पूर्ण केल्याच्या वेळेचा तसेच इतर आवश्यक अटी शर्तीचा करारनाम्यात उल्लेख करणे आवश्यक आहे. निविदा फॉर्म बी पान क्रमांक 15 वर अंदाजपत्रकीय दराच्या 8.52 टक्के कमी दराने काम करण्यास तयार असल्याबाबत कंत्राटदार यांची स्वाक्षरी नाही. तसेच नियम 146 व 148 नुसार करारनाम्यात संपूर्ण तपशिल देणे आवश्यक असताना तसेच नियम 116 (2) नुसार सदर करारनामा जिल्हा परिषदेच्या सामान्य मुद्रेने मोहोरबंद करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर करारनामा विधीग्राहय ठरत नाही. त्यामुळे करारनामे करताना वरील तरतुदीचे योग्य पालन केलेले नाही.

4) विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविनि 2307/जिप/सातारा/विमा संकिर्ण अभि-2, दिनांक 16/11/2007 जिल्हा परिषद, पुणे बांधकाम विभागाचे परीत्रक क्रमांक जिप/बां./प्र.क्र.793, दिनांक 25/03/2011 नुसार कामाचा व कामगाराचा विमा काम सुरु करणेपुर्वी उतरविणे आवश्यक आहे. तथापि, काम सुरु करण्यापुर्वी विमा न उतविल्यास पहील्या धावत्या देयकातुन 1 टक्के रक्कम रूपये 11,986/- वसुल करणे आवश्यक असतांना रक्कम रूपये 5,993/- वसुल केली आहे. कमी वसुली रक्कम रुपये 5,993/- संबंधीताकडुन वसुल करुन विमा संचालनालयाकडे भरणा करुन विमा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

**3.502 जिल्हा वार्षिक योजना निधीतून पाणी पुरवठा योजना कामावर केलेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन 2016-2017 मध्ये विशेष घटक नळ पाणी पुरवठा याजनेवर रक्कम रुपये 7,49,728/- व नियमित नळ पाणी पुरवठा योजनेवर रक्कम रुपये 22,27,78,774/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखापरीक्षणादरम्यान लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 16 दिनांक 13/11/21017 व अर्धसमासपत्र क्रमांक 21 दिनांक 16/11/2017 ने कामाच्या निविदा नस्ती मोजमाप पुस्तके, अंदाजपत्रके इत्यादींची मागणी करुनही सदर अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही. तसेच लेखापरीक्षण पुर्ण होईपर्यंत विभागाने अर्धसमासपत्रास कोणतेही उत्तर दिले नाही. यावरुन विभागाची लेखापरीक्षणाबाबत उदासिनता दिसून येते.

2) लेखापरीक्षण अहवाल सन 2014-2015 मधील परिच्छेद क्रमांक 36 व लेखापरीक्षण अहवाल सन 2015-2016 मधील परिच्छेद क्रमांक 37 मध्ये नमूद केलेनुसार सदर कामे सन 2010-2011 पासून मंजूर केलेली अपुर्ण असलेची दिसून येत आहे. तसेच सदर परिच्छेदानुसार मागील दोन वर्षाचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. यावरुन विभागाने अभिलेखे उपलब्ध करणेबाबत कोणत्याही प्रकारची ठोस उपाययोजना राबविल्याचे दिसून येत नाही. कामे अपुर्ण असलेने पाणी पुरवठासारख्या मूलभूत बाबींसाठी शासन अनुदानाचे संबंधित ग्रामस्थांना प्रत्यक्ष कोणताही लाभ झाल्याचे दिसून येत नाही. कार्यकारी अभियंता यांनी सर्व प्रलंबित कामे तातडीने पुर्ण होण्यासाठी ठोस उपाययोजना करुन अपुर्ण काम पुर्ण झाल्याबाबतची पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 10.02/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार निधी वितरीत केलेल्या वर्षापासून पुढील आर्थिक वर्षात अनुदान खर्च होणे आवश्यक आहे. दोन वर्षापासून अखर्चित अनुदानाची सर्व ग्रामपंचायतींकडून माहिती घेऊन रक्कम शासनास परत करणेबाबतची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.503 पाझर तलाव जोड प्रकल्प मौजे वेळू, तालुका कोरेगांव**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 27,05,324/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए/2009/प्र.क्र./108/ कामगार/7अ, दिनांक 17/06/2010 नुसार 1 टक्के उपकर वसुल करुन कामगार कल्याण मंडळाकडे रक्कम रुपये 27,053/- जमा करणे आवश्यक आहे.

2) 1 टक्का आयकर - भारतीय आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(सी) अन्वये 1 टक्के वैयक्तिक व 2 टक्के संस्था यांच्याकडून आयकर वसुल करणे आवश्यक आहे. तथापि, सदर बिलातून आयकर रक्कम रुपये 27,053/- वसुल केलेला असून उर्वरीत वसुल होणेबाकी रक्कम रुपये 27,053/- शासनास भरणा केल्याची पुर्तता दाखवावी.

3) खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11/05/2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400/- व प्रती घमी रूपये 141.34/- प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. सदर कामात रॉयल्टी स्टेटमेंटनुसार बिलातून वसुल न केलेली रक्कम रुपये 7,112/- एवढे शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

4) बाब क्रमांक 1 नुसार खुदाई कठीण खडक परिमाण 3014.175 घनमीटर ची रूपये 346.50/- दराने रक्कम रुपये 10,44,411.64/- एवढी मक्तेदारास अदा करण्यात आलेली आहे. परंतू, सदर बाबीचा अंदाजपत्रकात समावेश असलेबाबत दिसून येत नाही. याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजूरीअन्वये पुर्तता होणे आवश्यक आहे.

**3.504 टीसीएल /ब्लिचिंग पावडरबाबत**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** टीसीएल खरेदीबाबत रक्कम रूपये 9,21,417/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तालुका स्तरावर रक्कम रुपये 4,82,680/- ची व जिल्हा स्तरावर रक्कम रुपये 4,38,737/- ची अशी एकूण रक्कम रुपये 9,21,417/- इतका खर्च केला आहे. परंतु, महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार रक्कम रुपये 3,00,000/- च्या वरील खरेदी ही ई-निविदा/ ई-टेंडरिंग पद्धतीने करणे आवश्यक आहे. तथापि, ई-निविदा पद्धतीचा अवलंब न करता दरपत्रके मागवून केलेली खरेदी नियमबाहृय आहे.

2) खरेदी समितीची मान्यता घेऊन खरेदी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.505 भूजल सर्वेक्षणासाठी ब्लास्टिंग वाहने लावणेसाठी व कार्यशाळेसाठी जागा भाड्याने घेतलेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षण करताना यांत्रिकी उपविभाग, सांगलीकडील भूजल सर्वेक्षणासाठीची ब्लास्टिंग वाहने लावणेसाठी व कार्यशाळसाठी जागा भाड्याने घेउन सन 2016-2017 या कालावधीचे दर महिना 2,560/- प्रमाणे रुपये 30,720/- कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक खाते क्रमांक 773 वर रक्कम हस्तांतर निधीतून अदा करून खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, अधिसूचना क्रमांक 1000/स.क्र.107(1) प.पु.-7, दिनांक 14/11/2000 अन्वये सदर कार्यालय जिल्हा परिषदेकडे वर्ग झालेले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद कार्यालयासाठी जिल्हा परिषदेचीच जागा भाड्याने घेऊन शासनाकडून सदर रक्कम प्राप्त करून घेऊन भरणा केली आहे.

2) सदर जागा भाड्याने घेण्यासाठी शासनाची मंजुरी घेतल्याचे पत्र नस्तीसोबत नाही. मंजुरी नसताना खर्चासाठी रक्कम मागणी करून आदा केली आहे. याबाबत खुलासा करावा.

3) रक्कम रुपये 30,720/- प्रती वर्ष प्रमाणे सन 2000-2001 ते 2016-2017 सतरा वर्षाचे एकूण रक्कम रूपये 5,12,240/- एवढी रक्कम शासनास भरणा करावी व अनियमित प्रदानाची भरपाई करावी.

**3.506 पाणी पुरवठा योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा वार्षिक योजना व इतर राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी सन 2016-2017 मध्ये रक्कम रूपये 22,33,60,832/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोजमाप पुस्तकाच्या नोंदी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 165 नुसार नमुना नंबर 53 मध्ये नोंद घेणे आवश्यक असताना नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच निविदा प्रक्रिया कागदपत्रे नस्तीसोबत उपलब्ध झाले नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापयो/1109/ प्र.क्र.104/(पा.पु.)/07, दिनांक 17/03/2010 नुसार 50 लक्ष ते 5 कोटी पर्यंत योजनांची तांत्रिक अंमलबजावणी जिल्हा परिषदेने करणेची असताना व सर्व कागदपत्र मोजमाप नोंदवहीत जिल्हा परिषद स्तरावर असणे आवश्यक आहे. तथापि, तशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापयो/1109/ प्र.क्र.104/(पा.पु)/07, दिनांक 17/03/2010 नुसार ग्रामपंचायत स्तरावर तांत्रिक व्यक्तीची अथवा संस्थेची नेमणूक करणे आवश्यक असताना तांत्रिक कामासाठी कोणाची नेमणूक केली आहे? याची यादी उपलब्ध केलेली नाही. त्यामुळे त्याबाबत खात्री करता येत नाही.

4) ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने दिलेल्या महितीनुसार 254 गावातील नळपाणी पुरवठा योजना अपूर्ण अवस्थेत आहेत. सदर कामासाठी इस्टीमेट रक्कम रूपये 174.37 कोटी गुंतून राहिले आहेत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापयो/1109/ प्र.क्र.104/(पा.पु)/07, दिनांक 17/03/2010 परि. क्रमांक 4 नुसार 2.50 कोटी पर्यंतच्या कामची गुणवत्ता तपासणी व सबंधित कार्यवाही अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व त्यापुढील 2.50 कोटी ते 5 कोटी पर्यंतच्या कामाची गुणवत्ता तपसणी व सबंधित कार्यवाही मुख्य अभियंता यांनी करणेची आहे तथापि, तशा कार्यवाहीचे प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापयो/1109/ प्र.क्र.104/(पा.पु)/07, दिनांक 17/03/2010 नुसार परि. क्रमांक 8(1) नुसार प्रत्येक स्टेजसाठी कार्यारंभ आदेश स्वतंत्रपणे देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापयो/1109/ प्र.क्र.104/(पा.पु)/07, दिनांक 17/03/2010 मधील अनुक्रमांक 11 नुसार योजना पूर्ण झाल्यावर ठेकेदाराने एक वर्ष योजना चालविणे आवश्यक आहे व योजना एक वर्ष चालविल्याबाबत प्रमाणपत्र सादर केल्यानंतर ठेकेदारास 10 टक्के रक्कम देय आहे. परंतु, तसे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे व योजना पूर्ण होऊन एक वर्ष चालविल्यानंतर प्राप्त अनुदानापैकी 33 कामांची 10 टक्के रक्कम अद्याप देणे बाकी आहे. तथापि, अशी एकूण किती रक्कम देणे बाकी आहे? याबाबतची कोणतीही माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही. त्यामुळे त्याची खात्री करता आली नाही.

8) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांचे आदेशानुसार भारत निर्माण योजनेच्या अदा केलेल्या रक्कमेतून 20 टक्के अबकारी कर त्यावर 16 टक्के सरचार्ज वसूल करून भरणा करणेबाबत आदेश दिलेले आहेत. तथापि, तशी वसुली केलेली नाही.

9) ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने दिलेल्या माहितीनुसार गावातील नळपाणी पुरवठा योजना अपूर्ण अवस्थेत आहेत. सदर योजनांपैकी चालू (Ongoing) नमूद केलेल्या योजना ह्या सन 2008-2009 वर्षापासून सुरु असल्याचे दिसून येते व बऱ्याच वर्षापासून अपूर्ण असल्याचे दिसून येते

10) झालेला खर्च कोणत्या वर्षाच्या प्राप्त निधीतून केला आहे? याबाबत माहिती उपलब्ध नसल्याने सन 2015-2016 पूर्वीच्या निधीतून खर्च केला असल्यास तो लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही त्यास शासनाचे क्षमापन घेऊन दाखवावे.

### 3.507 मौजे वाडी रत्नागिरी (जोतिबा) तालुका पन्हाळा येथील मुरलीधर तलावातील दुरुस्ती करणे.

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** मौजे वाडी रत्नागिरी (जोतिबा) तालुका पन्हाळा येथील मुरलीधर तलावातील दुरुस्ती करणेकरिता रक्कम रूपये 7,14,339/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तकाची तपासणी करता बाब क्रमांक 2 अन्वये 1,616.53 घमी. काम excavation for foundation in earth soil of all types sand gravel and soft murum मध्ये झाले आहे. सदर खुदाई ही PWD DSR 14-15 पान क्रमांक 7 बाब क्रमांक 1ia/a अन्वये दर रुपये 138/- प्रती घमी. प्रमाणे केली आहे. परंतु, सदर काम रोड सेक्शनचे असलयाने PWD DSR 14-15 पान क्रमांक 207 बाब क्रमांक 2b/23 अन्वये रक्कम रुपये 60/- प्रमाणे निश्चित असताना तसा दर न देता रुपये 138/- प्रमाणे खुदाईचा दर अदा केला आहे. तसेच सदर काम हे 100 घमीच्या पुढे असल्याने डीएसआर 2014-2015 पान क्रमांक 5 बाब क्रमांक 6.11 अन्वये 100 घमीच्या आतील खुदाई केली असेल तर मनुष्यबळाचा दर देणे आवश्यक आहे व 100 घमी. च्या पुढे खुदाई असेल, तर मशिनच्या वापराचा खुदाईचा दर देणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नसल्याने रुपये 1,39,959/- संबंधिताकडुन वसुलात आणुन पुर्तता दाखवावी

2) सदर कामात 46.06 घमी. गौण खनीजाचा वापर केलेला आहे. महाराष्ट्र शासन, राजपत्र दिनांक 11/05/2015 अन्वये रुपये 141.34 रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असता ती 70.34 ने वसुल केलेली आहे. रककम

रुपये 9,680/- वसुल करणे आवश्यक असताना रुपये 4,840/- वसुल केली आहे. कमी वसुल रुपये 4,840/- वसुल करावी.

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण/2004/प्रक्रं 85/रस्ते 2, दिनांक 11/06/2004 नुसार ब-1 निविदेमधील खंड 38 खालील प्रस्तावास क्षेत्रिय अधिक्षक अभियंता यांची मंजुरी प्राप्त झाल्यावरच तसेच सक्षम तांत्रिक अधिकाऱ्याची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच वाढीव परिमाणाचे प्रदान करता येईल. असे असताना ब-1 निविदा अट क्रमांक 38 नुसार सक्षम मंजुरी न घेता वाढीव परिमाणावर केलेला खर्च रक्कम रुपये 10,33,001/- केलेला आहे.

4) सदर कामाचे देयकावर मक्तेदार यांची स्वाक्षरी नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 174 नुसार फॉर्म नंबर 58 रनिंग अकौंट बीलावर मक्तेदार यांची दिनांकित स्वाक्षरी घेणे बंधनकारक असताना विना स्वाक्षरी देयक कसे पारीत केले, याचा खुलासा करुन पुर्तता करावी

5) महाराष्ट्र शासन, बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 नियम 15 नुसार नोंदविलेली मोजमापे स्विकारलेचे दर्शक म्हणुन मक्तेदाराची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 अन्वये कामाची प्रत्येक बाब उपअभियंता यांनी 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, मोजमाप नोंदवहीवर त्याप्रमाणे कार्यवाही झालेचे दिसून येत नाही.

**3.508 मौजे महागाव तालुका गडहिंग्लज येथे गाव तलावाची दुरुस्ती करणे**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 26) -** मौजे महागाव तालुका गडहिंग्लज येथे गाव तलावाची दुरुस्ती करणेकरिता रककम रूपये 29,02,052/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे अंदाजपत्रक तपासता पुर्ण बाबीवर 10 टक्के डोंगराळ भागासाठीचा वाढीव दर आकारण्यात आला आहे. शासन निर्णय क्रमांक PWDR/DSR/1091/CR/6577/Planning 3, दिनांक 08/07/2003 अन्वये पुर्ण बाबीसाठी जादा टक्केवारी देय नाही. तथापि, जादा रक्कम रुपये 68,941/- अदा झाली. ती अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

2) उपलब्ध नस्तीसोबत कामाचे जादा/बचत प्रमाणपत्र जोडलेले नाही. त्यामुळे कोणत्या बाबीवर जादा खर्च झाला आहे? हे समजुन येत नाही. तथापि, अंदाजपत्रक व मोजमाप नोदंवहीची पडताळणी केली असता अंदाजपत्रकापेक्षा जादा काम केलेचे दिसून येते

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 143(1) व बी-1 टेंडर फॉर्ममधील कलम 38(12) तरतूदीनुसार कामाच्या परिमाणाच्या 25 टक्के किंवा रुपये 5,000/- पर्यंतचे जादा काम करण्याची तरतूद असताना जादा काम करणेत आले आहे.

3) अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 9 filling in plinth and floors murum bedding वरील 463.27 घमीचे काम प्रस्तावीत होते. तथापि, मोजमाप नोंदवहीनुसार प्रत्यक्ष काम केवळ 116.20 घमी चे केले आहे. त्यामुळे अंदाजपत्रक कोणत्या आधारे तयार केले? याबाबत साधार स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

**3.509 मौजे सोनवडे तालुका शाहुवाडी येथील गाव तलावातील गाळ काढणे**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 30) -** मौजे सोनवडे तालुका शाहुवाडी येथील गाव तलावातील गाळ काढणेकरीता रक्कम रूपये 13,57,446/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तलावातील गाळ काढणेकरिता अंदाजपत्रकात बाब क्रमांक 2 अन्वये माती मुरुमात खुदाई करुन काढलेला गाळ 2 किमी पर्यंत वाहतुक करणेची तरतूद केली आहे त्याकरिता 51.50 प्रती घमी लिडची तरतूद केली आहे.

खुदाईतुन 3755.64 घमी इतका गाळ खुदाई केला आहे. खुदाईतून निघालेला गाळ 2 किमी अंतरावर कोणत्या जमिनीत साठा केला? ते नमूद केलेले नाही अथवा ग्रामपंचायतीच्या ताब्यात दिलेचे प्रमाणीत केलेले नाही. सबब गाळाची काय विल्हेवाट लावली? ते स्पष्ट होणे आवश्यक आहे

2) काम सुरु दिनांक 03/03/2016 आहे. उपअभियंता उपविभाग क्रमांक 2 कोल्हापूर यांनी नस्तीसोबत जोडलेल्या पाणी उपसा तक्त्यानुसार दिनांक 03/03/2016 ते 17/03/2016 या 15 दिवसाकरिता दररोज सकाळी 10 ते 6 वाजेपर्यंत एकूण 8 तास x 2 पंप व्दारे 16 तास प्रमाणे एकूण 240 तास पाणी उपसा केलेचे स्वाक्षरीत केले आहे. तथापि, ग्रामपंचायत सोनवडे मासिक सभा दिनांक 22/03/2016 विषय क्रमांक 9/1 ठराव क्रं. 68/1 अन्वये कमी पाऊस झालेने गावामध्ये पाण्याची टंचाई आहे. शिवाय सदरच्या तलावातील पाणी उपसणेचे काम केलेस पाण्याची तीव्र टंचाई भासणार आहे. तसेच आजुबाजूस पाण्याचा स्त्रोत नसलेने गावातील जनावरांचे पाण्याविना हाल होणार आहेत. तरी सध्या पाणी उपसा न करता येईल, तेवढे करणेस व उर्वरित काम हे पावसाळयापुर्वी करणेस परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव तयार करुन मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयास पाठविणेबाबत सभेमध्ये ठराव मंजुर केला आहे. तसेच मक्तेदार यांनी दिनांक 17/03/16 रोजी मुदतवाढीच्या लेखी अर्जातसुध्दा उपरोक्त कारण नमूद केले आहे व नस्तीसोबत जोडलेल्या कामाच्या फोटोमध्ये पाणी उपसा न करताच गाळ काढणेचे काम सुरु असलेचे दिसुन येते.

पहिल्या धावत्या देयकातील बाब क्रमांक 7 अन्वये 240 तासाकरिता दर रुपये 289.30 प्रती तासप्रमाणे रक्कम रुपये 69,432/- पाणी उपसाकरिता मक्तेदारास देयकातून आदा केली आहे. उपरोक्त ठरावाचे व मक्तेदाराच्या लेखी मुदतवाढ पत्रामध्ये तसेच कामाच्या फोटोचे अवलोकन केले असता उपअभियंता उपविभाग क्रमांक 2 कोल्हापूर यांनी पाणी उपसा न करताच पोकळ प्रमाणपत्र दिलेने मक्तेदारास रक्कम रुपये 69,432/- आदा झाली आहे. ती रक्कम अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण/2004/प्रक्रं 85/रस्ते 2, दिनांक 11/06/2004 नुसार ब-1 निविदेमधील खंड 38 खालील प्रस्तावास क्षेत्रिय अधिक्षक अभियंता यांची मंजुरी प्राप्त झाल्यावरच तसेच सक्षम तांत्रिक अधिकाऱ्याची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच वाढीव परिमाणाचे प्रदान करता येईल. असे असताना ब-1 निविदा अट क्रमांक 38 नुसार सक्षम मंजुरी न घेता वाढीव परिमाणावर रक्कम रुपये 1,29,047/- खर्च केलेला आहे.

4) काम पुर्ण दिनांक 30/05/2016 आहे व ग्रामपंचायतीकडे ताबापट्टी देणेकरिता खरेदी केलेल्या रुपये 100/- च्या मुद्राकावर दिनांक 13/10/2016 नमूद आहे. विलंबाने ताबापट्टी देणेबाबत साधार स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

5) तलावात असलेल्या गाळाचे ग्राफिक्सच्या सहाय्याने संकल्पचित्र तयार करुन त्या आधारे गाळाचे प्रमाण निश्चित न करता अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस/1099/प्रक्र 54 दिनांक 20/05/1999 नुसार बांधकामाच्या ठिकाणी संपुर्ण माहितीफलक लावणे अनिवार्य असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 अन्वये कामाची प्रत्येक बाब उपअभियंता यांनी 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, मोजमाप नोंदवहीवर त्याप्रमाणे कार्यवाही झालेचे दिसून येत नाही.

## 3.510 शासनाच्या रक्कमा कामाचे मुल्यांकन नसताना ग्रामपंचायतीना वितरीत केल्यामुळे अनावश्यक गुंतून राहिलेबाबत.

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद, सोलापूर कडील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे सन 2016-2017 लेखापरीक्षण करताना जिल्हा परिषद, सोलापूरने कोषागारातून तात्काळ खर्चासाठी आवश्यकता नसताना शासकीय निधी आहरीत केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामीण पाणी पुरवठा विभागातून उपरोक्त तीन लेखाशिर्षातून पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1109/प्र.क्र.104(अ)/पापु-07, दिनांक 17/03/2010 च्या मार्गदर्शन सूचना क्रमांक 11 चा चुकीचा अर्थ लावून एकूण रक्कम रूपये 21,48,95,000/- इतकी रक्कम खर्च न करता केवळ ग्रामपंचायत स्तरावर वितरीत केलेली आहे. परंतु, त्या रकमेचा विचार करता सदरची रक्कम ही खर्च न होता ग्रामपंचायत स्तरावर विनावापर पडून आहे. सदर रक्कम वर्ग करताना पूर्वीच्या हप्त्याची रक्कम खर्च करून पुढील हप्ता मागविणे हाच उद्देश दिसून येतो. परंतु, विभागाने ठेकेदाराने काही काम केले आहे का कसे? तसेच हप्ता मागणी करताना केलेल्या कामाचे देयक सादर केलेले नाही. सबब सदरच्या वितरणास खर्च समजून विभागाने खर्च नोंदविला आहे व त्यामुळे WORK DONE PAYMENT हा उद्देश सफल न होता शासनाचा निधी अडकून पडलेला आहे, ही बाब निश्चितच गंभीर आहे.

2) विभागाने जिल्ह्यात किती कामे भौतिकदृष्ट्या पुर्ण / अपूर्ण व आर्थिकदृष्ट्या पूर्ण / अपूर्ण आहेत? याबाबत कोणतेही अभिलेखे ठेवलेले नाहीत. तसेच विभागाला मागणी करूनसुद्धा ग्रामपंचायत स्तरावर वर्ग करण्यात आलेल्या निधीपैकी किती निधी योजनेसाठी ठेकेदारांना त्यांनी केलेल्या कामासाठी अदा करण्यात आलेला आहे? याबाबत वर्षानुवर्षे ताळमेळ न घेतल्याने ग्रामपंचायत स्तरावर पडून असलेल्या अखर्चित निधीची खात्री करता येत नाही.

**3.511 राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत अपुर्ण कामाबाबत**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने NRWEP Annual Action Plan 2016-2017 सोबत जोडलेल्या यादीतील एकूण 80 योजनाचे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 16,707.2929 लक्ष असून यावर सन 2007-2008 ते 2016-2017 अखेर रूपये 11,547.26 इतका खर्च नोंदला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना मे 2008 ते जुलै 2015 या कालावधीत सुरु झालेल्या आहेत. परंतु, सदरच्या योजना Physicaly Completed असून, आर्थिकदृष्ट्या अदयाप पूर्ण झालेल्या नाहीत. विकासकामांना पुर्णत्वाचे दाखले दिले नसल्याने सदर योजना अपुर्ण आहेत. ग्रामपंचायत स्तरावर मोठया प्रमाणांवर निधी पडून आहे. तरी सदर योजना विहीत मुदतीत पुर्ण न होणेबाबत खुलासा सादर करावा

2) ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक जस्वप्र-2007/वित्तीय सल्लागार/प्र.क्र.11/ दिनांक 08/12/2007 व ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक 11/पापु1005/ प्र.क्र74 (2)पापु(7), दिनांक 02/05/2005 अन्वये योजना पुर्ण करण्यांची संपूर्ण जबाबदारी ही जिल्हा यंत्रणेची आहे. तसेच प्रकल्पाचे काम नियमानुसार चालले आहे किंवा नाही? यासाठी सामाजिक लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेकडून मिळणा-या प्रत्येक हप्त्याच्या बरोबरीने प्रत्यक्ष कामाच्या हप्त्याला प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1001/प्र.क्र.290/जल-3, दिनांक 01/10/2001 मध्ये नमुद केलेप्रमाणे नवीन कामे हाती घेण्यापुर्वी अपुर्ण कामे प्राधान्याने पुर्ण करावयाची असताना देखील नवीन योजनांना मंजुरी देण्यांत आली आहे ही बाब गंभीर आहे. त्यामुळे शासनाची देयता वाढलेली आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/3404/ प्रक्र.126 पापु-13, दिनांक 02/08/2008 अन्वये पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी संबंधित जिल्हा परिषदेकडे राहिल. तेव्हा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी कामावर सतत लक्ष ठेऊन कामाचा आढावा घेणे आवश्यक होते. अपुर्ण कामाच्या आकडेवारीवरुन शासन निर्णय व परिपत्रकातील सुचनानुसार विविध स्तरावर कामे पुर्ण करण्यासाठी कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे योजनेचा मुळ हेतु व उद्देश सफल झालेला नाही.

**3.512 राष्ट्रीय पेयजल योजनेंअंतर्गत वैराग येथे नळपाणीपुरवठा योजना करणे**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 74) -** राष्ट्रीय पेयजल योजनेंअंतर्गत वैराग येथे नळपाणीपुरवठा योजनेकरिता रक्कम रूपये 2,62,28,237/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 492.37 लाख आहे. महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक ZPA/2009/प्र.क्र.514/ वित्त 9, दिनांक 20/11/2009 नुसार रूपये 10 लाखापर्यंत रूपये 100 व रूपये 10 लाखाच्या पुढे प्रती लाख रूपये 100/- प्रमाणे एकूण रूपये 49,000/- स्टॅम्प पेपर घेणे आवश्यक असताना रूपये 100/- चे स्टॅम्प खरेदी करण्यांत आले आहेत. त्यामुळे रक्कम रुपये 48,900/- वसूल करावेत.

2) कामाची मुदत दिनांक 08/07/2016 रोजी संपली असून दिनांक 08/07/2016 ते 31/03/2017 अखेर विनादंड मुदतवाढ दिली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146(1) नुसार कार्यारंभ आदेश देणेपुर्वी मक्तेदाराकडून करारानामा करुन घेऊन त्यात काम सुरु दिनांक व काम पुर्ण करावयाचा कालावधी व कामाच्या अटी शर्ती नमुद करण्यांत आलेल्या नाहीत. नियम 148(2) नुसार करारातील अटी, शर्तीचा भंग केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतुद केली नाही. तसेच योजना पूर्ण झालेनंतर ठेकेदाराने किमान एक वर्ष योजना चालविणेची अट करारनाम्यामध्ये घातली नाही.

3) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वि.1098/प्र.क्र./2889/शासन इयत्तामा., दिनांक 19/08/1998 व विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक 5 विनि/2300/सहविमा/साबावि/संकीर्ण, दिनांक 24/04/2001 नुसार कंत्राटी कामाच्या / निविदा रकमेच्या 1टक्के विमा रक्कम वसुल करुन विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक असतां तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे निविदा रक्कम रूपये 4,18,19,743/- च्या 1 टक्के विमा रक्कम रूपये 4,18,197/- वसुल करुन विमा संचालनालयाकडे भरणा करावी.

**3.513 मौजे हरिसाल तालुका धारणी येथील तात्पुरती नळ पाणी पुरवठा योजना दुरूस्ती खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** मौजे हरिसाल तालुका धारणी येथील तात्पुरती नळ पाणी पुरवठा योजना दुरूस्ती खर्चावर रक्कम रूपये 13,15,904/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकुण रूपये 600/- चे स्टॅमपेपर वर करारनामा करणे आवश्यक होते. परंतु, केवळ रूपये 100/- चे स्टॅम्पपेपर वर करारनामा केला. सबब कमी मुद्रांक रकमेवर करारनामा केल्याने रूपये 500/- जबाबदारी निश्चित करुन वसुल करावी.

2) कामाची मुळ मुदत दिनांक 25/06/2016 पर्यंत होती. मुळ मुदतीत कंत्राटदाराने काम पुर्ण केले नाहीत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 148 नुसार कंत्राटदाराने 15 दिवस आधी मुळ मुदत संपण्या अगोदर मुदत वाढीसाठी अर्ज सादर करणे आवश्यक होते. परंतु, कंत्राटदाराने मुदतवाढीसाठी अर्ज विलंबाने सादर केले. याबाबत ग्रामपंचायत हरीसाल यांचे दिनांक 20/06/2016 चे जावक क्रमांक नसलेले पत्र नस्तीस आढळून आले. उपअभियंता ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, धारणी यांनी त्यांचे पत्र क्रमांक 342 दिनांक 16/12/2016 नुसार मुदतवाढ प्रस्ताव जिल्हा परिषदेस सादर केला व त्याला मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक 07/03/2017 रोजी कार्योत्तर मंजुरी दिली आहे. कार्योत्तर मंजुरी कोणत्या नियमान्वये दिली, याबाबत खुलासा करावा. पाणी टंचाईची कामे 30 जुन पुर्वी अथवा शासनाने मुदतवाढ दिल्यास 31 जुलै पुर्वी पुर्ण करणे बंधनकारक आहे. सदर बाब बघता काम पुर्ण नसतांना केवळ मुदतीत दाखवण्यासाठी विलंबाने कार्योत्तर मुदतवाढ दिल्याचे दिसुन येते.

3) कंत्राटदाराने लेखासंहीता नियम 148 व बी 1 निविदेतील कलमांचे पालन केले नाहीत. त्यामुळे लेखासंहीता नियम 141 व बी 1 निविदेतील कलम 2 नुसार विहीत मुदतीनंतर शिल्लक असलेल्या कामांच्या किंमतीवर कमीत कमी 1 टक्के व अधिकतम 10 टक्के नुकसान भरपाई वसुल करणे आवश्यक होते. परंतु, विना नुकसान भरपाई मुदतवाढ मंजूर करून कंत्राटदाराचे हित जोपासले आहे. सबब न्युनतम 1 टक्का रुपये 14,330/- नुकसान भरपाई वसूल करावी.

4) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1009/प्र.क्र.12/पापु-14, दिनांक 03/02/1999 नुसार तात्पुरती पुरक पाणी पुरवठा योजना हाती घेण्यापुर्वी टँकर / बैलगाडीद्वारे पाणी पुरवठ्याचा विचार करावा. टँकर / बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा करण्यापेक्षा तात्पुरती पुरक योजना कमी खर्चाची असेल, तरच सदर योजना हाती घ्यावी. मात्र याबाबत कोणतेही दस्तएवज उपलब्ध नसल्याने खात्री करता आली नाही. सदर योजनेवर एकुण खर्च रुपये 13,15,904/- करण्यात आला असुन तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनेवर अपेक्षीत खर्चापेक्षा केलेला खर्च जास्त आहे. यावरुन शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य या लेखा शिर्षामधून करण्यात आलेला जादा खर्चाची बाब जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आणून देऊन त्यांची मान्यता घेण्यात यावी.

5) सोलार पंपवर रुपये 6,75,000/- खर्च केला आहे. परंतु, त्याची गुणवत्ता व क्षमता चाचणी अहवाल आढळून आला नाही. त्यामुळे बसविण्यात आलेले सोलर पंपसेट कार्यान्वीत असुन योग्य गुणवत्तेचे असल्याची खात्री पटत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्राममविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-2001/प्र.क्र. 40/जल-3, दिनांक 19/10/2001 अन्वये संबंधित मक्तेदारावर दोन वर्षेपर्यंत देखभालीची हमी देण्यात यावी. तसेच 10 टक्के सुरक्षा निधी 2 वर्षासाठी देण्यात येवु नये. सदर निधी राखीव ठेवण्यात यावा. परंतु, उपरोक्त प्रकरणी सुरक्षा ठेव कपात करण्यात आली नाही.

7) मालमत्ता व पाणीपुरवठा योजना नोंदवहीत नोंदी घेणे आवश्यक असुन पुष्ठ क्रमांकसह नोंदवहीमध्ये नोंदी घेतलेबाबत प्रमाणित केले नाही.

**3.514 मौजे मान्सुधावडी ता.धारणी येथील पाणी पुरवठा योजना दुरूस्ती खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** मौजे मान्सुधावडी तालुका धारणी येथील पाणी पुरवठा योजना दुरूस्ती खर्चाकरीता रक्कम रूपये 34,30,518/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मान्सुधावडी गावाला पाणी पुरवठा करणेचे काम 2.88 टक्के जादा दराने मंजुर करण्यात आले. परंतु, दुबार निविदा मागविणे आवश्यक असतांना प्रशासनाने तशा प्रकारची कार्यवाही केले नाही. अशा प्रकारची कार्यवाही न केल्यामुळे जादा खर्च झाला आहे.

2) कामाची मुळ मुदत 12 महिने दिनांक 02/09/2015 पर्यंत होती. मुळ मुदतीत कंत्राटदाराने काम पुर्ण केले नाहीत. मिस्लेनिअस वर्क बाब 4 कमिशनिंग रनिंग अँड मेंटेनिंगचे कामे दिनांक 14/10/2015 पर्यंत केले. तसेच बाब 3 मध्ये तारखेत खोडतोड आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 148 नुसार कंत्राटदाराने 15 दिवस आधी मुळ मुदत संपण्या अगोदर मुदत वाढीसाठी अर्ज सादर करणे आवश्यक होते. परंतु, कंत्राटदाराने मुदतवाढीसाठी अर्ज रोजी सादर केले नाही.

3) कंत्राटदाराने लेखासंहीता नियम 148 व बी 1 निविदेतील कलमांचे पालन केले नाहीत. त्यामुळे लेखासंहीता नियम 141 व बी 1 निविदेतील कलम 2 नुसार विहीत मुदतीनंतर शिल्लक असलेल्या कामांच्या किंमतीवर अधिकतम 10 टक्के नुकसान भरपाई वसुल करणे आवश्यक होते. नुकसान भरपाई परिगणीत करतांना कामास विलंब झाल्यामुळे अपुर्ण कामात गुंतलेल्या रक्कमा व त्यावर प्राप्त होणाऱ्या व्याजाचे झालेले नुकसान, कामांच्या सनियंत्रणासाठी वापरण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्चाचा व विचाराधीन कामांच्या हिस्सा सदर काम वेळेत पुर्ण न झाल्याने त्यापासुन जनतेला मिळणाऱ्या लाभाचे नुकसान व जनतेस येणारा जादा खर्च इत्यादी बाबी हिशोबात घेणे अनिवार्य आहे. सबब 10 टक्के रुपये 43,789/- नुकसान भरपाई वसूल करावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 153(1) अन्वये कंत्राटदारास मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे बंधनकारक आहे. तसेच लेखासंहीता नियम 118(1) प्रमाणे वाढीव कामाबाबत संबंधित उपअभियंता यांनी वरिष्ठांकडे निवेदन सादर करणे आवश्यक असतांना नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आले नाही.

5) कार्यकारी अभियंता यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 122 नुसार लेखी आदेश देऊन जादा कामास मान्यता दिली. तसेच नियम 124 नुसार कामाचे आदेश पुस्तिकामध्ये त्याची नोंद घेवुन नियम 156 नुसार जादा काम करण्याबाबत कंत्राटदाराचे हमीपत्र घेतले नाहीत. जादा कामाबाबत कामाचे आदेश पुस्तिकामध्ये नोंद घेवुन त्यांची साक्षांकीत प्रत देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. परंतु, आदेश पुस्तिका ठेवली नाही. त्यामुळे कामाचे मोका पाहणी करूनच जादा काम करणेबाबत आदेश दिले, याबाबत पडताळणी करता आली नाही.

6) प्रपत्र ब ची तपासणी केली असता 1 बी. सॉफ्ट रॉक व इतर बाबीमध्ये खोदकाम 7.50 ते 9.00 मीटर दोन वेळा दर्शविले असुन प्रथम लिफ्टचे दर रूपये 706.50 व दुसरे प्रथम लिफ्टचे दर रूपये 727.90 आहे. एकच प्रथम लिफ्टचे दरात तफावत शक्य नाही. त्यामुळे दरविश्लेषण दर्शवून पुर्तता करावी. वरीलप्रमाणे दरात तफावत असून प्रदान मात्र अनुज्ञेय दराने केले. प्रपत्र ब मध्ये 1 लिप्ट जादा घेतल्याने रूपये 58,081/- न अतिरिक्त जादा तरतुद केले.

7) मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता विहीरीचे खोदकाम या बाबीमध्ये लिफ्ट 0.00 ते 3.00 व 1.50 ते 4.50 मीटर पर्यंत जुनी विहीरीचे 4.00 मीटर व्यासाचे परिमाण वजा केले. सबब जुनी विहीरीचे मालमत्ता व बांधकाम पाणीपुरवठा योजना नोंदवही व मोजमाप पुस्तक उपलब्ध करुन खर्चाची खात्री पटवावी.

8) अंदाजपत्रकात पाईपलाइन खोदकाम या बाबीचे भुप्रस्तरानुसार तरतुद न करता सरासरी दराने रूपये 2,40,888/- रुपये तरतुद करुन एकुण रूपये 2,28,911/- खर्च केले. प्रत्यक्षात मोजमाप भुप्रस्तरानुसार करणे आवश्यक होते. असे असतांना सरासरी दराने प्रदान केले आहे. त्यामुळे खर्चाबाबत पडताळणी करता आले नाही. पुर्तता करावी.

9) विभागाने स्वामित्वधनाची रक्कम परिगणीत केली नाही. लेखापरिक्षणात सदर कामावर 149.76 घ.मी गौणखनिज वापर केले असून रूपये 141.34 दराने रूपये 21,167/- रूपये वसुल करणे आवश्यक आहे.

10) खोदकामातून निघालेली माती 0 ते 5 कि.मी. अंतरावर वाहतुक करणे यावर 576.49 घ.मी. चे रूपये 226.25 दराने रूपये 1,30,205/- रुपये खर्च केले आहे.परंतु खेडेगाव असल्याने 5 कि.मी.अंतर अवास्तव घेऊन शासन निधीचे नुकसान केले.जबाबदारी निश्चित करुन पुर्तता करावी.

11 मालमत्ता व पाणीपुरवठा योजना नोंदवहीत नोंदी घेणे आवश्यक असुन फृष्ठ क्रमांकासह नोंदवहीमध्ये नोंदी घेतलेबाबत प्रमाणित केले नाही. पुर्तता करावी.

**3.515 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 32) -** लेखापरिक्षणास विभागाकडुन सादर विवरणावरून 21 पाणी पुरवठा योजनांचे अंदाजपत्रकीय किंमत रूपये 1,027.94 लक्ष असुन मार्च 2017 अखेर रूपये 410.13 लक्ष खर्च केल्याचे आढळून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायतीमार्फत पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांना काम पुर्ण झाल्याबाबत रक्कमा अदा करण्यात आल्या आहेत. मात्र त्याबाबत संबंधिताकडून सदर रकमेच्या अनुषंगाने उपयोगिता प्रमाणपत्रे घेण्यात आलेली नाहीत. त्यामुळे सदर रकमेचा योग्य विनियोग झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) अंतीम हप्ता रकमेचे शोधन करतेवेळी प्रस्तावासोबत पुर्वी दिलेले तिसरे हप्त्याचे सनदी लेखापरिक्षण अहवाल असणे आवश्यक होते. परंतु, अहवाल नसतांना अंतीम हप्त्याची रक्कम प्रदान केले आहेत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 148(1) कामाच्या अटी व शर्तीबाबत करारनामा केला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक परास/1001/प्र.क्र./40/जल-03, दिनांक 19/10/2001 संबंधीत काम करणारी संस्था/ मक्तेदारावर 2 वर्ष देखभालीची हमी देण्यात यावी. तसेच 10 टक्के निधी दोन वर्षाकरीता देण्यात येवु नये. तो राखुन ठेवण्यात यावा, असे आदेश असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5) शासन निर्णयानुसार पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने आयकर, उपकर, विमा, विक्रीकर व गौणखनिज स्वामित्वधनाची रक्कम शासनखाती भरणा केलेबाबत परिगणनासह भरणा रकमेचे चलान उपलब्ध केले नाही.

**3.516 जलयुक्त शिवार अभियान योजना अंतर्गत सन 2016-2017 च्या कामाबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** जलयुक्त शिवार अभियान योजनेवर रक्कम रूपये 40,74,022/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) परीशिष्ट अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कपात करण्यात आलेला 1 टक्के उपकर शासन खाती जमा करण्यात आला किंवा नाही, याबाबत अर्ध समास पत्र क्रमांक 05 दिनांक 24/11/2017 नुसार खुलासा सादर करण्यास सांगितला होता. त्यावर काहीही खुलासा सादर केला नाही. कपात केलेला 1 टक्के उपकर शासन खाती भरणा करण्यात यावा.

2) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि /10/1009/ख, दिनांक 11/02/2010 अन्वये गौण खनिजासाठी स्वामित्वधन वसुल करणे आवश्यक आहे. उकळीपेन, पार्डीतिखे, बालाजीनगर, सोमेश्र्वरनगर, आमकिन्ही व गिभा या ग्रामपंचायतीच्या कामावर वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची रक्क्म कपात करण्यात आली नाही. सदरील रक्कम कपात करुन शासन खाती भरणा करावी.

3) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा 2014/ प्र.क्र. 260/पंरा-7, दिनांक 27/05/2015 अन्वये रूपये 3 लाख पेक्षा जास्त किंमतीच्या कामांना ई - निविदा कार्यप्रणाली लागु आहे. त्यानुसार उकळीपेन, पार्डीतिखे, बालाजीनगर, सोमेश्र्वरनगर, आमकिन्ही व गिभा या ग्रामपंचायतीच्या कामांची ई-निविदा करण्यात आली आहे. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा 2014/ प्र.क्र. 164 /पंरा-7, दिनांक 15/07/2014 अन्वये सर्व जिल्हा परीषदांनी ई - निविदा कार्यप्रणाली अंतर्गत कंत्राटदाराकडुन स्विकारावयाच्या निविदा फ़ी व इसारा रक्क्मेसाठी स्टेट बँक आफ़ इंडीया (SBI) या बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडावे. दिनांक 01/08/2014 पासुन ई - निविदा कार्यप्रणाली अंतर्गत विकास कामांची निविदा सुचना प्रसिध्द करतांना त्यामध्ये जिल्हा परीषदेने या प्रयोजनासाठी स्टेट बँक आफ़ इंडीया (SBI) या बँकेत उघडलेल्या खात्यामध्ये संबधित कंत्राटदाराने निविदा फ़ी व इसारा रक्क्म RTGS/ NEFT व्दारे जमा करावी, असे निर्देश असतांना निविदा फ़ी ही रोख स्वरुपात व इसारा रक्क्म ही डिमांड ड्राफ्टद्वारे स्विकारुन ती एचडीएफ़सी बँकेत जमा करण्यात आली आहे. सदरील शासन निर्णयाच्या आदेशाचे पालन करण्यात आले नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 214, 215, 216 व 217 नुसार नमुना 71 मध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत कपात करण्यात आलेल्या सुरक्षा अनामतची नोंदी घेण्यात आल्या नाही. तसेच सुरक्षा रक्कम कपात करतांना काही ग्रामपंचायतीकडून 3 टक्के, 4टक्के व 5 टक्के अशी वेगवेगळी कपात करण्यात आली आहे. सदरील रक्कम वेगवेगळी कपात का करण्यात आली, याबाबतचा खुलासा सादर करावा.

5) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परीपत्रक क्रमांक विकास 1098/ प्र.क.431/कराधन -1, दिनांक 05/05/1998 व महाराष्ट्र शासन, सार्वनजिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी /2005 / प्र.क्र.324 / इमारती-2, दिनांक 03/03/2005 अन्वये किंमतीच्या 2 टक्के इतका आयकर तसेच विक्रीकर आयुक्त, विक्रीकर भवन, मुंबई यांचे पत्र क्रमांक वि. आ. (कावनि) कार्य कंत्राट 2009-2010/13/ प्रमा - 06ब/ 614, दिनांक 14/10/2010 नुसार मुल्यवर्धित कर अधिनियमाखाली 5 टक्के कर वसूल करण्यात येवुन शासन खाती भरणा करण्यात यावा.

6) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 100 अन्वये कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, वाशिम यांनी नमुना नंबर 42 प्रकल्पाची नोंदवही ठेवली किंवा कसे, याबाबत समर्पक खुलास सादर करावा.

**3.517 नैसर्गिक आपत्ती पाणी टंचाई व आमदार निधी स्थानिक विकास स्तर अंतर्गत नवीन विंधन विहीरी खोदणे व हातपंप उभारणी खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 21) -** नैसर्गीक आपत्ती पाणी टंचाई अंतर्गत 55 विंधन विहीरी खोदणे, हातपंप साहित्य खरेदी करणे व हातपंप उभारणी करणे यावर रूपये 25,13,644/- व आमदार निधी अंतर्गत 18 विंधन विहीरी खोदणे, हातपंप साहित्य खरेदी करणे व हातपंप उभारणी करणे यावर रूपये 7,41,090/- असा एकुण रूपये 32,54,734/- एवढा खर्च केल्याचे दिसुन येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मौजे कामरगांव, पंचायत समिती कारंजा व मौजे मानोली, पंचायत समिती मंगरुळपीर, मौजे किन्ही रोकडे, पंचायत समिती कारंजा येथील विंधन विहीर खोदकाम करणे, साहित्य खरेदी करणे व कटटा बांधकाम करणे यावर अनुक्रमे रूपये 40,502/-, रूपये 56,467/- व रूपये 42,089/- एवढा खर्च केल्याचे दिसुन येते. या अनुषंगाने विंधन विहीर खोदकामाचे मुल्यांकन तपासले असता मोजमाप पुस्तिका क्रमांक 116 पान क्रमांक 98 नुसार कामरगांव येथील विंधन विहीर, मोजमाप पुस्तिका क्रमांक 26 पान क्रमांक 44 नुसार मानोली येथील विंधन विहीर व मोजमाप पुस्तिका क्रमांक 06 पान क्रमांक 96 नुसार किन्ही रोकडे येथील विंधन विहीर कोरडी असल्याचे त्यामध्ये नमुद आहे. त्यामुळे सदरच्या विंधन विहीरी कोरडया असतांना त्यावर खोदकाम नंतरचा खर्च कसा काय करण्यांत आला, पुढील खर्च केल्यानंतर सदर विंधन विहीरीला पुरेसे पाणी लागले काय, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) कार्यारंभ आदेशानुसार केसिंग पिव्हीसी पाईप मिटरची अधिकतम मर्यादा 15.25 मीटर दर्शविली आहे. त्यापेक्षा अधिक पाईप लावण्याकरीता भुवैज्ञानिक यांचेशी संपर्क साधून निर्णय घेणे आवश्यक आहे. परंतु, मौजे जुमडा, सोनगांव पंचायत समिती वाशिम (प्रमाणक क्रमांक 659 दिनांक 28/10/2016) मौजे जोगलदरी, कंजरा, पार्डी, सनगांव पंचायत समिती मंगरुळपीर (प्रमाणक क्रमांक 657 दिनांक 28/10/2016), मौजे लावणा पंचायत समिती मंगरुळपीर (प्रमाणक क्रमांक 656 दिनांक 28/10/2016) मौजे सोमेश्वरनगर व इंजा, पंचायत समिती कारंजा (प्रमाणक क्रमांक 655 दिनांक 28/10/2016) व मौजे विळेगांव, इंझा, खेर्डा काळीबायपास पंचायत समिती कारंजा (प्रमाणक क्रमांक 10 दिनांक 02/07/2016) येथील विंधन विहीरीकरीता 15.25 मीटर पेक्षा जास्त पिव्हीसी केसिंग पाईप वापरल्याचे दिसुन येते. परंतु, भुवैज्ञानिक यांची मंजुरी घेतल्याबाबत कोणतेही दस्तावेज लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

3) उपसरपंच, पार्डी यांचे विंधन विहीर खोदाईच्या प्रमाणपत्रानुसार मौजे पार्डी येथे खोदलेल्या विंधन विहीरीत 12.20 मीटर केसिंग पाईप वापरल्याचे व उपसरपंच, खेर्डा यांचे विंधन विहीर खोदाईच्या प्रमाणपत्रानुसार मौजे खेर्डा येथे खोदलेल्या विंधन विहीरीत 7.62 मीटर केसिंग पाईप वापरल्याचे नमुद आहे. परंतु, प्रत्यक्षात खर्च व मुल्यांकन अनुक्रमे 18.30 मीटर व 12 मीटर नुसार दर्शविले आहे. त्यामुळे प्रत्यक्षात किती केसिंग टाकण्यात आले, याबाबत सप्रमाण खुलासा करावा अन्यथा कमी केसिंग टाकुन जादा खर्च दर्शविला असल्यास फरकाची रक्कम संबंधीताकडुन वसुलपात्र ठरते.

4) सदरची कामे पुर्ण झाल्यानंतर पाणीशास्त्र यांचे पाणी तपासणीबाबतचे अहवाल देयकासोबत जोडण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पाणी पिण्यास योग्य असल्याबाबत खात्री करता येत नाही.

5) विधंन विहीरचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मालमत्ता नोदंवही वर नोंदी घेतल्याबाबतची पडताळणी नोंदवही अभावी करता आली नाही.

6) सदर कामे करण्यापुर्वी ग्रामपंचायतीचा ठराव, नाहरकत प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. परंतु, ब-याचशा ग्रामपंचायतीचे ठराव व नाहरकत प्रमाणपत्र नस्तीमध्ये आढळुन आले नाही.

**3.518 देखभाल दुरुस्ती अंतर्गत उपविभाग मंगरुळपीर येथील नळयोजना विशेष दुरुस्ती खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 27) -** उपविभाग मंगरुळ अंतर्गत नळयोजना विशेष दुरुस्तीवर रक्कम रूपये 10,05,522/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणीपुरवठा साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतुन किंवा मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतुन चाचणी करुन त्यानंतर सदर साहित्याचा वापर करणे आवश्यक आहे. परंतु, मौजे दाभळी येथील पाणीपुरवठा कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. तसेच मौजे आसेगाव येथील साहित्य चाचणीचा अहवाल काम पुर्ण झाल्यानंतर प्राप्त झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर कामाकरीता वापरलेले साहित्य योग्य गुणवत्तेचे असल्याची खात्री पटत नाही.

2) शिल्लक राहिलेल्या किंवा निरुपयोगी साहित्याची काय विल्हेवाट लावली, याची अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही. सबब याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, निर्णय क्रमांक ग्रापाधो-1114/प्र.क्र.61/पापु-07, दिनांक 15/06/2015 नुसार राज्यातील ग्रामीण भागातील वाड्या / वस्त्यांना पूरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा सेवेचा दर्जा सुधारावा, याकरीता प्रत्येक वर्षी नवीन योजना राबविण्यासाठी तसेच जुन्या योजनांची क्षमता वाढविण्यासाठी त्रयस्थ मान्यताप्राप्त संस्थेकडुन तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. परंतु, अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती 1968 चे नियम 168 (1)(ब) नुसार कार्यकारी अभियंता यांनी काम सुरु असतांनी 5 टक्के कामाची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, मौजे आसेगांव येथील कामाची 5 टक्के तपासणी केल्याचे मोजमाप पुस्तीकेत नमुद नाही.

**3.519 मौजे वाकी दुधाना तालुका यवतमाळ येथिल नळ पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्ती खर्चातील गंभीर अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** मौजे वाकी दुधाना तालुका यवतमाळ येथील नळ पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्तीकरीता रक्कम रूपये 8,13,519/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुल्यांकनानुसार पहिले व चालु देयकाचे रक्कम रुपये 8,13,519/- कंत्राटदारास अदा केले आहे. एकूण मुल्यांकनाचे 98 टक्के रक्कम कंत्राटदारास अदा केल्यानंतर दुसरे व अंतिम देयकाची रक्कम रुपये 17,320/- अजुनपावेतो प्रलंबीत असल्याचे उपलब्ध नस्तीवरून दिसुन येते. साहित्याच्या त्रयस्थ शासनमान्य यंत्रणेकडुन तपासणी अहवाल, कामाचे विविध टप्प्यानुसार रंगीत छायाचित्रे, पी.व्ही.सी पाईप व इतर साहित्य खरेदीची देयके, सबमर्सीबल खरेदीचे उपबिजक / वारंटी कार्ड कंत्राटदाराने सादर केले नसतांना सुध्दा पहिले व चालु देयकाचे रक्कम रुपये 8,13,519/- कंत्राटदारास अदा केले आहे. कामाचा आदेश दिनांक 25/05/2016 ला दिल्यानंतर पहिले व चालू देयकाचे कामाचे 98 टक्के रक्कम रुपये 8,13,519/- कंत्राटदारास दिनांक 23/06/2016 ला अदा केले आहे. परंतू, कार्यालयीन टिप्पणी दिनांक 31/03/2017 अन्वये कंत्राटदाराला काम त्वरीत सुरु करणेबाबत पत्र देण्याचे प्रस्तावीत केले आहे. यावरुन नळ योजनेची कामे न करताच प्रथमत: मोजमापे नोंदवून देयक जिल्हा परिषदेकडे सादर करुन कंत्राटदारास रक्कम अदा केल्यामुळे वित्तिय नियमाचा भंग झालेला आहे. सदर नळ योजनेचे काम पुर्ण झाल्याबाबतचे कोणतेही सबळ पुरावे नस्तीला न आढळल्यामुळे रकमेचा संशयीत अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत चौकशी करण्यात यावी व दोषी आढळल्यास सबंधितावर जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करण्यात यावी.

2) नळ योजनेचे काम सुरू करण्यापुर्वी कामाच्या विविध टप्प्यानुसार व कामे पुर्ण झाल्यावर कामाची रंगीत छायाचित्रे घेणे बंधनकारक आहे. परंतू, तशी छायाचित्रे नस्तीमध्ये आढळली नाही. त्यामुळे काम झाले किंवा कसे, अथवा दर्जात्मक / गुणवत्तापुर्ण झाले किंवा कसे, खात्री करता आली नाही.

3) जिल्हा परिषदेने कंत्राटदाराला बी-1 करारनामा / शेड्युल बी पुरविले असलेबाबत आढळून आले नाही. शेड्युल बी वर कंत्राटदाराची स्वाक्षरी नाही. असे असतांना कंत्राटदारांनी कामे कसे केले, याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

4) तांत्रिक मान्यतेतील अटीनुसार योजनेच्या कामाकरीता वापरण्यात येणारे सर्व साहित्य त्रयस्थ शासनमान्य यंत्रणेकडून तपासणी करुन खात्री केल्यानंतरच वापरण्यात यावे. परंतू, तसा अहवाल नस्तीला आढळला नाही.

5) कामाची मुळ मुदत 6 महिने दिनांक 24/11/2016 पर्यंत होती. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 नुसार कंत्राटदाराने कामाची मुदतवाढ हवी असेल, तर किमान 15 दिवस आधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक असतांना विहीत मुदतीत अर्ज सादर केले नाही.

### 3.520 मौजे अर्जुना तालुका यवतमाळ येथील नळ पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्ती खर्चातील गंभीर अनियमितता.

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** मौजे अर्जुना तालुका यवतमाळ येथील नळ पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्तीकरीता रक्कम रूपये 8,14,843/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुल्यांकनानुसार पहिले व चालु देयकाचे रक्कम रुपये 8,14,843/- कंत्राटदारास अदा केले आहे. एकूण मुल्यांकनाचे 99 टक्के रक्कम कंत्राटदारास अदा केल्यानंतर दुसरे व अंतिम देयकाची रक्कम रुपये 11,463/- अजुनपावेतो प्रलंबीत असल्याचे उपलब्ध नस्तीवरून दिसुन येते. साहित्याच्या त्रयस्थ शासनमान्य यंत्रणेकडुन तपासणी अहवाल कामाचे विविध टप्प्यानुसार रंगित छायाचित्रे, उद्भवाचे खोदकामानंतर पुरेसे पाणी उपलब्ध असल्याबाबत Yeild Test Report कंत्राटदाराने सादर केले नसतांना सुध्दा पहिले व चालु देयकाचे रक्कम रुपये 8,14,843/- कंत्राटदारास अदा केले आहे. यावरुन नळ योजनेची कामे न करताच प्रथमत: मोजमापे नोंदवून देयक जिल्हा परिषदेकडे सादर करुन कंत्राटदारास रक्कम अदा केल्यामुळे वित्तिय नियमाचा भंग झालेला आहे. सदर नळ योजनेचे काम पुर्ण झाल्याबाबतचे कोणतेही सबळ पुरावे नस्तीला न आढळल्यामुळे रकमेचा संशयीत अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत चौकशी करण्यात यावी व दोषी आढळल्यास सबंधितावर जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करण्यात यावी.

2) नळ योजनेचे काम सुरू करण्यापुर्वी कामाच्या विविध टप्प्यानुसार व कामे पुर्ण झाल्यावर कामाची रंगीत छायाचित्रे घेणे बंधनकारक आहे. परंतू, तशी छायाचित्रे नस्तीमध्ये आढळली नाही. त्यामुळे काम झाले किंवा कसे, अथवा दर्जात्मक / गुणवत्तापुर्ण झाले किंवा कसे, खात्री करता आली नाही.

3) करारनाम्यावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे केलेला करारनामा वैध ठरत नाही. तसेच जिल्हा परिषदेने कंत्राटदाराला बी-1 करारनामा / शेड्युल बी पुरविले असलेबाबत आढळून आले नाही. असे असतांना कंत्राटदारांनी कामे कसे केले, याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

4) तांत्रिक मान्यतेतील अटीनुसार योजनेच्या कामाकरीता वापरण्यात येणारे सर्व साहित्य त्रयस्थ शासनमान्य यंत्रणेकडून तपासणी करुन खात्री केल्यानंतरच वापरण्यात यावे. परंतू, तसा अहवाल नस्तीला आढळला नाही.

5) तांत्रिक मान्यतेतील अटीनुसार उद्भवाचे खोदकामानंतर पुरेसे पाणी उपलब्ध असल्याबाबत Yield Test तसेच पाण्याचे रासायनीक तपासणी झाल्यानंतर बांधकामाचे परवानगी घेवून विहीर बांधकाम करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

6) कामाची मुळ मुदत 6 महिने दिनांक 24/11/2016 पर्यंत होती. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 नुसार कंत्राटदाराने कामाची मुदत वाढ हवी असेल, तर किमान 15 दिवस आधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक असतांना विहीत मुदतीत अर्ज सादर केले नाही.

**3.521 पाणी टंचाई कार्यक्रम 2015-2016 अंतर्गत ग्रामपंचायत मुरली तालुका उमरखेड येथील तात्पुरती पुरक नळयोजनेची कामे करणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** पाणी टंचाई कार्यक्रम 2015-2016 अंतर्गत ग्रामपंचायत मुरली तालुका उमरखेड येथील तात्पुरती पुरक नळयोजनेची कामे करणेकरीता रक्कम रूपये 11,30,002/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पहिले व चालू देयक प्रदान करण्यापुर्वी मुल्यांकनानुसार सदर नळ योजनेचे काम पुर्ण झाल्याचे दिसुन येते. परंतू, सदर नळ योजनेचे काम पुर्ण झाल्याचे पुरावे उदा. साहित्य तथा पाईप खरेदीची देयके, पाईपचे रिलीज नोट्, पाईपचे चाचणी अहवाल, कामाचे विविध टप्प्यानुसार छायाचित्रे, ग्रामपंचायतीचा ठराव / काम सुरु करण्यापुर्वी व काम पुर्ण झाल्यानंतरचे पंचनामे सादर करणे आवश्यक होते. परंतु, सादर न केल्यामुळे सदर कामामध्ये अदा केलेल्या रकमेचा संशयीत अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत चौकशी करण्यात यावी व दोषी आढळल्यास सबंधितावर जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करण्यात यावी. देयके पारित करण्यापुर्वी कार्यकारी अभियंता यांनी अभिलेख्यांची संपुर्णतः शहनिशा केल्याचे दिसत नाही.

2) प्रशासकिय मान्यतेतील अट क्रमांक 7 नुसार नळ योजनेसाठी नवीन विद्दुत पंप घेण्यापुर्वी जुन्या पंपाची निर्लेखनाची कार्यवाही करणे आवशक असतांना तशी कार्यवाही केली नाही. परंतू, मुल्यांकनातील बाब क्रमांक 17 नुसार सबमर्सिबल पंप बसविल्याबाबत रुपये 38,612/- चे मुल्यांकन केले आहे. सदर सबमर्सिबल पंप खरेदीचे देयक व वॉरंटी कार्ड सादर न केल्यामुळे / खरेदीचे सबळ पुरावे नसल्यामुळे मुल्यांकनाची रक्कम रुपये 38,612/- मान्य करता येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2015/प्र.क्र.10/वित्त-9, दिनांक 25/03/2015 ला अनुसरुन ग्रामपंचातीला "एजन्सी" म्हणून विकास कामे देतांना त्या कामासाठी ग्रामपंचातीकडे पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीची उपलब्धता ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती किंवा काम करण्यास तयार असल्याबाबत ग्रामपंचायतींना पत्र देऊन विचारणा करणे आवश्यक होते. परंतू, तशी विचारणा न करता ग्रामपंचायत काम करण्यास तयार असल्याबाबतचे ठराव जिल्हा परिषदेला कसे प्राप्त झाले? याचा बोध होत नाही. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 4 नुसार विकास कामे इतर एजन्सी कडून करवून घेतांना रुपये 3 लक्ष पेक्षा अधिक रक्कमेच्या विकास कामांच्या निविदे करता ई-निविदा पध्दतीचाच अवलंब करणे अनिवार्य असतांना तशी कार्यवाही केल्याचे अभिलेखे नस्तीमध्ये आढळले नाही. ग्रामपंचायतींनी उपरोकत कामे स्वत: केली असल्यास महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा-2014/प्र.क्र.260/पंरा-7, दिनांक 27/05/2015 मधिल परिच्छेद क्रमांक 2 (2) नुसार रूपये एक लाख व त्यापेक्षा अधिक किंमतीच्या साहित्य खरेदीसाठी ई-निविदा प्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक होते. परंतू, ग्रामपंचायतीमार्फत तशी कार्यवाही केल्याचे पुरावे नस्तीमध्ये आढळले नाही. तसेच ग्रामपंचायतीने बांधकामासाठी खरेदी केलेले साहित्यांचे देयके सुद्धा नस्तीमध्ये आढळले नाही. यावरुन प्रथमत: नळ योजना कामाचे मोजमापे नोंदवून, पुर्णत्वाचे प्रमाणपत्र विहीत नमुन्यात दिल्यानंतर देयक जिल्हा परिषदेकडे सादर करण्यात आले व त्यानंतर ग्रामपंचायतीस रक्कम प्राप्त झाल्यानंतर नळ योजनेकरीता मोघम स्वरुपात साहित्य खरेदी केल्याचे व बहुतांशी रक्कम नगदीने उचल केल्यामुळे वित्तिय नियमाचा भंग झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत चौकशी होणे अभिप्रेत आहे.

4) मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता नळ योजनेकरीता लागणारे साहित्याच्या नोंदी एम.एस.ए. ला घेतल्या नसल्यामुळे तेवढे साहित्य नळ योजनेकरीता उपयोगात आणले किंवा नाही, याची खात्री पटत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार साहित्य प्राप्त झाल्यानंतर त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करुन घेतल्याबाबत चाचणी अहवाल घेतले नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार नमुना नंबर 69 मध्ये पुर्ण झालेल्या कामाच्या नोंदी घेतल्या नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 97 नुसार स्थावर मालमत्तेची नोंद नमुना नंबर 39 मध्ये घेतली नाही.

**3.522 मौजे राझा तालुका कळंब येथिल नळ पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्ती खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** मौजे राझा तालुका कळंब येथील नळ पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्तीकरीता रक्कम रूपये 4,10,439/- खर्च केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायत राझा ला सन 2013-2014 मध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेमधुन रुपये 11,31,651/- व नळ योजनेमधुन रुपये 7,09,608/- असा एकूण रूपये 18,41,259/- एवढा निधी नळ योजनेकरीता प्राप्त असतांना संक्षिप्त टिप्पणीनुसार गावातील अर्ध्वनलिका 20 वर्ष जुनी दर्शवुन देखाभाल दुरुस्तीचे काम प्रस्तावित केले आहे. तसेच ग्रामपंचायत ठराव दिनांक 26/01/2016 नुसार पाणी पुरवठा विहीरीपासुन पाण्याचे टाकीपर्यंत पाईपलाईन टाकण्याचे प्रस्तावित केले आहे. सदर ग्रामपंचायतीला इतक्या मोठ्या प्रमाणत निधी प्राप्त असतांना देखभाल दुरुस्तीमधुन खर्च करणे संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे सदर गावामध्ये राष्ट्रीय पेयजल योजना व नळ योजना अनुदानमधुन कोणती कामे झाली व आता प्रस्तावित केलेल्या कामाची चौकशी करुन तसा अहवाल सादर करुन अनुपालन दर्शवावे. राष्ट्रीय पेयजल योजना अथवा नळ योजना निधीमधुन नळ योजनेची कामे अर्धवट सोडले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत चौकशी होणे अभिप्रेत आहे.

2) एस.जि.एस. इंडिया प्राईवेट लिमिटेड यांचे रिलिज नोट क्रमांक 134737 नुसार 684 RMT (114 पी.व्ही.सी पाईप) खरेदी केले असतांना 744 RMT चे मुल्यांकन दर्शविल्यामुळे जादा 60 RMT पाईपचे रुपये 8,778/- ने जादा शोधन झाले आहे. तसेच 60 मीटर खोदकामाचे मुल्यांकन जादा दर्शविल्यामुळे रुपये 11,647/- ने जादा शोधन झाले आहे. सबब, रक्कम रुपये 20,425/- सबंधिताकडुन वसुल करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 118 व 153 (1) प्रमाणे कंत्राटदारास मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे व प्रमाण संकल्पचित्राप्रमाणे काम करणे बंधनकारक आहे. तसेच नियम 120 (1) नुसार कामातील एखाद्या बाबिवर होणारी बचत ही मुळ प्राकलनात उद्देशित नसेल, असे जादा बांधकामाकरीता वापरली जावु नये. परंतू, 80 mm dia - Non Return Valve ही बाब प्राकलनात उद्देशित नसतांना सदर बाबीवर रक्कम रुपये 11,036/- चे मुल्यांकन केले आहे. सबब जादा मुल्यांकनाची रक्कम लेखापरिक्षणात मान्य करता येत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 190 अनुसार कामाचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. परंतु, उपरोक्त नळ योजना कामाचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र (नमुना क्रमांक 65) आढळुन आले नाही. त्यामुळे काम पुर्ण झाल्याचे प्रमाणीत करता येत नाही.

5) नळ योजनेचे काम सुरू करण्यापुर्वी कामाच्या विविध टप्प्यानुसार व कामे पुर्ण झाल्यावर कामाची रंगीत छायाचित्रे घेणे बंधनकारक आहे. परंतू, तशी छायाचित्रे नस्तीमध्ये आढळली नाही. त्यामुळे काम झाले किंवा कसे, अथवा दर्जात्मक / गुणवत्तापुर्ण झाले किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

6) तांत्रिक मान्यतेतील अटीनुसार योजनेच्या कामाकरीता वापरण्यात येणारे सर्व साहित्य त्रयस्थ शासनमान्य यंत्रणेकडून तपासणी करुन खात्री केल्यानंतरच वापरण्यात यावे. परंतू, तसा अहवाल नस्तीला आढळला नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार नमुना नंबर 69 मध्ये पुर्ण झालेल्या कामाच्या नोंदी घेतल्या नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 97 नुसार स्थावर मालमत्तेची नोंद नमुना नंबर 39 मध्ये घेतली नाही.

**3.523 पंचायत समिती, बुलडाणा येथील पाणीटंचाई अंतर्गतच्या अखर्चित निधी सन 2014-2015 पासूनचा निधी आजपावेतो परत न करण्याबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा येथील सन 2016-2017 चे लेखापरीक्षण करतांना आढळुन आले की, बुलडाणा पंचायत समिती

अंतर्गत अखर्चीत निधी सन 2014-2015 रुपये 32,58,214/- व सन 2015-2016 मधील अखर्चीत निधी रुपये 1,24,27,600/- पंचायत समिती कार्यालयाने सक्षम अधिकाराची यांची परवानगी न घेता सदर अखर्चीत निधी सन 2016-2017 मध्ये वापरल्याचे दिसुन आले आहे.

1) सन 2014-2015 मधील अखर्चीत निधी रूपये 32,58,214/- शासन खाती जमा करणे आवश्यक असतांना सदर निधी कोणतेही परवानगी न घेता खर्च केलेला आहे.

2) तसेच सन 2015-2016 मधील अखर्चीत रक्कम रुपये 1,24,27,600/- एवढी रक्कम शासन खाती जमा करणे आवश्यक असतांना उपरोक्त निधी शासनाच्या परवानगी न घेता व शासनाला जमा न करता कार्यालयाजवळ ठेवून घेतली आहे. सदर सन 2014-2015 व 2015-2016 अखेर अखर्चीत रक्कम रूपये 50,50,075/- सन 2016-2017 मध्ये परत करण्यात आलेली नाही.

**3.524 मौजा पांढरढाकणि येथिल भूमिगत बंधारा, रिचार्ज शॉफट व रिचार्ज पिटचे बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदर कामाकरिता रक्कम रूपये 9,71,124/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोजमाप पूस्तिकेत बाब क्रमांक 6 व 5 अन्वये भूमिगत बंधा-याकरीता खोदकाम केल्याचे मोजमापे नोंदविण्यात आलेले आहेत.

बाब क्रमांक 6 बाबत मोजमापाचे गुणाकार 26.00 Cm. येते. 6.50 Cm परीमाण जादा दर्शविलेले आहे. दर 599 प्रमाणे जादा परीमाणाचे रूपये 3,894/- वसुलपात्र ठरते.

बाब क्रमांक 5 बाबत परीमाणाचे गुणाकार 28.50 Cm येते. 6.50 Cm परीमाण जादा दर्शविलेले आहे. सदर बाबीचे दर रूपये 449/- नूसार जादा परीमाणाचे रूपये 2,919/- वसुलपात्र ठरते.

2) महाराष्ट्र शासन, विक्रीकर आयुक्तालय यांचे पत्र क्रमांक सूचक/डब्लूसी-2012/12/प्रशा-8/ब-525, दिनांक 12/10/2012 अन्वये 01 एप्रिल 2012 नंतर प्रदान केलेल्या बिलातून व कामाचे आदेशातील अटिनूसार 5 टक्के विक्रीकर कपात करणे आवश्यक होते. परंतु सदर कामात उर्वरीत 3 टक्के प्रमाणे विक्रीकराची कपात न केल्यामुळे रूपये 29,133/- शासन महसूलाचे नूकसान झालेले आहे. सबब रूपये 29,133/- संबंधीताकडून वसुल करून शासन खाती जमा करावे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2-2000/प्र.क्र. 837/पंरा.8/35, दिनांक 08/05/2002 व विमा संचालनालय मुंबई दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा विमा शासकीय विमा निधी मुंबईकडे काम सूरू करण्यापूर्वी उतरविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाहि केलेली नाही.

4) सदर बाबीचे अंदाजपत्रकिय मुल्यापेक्षा जादा रूपये 60,430/- ने काम करण्यात आलेले आहे. जादा कामाबाबत कुठलेही कारण दर्शविण्यात आलेले नाही. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते 1, दिनांक 11/6/2004 प्रमाणे तसेच निविदा कलम 38 मधील तरतुदीप्रमाणे एखाद्या बाबीचे अंदाजपत्रकातील परीमाणापेक्षा 25 टक्के किंवा रूपये 5,000/- यापैकी जे रक्कम कमी असेल त्या रक्कमेपेक्षा जादा काम होत असल्यास वरील शासन परिपत्रकातील निर्देशाप्रमाणे व निविदा करारातील अट क्रमांक 38 प्रमाणे काम करण्याचे अगोदर योग्य कार्यवाही करूनच जादा काम करणे आवश्यक असताना सदर कामात शासन निर्देशाचे व निविदा कलम 38 चे पालन न करता जादा कामाचे रूपये 60,430/- प्रदान नियमबाह्य ठरते.

5) सदर बांधकाम कंत्राटदार मे. नानक कन्स्ट्रक्शन, काटोल यांनी 12.67 टक्के कमी दराने केलेले आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी 2016/प्र.क्र.2/इमा.2, दिनांक 12/02/2016 मार्गदर्शक सूचना क्रमांक 2 व 3 अन्वये प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 10 टक्के पर्यंत कमी दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या 1 टक्के एवढ्या रक्कमेचा धनाकर्ष परफॉर्मन्स् सिक्युरीटी म्हणून सादर करावी तसेच प्राप्त निम्नतन निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 10 टक्के पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार 10 टक्के पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे तेवढ्या रक्कमेचा व वरीलप्रमाणे येणाऱ्या रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष सादर करावा. सदर कामाची वरील शासन

निर्णयानूसार 4 टक्के सुरक्षाठेव कपात करणे आवश्यक होते. परंतु फक्त 2 टक्के सुरक्षाठेव रूपये 19,422/- स्विकारण्यात आलेली आहे. त्यामुळे शासन नियमाचे उल्लंघन झालेले असून सूरक्षाठेव गुंतवणूक रकमेवर मिळणाऱ्या व्याजाचे नूकसान झालेले आहे. सबब व्याजाची रक्कम परीगणित करून वसुल करण्यात यावी.

6) सदर योंजनेच्या बांधकामाचे शर्ती व अट क्र. 15 नूसार काम पूर्ण झाल्यावर कामाचा व त्या स्थळाचा फोटो काढून नस्तीला जोडणे आवश्यक आहे. फोटो सादर केलेले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम./1099/प्र.क्र. 54/08, दिनांक 20/05/1999 अन्वये कामावर कामाची माहिती दर्शविणारा माहितीफलक लावणे आवश्यक असतांना, त्यानुसार कामावर माहितीफलक लावण्यात आलेले नाही.

**3.525 ग्रामपंचायत भिवी येथे भूमिगत बंधारा बांधकाम करणेबाबत**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर कामाकरिता रक्कम रूपये 7,65,300/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य अभियंता पाटबंधारे (स्था.स्त्र) पुणे यांचे परिपत्रक क्रमांक मुअ/3विअ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये साइट क्लिअरंस ही बाब अंतर्भुत करण्यात येवु नये असे नमुद आहे बांधकामाचे स्टँडर्ड स्पेसिफिकेशन्सच्या परिच्छेद क्रमांक 6.1 नुसार क्लिअरंस दि साइट ही बाब खोदकामामध्ये अंतर्भुत असल्याने मोजमाप पूस्तिकेतील बाब क्रमांक 01 अन्वये क्लिअरंस दि साइटचे कामावर खर्च केलेली रक्कम रूपये 520/- वसुलीस पात्र ठरते.

2) कामाच्या देयकातून रॉयल्टीची रक्कम कपात केलेली नाही. सदर कामामध्ये बंधारा तयार करण्यासाठी कांक्रेटिंगचा उपयोग केलेला असून कांक्रेटिंगमध्ये गिटटी व रेतीचे एकूण प्रमाण 88.06 घनमिटर वापरलेले आहे. परंतु याची रॉयल्टी भरलेली नाही. सबब प्रति घनमिटर रूपये 141.40 प्रमाणे देयकातून रुपये 12,450/- कपात करणे आवश्यक होते. सबब रूपये 12,450/- वसुलपात्र आहे.

3) सदर बांधकाम कंत्राटदार बी. जे, लांडगे, साइनगर, बहादूरा यांनी 14.44 टक्के कमी दराने केलेले आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी 2016/प्र.क्र.2/इमा.2, दिनांक 12/02/2016 मार्गदर्शक सूचना क्रमांक 2 व 3 अन्वये प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 10 टक्के पर्यंत कमी दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या 1 टक्के एवढ्या रक्कमेचा धनाकर्ष परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून सादर करावी तसेच प्राप्त निम्नतन निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 10 टक्के पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार 10 टक्के पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे तेवढ्या रक्कमेचा व वरीलप्रमाणे येणाऱ्या रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष सादर करावा. सदर कामाची वरील शासन निर्णयानूसार 6 टक्के सुरक्षाठेव कपात करणे आवश्यक होते. परंतु फक्त 2 टक्के सुरक्षाठेव रूपये 15,306/- स्विकारण्यात आलेली आहे. त्यामुळे शासन नियमाचे उल्लंघन झालेले असून उर्वरीत 4 टक्के सूरक्षाठेव गुंतवणूक रक्कमेवर मिळणाऱ्या व्याजाचे नूकसान झालेले आहे. सबब व्याजाची रक्कम परीगणित करून वसुल करण्यात यावी.

4) सदर बाबीचे अंदाजपत्रकिय मुल्यापेक्षा जादा रूपये 80,631/- ने काम करण्यात आलेले आहे. जादा कामाबाबत कुठलेही कारण दर्शविण्यात आलेले नाही. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते 1, दिनांक 11/6/2004 प्रमाणे तसेच निविदा कलम 38 मधील तरतुदीप्रमाणे एखाद्या बाबीचे अंदाजपत्रकातील परीमाणापेक्षा 25 टक्के किंवा रूपये 5,000/- यापैकी जे रक्कम कमी असेल त्या रक्कमेपेक्षा जादा काम होत असल्यास वरील शासन परिपत्रकातील निर्देशा प्रमाणे व निविदा करारातील अट क्रमांक 38 प्रमाणे काम करण्याचे अगोदर योग्य कार्यवाही करूनच जादा काम करणे आवश्यक असताना सदर कामात शासन निर्देशाचे व निविदा कलम 38 चे पालन न करता जादा कामाचे रूपये 80,631/- प्रदान नियमबाह्य ठरते.

5) सदर काम पूर्ण झाल्याबाबत काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 21/12/2000 अन्वये काम पूर्ण झाल्यावर काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे

**3.526 150 मी.मी.डाय (व्यासाचे) बोअर वेल (हातपंप) ड्रिलींग खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर कामाकरिता रक्कम रूपये 14,19,585/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सर्व प्रथम कामाच्या खर्चाचे अंदापत्रक तयार करुन त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असतांना सदर कामाचे अंदाजपत्रक लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 150 व 151 व अधिनियम 1961 चे कलम 125 अन्वये तसेच महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मॅनुअल मधील नियम 132 व 133 अन्वये प्रशासकीय मंजुरी व तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक आहे. सदर कामाची तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मंजुरी मोजमाप पुस्तीकेत किंवा इतर ठिकाणी नमुद नसल्यामुळे नमुद करता आली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146 अन्वये कंत्राटदाराला कामाचे आदेश देण्यापुर्वी विहीत मुंल्याचे मुद्रांक शुंल्काचे स्टॅम्प पेपरवर कंत्राटदाराकडून काम करण्याबाबत अटी व शर्तीचे अधिन राहुन करारनामा करणे आवश्यक असतांना सदर कामाचा करारनामा दिसुन आला नाही सदर कामाचा करारनामा 500/- रुपयाचे मुद्रांक पेपरवर करावयाचे असतांना अशी कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही, तरी संबंधीताकडून रुपये 500/- प्रती करारनामा रक्कम 1,500/- वसुल करुन निधीत जमा करावे.

4) विक्रीकर सहआयुक्त (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, मुंबई अधिसुचना क्रमांक जेओ.(एचक्यु) व्हीएटी 2005/97, दिनांक 04/10/2012 नुसार दिनांक 01/04/2012 पासुन मुल्यवर्धित कर 5 टक्के वसूल करावयाचे असतांना सदर कामाचे देयक प्रदान करतांना 4 टक्के कपात केलेली आहे. तरी कमी कपात केलेली 1 टक्के रक्कम एकुण रुपये 14,196/- संबंधीताकडून वसुल करुन योग्य शिर्षात जमा करावे.

5) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/ कामगार-7 अ, दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 नुसार कामाचे देयकातुन 1 टक्के कामगार कल्याण उपकराची रक्कम रूपये 14,196/- कपात करणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2-2000/प्र.क्र. 837/पंरा.8/35, दिनांक 08/05/2002 व विमा संचालनालय मुंबई दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा विमा शासकीय विमा निधी मुंबईकडे काम सूरू करण्यापूर्वी उतरविणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही तरी बांधकाम मुल्याचे 1 टक्के रक्कम रूपये 14,196/- वसुली करुन योग्य शिर्षात जमा करावे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपिए-2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 मधील परिच्छेद 13 अन्वये काम पुर्ण झाल्यावर कामपुर्णत्वाचे प्रमाणपत्र मोजमाप पुस्तीकेत विहीत नमुण्यात नोंदविणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नस्तीला लागुण आहे.

8) कार्यारंभ आदेशाचे अट क्रमांक 1 नुसार भुवैज्ञानिक यांनी दिलेल्या जागेवरच दिलेल्या खोलीपर्यत विंधन विहीर खोदण्यांत यावी असे नमुद असतांना भुवैज्ञानिक यांचे तपासणी अहवाल देयकासोबत दिसुन आले नाही.

9) बिलात तसेच मोजमाप पुस्तीकेत 150 M.M. व्यासाचा केसींग पाईप दर रुपये 1,050/- प्रती मीटर दाखविले असुन बिलात तसेच मोजमाप पुस्तीकेत केसींग पाईप किती जाडीचे वापरले याबाबत उल्लेख नसतांना 4.80 मी.मी. (I.S.1239) जाडीचे दर रुपये 1,050/- प्रमाणे कंत्राटदारास प्रदान करण्यात आले आहे.

सदर नमुद परिच्छेदाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 6/25.10.2017 व 8/26.10.2017 विभागाला देण्यात आले. परंतु उपरोक्त अभिप्रायात नमुद केलेले दस्ताऐवज लेखा परीक्षणास सादर करण्यांत आले नाही.

**3.527 प्रादेशिक पाणी पुरवठा योजना अंतर्गत फेटरी तालुका नागपुर अंतर्गत विद्युत देयकाचे जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 13,74,170/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक देप्राअ-1309/प्र.क्र.69/पा.पु.-07, दिनांक 17/08/2009 मधील बाब क्रमांक 5 नुसार राज्यातील नियमित चालणाऱ्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना विद्युत देयक महावितरण कंपनीस अदा करण्यांत आल्यानंतर देयकाची रक्कम 50 टक्के शासनाकडून प्रदान करण्यात येईल, परंतु उपरोक्त देयकात विद्युत देयकाची 100 टक्के प्रदान करण्यात आली आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 13, दिनांक 31/10/2017 अन्वये विचारणा केली असता खुलास सादर केला नाही.

2) विभागाकडे तरतुद रुपये 40,00,000/- निधी असतांना उशिरा पेमेंट केल्यामुळे डिले पेमेंट रुपये 5078.24 दंड ज्यादा प्रदान केलेला आहे. तसेच विभागीय विद्युत देयके भरुन ही विभागाने देयकाची तपासणी न करता व्याज एरिअर्स रुपये 3,59,487/- प्रिन्सीपल एरिअर्स रुपये 6,98,623/- जादा प्रदान केलेले आहे. नियमबाह्य जादा प्रदान केलेली एकुण रक्कम रुपये 10,63,188/- वसुलपात्र ठरते तसेच वर्षभरात प्रदान करण्यांत आलेल्या सर्वच बिलाची तपासणी करुन केलेल्या जादा प्रदानाची रक्कम वसुल करुन निधीत जमा करावी.

### 3.528 विंधण विहिरीचे ओटा बांधकाम करणेबाबत (हातपंप इन्स्टालेशन ॲन्ड बांधकाम)

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर कामाकरिता रक्कम रूपये 3,66,180/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सर्व प्रथम कामाच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असतांना सदर कामाचे अंदाजपत्रक लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146 अन्वये कंत्राटदाराला कामाचे आदेश देण्यापुर्वी विहीत मुंल्याचे मुद्रांक शुंल्काचे स्टॅम्प पेपरवर कंत्राटदाराकडून काम करण्याबाबत अटी व शर्तीचे अधिन राहुन करारनामा करणे आवश्यक असतांना सदर कामाचा करारनामा दिसुन आला नाही सदर कामाचा करारनामा 500/- रुपयाचे मुद्रांक पेपरवर करावयाचे असतांना अशी कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही, तरी संबधीताकडून रुपये 500/- प्रती करारनामा रक्कम रूपये 3,000/- वसुल करुन निधीत जमा करावे.

3) विक्रीकर सहआयुक्त (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक सुचक/डब्ल्युसी 2012/12/ प्रशा.8/ब/525, दिनांक 12/10/2012 नुसार 1 एप्रील 2012 नंतरच्या प्रदानातुन विक्रीकराची 5 टक्के कपात करावयाची असतांना कमी कपात केलेली आहे. तरी कमी कपात केलेली रक्कम रुपये 4,379/- वसुल संबधीताकडून वसुल करुन योग्य शिर्षात जमा करावे.

4) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि/10/1009/प्र.क्र.309/ख, दिनांक 11/02/2010 व दिनांक 11/05/2015 चे अधिसुचनेनुसार मे 2005 पासुन बांधकामावर वापरलेल्या रेती, मुरुम, गिट्टी या गौण खनिजावर स्वामित्व धनाची वसुली रुपये 400/- प्रति ब्रास व रुपये 141.34/ प्रती घ.मी प्रमाणे करावयाची आहे. सदर कामामध्ये 1 हातपंपाचा ओटा तयार करण्यासाठी C.C.1:2:4 (M-15) = 1.143 m3 सिमेंट कॉक्रीटचे काम केलेले आहे. परंतु रॉयल्टीची रक्कम कपात केलेली नाही. तरी 51 हातपंपाचे x 1.143 = 58.29 घ.मी.@ 141.34 = रुपये 8,236/- संबंधीताकडून वसुल करुन योग्य शिर्षात जमा करावे

5) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/ कामगार-7 अ, दिनांक 17/06/2010 अन्वये वरील बांधकामाचे मुंल्याकनातुन 1 टक्के रक्कम कामगार कल्याण उपकराची कपात करावायाची असतांना अशी कापात केलेली नाही तरी सदर कामाच्या मुंल्याचे 1 टक्के रक्कम रुपये 3,661/- वसुल करुन योग्य शिर्षात जमा करावे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2-2000/प्र.क्र. 837/ पंरा.8/35, दिनांक 08/05/2002 व विमा संचालनालय मुंबई दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा विमा शासकीय विमा निधी मुंबईकडे काम सूरू करण्यापूर्वी उतरविणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही तरी बांधकाम मुंल्याचे 1 टक्के रक्कम रुपये 3,661/- वसुल करुन योग्य शिर्षात जमा करावे.

7) मोजमाप पूस्तिकेमध्ये बाबनिहाय मोजमापे (लांबी,रूंदी व खोली) न नोंदविता साहित्याचे दर व परीमाणानूसार गोषवारे नोंदविलेले आहे. ओट्याची लांबी / रूंदी किती व त्यासाठी खोदकाम केले किंवा कसे याबाबत तपासणी करता आलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपिए-2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 मधील परिच्छेद 13 अन्वये काम पुर्ण झाल्यावर कामपुर्णत्वाचे प्रमाणपत्र मोजमाप पुस्तीकेत विहीत नमुण्यात नोंदविणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नस्तीला लागुन आहे.

**3.529 हरणखुरी येथील भुमीगत बंधारा,रिचार्ज शॉफट व नाला ट्रेंच कामावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद, वर्धा ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग हिंगणघाटचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण करीत असतांना, शासन निधी अंतर्गत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 11,84,204/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे प्राकलन रूपये 17,13,255/- चे असुन प्रशासकीय मंजुरी ही रूपये 15,00,000/- ला असल्याने कामाचा आदेश सुध्दा रूपये 15,00,000/- चा दिलेला आहे. परंतु, निविदा प्रकाशीत केल्यावर त्यावर निविदा किंमत ही रूपये 16,79,067/- इतकीच असुन कंत्राटदारांनी सुध्दा याच किंमतीच्या अनुशंगाने निविदा भरलेल्या असुन 1 टक्के अनामत रक्कम सुध्दा रूपये 16,800/- इतकीच घेतलेली आहे. प्रशासकीय मंजुरी ही दिनांक 22/04/2016 ला प्राप्त झालेली असतांना व त्यानंतर निविदा प्रकाशित केलेल्या असतांना विभागाने प्रशासकीय मंजुर रकमेच्या मर्यादेत Reduced Estimate तयार केलेले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/ प्र.क्र.85/ रस्ते-1, दिनांक 11/06/2004 अन्वये कामाचे अंदाजपत्रक बनवितांना सर्व बाबीचा विचार करुनच अचुक / सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. असे असतांना प्राकलनानुसार रूपये 17,13,255/- किंमतीचे काम रूपये 15,00,000/- ला कसे काय करण्यात आले? कामाची गुणवत्ता कशी राहील? यामुळे काम करण्यामागील शासनाचा उद्देश सफल झाला किंवा कसे, याबाबत समर्थनीय खुलासा करावा.

2) एमबीनुसार भुमीगत सिमेंट बंधाऱ्याच्या कामात खोदकामात रूपये 1,51,238/-, नाला ट्रेंचेस कामात रूपये 2,54,309/- व रिचार्ज शाफटचे कामात रूपये 18,642/- याप्रमाणे एकुण रूपये 4,24,189/- प्राकलनात नमुद बाबींपेक्षा जादाचा खर्च केला आहे. तसेच याच तीन बाबींवर रूपये 9,19,647/- इतक्या रकमेची बचत केली आहे. एका कामाच्या बाबींवरील बचतीची रक्कम दुसऱ्या बाबींवर खर्च करता येत नाही. जादा काम करण्यापुर्वी बी-1 करारनामा क्लॉज 38 नुसार 25 टक्के वरील जादा कामाकरीता पुर्वमंजुरी घेण्यात आली नाही सबब जादा कामावरील केलेला खर्च रूपये 4,24,189/- लेखामान्य करता येत नसुन वसुलपात्र ठरतो.

3) कामाचा करारनामा रूपये 16,79,667/- असुन सदर कामाकरीता एकुण रूपये 1,200/- चे स्टॅंप पेपर खरेदी करणे आवश्यक असतांना रूपये 700/- चे पेपर जोडल्यामुळे मुळे शासनाचे रूपये 500/- चे नुकसान झाले आहे.

4) कामांचे टेक्नीकल बीड सोबत कंत्राटदारांचे प्रतीज्ञापत्र हे कामनिहाय नसुन मोघम स्वरूपाचे असुन सर्व कामांकरीता एकाच करारनाम्याची स्कॅन कॉपी लावलेली आहे. त्यामुळे निविदा शर्ती व अट क्रमांक 15 ची पुर्तता केली नसल्याने सर्वच निविदा अवैध ठरतात.

5) विभागाने कंत्राटदारांकडून रूपये 1,000/- निविदा फी च्या स्वरूपात घेतले असुन प्रत्यक्षात करारनामा नस्तीसोबत बी-1 निविदा फॉर्म जोडलेला नाही.

6) कामाचे प्राकलन सन 2013-2014 च्या सीएसआर दराने तयार केले आहे. सदर योजनेतील सर्वच कामांना तांत्रिक मंजुरी ही एप्रिल 2016 या महिन्यातील असतांना व त्यावेळेस सन 2015-2016 चा सीएसआर उपलब्ध असतांना 2013-2014 च्या दराने प्राकलन का तयार करण्यात आले? 2015-2016 पेक्षा 2013-2014 चे सीएसआर दर तुलनात्मकदृष्टया जादा असल्याचे दिसुन येते याबाबत परिगणना करून वसुलीची कार्यवाही करणे आवश्यक ठरते.

7) कामाच्या दरम्यान पाणी उपसण्याचे कामाचे मुल्यांकन रूपये 35,221/- करण्यात आले. परंतु, देयकासोबत मोटरपंपचे लॉगबुक लेखापरिक्षणास सादर करण्यात आले नाही.

**3.530 ग्रामपंचायत गुंजखेडा येथे नळ पाणी पुरवठा योजना योजना विशेष दुरुस्तीबाबत. (उपविभाग वर्धा)**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर बाबत रक्कम रुपये 2,93,410/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1**)** अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 2 Rewinding existing 45 hp motor... कामावर रूपये 26,500/-, बाब क्रमांक 5 repair to existing 45 hp starter. च्या कामावर रूपये 13,500/- व बाब क्रमांक 6 वर fabrication of gear box with motor starter च्या कामावर रूपये 30,000/- इत्यादी बाबी वर खर्च केलेला आहे. परंतु, सदर दुरुस्तीची गरज होती का? त्यासंबंधी संबंधित दुरुस्तीकरीता प्रथम तपासणी अहवाल यांत्रिकी विभागाकडुन घेतलेला नाही व मोघम खर्च केलेला आहे. तसेच दुरुस्ती केली असल्यास नादुरुस्त असलेले जुने साहित्य कुठे आहे? याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 05 दिनांक 11/12/2017 अन्वये विचारणा केली होती. परंतु, याबाब संयुक्तिक खुलासा सादर केलेला नाही.

2) सदर कामाच्या अंदाजपत्रकाला तांत्रिक मान्यता दिनांक 25/04/2016 ची असुन त्यावेळेस 2015-2016 चे सी.एस.आर. उपलब्ध होते. परंतु, अंदाजपत्रकातील दर 2013-2014 च्या सी.एस.आर. नुसार घेतलेले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक हस्तलिखीत असुन प्रत्येक बाबीचे दर कोणत्या सी.एस.आर.नुसार व पान क्रमांक असे नमुद करणे आवश्यक असतांना नमुद केलेले नाही. चालु वर्षाचे सी.एस.आर. नुसार अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असतांना 2013-2014 च्या सी.एस.आर. नुसार अंदाजपत्रक तयार करण्याचे काय कारण आहे? याबाबत खुलासा सादर करावा.

3) रुपये पाचशेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना रूपये 100/- च्या मुद्रांकावर करारनामा केला आहे. तरी संबंधिताकडुन रूपये 400/- वसुलपात्र ठरते.

4) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वि मा सं-1098 /प्र.क्र.29/98, दिनांक 20/06/1998 आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग] शासन निर्णय क्रमांक जिपर/ 2000/प्र.क्र.837/पंरा.8(35), दिनांक 15/09/2003 नुसार काम सुरू होण्यापुर्वी ठेकेदाराने कामाचा व कामावरील मजूरांचा विमा, शासकीय विमा निधी, मुंबई यांचेकडे उतरविणे आवश्यक असतांना उतरविलेला नाही. तरी संबंधिताकडुन 1 टक्के विम्यांची रक्कम रूपये 2,934/- वसुल करावी.

5) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए /2009/प्र.क्र.108/कामगार-7अ, दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 नुसार देयकातून 1 टक्का कामगार कल्याण उपकराची रक्कम कपात करणे अनिवार्य असतांना केलेली नाही. तरी संबंधिताकडुन 1 टक्के कामगार कल्याण उपकराची रक्कम रूपये 2,934/- वसुल करावी.

6) प्रशासकिय मान्यतेतील अटी व शर्ती क्रमांक 2 नुसार काम सुरु होण्यापुर्वीचे व पुर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.531 पिंपरी येथे नळ पाणी पुरवठा योजना योजना विशेष दुरुस्तीबाबत. (उपविभाग हिंगणघाट)**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदर बाबत रक्कम रुपये 7,84,752/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर काम ग्रामपंचायत पिंपरी ला मिळावे, याकरीता ग्रामपंचायतने ठराव क्रमांक 7 दिनांक 13/03/2016 नुसार ग्रामपंचायत स्वत: काम करण्यास तयार असल्याचे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला कळविले आहे. त्यानुसार सदर काम ग्रामपंचायत पिंपरी ला देण्यात आले व सदर कामाचा आदेश ग्रामपंचायत पिंपरीच्या नावे दिनांक 30/04/2016 ला दिलेला आहे. परंतु**,** सदर काम ग्रामपंचायतने कंत्राटदार स्वप्नील राजेंद्र दरवेकर ला ई-

निविदा करुन दिलेला आहे. ग्रामपंचायतने ई-निविदा करुन प्राप्त 3 निविदेपैकी सर्वात कमीची निविदा कंत्राटदार स्वप्नील राजेंद्र दरवेकर यांची मंजुर करुन दिनांक 13/05/2016 ला सदर कामाचा कार्यादेश दिलेला आहे.

2) वरील बांधकाम ग्रामपंचायतीने केला आहे. म्हणुन कोणतीही कपात केलेली नाही. परंतु, सदर काम खाजगी कंत्राटदाराने केलेले असल्याने खालीलप्रमाणे सर्व शासकीय कपाती संबंधिताकडुन होणे आवश्यक आहे.

अ) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय बीडीजी/2005/प्र.क्र.324/इमा.2, दिनांक 03/03/2006 मधील मुद्दा क्रमांक 4 नुसार मुल्यवर्धित कर अधिनियमानुसार नोंदणीकृत ठेकेदाराच्या देयकातून अधिसूचना क्रमांक व्हीएटी-1505/सीआर 13/करा धन-1, दिनांक 01/04/2005 पासून 2 टक्के व अनोंदणीकृत ठेकेदाराच्या देयकातून 4 टक्के मुल्यवर्धीत कर वसुल करावयाचा आहे. तसेच अधिसूचना क्रमांक जेओ(एचक्यु)/व्हीएटी/2005/97, दिनांक 04/04/2012 नुसार दिनांक 01/04/2012 पासून मुल्यवर्धित कर 5 टक्के वसुल करणे बंधनकारक आहे. असे असतांना कपात केलेली नाही. तरी संबंधिताकडुन मुल्यांकनाच्या 5 टक्के रक्कम रूपये 39,297/- वसुली करावी. (नोंदणीकृत कंत्राटदार असल्याचे दस्तऐवज नस्तीत नाही.)

ब) आयकर अधिनियम 1961 कलम 194 सी नुसार दिनांक 01/07/2010 पासून ठेकेदार व उपठेकेदारास एकावेळी प्रदान रूपये 30000/- व वार्षिक प्रदान रूपये 75000/- असेल तेव्हा अनुक्रमे 2 टक्के (संस्थात्मक) व 1 टक्के (वैयक्तीक नावे) या दराने आयकर कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेली नाही. तरी संबंधिताकडुन मुल्यांकनाच्या 2 टक्के आयकराची रक्काम रूपये 15,719/- वसुल करावी.

क) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए /2009/प्र.क्र.108 /कामगार-7अ, दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 नुसार देयकातून 1 टक्का कामगार कल्याण उपकराची रक्कम कपात करणे अनिवार्य असतांना केलेली नाही. तरी संबंधिताकडुन 1 टक्का कामगार कल्याण उपकराची रक्कम रूपये 7859/- वसुल करावी.

ड) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक - वि मा सं-1098 /प्र.क्र.29/98, दिनांक 20/06/1998 आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर/ 2000/प्र.क्र.837/पंरा.8(35), दिनांक 15/09/2003 नुसार काम सुरू होण्यापुर्वी ठेकेदाराने कामाचा व कामावरील मजूरांचा विमा, शासकीय विमा निधी, मुंबई यांचेकडे उतरविणे आवश्यक असतांना उतरविलेला नाही. तरी संबंधिताकडुन 1टक्का विम्यांची रक्कम रूपये 7859/- वसुल करावी.(एकुण वसुलपात्र रूपये 70,734/-)

3) सदर कामात भाग 3 90mm PVC Rising main च्या कामाबाबत बाब क्रमांक 5 Providing isi mark GI pipe (80mm) नुसार 18 rmt जी.आय.पाईप ( रूपये 556/- प्रती आरएमटी प्रमाणे) चा पुरवठा केलेला आहे. परंतु, बाब क्रमांक 10 lowering &laying & jointing gi pipe चे काम केलेले नाही. म्हणजेच सदर कामाकरीता 80 एमएम जी.आय.पाईप पुरवठा केलेला आहे. परंतु, प्रत्यक्ष कामात वापरलेला नाही. तरी पाईप पुरवठाकरीता केलेला खर्च रक्कम रूपये 10,008/- संबंधिताकडुन वसुल करावे.

4) भाग 3 मधील बाब क्रमांक 14 providing & fixing in position air valve चे काम 3 नग केलेले असुन अंदाजपत्रकातील दर रूपये 5,431/- प्रमाणे प्रदान करणे आवश्यक असतांना रूपये 5,492/- प्रमाणे प्रदान केलेले आहे. तरी जादा प्रदान केलेली रक्कम रूपये 183/- संबंधिताकडुन वसुल करावे.

5) सदर कामाच्या अंदाजपत्रकाला तांत्रिक मान्यता दिनांक 28/03/2016 ची असुन त्यावेळेस 2015-2016 चे सी.एस.आर. उपलब्ध होते. परंतु, अंदाजपत्रकातील दर 2013-2014 च्या सी.एस.आर. नुसार घेतलेले आहे. चालु वर्षाचे सी.एस.आर.नुसार अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असतांना 2013-2014 च्या सी.एस.आर.नुसार अंदाजपत्रक तयार करण्याचे काय कारण आहे? याबाबत खुलासा सादर करावा.

6) महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 चे अनुच्छेद 63 मध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसुचना दिनांक 04/04/2015 प्रमाणे दहा लाखाच्या आतिल कार्यकंत्राटाच्या रकमेवर रुपये पाचशेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना रूपये 100/- च्या मुद्रांकावर करारनामा केला आहे. तरी संबंधिताकडुन रूपये 400/- वसुलपात्र ठरते.

7) प्रशासकिय मान्यतेतील अटी व शर्ती क्रमांक 2 नुसार काम सुरु होण्यापुर्वीचे व पुर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

### 3.532 शिवनी पाणी पुरवठा योजनेतील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** प्रमाणक क्रमांक 18, दिनांक 06/09/2016 अन्वये रक्कम रूपये 7,83,061/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक 25/03/2015 अन्वये जर ग्रामपंचात कामे करण्यास इच्छुक असल्यास त्यांना कामे देण्यात यावे असे नमुद आहे व त्याप्रमाणे सदर ग्रामपंचायत ग्रामपंचायतीच्या ठरावानिशी काम करण्यास इच्छुक असल्याबाबतचा ठराव सादर करणे आवश्यक आहे. वरील शासन निर्णयाप्रमाणे ग्रामपंचायत शिवनीने काम करण्यास इच्छुक असल्याबाबतचा ठराव सादर केला आहे व त्यानुसार ग्रामपंचायत शिवनीला करारनामा करुन काम वाटप करण्यात आलेले आहे. परंतु ग्रामपंचायतीने स्वत: काम न करता सबकॉन्ट्रक्टर नेमुन कामे केल्याचे दिसून येते.

2) कार्यकारी अभियंता, पाणी पुरावठा विभाग यांचेकडून ग्रामपंचायत शिवनीला करारनामा करुन काम वाटप करण्यात आलेले आहे. त्यामुळे शासकीय नियमानुसार 5 टक्के विक्रीकर व अडीच टक्के सुरक्षा ठेव कपात करणे आवश्यक होते. परंतु, याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 15/11/2011 नुसार राज्य गुणवत्ता नियंत्रण यांचेकडुन कामाची तपासणी करावी व तसेच तपासणीचा मोबदला देण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1 टक्का रक्कम ठेवण्यता यावे असे नमुद आहे, परंतु पाणी पुरवठा विभागाने अंदाजपत्रक तयार करतांना 1 टक्का रक्कम ठेवण्यात आलेली नाही व कामाची तपासणी राज्य गुणवत्ता नियंत्रण यांचेकडुन करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहीता 1968 चे नियम 87 नुसार कामात वापरलेल्या साहित्याची चाचणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय देयकाचे प्रदान करण्यात येवू नये असे नमूद आहे. सदर कामा मध्ये पंपीग मशीनरी व पाईप साहित्य वापरण्यात आलेले आहे, परंतु त्याची चाचणी अहवाल घेण्यात आलेले नाही.

5) डिवाटरींग करीता रक्कम रुपये 17,970/- दर्शविण्यात आलेले आहे. परंतु, त्याचे लॉगबुक लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.

### 3.533 हातपंप ओटा बांधकाम गौण खनिज साहित्य रॉयल्टी वसुल न करणेबाबत.

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) प्रत्येक पूर्ण झालेल्या बोरवेल ओटा बांधकामाकरीता अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे मोजमाप मुल्यांकन नोंदविण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

2) बोरवेल ओटा बांधकाम करतांना ड्राय रबल स्टोन, रेती, 20 एम एम मेटल, विटा गौण खनिज बाब क्रमांक 8 व 9 नुसार वापरण्यात आले आहेत. परंतु सदर कामाचे देयक तपासले असता रॉयल्टी रक्कम कपात करुन शासन महसुली जमा नाही. महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक गौखनि-10/1012/पीके 603/ख 3, दिनांक 11/05/2015 अन्वये प्रती ब्रास रुपये 400/- प्रमाणे रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे.

3) प्रती बोरवेल ओटा बांधकाम 2.329 + 1.143 = 3.472 घनमीटर X 141.34 रुपये एकुण 490.70 रुपये प्रती बोरवेल रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार एकुण 199 बोरवेल ओटा बांधकामाचे रक्कम रुपये 97,649/- शासन महसुली जमा करणे आवश्यक आहे.

### 3.534 विक्री कराची रक्कम कमी कपात करणे बाबत.

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सन 2016-17 मध्ये विंधन विहीर कार्यक्रम अंतर्गत विंधन खोदकामावर खर्च करणेत आलेला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विक्रीकराची 5 टक्के रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून करणे एवजी 2 टक्के रक्कम कपात केलेमुळे शासन महसूलाचे नुकसान झालेले आहे. एकूण 3 प्रमाणकाद्वारे विक्रीकराची कमी कपात केलेली रक्कम रुपये 33,805/- वसूल करावी.

2) कामांच्या मुल्यांकनामध्ये सर्वेक्षण शुल्काची रक्कम समावेश करुन देयकामधून सदर रक्कमा कपात करुन जिल्हा निधीमध्ये जमा करण्यात आलेल्या आहेत. एकूण 3 प्रमाणाद्वारे सर्वेक्षण शुल्काची रक्कम रुपये 15,000/- जिल्हा निधीमध्ये जमा केलेली आहे. सदर रक्कमांचा समावेश मुल्यांकनामध्ये समावेश करुन कपात करणेबाबत शासनाचे कुठलेच परिपत्रक किंवा शासन निर्णय लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देणेत आलेले नाही.

**3.535 हातपंपावर क्लोरीनेशन युनिट बसविणे खरेदीतील नियमबाहयतेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** प्रमाणक क्रमांक 12, दिनांक 06/10/2016 अन्वये रक्कम रूपये 25,86,375/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 मधील मान्य झालेला खर्च सन 2016-2017 मध्ये करताना खर्चाच्या पुर्नविनीयोजनास मान्यता घेतल्याचे लेखापरीक्षणास निदर्शनास आले नाही. तसेच जिल्हा परिषद विशेष सभा दिनांक 27/03/2015 विषय क्रमांक 1 नुसार सर्व योजना / साहित्याकरीता रूपये 24,40,000/- तरतुद असताना फक्त क्लोरीनेशन युनीट खरेदीवर खर्च केले आहे. इतर बाबींवर खर्च न करणे तसेच अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्त खरेदी करणे नियमबाहय आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए/2006/प्र.क्र.366/वित्त- 9, दिनांक 31/12/2009 नुसार सदर कामाची ई निविदा प्रकाशीत झाल्याबाबत जाहीरात रोष्टरप्रमाणे विभागस्तरीय ब वर्ग दैनिक, विभाग स्तरीय ब वर्ग मराठी साप्ताहीक, जिल्हा स्तरीय ब वर्ग दैनिक, जिल्हा स्तरीय ब वर्ग साप्ताहीक अशा एकूण 4 ठिकाणी जाहीरात दिल्याचे वृत्तपत्र कात्रण, जाहीरात देयक व प्रमाणीत रोष्टर नोंदवही उपलब्ध नाही. त्यामुळे अशा प्रकारे कार्यवाही न केल्यामुळे जिल्हा परिषदेला स्पर्धात्मक किमान दराचा फायदा झाला नाही. नियमबाहयरीत्या निविदा व जाहीरात प्रक्रिया राबविलेली आहे. ज्या वृत्तपत्रात जाहीरात दिली, ते कोणत्या श्रेणीत येते? याबाबत माहीती व जनसंपर्क कार्यालयाचे पत्र उपलब्ध केले नाही.

3) प्रशासकीय मंजुरी जलव्यवस्थापन समिती सभा दिनांक 31/12/2015 विषय क्रमांक 6 नुसार MHAL AQUA SOLUTIONS NAGPUR यांचे कडून PURALL 50 सयंत्र 275 नग प्रती नग रूपये 9,405/- प्रमाणे खरेदीबाबत ई-निविदेने दर मंजुर केल्याचे उल्लेख असल्याने म्हणजेच निविदा प्रक्रिया, दर मंजुरी आदेश आधीच दिलेले असताना जलव्यवस्थापन स्वच्छता विषय समिती सभा दिनांक 31/12/2015 नुसार वेळेवर येणाऱ्या विषयामध्ये विषय क्रमांक 6 नुसार प्रशासकीय मंजुरी घेणे नियमबाहय आहे.

4) जिल्हा परिषदेअंतर्गत 15 पंचायत समिती असताना केवळ पोंभुर्णा व बल्लारपूर पंचायत समितीमधील 40 गावातील 318 हातपंपावर क्लोरीनेशन युनीट बसविले आहेत. इतर पंचायत समिती अंतर्गत हातपंपावर क्लोरीनेशन युनीट का लावले नाहीत व सदर निवड कोणत्या निकषा आधारे केली व ज्या निकषाआधारे पोंभुर्णा व बल्लारपूर पंचायत समितीमधील गावाची निवड केली ते निकष इतर पंचायत समितीधील गावांना का लागू केले नाही? याबाबत अनुपालन होणे आवश्यक आहे.

5) साहित्य प्राप्तीचे डीलीवरी मेमो, स्टॉक बुक, मुल्यांकन नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

6) M/S. MHAL AQUA SOLUTIONS NAGPUR यांचे कडील उपअभियंता यांत्रिकी यांना दिलेले पत्र क्रमांक 103/10.3.2015 नुसार PURALL 50 क्लोरीनेशन सयंत्राची किंमत रूपये 8,000/- प्रती नग प्रमाणे असल्याचे कळविले आहे. प्रती नग रूपये 8,000/- प्रमाणे किंमत असताना MHAL AQUA SOLUTIONS NAGPUR यांना प्रती नग रूपये 9,405/- प्रमाणे रक्कम प्रदान केली आहे. म्हणजे प्रती नग रूपये 1,405/- रूपये अधिक प्रदान केले आहे. त्यानुसार 275 नगाचे रूपये 1,405/- प्रमाणे रूपये 3,86,375/- वसूलपात्र ठरतात. याबाबत उदयोग, उर्जा विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार विभागाने वाटाघाटी केलेल्या नाही.

7) साहित्याच्या दरांबाबत बाजारामधील किमान मुल्याशी तुलना केलेली नाही व खरेदी अधिकाऱ्याने प्रमाणीत केलेले नाही.

8) साहित्याची गुणवत्ता तपासणी झाल्यानंतर बील अदायगी करणे आवश्यक असताना पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय दिनांक 07/02/2014 अटी व शर्तीनुसार शासकीय यंत्रणेकडून साहित्याचा टेस्ट रिपोर्ट घेतलेला नाही.

**3.536 कर्मशाळेकरीता पहारेकरी नियुक्ती मधील नियमबाहयतेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** सदर बाबत रक्कम रूपये 5,10,772/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री. शंकर निनावे यांना मार्च 2016 ते जानेवारी 2017 या कालावधीचे एकूण रूपये 53,985/- व लालचंद बोरकर यांना सप्टेंबर 2015 ते जानेवारी 2017 पर्यंतचे एकूण रूपये 1,26,850/- पहारेकरी म्हणुन काम केल्याबाबत दोघांचे मिळून 1,80,835/- खर्च दाखविलेले आहेत. प्रत्यक्ष श्री. निनावे व बोरकर यांचे बँक खातेवर रक्कम जमा झालेली नाही. संबंधीतांच्या बँक खातेवर रक्कम जमा न होणे ही बाब संशयास्पद आहे. उपअभियंता यांत्रिकी यांचे नावाने धनादेशाचे प्रदान करणे नियमबाहय आहे.

2) विधी व न्याय विभाग, शासन निर्णय दिनांक 19/03/2014 मधील बाब 1 नुसार जिल्हयातील सुरक्षा रक्षक मंडळाने पहारेकरी / सुरक्षा रक्षक उपलब्ध करून देण्यास नकार दिला, तरच निविदा प्रक्रिया राबवावी, असे निर्देश असताना सहायक कामगार आयुक्त, चंद्रपूर यांना सुरक्षा रक्षक मंडळकडून पहारेकरी पुरविण्याबाबत पत्राव्दारे न विचारताच निविदा प्रक्रिया राबविलेली आहे.

3) शासन निर्णय दिनांक 31/12/2009 चे कोष्टक 1 नुसार जाहिरात दिल्याची रोष्टर नोंदवहीतील प्रमाणित सत्यप्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे रोष्टरनुसारच जाहिरात दिल्याची खात्री करता आली नाही. तसेच दिनांक 12/09/2016, 19/09/2016, 27/09/2016 या तारखेचे वर्तमानपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

4) निविदा जाहीरात मधील अटीनुसार व अंदाजपत्रकीय तांत्रिक मान्यतेनुसार प्रतीमहा रूपये 8,000/- प्रमाणे दर ठरविलेले होते. त्यानुसार भारत इंटेलीजन्स सेक्युरीटी फोर्स, चंद्रपूर यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे रूपये 7756.40/- होती. कार्यालयाने निश्चित केलेल्या अंदाजपत्रकीय दर प्रती महा प्रती सुरक्षा रक्षक रूपये 8,000/- प्रमाणे निश्चित केल्यानुसार व सहायक कामगार आयुक्त, चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक 2016/1260, दिनांक 30/09/2016 नुसार किमान वेतन अधीनियम 1948 अंतर्गत पहारेकरी / सुरक्षा रक्षक चंद्रपूर करीता प्रती महा रूपये 7756.40/- प्रमाणे भारत इंटेलीजन्स सेक्युरीटी फोर्स, चंद्रपूर यांची सर्वात कमी दराची निविदा मंजुर न करता इंटेलीजन्स सेक्युरीटी ब्युरो, चंद्रपूर यांची निविदा प्रती महा रूपये 9164.93/- प्रमाणे मंजुर केल्यामुळे फरकाची रक्कम प्रती महा रूपये 1408.53/- प्रमाणे 03 सुरक्षा रक्षकांचे 12 महिन्याकरीता एकूण रूपये 50,707.08/- संबधीतांकडून वसूली करून योग्य लेखाशीर्षात जमा करावे.

5) विधी व न्याय विभाग, शासन निर्णय दिनांक 19/03/2014 मधील बाब 15 नुसार कंत्राटदाराने 03 सुरक्षा रक्षकांचे बँक खातेवर रक्कम जमा केलेली नाही. तसेच निविदा अट क्रमांक 15 नुसार मुळ वेतन रूपये 4,700/-, विशेष वेतन रूपये 3,056.40/-, भनिनी रूपये 960.76/-, भनिनी प्रशा.105.48/-, ESIC 368.42/- असे एकूण 9,161.06/- प्रमाणे सबंधीत बँक खातेत व विभागाकडे जमा केल्याची खात्री न करताच देयके अदा केली आहे.

6) प्रती महा रूपये 9,161.06/- प्रमाणे 03 पहारेकरी करीता 12 महिन्याचे एकूण रूपये 3,29,798.16/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करून व तांत्रिक मान्यता घेउन उदयोग, उर्जा विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार ई टेंडरींग पध्दतीने खरेदी/पुरवठा करने आवश्यक असताना, त्याप्रमाणे कार्यवाही न करता विभागाने नियमबाहय पध्दतीने कार्यवाही केलेली आहे.

**3.537 रोखपुस्तकातील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोलीचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणाचे वेळी रोख पुस्तकाची दिनांक 13/09/2017 रोजी तपासणी केली असता रक्कम रुपये 7,50,235/- शिल्लक असल्याचे आढळून आले.

शिल्लक रकमेपैकी अनुक्रमे रक्कम रुपये 2,035/- व 1,18,277/- दिनांक 20/9/2017 लेखापरीक्षण कालावधीत संबंधीतांना पाठविल्याचे दिसून येते. लेखापरीक्षणाअंती अभिप्राय खालीलप्रमाणे: -

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 13 व नियम 49 नुसार परिषदेच्या वतीने घेतलेल्या पैशाचा विहित नोंदवहीत हिशोब ठेवावा व अशा रकमेचा चालन तयार करुन विनाविलंब जास्तीत जास्त चोविस तासाचे आंत बँकेत किंवा कोषागारात भरणा करावा, अशी तरतूद आहे. परंतू, त्याचे पालन होत असल्याचे आढळून आले नाही. रक्कम रुपये 6,29,923/- भुजल सर्वेक्षण वसुलीच्या व इतर कपातीच्या रकमा बऱ्याचा कालावधीपासून रोख स्वरुपात प्रलंबीत आहे. ही गंभीर अनियमितता आहे. तरी प्रलंबीत उपकर, विमा रक्कमा संबंधितांना पाठवून उर्वरीत तात्काळ विभागाच्या बँकेच्या खात्यात जमा करुन विलंबाच्या कारणासह अनुपालन सादर करावे.

2) प्रलंबीत रक्कम लक्षात घेता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 50, 56 व 57 नुसार कार्यवाही करुन रोखपुस्तक दैनिक शिल्लकेसह दररोज बंद करुन त्यावर स्वाक्षरी करणे आावश्यक आहे. परंतू, तसे होत नसल्याचे दिसून आले.

3) लेखा संहिता 1968 चे नियम 42 नुसार रोख पुस्तकातील शिल्लक रकमेची मासीक तपासणी, त्रैमासिक अचानक तपासणी झाल्याचे आढळून आले नाही.

**3.538 स्पेशल दुरूस्तीकरीता जी.आय.पाईप, हातपंप सुटेभाग साहित्य व अवजारे खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** स्पेशल दुरूस्तीकरीता जी.आय.पाईप, हातपंप सुटेभाग साहित्य व अवजारे खरेदीकरीता रककम रूपये 14,46,230/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर साहित्य खरेदी करीता प्रशासकीय मान्यता व तांत्रीक मंजुरी घेण्यांत आल्याचे नस्तीत अभिलेखे आढळले नाही. तरी प्रशासकीय मान्यता व तांत्रीक मंजुरी नसतांना नियमबाहय खरेदी करण्यांत आलेली आहे.

2) पुरवठा आदेशानुसार खरेदी केलेले स्पेशल दुरुस्तीकरीता जीआय.पाईप, हातपंपाचे सुटेभाग व अवजारे संबंधितांनी विहीत मुदतीत पुरविल्याचे दिसून आले आहे प्राप्त झालेल्या साहित्यांची मोजमाप पुस्तकांत क्रमांक 288 व 285 तसेच माल-साठा रजीस्टर क्रमांक 3 वर नोंद घेण्यांत आली व मागणीनुसार पंचायत समितीला साहित्य पुरविण्यांत आलेले आहे. परंतु, संबंधित पंचायत समितीने स्पेशल दुरुस्तीकरीता जीआय.पाईप, हातपंपाचे सुटेभाग व अवजारे कधी, किती व कोणत्या कामावर वापरले किंवा उपयोगात आणले, याबाबतचे उपयोगीता प्रमाणपत्र घेतले नाही.

2) पुरवठा आदेशानुसार प्राप्त झालेले साहित्य सर्व पंचायत समित्यांना मागणी प्रमाणे स्पेशल दुरुस्तीकरीता जी.आय.पाईप, हातपंपाचे सुटेभाग व अवजारे वाटप करण्यांत आलेले आहेत. परंतु, माल-साठा पुस्तिकेत साहित्य असल्याचे दिसून आले. उदा. 1) Chain With Coupling 500 नग खरेदी करण्यांत आले. परंतु, साठा-पुस्तकांचे पान क्रमांक-13 वर 1,235 नग शिल्लक असल्याचे आढळले. तसेच 2) Pump Bucket (NR)-2,000 नग खरेदी करण्यांत आले. परंतु, साठा-पुस्तकांचे पान क्रमांक-19 वर 4,350 नग शिल्लक असल्याचे आढळून आले आहे आणि 3) Hexagonal Bolt With Nut & Washer 5,000 नग खरेदी करण्यात आले. परंतु, साठा-पुस्तकांचे पान क्रमांक-46 वर 5,032 शिल्लक असल्याचे आढळून आले. 4) Pipe Wrench 36 Inch) 10 नग प्राप्त झाले. परंतु, साठा-पुस्तकांचे पान क्रमांक-5 वर 13 नग शिल्लक असल्याचे दिसून आले आहे.

3) पंचायत समिती, चामोर्शी यांचे मागणी पत्र क्रमांक 73, दिनांक 04/03/2017 नुसार हातपंपाचे सुटेभाग व अवजारे याची मागणी केली असता, पावती क्रमांक 89, दिनांक 07/03/2017 नुसार हातपंपाचे सुटेभाग व अवजारे

असे एकूण अनुक्रमांक 1 ते 19 पर्यंतचे वाटप करण्यांत आले. परंतु, माल ताब्यात घेणा-यांचे नाव श्री.गेडाम यांनी अनुक्रमांक 1 ते 18 पर्यंतचे साहित्य प्राप्त झाल्याचे नमुद केले आहे. परंतु, अनुक्रमांक 19 वर नमुद असलेले साहित्य सिलेंडर असेंब्ली-10 नग प्राप्त झाले किंवा नाही? तसेच संबंधित पंचायत समितीला साहित्य प्राप्त झाल्याबाबत व माल साठा-नोंदवहीचे पान क्रमांकासह पोहच पावती प्राप्त करण्यांत आले नाही.

**3.539 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजना शिऊर बंगला तावैजापूर कामातील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजनेवर तिसऱ्या हप्त्यापोटी रक्कम रूपये 7,71,824/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक जिपर 2000/प्र.क्र.837/पंरा 8, दिनांक 13 फेब्रुवारी 2006 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे तथापी शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही. त्यामुळे 1% विम्याची रक्कम रुपये 56,087/- वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे.

2) कमी घेतलेले मुद्रांक शुल्क रुपये 4,700/- संबंधिताकडून वसूल करून "0030 मुद्रांक व नोंदणी" या शासन लेखाशीर्षाखाली भरणा होणे आवश्यक आहे.

3) योजनेतील विहीर व जलकुंभाची जागा निर्वीवाद असलेबाबतचे अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

4) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक.ग्रापाधो-1114/प्र.क्र.22/पापु-07 दिनांक 09/07/2014 मधील मुद्दा क्रमांक 04 नुसार सदर योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक असतांना तसे परीक्षण केलेले दिसून येत नाही.

5) निवीदेमध्ये पाईप लाईनच्या खोदकामासंदर्भात सरासरी दराची तरतुद ठेवण्यापूर्वी पाईप लाईनच्या एकूण लांबीवर प्रत्येकी 30 मीटरवर चाचणी खडडे घेवून त्यानुसार तपासण्यात आलेल्या भुस्तरीय मापनांचा Weighted average Calculate करुन सरासरी दर निवीदेमध्ये ठेवणे अपेक्षीत असताना तशी कार्यवाही सक्षम प्राधिकारी यांनी केलेली नाही. तरी त्यामुळे पाईप लाईनच्या खोदकामाकरीता वाढीव दर देण्यात येवून शासन निधीचे नुकसान झाल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा करावा.

6) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2010/प्र.क्र.34/39, दिनांक 06/08/2010 नुसार सदर कामासाठी ई - निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार सदर कामाची निविदा संबधित विभागातील "अ" वर्ग दैनिकात व त्या विभागातील "ब" व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका "क" वर्ग दैनिकात प्रसिध्द करणे आवश्यक असतांना सदर शासन निर्णयाचे पालन झालेले नाही. निविदेस व्यापक प्रसिध्दी न मिळाल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले दिसून येत नाही.

7) जलकुंभाचे बांधकाम करण्यापूर्वी जलकुंभाची Safe Bearing capacity याबाबत सक्षम प्राधिका-याने तपासणी केलेबाबत अभिलेखे दिसून आले नाहीत.

8) विदयुतीकरणासंदर्भात केलेल्या कामासंबंधी संचिका, उपप्रमाणके उपलब्ध करण्यात आलेले नाहीत व मोजमाप पुस्तीकेत नोंदी केल्याचे दिसून येत नाही.

9) सनदी लेखापाल यांचे अहवाल/ प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही. तसेच कंत्राटदाराने खरेदी केलेले सिमेंट, स्टील, पाईप व इतर बांधकाम साहित्याबाबत उपप्रमाणके संचिकेत आढळून आलेले नाहीत.

10) वहन अंतराची / लीड चार्जेस ची तपासणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या Quarry chart प्रमाणे केलेबाबतची अभिलेखे संचिकेत दिसून आली नाहीत.

11) निवीदा संपूर्ण कामासाठी मागविण्यात आलेल्या असताना टप्पेनिहाय दर स्विकृत करणे व त्यास मंजुरी देणे याबाबत लेखापरीक्षणास प्राधिकार दर्शविण्यात आलेला नाही.

12) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जिपर-2009 / प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 अन्वये प्रत्यक्ष कामाचे जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात अशा पध्दतीने माहिती दर्शविणारे फलक बसविलेले नाहीत.

13) कामावर ठेकेदाराने सिमेंट, स्टील, वाळु, खडी, गौणखनिज, दगड इत्यादी साहित्य वापरले आहे, तथापी त्याबाबत जमेच्या नोंदी व वापराच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे कामावर वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करुन अंतिम देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. म्हणून काम गुणवत्तापूर्ण झाले किंवा कसे याबाबतची खात्री करता येत नाही.

## 3.540 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजना सुलतानपुरभांडेगाव तालुका खुलताबाद कामातील अनियमितता बाबत.

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजनेवर रक्कम रूपये 18,15,012/- खर्च केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेतील विहीर व जलकुंभाची जागा निर्वीवाद असलेबाबतचे अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

2) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापाधो-1114/प्र.क्र.22/पापु-07, दिनांक-09/07/2014 मधील मुद्दा क्रमांक 04 नुसार सदर योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक असतांना तसे परीक्षण केलेले दिसून येत नाही.

3) ॲप्रोच बंड मधील बाब क्रमांक 1) Earthwork in embankment या बाबीमधे (रुपये 6,23,788/- ) 10% दबाई घट वजा करणे आवश्यक असताना ती वजा न केल्याने रुपये 62,378/- इतक्या रकमेचे अतिप्रदान झालेले आहे. तरी आता संबंधीताकडून अतिप्रदानाची रक्कम रुपये 62,378/- वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

4) निवीदेमध्ये पाईप लाईनच्या खोदकामासंदर्भात सरासरी दराची तरतुद ठेवण्यातपूर्वी पाईप लाईनच्या एकूण लांबीवर प्रत्येकी 30 मीटरवर चाचणी खड्डे घेवून त्यानुसार तपासण्यात आलेल्या भुस्तरीय मापनांचा Weighted average Calculate करुन सरासरी दर निवीदेमध्ये ठेवणे अपेक्षीत असताना तशी कार्यवाही सक्षम प्राधिकारी यांनी केलेली नाही. तरी त्यामुळे पाईप लाईनच्या खोदकामाकरीता वाढीव दर देण्यात येवून शासन निधीचे नुकसान झाल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा करावा.

5) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2010/प्र.क्र.34/39, दिनांक 06/08/2010 नुसार सदर कामासाठी ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक- 31/08/2009 नुसार सदर कामाची निविदा संबधित विभागातील “अ” वर्ग दैनिकात व त्या विभागातील “ब” व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका “क” वर्ग दैनिकात प्रसिध्द करणे आवश्यक असतांना सदर शासन निर्णयाचे पालन झालेले नाही. निविदेस व्यापक प्रसिध्दी न मिळाल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले दिसून येत नाही.

6) जलकुंभाचे बांधकाम करण्यापूर्वी जलकुंभाची Safe Bearing capacity याबाबत सक्षम प्राधिका-याने तपासणी केलेबाबत अभिलेखे दिसून आले नाहीत.

7) विद्युतीकरणासंदर्भात केलेल्या कामासंबंधी संचिका, उपप्रमाणके उपलब्ध करण्यात आलेले नाहीत व मोजमाप पुस्तीकेत नोंदी केल्याचे दिसून येत नाही.

8) सनदी लेखापाल यांचे अहवाल/ प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

9) कंत्राटदाराने खरेदी केलेले सिमेंट, स्टील, पाईप व इतर बांधकाम साहित्याबाबत उपप्रमाणके संचिकेत आढळून आलेले नाहीत. तरी याबाबत विभागाने खातरजमा करुन अनुपालन सादर करावे.

10) वहन अंतराची / लीड चार्जेस ची तपासणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या Quarry chart प्रमाणे केलेबाबतची अभिलेखे संचिकेत दिसून आली नाहीत.

11) निवीदा संपूर्ण कामासाठी मागविण्यात आलेल्या असताना टप्पेनिहाय दर स्विकृत करणे व त्यास मंजुरी देणे याबाबत लेखापरीक्षणास प्राधिकार दर्शविण्यात आलेला नाही.

12) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 अन्वये प्रत्यक्ष कामाचे जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात अशा पध्दतीने माहिती दर्शविणारे फलक बसविलेले नाहीत.

13) कामावर वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करुन अंतिम देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. म्हणून काम गुणवत्तापूर्ण झाले किंवा कसे याबाबतची खात्री करता येत नाही.

**3.541 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजना पांगरा/पांगरा तांडा ता.कन्नड कामातील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजनेवर तिसरा व अंतिम हप्त्यावर रक्कम रूपये 31,74,382/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक जिपर 2000/प्र.क्र.837/पंरा 8, दिनांक 13 फेब्रुवारी 2006 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापी शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला आढळून आला नाही. त्यामुळे सदरबाबत विभागाने खातरजमा करुन 1% विम्याची रक्कम वसूल करून शासन खाती भरणा केली किंवा कसे याबाबत अनुपालन सादर करावे.

2) शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक. बिसिए 2009 /प्र.क्र.108/कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार देयकातून बांधकाम मूल्याच्या 1% कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक आहे. सदर योजनेच्या देयकातून 1% प्रमाणे कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक होते. परंतु याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदरबाबत विभागाने खातरजमा करुन 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम वसूल करून शासन खाती भरणा केली किंवा कसे याबाबत अनुपालन सादर करावे.

3) ॲप्रोच बंड या कामातील Filling in Plinth या बाबीसंदर्भात 10 टक्के दबाई घट (Shrinkage ) वजा न केल्याने रुपये 1,04,341/- एवढया रकमेने अतिरीक्त अदाई झाल्याचे दिसून येते. अतिप्रदानाची रक्कम रुपये 1,04,341/- वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे.

4) योजनेतील विहीर व जलकुंभाची जागा निर्वीवाद असलेबाबतचे अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

5) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक.ग्रापाधो-1114/प्र.क्र.22/पापु-07, दिनांक-09/07/2014 मधील मुद्दा क्रमांक 04 नुसार सदर योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक असतांना तसे परीक्षण केलेले दिसून येत नाही.

6) शासन निर्णय दिनांक 09/07/2014 नुसार दिनांक 02/07/2014 पूर्वी मंजुर केलेल्या व कार्यारंभ आदेश दिलेल्या कामांसंदर्भात द्वितीय अग्रीम अदा करण्यापूर्वी उर्वरीत 5 टक्के लोकवर्गणीची रक्कम जमा असलेबाबतची खात्री करण्यात आलेली नाही.

7) निवीदेमध्ये पाईप लाईनच्या खोदकामासंदर्भात सरासरी दराची तरतुद ठेवण्यातपूर्वी पाईप लाईनच्या एकूण लांबीवर प्रत्येकी 30 मीटरवर चाचणी खडडे घेवून त्यानुसार तपासण्यात आलेल्या भुस्तरीय मापनांचा Weighted average Calculate करुन सरासरी दर निवीदेमध्ये ठेवणे अपेक्षीत असताना तशी कार्यवाही सक्षम प्राधिकारी यांनी केलेली नाही. तरी त्यामुळे पाईप लाईनच्या खोदकामाकरीता वाढीव दर देण्यात येवून शासन निधीचे नुकसान झाल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा करावा.

8) सदर कामासाठी ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार सदर कामाची निविदा संबधित विभागातील “अ” वर्ग दैनिकात व त्या विभागातील “ब” व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका “क”

वर्ग दैनिकात प्रसिध्द करणे आवश्यक असतांना सदर शासन निर्णयाचे पालन झालेले नाही. निविदेस व्यापक प्रसिध्दी न मिळाल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले दिसून येत नाही.

9) जलकुंभाचे बांधकाम करण्यापूर्वी जलकुंभाची Safe Bearing capacity याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने तपासणी केलेबाबत अभिलेखे दिसून आले नाहीत.

10) दर पृथःकरण करताना सदर गाव डोंगरी भागात आहे असे नमुद करुन बाबनिहाय मुळ दरात 10 टक्के वाढ समाविष्ठ करण्यात आलेली आहे. परंतु सदर गाव डोंगरी भागात समाविष्ठ असलेबाबत अभिलेख संचिकेत आढळून आलेला नाही.

11) विदयुतीकरणासंदर्भात केलेल्या कामासंबंधी संचिका, उपप्रमाणके उपलब्ध करण्यात आलेले नाहीत व मोजमाप पुस्तीकेत नोंदी केल्याचे दिसून येत नाही.

12) सनदी लेखापाल यांचे अहवाल/ प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

13) कंत्राटदाराने खरेदी केलेले सिमेंट, स्टील, पाईप व इतर बांधकाम साहित्याबाबत उपप्रमाणके संचिकेत आढळून आलेले नाहीत.

14) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 अन्वये प्रत्यक्ष कामाचे जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात अशा पध्दतीने माहिती दर्शविणारे फलक बसविलेले नाहीत.

15) कामावर वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करुन अंतिम देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. म्हणून काम गुणवत्तापूर्ण झाले किंवा कसे याबाबतची खात्री करता येत नाही.

**3.542 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजना कुंजखेडा तालुका कन्नड कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजनेवर तिसरा व अंतिम हप्त्यावर रक्कम रूपये 39,71,412/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक जिपर 2000/प्र.क्र.837/पंरा 8, दिनांक 13 फेब्रुवारी 2006 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापी शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला आढळून आला नाही. त्यामुळे सदरबाबत विभागाने खातरजमा करुन 1% विम्याची रक्कम वसूल करून शासन खाती भरणा केली किंवा कसे याबाबत अनुपालन सादर करावे.

2) ॲप्रोच बंड या कामातील Filling in plinth या बाबीत 10 टक्के दबाई घट (Shrinkage) वजा न केल्याने रक्कम रुपये 1,79,076/- एवढया रकमेने अतिरीक्त अदाई झाल्याचे दिसून येते. अतिप्रदानाची रक्कम रुपये 1,79,076/- वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे.

3) योजनेतील विहीर व जलकुंभाची जागा निर्वीवाद असलेबाबतचे अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

4) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक.ग्रापाधो-1114/प्र.क्र.22/पापु-07, दिनांक-09/07/2014 मधील मुद्दा क्रमांक 04 नुसार सदर योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक असतांना तसे परीक्षण केलेले दिसून येत नाही.

5) निवीदेमध्ये पाईप लाईनच्या खोदकामासंदर्भात सरासरी दराची तरतुद ठेवण्यातपूर्वी पाईप लाईनच्या एकूण लांबीवर प्रत्येकी 30 मीटरवर चाचणी खडडे घेवून त्यानुसार तपासण्यात आलेल्या भुस्तरीय मापनांचा Weighted average Calculate करुन सरासरी दर निवीदेमध्ये ठेवणे अपेक्षीत असताना तशी कार्यवाही सक्षम प्राधिकारी यांनी केलेली नाही. तरी त्यामुळे पाईप लाईनच्या खोदकामाकरीता वाढीव दर देण्यात येवून शासन निधीचे नुकसान झाल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा करावा.

6) सदर कामासाठी ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार सदर कामाची निविदा संबधित विभागातील “अ” वर्ग दैनिकात व त्या विभागातील “ब” व ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील एका “क” वर्ग दैनिकात प्रसिध्द करणे आवश्यक असतांना सदर शासन निर्णयाचे पालन झालेले नाही. निविदेस व्यापक प्रसिध्दी न मिळाल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले दिसून येत नाही.

7) विदयुतीकरणासंदर्भात केलेल्या कामासंबंधी संचिका, उपप्रमाणके उपलब्ध करण्यात आलेले नाहीत व मोजमाप पुस्तीकेत नोंदी केल्याचे दिसून येत नाही.

**3.543 जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत पुर्नवसन गावातील हातपंपाचे संच बदलणेसाठी नवीन संच खरेदीमधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती मंठा व परतूर अंतर्गत लोअर दुधना प्रकल्पाअंतर्गत पुनवर्सन गावातील हातपंपाचे संच बदलणे ओटा बांधणे इत्यादी कामासाठी जिल्हा वार्षिक योजना पुनर्वियोजन सन 2015-2016 मध्ये प्र.क्र. 151 माहे 3/2017 रूपये 16,01,760/- अन्वये खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त खरेदीसाठी प्रथम ई-निविदा दिनांक 23/11/2016 रोजी प्रसिध्द करण्यात आली. प्रतिसाद अल्प असल्यामूळे फेरनिविदा दिनांक 11/01/2017 रोजी प्रसिध्द केली. परंतू, याबाबत वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली नाही. त्यामूळे व्यापक प्रसिध्दी न मिळाल्यामूळे स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

2) उपरोक्त साहित्य खरेदीपूर्वी पुरवठा आदेश देतांना संबंधित पुरवठाधारकासाबत करारनामा करणे आवश्यक असतांना करारनामा केलेला नाही. यामूळे खरेदी करतांना पुरवठाधारकांशी ज्या अटी/ शर्ती करणे आवश्यक आहेत, त्यास वैधता प्राप्त होत नाही. करारनामा न करताच खरेदी केली आहे. त्यामूळे उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस/2014/प्र.क्र.82/भाग-III /उदयोग 4, दिनांक 30/10/2015 प्रमाणे कार्यवाही झाल्याची खात्री लेखापरीक्षणात पटत नाही.

3) निविदा मागवितांना मागील शिल्लक साठयाचा आढावा न घेताच निविदा मागवून खरेदी आदेश दिल्याचे दिसून येते. उपरोक्त साहित्याची नोंद नमूना नंबर 33 साठा नोंदवहीवर न घेता नवीन साठा नोंदवही क्रमांक 6 पान क्रमांक 1 वर दिनांक 27/03/2017 रोजी 120 नग जमा दर्शवले आहेत. त्यापैकी दिनांक 18/03/2017 रोजी साठा नोंदवही क्रमांक 2 पान क्रमांक 7 वर लोअर दुधना प्रकल्पासाठी दिलेले 15 नग परत करण्यात आले आहेत व उर्वरीत संबंधित हातपंपाचे काम करणाऱ्या संस्थेप्रमाणे देण्यात आले. परंतू, त्यावर जेवढे नग दिले त्या संबंधीचे यंत्रावरील अनूक्रमांक नमूद करण्यात आलेला नाही उपरोक्त पानावर 17 नग दिनांक 13/05/2017 रोजी शिल्लक असून त्याच दिनांकास 2 नग परत आले असून लेखापरिक्षण दिनांकापर्यंत 19 नग शिल्लक आहेत. याबाबत आवश्यकता नसतांना जास्तीची खरेदी केल्याचे दिसून येते.

4) संचिकेची तपासणी केली असता संचिकेमध्ये पंचायत समिती मंठा हातपंप मागणी दिनांक 05/11/2015 नूसार एकूण संच 29 व पंचायत समिती, परतूर हातपंप मागणी दिनांक 03/11/2015 एकूण संच 76 असे एकूण हातपंप संच मागणी 105 उपलब्ध अभिलेख्यानूसार दिसून आले आहेत. परतूर मागासवर्गीय वस्तीमधील 5 संच हातपंपाची माहिती सोबत संलग्न आहे. परंतू, त्यावर हातपंपाची मागणी आहे, असे नमूद नाही. प्रत्यक्ष मागणी 105 संचाची असतांना खरेदी 120 संच खरेदी केले आहेत. म्हणजेच 15 संचाची जास्तीची मागणी दर्शवून अनावश्यक खरेदी केले आहेत. सबब 15 नग @ रूपये 13,348/- प्रमाणे एकूण रूपये 2,00,220/- अनावश्यक गुंतले आहेत.

5) साठा नोंदवही क्रमांक 6 पान क्रमांक 1 वर RIV (RICIPTE ISSUE VOUCHER ) क्रमांक 191 नूसार 13 नग वितरीत केल्याचे नोंद आहे. परंतू, RIV वर 11 नगाचे क्रमांक नमूद केलेले आहे व अनुक्रमांक 12 व 13 समोर क्रमांक नमूद नाही. म्हणजेच एकूण 11 नगच वितरीत केल्याचे दिसून येते. 2 नगाबाबत जबाबदारी निश्चित करुन संबंधिताकडून रूपये 13,348/- प्रमाणे 2 नगाची रक्कम रूपये 26,696/- वसूल करुन शासनखाती भरुन अनूपालन दर्शवावे.

6) जिल्हाधिकारी यांचे निधी वितरण आदेश दिनांक 14/03/2016 मधील अटी व शर्ती अनुक्रमांक्नुसार निधी दिनांक 31/03/2016 पर्यंत खर्च हाईल, याची दक्षता घेणेबाबत नमूद आहे. परंतू, अशी कार्यवाही झालेली नाही.

7) जिल्हाधिकारी यांचे निधीवितरण आदेशातील अटी व शर्तीचे पालन झाल्याचे दिसून येत नाही. तसेच उपरोक्त आदेशातील अनुक्रमांक 12 नूसार कार्यक्रमांतर्गत होणारा मासिक खर्च व भौतिक प्रगतीचा अहवाल दरमहा 5 तारखेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे बंधनकारक असतांना अशी कार्यवाही केली नाही.

8) पंचायत समिती मंठा व परतूर अंतर्गत लोअर दूधना प्रकल्पाअंतर्गत पुनवर्सन गावातील हातपंपाचे संच बदलणे, ओटा बांधणे इत्यादी कामासाठी जिल्हा वार्षिक योजना पुनर्वियोजन सन 2015-2016 मध्ये रक्कम रूपये 25 लक्ष तरतूद करण्यात आली होती. उपरोक्त कामावर निधी उपलब्ध असूनही सन 2015-2016 मध्ये योजना न राबवता ती सन 2016-2017 अखेर राबविण्यात आली आहे. उपरोक्त निधी 1 वर्षापेक्षा जास्त कालवधीसाठी कुंठीत करण्याचे दिसून येते व योजना वेळेवर न राबविण्यामूळे उपरोक्त पुर्नवसीत गावातील लोक पाण्यापासून वंचित राहीले आहेत.

**3.544 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल केंद्र हिस्सा (सौर उर्जा) अनूदान BDS वरील आहरीत रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी व उपअभियंता (यांत्रिक) यांच्या संयुक्त खात्यावर वर्ग करणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक राग्राये 2016/प्र.क्र. 44/ पा पु 10, दिनांक 11/01/2017 मधील अनुक्रमांक 6 नूसार सदर निधी सन 2012-2013, 2013-2014, 2014-2015 व 2016-2015 या वर्षाच्या कृती आराखडयात समाविष्ट असलेल्या गावाच्या योजनासाठीच खर्च करावा. तसेच उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी उपयोगात आणण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून खर्चाचे नियोजन करावे व उपयोगीता प्रमाणपत्रे शासनास वेळीच सादर करावे. असे असतांना वरीलप्रमाणे कार्यवाहीचे संदर्भिय कागदपत्रे संचिकेत दिसून आली नाहीत.

2) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1109/प्र.क्र. 104(अ)/पापु-07, दिनांक 17/03/2010 मध्ये योजनेची मागणी व त्यापुढील कार्यवाहीचे वेळापत्रक नमूद आहे ज्यानूसार नियोजन टप्पा अंमबजावणी टप्पा, बहीर्गमन टप्पा याप्रमाणे कार्यवाही झालेबाबत लेखापरिक्षणात दिसून आले नाही.

3) ग्रामिण पाणीपुरवठा विभागाने उपरोक्त रक्कम यांत्रिकी विभागाकडे वरीलप्रमाणे बँक खात्यामध्ये जमा असतांना सादर केलेल्या लेखाशिर्षनिहाय जमा खर्च तक्त्यामध्ये (परि.क्र. 1 नूसार) व त्यांचे लेखामध्ये सदरील रक्कम वित्तीय वर्षात खर्च दर्शवून शिल्लक निरंक दर्शवली आहे. म्हणजेच रक्कम जिल्हानिधीच्या लेख्याबाहेर ठेवलेली आहे. याबाबत खुलासा होणे योग्य वाटते.

4) उपरोक्त अनूदान लेखापरिक्षण दिनांकापर्यंत अखर्चित राहील्यामूळे शासननिधी विनाकारण गुंतून पडला आहे. याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

**3.545 नैसर्गिक आपत्ती अंतर्गत नगर परिषद अंबड यांना देण्यात आलेल्या अनूदानाच्या देयकातील अतिप्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** ग्रामिण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी सन 2016-2017 या वित्तीय वर्षात जिल्हाधिकारी जालना यांचेकडून नैसर्गिक आपत्ती अंतर्गत टँकरव्दारे घनसावंगी व अंबड तालुका मधील गावांना पाणीपुरवठा केल्याबाबत देयकान्वये रक्कम रूपये 20,40,000/- अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्याधिकारी नगर परिषद, अंबड यांचे पत्र दिनांक 30/05/2015 अन्वये जलशुध्दीकरण केंद्र, अंबड येथून घनसावंगी व अंबड तालुक्यातील ग्रामिण भागात टंचाईग्रस्त गावामध्ये पाणीपुरवठा करण्यात आलेल्या टँकर्सचे पाण्याचे देयक अदा करणेबाबत कार्यकारी अभियंता (ग्रामिण पाणीपुरवठा) यांना विनंती केली आहे व सोबत देयक

सादर केले आहे. परंतू, सदरील देयक लेखा शाखेने तपासल्याचे संचिकेवरुन दिसून आले नाही. विभागामार्फत सादर न होता देयक थेट अदाईस्तव सादर झाल्याचे दिसून येते.

2) जिल्हाधिकारी जालना यांचे पत्र जा.क्र. 1144 दिनांक 30/10/2015 अन्वये त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना दिलेल्या पत्रामध्ये विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांचे पत्र दिनांक 28/09/2015 मध्ये नगर परिषद, अंबड यांनी सादर केलेली अनूदान मागणी अ) कोणत्या कालावधीकरता केली आहे. ब) किती टँकरकरता पाणी वाहतूक करण्यात आली आहे. क) नमूद निधी मागणी कशाच्या आधारे निश्चित केली आहे. ड) मागणी कोणत्या शासन निर्णयाआधारे करण्यात आली आहे, याबाबत काहीही नमूद केले नसल्याने तसेच मागणी मोघम स्वरुपाची असल्याचे नमूद केले आहे. त्या अनूषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयाने उपस्थित केलेल्या मुद्याप्रमाणे परिपूर्ण निधी मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे. परंतू, अशा प्रकारे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नगर परिषद, अंबडकडून संदर्भिय अभिलेखे मागवून त्याबाबत तपासणी करुन सुधारीत प्रस्ताव सादर करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केल्याबाबत संचिकेत नोंद दिसून येत नाही. त्यामूळे विभागीय आयुक्त यांनी उपरोक्तप्रमाणे नमूद केलल्या बाबीनूसार गंभीर अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) जिल्हाधिकारी, जालना यांचे निधी वर्ग आदेश जा.क्र. 2016/मशाका/पांर/सीआर-22/415, दिनांक 23/03/2016 अन्वये वितरीत अनूदानापैकी अनुक्रमांक 5 चे अनूदान जलशुध्दीकरण केंद्र अंबड येथून टँकरव्दारे पाणीपुरवठा करणेसाठी रक्कम रूपये 20,40,000/- एवढे अनूदान मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्राप्त झाले असतांना वरीलप्रमाणे 3 महिने नंतर अनूदान वितरीत केले आहे. विलंबाने अनूदान वितरीत केल्याचे दिसून येते.

4) देयकाची तपासणी केली असता दिनांक 10/05/2015 ते 15/08/2015 पर्यंत एकूण 5,67,54,000 ली पाणी वितरीत केले आहे. याबाबतची परिगणना रूपये 56754 X 29.50 प्रमाणे रूपये 19,23,864/- एवढे देयक सादर केले आहे. परंतू, प्रत्यक्ष देयकाची परिगणना केली असता रक्कम रूपये 16,74,243/- ऐवढी येते. याबाबत लेखा विभागाने कोणतीही तपासणी न करताच प्राप्त झालेले अनूदान रक्कम रूपये 20,40,000/- नगर परिषद, अंबड यांना अदा केले आहे. म्हणजेच रूपये 3,65,757/- एवढे अतिप्रदान केले आहे. ही रक्कम लेखापरिक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहेत.

5) नगरपरिषदेला देण्यात आलेले अनूदानाचे मुख्यधिकारी नगर परिषद, अंबड यांचेकडून प्राप्त झालेले विनियोग प्रमाणपत्र (Utilaitation Certificate ) संचिकेमध्ये दिसून आले नाही. त्यामूळे अनूदान रक्कम ज्या त्या कारणासाठी खर्च केलेबाबत लेखापरिक्षणात खात्री पटत नाही.

**3.546 राष्ट्रीय पेयजल योजनामधील नळ पाणीपुरवठा कामातील अनियमिततेबाबत. मौकजे पिंपरखेड (खु) तालुका अंबड.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** राष्ट्रीय पेयजल योजनामधील नळ पाणीपुरवठा कामाकरिता रक्कम रूपये 3,25,109/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक ग्रापासो-1111/प्र.क्र./185/पा पु 7, दिनांक 26/03/2013 अन्वये ई-निविदा प्रणालीचा अवलंब करणे आवश्यक आहे. तथापि, उपविभाग अंबड अथवा ग्रामपंचायत पिंपरखेड खु. यांनी ई- निविदा प्रसिध्द केलेले संदर्भिय अभिलेखे अथवा किती निविदा प्राप्त झाल्या, निविदा प्रक्रिया कशी राबविली, तुलनात्मक तक्ता इत्यादी बाबी संचिकेत संलग्न केलेल्या नाहीत. निविदा प्रक्रिया राबविलेबाबत लेखापरिक्षणात खात्री पटत नाही.

2) संचिकेची तपासणी केली असता त्यामध्ये ठेकेदाराने मुल्यवर्धीत कराबाबत विक्रीकर विभागात नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र व इतर ठेकेदारासंदर्भिय सूचना दिनांक 04/04/2012 नूसार अनोंदणीकृत ठेकेदाराचे देयकातून 5 टक्के मुल्यवर्धीत कराची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. सदरील देयकामध्ये 2 टक्के दराने वसूली केली आहे. त्यामूळे देयकातील कमी वसूल 3टक्के मुल्यवर्धीत कर रक्कम रूपये 1,19,125/- संबंधिताकडून वसूल करुन शासन खाती भरणा करावी.

3) बाब क्रमांक 3 पाण्याची तपासणी करणे ही बाब मोजमाप पुस्तिकेमध्ये कार्यान्वित केली नाही. त्यामूळे पाणी पिण्यायोग्य असलेबाबत अधिकृतता दिसून येत नाही.

4) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1114/प्र.क्र.22/पापु-07, दिनांक 09/07/2014 मधील मुद्दा क्रमांक 04 नूसार सदर योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करणे बंधनकारक असतांना तसे परीक्षण केलेले दिसून येत नाही. त्यामूळे योजना विहीत कालावधीत पूर्ण झाली किंवा कसे? त्यामधील अनियमितताला आळा बसेल, हा हेतू साध्य होवू शकला नाही.

5) सदर कामाच्या कार्यकरारासाठी रूपये 3,100/- चे मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक होते. तथापि, फक्त रूपये 100/- मुद्रांक शुल्क घेण्यात आले आहे. कमी घेतलेले रूपये 3,000/- मुद्रांक शुल्क संबंधिताक्डून वसूल करावे.

6) उदभव विहीरीस पुरेसे पाणी असल्याबाबत क्षमता चाचणी अहवाल संचिकेत निदर्शनास आला नाही. क्षमता चाचणी न घेताच योजनेचे काम केल्याचे दिसून येते. त्यामूळे योजनेसाठी पूरेसे पाणी उपलब्ध असल्याची खात्री पटत नाही.

7) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील परिशिष्ट 24 नूसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी अदृश्य मोजमापे 100 टक्के व इतर मोजमापे 5 टक्के प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. तथापि, यानुसार कार्यवाही केलेली दिसून येत नाही. यामुळे गंभीर स्वरुपाच्या अनियमितांना वाव मिळू शकतो.

8) तांत्रिक मान्यतेतील अटी नूसार लीड चार्जेसची तपासणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या Quarry Chart प्रमाणे करुन घेण्याच्या सूचना असतांना अशी तपासणी करण्यात आलेली नाही. तपासणी न करताच लीड देणे अनियमित आहे.

9) काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याने प्राधिकृत करुन देयकासोबत अथवा संचिकेमध्ये जोडलेली नाही.

**3.547 नैसर्गिक आपत्ती अंतर्गत खाजगी / टँकरचे देयक जिल्हास्तरावरुन अदा केल्यामूळे झालेल्या अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** नैसर्गिक आपत्ती अंतर्गत खाजगी/ टँकरचे देयकाकरिता रक्कम रूपये 5,69,67,783/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे पत्र क्रमांक जा.क्र. 2016/मशाका/पांर/कावि-436, दिनांक 31/03/2016 अन्वये ग्रामिण भागातील पाणी टंचाई निवारणार्थ टँकर लावण्याचे अधिकार जिल्हयातील तहसिलदार यांना प्रदान केलेले आहेत. त्यानूसार लावण्यात आलेल्या टँकरच्या देयकाची मागणी गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी तहसिलदार यांचेकडे सादर करावी व तहसिलदार यांनी कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांचेकडे मागणी सादर करावी. तदनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी त्यांचे स्तरावर टँकरचे देयक अदा करावे, असे कळविले होते.

2) पुढील प्रमाणकामध्ये कालबाहय देयके अदा करण्यात आली आहेत. अनुक्रमांक 7 मधील प्रमाणक क्रमांक 6 दिनांक 06/06/2016 रूपये 30,15,524/- मध्ये भगवाननगर, ग्रामपंचायत कर्जत, सोनकपिंपळगाव, भगवाननगर व अनुक्रमांक 9 मधील प्रमाणक क्रमांक 16 दिनांक 16/06/2016 रूपये 41,24,009/- मध्ये सादर केलेल्या देयकामध्ये ग्रामपंचायत रवना, सरफगव्हाण, शेवगड, अंतरवाली दाई, लांमनवाडी, रांजणी व शिंदेवडगाव येथील पाणीपुरवठा केलेल्या कालावधीची कालबाहय देयके अदा करण्यात आली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 44 प्रमाणे एखादया मागणीची रक्कम देय झाल्यापासून एक वर्षाच्या आत पाठविण्यात न आल्यास ती मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मंजूरीशिवाय देण्यात येणार नाही असे नमूद असतांना वरीलप्रमाणे कालबाहय देयके अदा करण्यात आली आहे. याबाबत जबाबदारी निश्चित करुन अनूपालन दर्शवावे.

3) अनुक्रमांक 1 ते 11 देयकांची तपासणी केली असता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी नमूना 29 मध्ये आकस्मिक खर्चाचे देयक त्यांचे स्वाक्षरीने सादर केले आहेत. परंतू, उपरोक्त देयकांसोबत पुरवठादार मे. परफेक्ट रोडलाईन यांची मागणी व त्यांनी सादर कलेले देयक सोबत जोडलेले नाही. त्यामूळे पुरवठादाराच्या मागणीशिवाय देयक कसे तयार केले व अदा करण्यात आले याबाबत जबाबदारी निश्चित होणे योग्य होईल.

4) प्रमाणक क्रमांक 2 दिनांक 07/05/2016 पंचायत समिती जाफ्राबाद रूपये 87,27,847/- व प्रमाणक क्रमांक 3 दिनांक 07/05/2016 पंचायत समिती भोकरदन रूपये 79,85,538/- मध्ये उपरोक्तप्रमाणे देयकांची तपासणी केली असता देयकात नमूद तपशिलानूसार गावांना पाणीपुरवठा केलेल्या सर्व टँकरची क्षमता 12,000/- लिटर दर्शविलेली आहे व देयकासोबत जोडलेल्या उपप्रादेशिक परीवहन अधिकारी जालना यांचे टँकरचे क्षमता प्रमाणपत्र प्रमाणित करुन जोडलेले आहे. त्यानूसार परिगणना केली आहे. परंतू, पुढीलप्रमाणे पाण्याचे परिमाण कमी असतांना सरसकट 12,000 ली. प्रमाणे देयक अदा केल्यामूळे रक्कम रूपये 93,979/- अतिप्रदान झाले आहे.

5) उपरोक्तप्रमाणे अनुक्रमांक 1 ते 8 देयकांमध्ये दिनांक 29/02/2016 पर्यंतचे देयक व दिनांक 01/03/2016 ते 31/03/2016 पर्यंत पाणीपुरवठा केल्याचे दर वेगवेगळे दर्शवून अदा केले आहेत ज्यामध्ये दिनांक 29/02/2016 पर्यंत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याबाबतचा दर प्रती मे. टन प्रति कि.मी. दर 1.76 पैसे व प्रती मे. टन प्रती दिवसाचे भाडे रूपये 112.50 प्रमाणे परिगणना केली आहे व दिनांक 01/03/2016 ते 31/03/2016 या कालावधीसाठी प्रती मे. टन प्रती कि.मी. चा दर 1.99 पैसे व प्रती मे.टन प्रती दिवसाचे भाडे रूपये 145/- या दराने देयके अदा केली आहेत. परंतू, याबाबत देयकासोबत दर बदलाचे आदेश जोडलेले नाहीत. त्यामूळे दिनांक 01/03/2016 ते 31/03/2016 मध्ये वरीलप्रमाणे वाढीव दराने देयके अदा का करण्यात आली आहेत, याबाबत खुलासा करुन अनूपालन दर्शवावे.

6) अर्धसमासपत्र 8 दिनांक 15/11/2017 अन्वये नैसर्गिक आपत्ती लेखाशिर्ष 22450093 अंतर्गत ग्रामिण पाणीपुरवठा विभागातून उपरोक्तप्रमाणे करण्यात आलेल्या खर्चाबाबतची संदर्भिय संचिका व संदर्भिय अभिलेखे लेखापरिक्षणात मागणी करुनही सादर करण्यात आले नाही. त्यामूळे मूळ GPS स्टेटमेंट (ग्लोबल पोजीशनींग सिस्टीम) नूसार अथवा खाजगी टँकरचे लॉगबुक व इतर संदर्भिय अभिलेखे प्रमाणे देयकाची तपशिलामध्ये तपासणी करता आली नाही. याबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक लेखा 2013/(7/13)वित्त-8, दिनांक 18/02/2013 व मुंबई स्थानिक निधी लेखा 1930 चे सुधारणा 2011 च कलम 8 अन्वये अभिलेखे उपलब्ध न केलेबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**3.548 नळ पाणीपुरवठा योजना लोणीशहाजानपुर ता बीड च्या कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** नळ पाणीपुरवठा योजना लोणीशहाजानपुर ता. बीड च्या कामाकरिता रक्कम रूपये 13,39,678/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर समितीला विहीत मुदतीत काम पुर्ण न केल्यामुळे दिनांक 28/08/2015 ला अंतिम नोटीस (पोलिस गुन्हा नोंदबाबत) पत्र दिले होते. तदनंतरही दिनांक 31/03/2017 पर्यंत सदर एजन्सीने काम पुर्ण केलेले नाही. त्याचप्रमाणे ग्रामिण पाणीपुरवठा विभागाने काम पुर्ण केल्यानंतरच संबंधीत ग्रामपंचायतीला अनुदान देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता तिसरा हप्ता दिला आहे. सदर बाब नियम बाह्य आहे.

2) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार दिनांक 31/03/2017 पर्यंत एकुण दिलेल्या रुपये 32,12,483/- अनुदानवर 2% प्रमाणे आयकर रक्कम रुपये 64,249/- कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेला नाही. सदर कपात न केलेली रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 04 एप्रिल 2012 च्या अधिसुचनेनुसार मुल्यवर्धीत कर हा 5% कपात करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त कामांचा विक्रीकर कपात केलेला नाही. त्यामुळे दिनांक 31/03/2017 पर्यंत एकुण दिलेल्या रुपये 32,12,483/- अनुदानवर 5% प्रमाणे विक्रीकर कपातीची रक्कम रुपये 1,60,624/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) शासन निर्णयानुसार दिनांक 31/03/2017 पर्यंत एकुण दिलेल्या रुपये 32,12,483/- अनुदानवर 1% प्रमाणे बांधकाम उपकराची रक्कम रुपये 32,125/- कपात करणे आवश्यक होते, परंतु रुपये 27,715/- इतकीच कपात केलेली आहे. त्यामुळे कमी कपात रक्कम रुपये 4,410/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

5) कामाचा कार्यारंभ आदेश सन 2009 चा असुन काम पुर्ण करण्याचा कालावधी मध्ये सदरचे काम पुर्ण झालेले नाही. काम विहित मुदतीत पुर्ण न झाल्यास / केल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचे पत्र क्रमांक 341/11, दिनांक 24/02/2011 नुसार एक वर्षापेक्षा जास्तीचा कालावधी लागणाऱ्या कामावर 3% प्रमाणे दंड आकारणी करण्याबाबत नमुद केल्यामुळे सदर कामाचे अंतिम देयक रुपये 13,39,678/- वर 3% प्रमाणे दंड रुपये 40,190/- कपात करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात ग्रामिण पाणीपुरवठा विभागाने अंदाजे दंड रुपये 5,000/- आकारुन शासनाचे नुकसान केल्याचे दिसुन येते तेव्हा कमी दंडाची रक्कम रुपये 35,190/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. (सदर दंडाची रक्कम ही फक्त उशीर झालेल्या कामाच्या चालु देयकावर करण्यात आलेली आहे. यापुर्वी किंवा यानंतर उशीरा अपुर्ण कामाच्या प्रदान रक्कमेवर 3% प्रमाणे दंड आकारुन रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.)

6) प्रथम अग्रिम दिल्या नंतर झालेल्या कामाचे मुल्यांकन करुनच दुसरा अग्रिम देणे आवश्यक आहे या बाबत योग्य कार्यवाही झालेली नाही. अग्रिम वाटप करताना योग्य निकष लावून अग्रिम वाटप केल्याचे दिसुन येत नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधिल नियम 155 (3) नुसार कमी अधिक बाबीवरील खर्चास कार्यकारी अभियंता यांची मंजूरी घेण्यात आलेली नाही

8) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक1008, दिनांक 11 जानेवारी 1999 मधिल परिच्छेद 40 नुसार वापरलेल्या साहित्याची प्रयोग शाळेतून तपासणी करुन घेण्यात आलेली नाही.

**3.549 नळ पाणीपुरवठा योजना कडा ता. आष्टी च्या कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** नळ पाणीपुरवठा योजना कडा तालुका आष्टी च्या कामाकरिता रक्कम रूपये 43,81,935/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार दिनांक 31/03/2017 पर्यंत एकुण दिलेल्या रुपये 4,48,26,693/- अनुदानवर 2% प्रमाणे आयकर रक्कम रुपये 8,96,534/- कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेला नाही. सदर कपात न केलेली रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 04 एप्रिल 2012 च्या अधिसुचनेनुसार मुल्यवर्धीत कर हा 5% कपात करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त कामांचा विक्रीकर कपात केलेला नाही. त्यामुळे दिनांक 31/03/2017 पर्यंत एकुण दिलेल्या रुपये 4,48,26,693/- अनुदानवर 5% प्रमाणे विक्रीकर कपातीची रक्कम रुपये 22,41,335/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) कामाचा कार्यारंभ आदेश 2012 चा असुन काम पुर्ण करण्याचा कालावधी मध्ये सदरचे काम पुर्ण झालेले नाही. काम विहित मुदतीत पुर्ण न झाल्यास / केल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचे पत्र क्रमांक 341/11 दिनांक 24/02/2011 नुसार एक वर्षापेक्षा जास्तीचा कालावधी लागणाऱ्या कामावर 3% प्रमाणे दंड आकारणी करण्याबाबत नमुद केल्यामुळे सदर कामाचे अंतिम देयक रुपये 43,81,935/- वर 3% प्रमाणे दंड रुपये 1,31,458/- कपात करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात ग्रामिण पाणीपुरवठा विभागाने दंड न आकारता शासनाचे नुकसान केल्याचे दिसुन येते तेव्हा कमी दंडाची कपात रक्कम रुपये 1,31,458/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. (सदर दंडाची रक्कम ही फक्त उशीर झालेल्या कामाच्या चालु देयकावर करण्यात आलेली आहे. यापुर्वी किंवा यानंतर उशिरा अपुर्ण कामाच्या प्रदान रक्कमेवर 3% प्रमाणे दंड आकारुन रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.)

4) प्रथम अग्रिम दिल्या नंतर झालेल्या कामाचे मुल्यांकन करुनच दुसरा अग्रिम देणे आवश्यक आहे या बाबत योग्य कार्यवाही झालेली नाही. अग्रिम वाटप करताना योग्य निकष लावून अग्रिम वाटप केल्याचे दिसुन येत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधिल नियम 155 (3) नुसार कमी अधिक बाबीवरील खर्चास कार्यकारी अभियंता यांची मंजूरी घेण्यात आलेली नाही

**3.550 तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत ढगे बुवा महाराज मंदिर मौजे जांब खुर्द तालुका जिंतूर येथे पाण्याची व्यवस्था करणे या कामातील अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणीच्या सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात विभागाने तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत ढगे बुवा महाराज मंदिर मौजे जांब खुर्द तालुका जिंतूर येथे पाण्याची व्यवस्था करणे या कामावर रूपये 6,97,914/- चा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 अन्वये कंत्राटदारासोबत करारनामा करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने संचिकेतील करारनामा तपासला असता करारनाम्यावर साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या दिसून आल्या नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 153(1) अन्वये अंदाजपत्रकाप्रमाणे काम पूर्ण करून घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता व कामावरील संबंधित अभियंता यांची आहे. परंतु, सदरील काम अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण केलेले नाही. त्यामुळे केलेली कार्यवाही नियमबाह्य ठरते. तेंव्हा अंदाजपत्रकापेक्षा जादा केलेला खर्च रूपये 1,10,616/- हा कोणत्या प्राधिकारान्वये करण्यात आला, हे स्पष्ट करण्यात यावे. अंदाजपत्रक वस्तुनिष्ठ करण्यात आलेले नाही, असे दिसून येते.

3) तसेच काही बाबींच्या परिमाणात बचत ही 10 टक्के पेक्षा अधिक आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 152(3) अन्वये कामातील बचत ही अन्य बाबींच्या कामावरील खर्च करणेकरीता वापरणे अनियमिततेचे आहे. त्यामुळे बचत कोणत्या प्राधिकारान्वये वापरण्यात आली, हे स्पष्ट करण्यात यावे.

4) सदरील पाणीपुरवठा योजनेसाठी पीव्हीसी पाईप पुरवठा 690 मीटर दर्शवून रूपये 130.90 या दराने 90,321/- चे प्रदान केलेले आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापू-1093/सीआर-625/39-A, दिनांक 25/01/1994 व सी.एस.आर. मधिल सर्वसाधारण नोटस क्रमांक 19 नुसार हायड्रोलिक टेस्टसाठी (जलदाब चाचणी) 10 टक्के रक्कम राखून ठेवून 90 टक्के रक्कम प्रदान करावयास पाहिजे. हायड्रोलिक टेस्ट झाल्यानंतरच देयकाची 10 टक्के रक्कम देण्यात यावी. परंतु, हायड्रोलिक टेस्ट न घेता सदरील बाबींचे 100 टक्के दराने नियमबाह्य प्रदान केलेले आहे.

5) बोअर & पंपिंग मशिनरीचे अंदाजपत्रक व मुल्यांकन तपासले असता कामात 150mm व्यासाचा बोअर घेऊन त्यावर सबमार्शिबल पंप, पाईप,प्यानल बोर्ड, वायर, एम.एस.ई.बी. कोटेशन या बाबी दर्शविल्या आहेत. प्रत्यक्षात बोअरवर मोटार बसविणेसाठी 50mm व्यासाची लोखंडी कॅप, युनियन, एल्बो, निप्पल, बेंड या बाबी आवश्यक आहेत. परंतु, या बाबी अंदाजपत्रकात व मूल्यांकनात नमूद नसताना पाणीपुरवठा सुरळीत कसा झाला, याचा उलगडा लेखापरीक्षणात कळू शकला नाही.

6) रायझिंग मेनच्या कामात 690 मीटर पाईपलाईनच्या कामासाठी 690 मीटर खोदकाम हार्ड रॉकमध्ये दर्शविलेले आहे. जर खोदकाम हार्ड रॉकमध्ये असेल तर ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापू-1093/सीआर-625/39-A, दिनांक 25/01/1994 नुसार पाईप लाईनच्या तळाशी 15 से.मी. जाडीचा मऊ मुरुमाचा किंवा रेतीचा बेड देणे आवश्यक आहे. परंतु, अशी बेडिंग केलेली नाही त्यामुळे नियमबाह्यता झालेली आहे.

7) सदरील पाईपलाईन 90mm व्यासाची असल्यामुळे 25mm व्यासाचे एअर वॉल्व आवश्यक असताना 40mm व्यासाचे एअर वॉल्व बसविलेले आहेत. तरी जादा प्रदानाची रक्कम रूपये 478/- संबंधितांकडून वसूल करावी.

8) सदरील कामात 40mm व्यासाचे एअर वॉल्व असल्याने एअर वॉल्व शाफ्टची आवश्यकता नाही. तसेच ते Saddle Pieces द्वारे (बाब क्रमांक 12) बसविलेले आहेत. एअर वाल शाफ्टची आवश्यकता नसताना निष्कारण खर्च केलेला आहे. सबब निष्कारण खर्चाची रक्कम रूपये 9,272/- वसूल करावी.

9) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, अधिसूचना क्रमांक शासन राजपत्र असाधारण-67, दिनांक 11/05/2015 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या गौण खानिजामधून स्वामित्व धनाची रुक्कम वसूल करणे

आवश्यक आहे. तेंव्हा स्वामित्व धनाची रक्कम रूपये 10,598/- कपात करणे आवश्यक होते. सबब, कमी कपात केलेली रुक्कम 10,598/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

10) सदर कामाच्या पाईप लाईनमध्ये बाब क्रमांक 16 - Refilling th treanches चे परिमाण 474.01 घ.मी. दर्शविले आहे. परंतू, त्यामधून सिमेंट कॉंक्रीटचे परिमाण 13.22 घ.मी. वजा केलेले नाही. त्यामुळे 13.22 घ.मी.चे रूपये 60/- प्रमाणे रक्कम रूपये 793/- चे जादा प्रदान झालेले आहे. सबब जादा प्रदानाची रक्कम वसूल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

11) अंदाजपत्रकाची तपासणी केली असता प्यानल बोर्ड बसविणेसाठी (As per Rate Analysis) रूपये 6,500/- दर दर्शविलेला आहे. परंतु, सदरील बाबीचा दर सीएसआरमध्ये नमूद नाही. तसेच सदरील बाबीचे दर पृथःकरण अंदाजपत्रकासोबत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 105 (ब) नुसार ज्या बाबीसाठी डीएसआरमध्ये दर नमूद नाहीत, त्या बाबतीत दर पृथःकरण करून त्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू, अशी मान्यता घेतलेली नाही. मान्यता न घेता केलेले प्रदान हे नियमबाहय आहे.

12) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-1098/प्र.क्र.245/ पापु-7, दिनांक 11/01/1999 मधील सूचना क्रमांक 28 नुसार बोअरला पाणी लागताच ते पिण्यायोग्य आहे किंवा नाही, याची आरोग्य प्रयोगशाळेकडून चाचणी घेण्यात यावी. तसेच प्रकल्पित लोकसंख्येस पुरेल इतके पाणी उपलब्ध असल्याचे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने प्रमाणित केल्यानंतरच योजनेच्या अन्य उपांगाची कामे करावीत, असे स्पष्ट निर्देश असताना अशा प्रकारची कार्यवाही झालेली नाही.

**3.551 विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना धर्मापुरी तालुका परभणीच्या कामातीलगंभीर अनियमितता व जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद परभणीच्या सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात विभागाने 2245-नैसर्गिक आपत्ती टंचाई अंतर्गत विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना धर्मापुरी तालुका परभणीच्या कामावर रूपये 9,96,486/- चा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीएं-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टीप 1 नुसार विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्वीकारलेची माहिती पुढील स्थायी समिती व विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे. परंतु, अशी कार्यवाही झालेचे दिसून आले नाही. त्याचप्रमाणे उक्त शासन निर्णयातील टीप 2 नुसार- जिल्हा परिषदेतील प्रत्येक विभागांनी कामाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करावयास पाहिजे. परंतू, अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 अन्वये कंत्राटदारासोबत करारनामा करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने संचिकेतील करारनामा तपासला असता करारनाम्यावर साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या दिसून आल्या नाहीत.

3) सदर कामाची संचिका तपासली असता भूजल विकास व सर्वेक्षण यंत्रणेचे कामाच्या शिफारसीबाबतचे प्रपत्र-ब अंदाजपत्रकासोबत दिसून आले नाही.

4) सदरील पाणीपुरवठा योजनेसाठी पीव्हीसी पाईप (110mm) पुरवठा 1,608 मीटर दर्शवून रूपये 180.40 या दराने 2,90,083/- चे प्रदान केलेले आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापू-1093/सीआर-625/ 39-A, दिनांक 25/01/1994 व सी.एस.आर. मधील सर्वसाधारण नोटस क्रमांक 19 नुसार हायड्रोलिक टेस्टसाठी (जलदाब चाचणी) 10 टक्के रक्कम राखून ठेवून 90 टक्के रक्कम प्रदान करावयास पाहिजे. (excavation, bedding, laying, chamber, valves, cost of pipe या रकमेच्या 10 टक्के रक्कम) हायड्रोलिक

टेस्ट (जलदाब चाचणी) झाल्यानंतरच देयकाची 10 टक्के रक्कम देण्यात यावी. परंतु, हायड्रोलिक टेस्ट (जलदाब चाचणी) न घेता सदरील बाबींचे 100 टक्के दराने नियमबाह्य प्रदान केलेले आहे.

5) सदरील कामामध्ये 40mm व्यासाचे 4 नग एअर वाल दर प्रतिनग रूपये 1,228/- दर्शवून प्रदान केलेले आहे. तसेच एअर वॉल्व हे शाफ्ट मध्ये बसवून 4 नग प्रतिनग दर 4,636/- ने दर्शवून प्रदान केलेले आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापू-1093/सीआर-625/39-A, दिनांक 25/01/1994 नुसार 80 ते 150 mm व्यासाच्या पाईपसाठी 25mm व्यासाचा एअर वॉल्व आवश्यक आहे. सदरील पाईपलाईन 110 mm व्यासाची असल्यामुळे 25 mm व्यासाचे एअर वॉल्व आवश्यक असताना 40mm व्यासाचे एअर वॉल्व बसविलेचे दर्शविले आहे. तसेच उक्त शासन परिपत्रकातील सूचनानुसार 80mm व 100mm व्यासाचेच एअर वॉल्व हे एअर शाफ्ट करून बसवायचे आहेत. त्याखालील व्यासाचे एअर वॉल्व हे Saddle Pieces द्वारे बसवायचे आहेत. सदरील कामात 40mm व्यासाचे एअर वॉल्व असल्याने एअर वॉल्व शाफ्टची आवश्यकता नाही. 25mm व्यासाचे एअर वॉल्व बसविणेचा दर रूपये 180/- आहे. त्यामुळे निष्कारण खर्च झालेला आहे. सबब जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम रूपये 18,648/- संबंधितांकडून वसूल करून शासन खाती भरणा करावी.

6) सदरील कामाचे अंदाजपत्रक तपासले असता त्यात रायझिंग मेनमध्ये बाब क्रमांक 1-प्रमाणे 3,216 मीटर जुनी पाईपलाईन काढणेबाबत प्रस्तावित करून बाब क्रमांक 2-प्रमाणे 1,608 मीटर नवीन पाईप पुरवठा करणेचे प्रस्तावित आहे. तथापि, अंदाजपत्रकात बाब क्रमांक 3 मध्ये मात्र 3,216 मीटरऐवजी केवळ 1,608 मीटरच पाईप अंथरूण बसविणेबाबतचे प्रस्तावित आहे. जेवढी जुनी पाईपलाईन काढली असेल, तर तेवढेच पाईप अंथरुण बसविणे आवश्यक आहे. म्हणजे अंदाजपत्रक देखील चुकीचे बनविलेले आहे. तसेच मुल्यांकनाबाबतची मोजमाप पुस्तिका क्रमांक 3,110 ची तपासणी केली असता पृष्ठ क्रमांक 69 ते 70 वर रायझिंग मेनमधिल बाब क्रमांक 1 प्रमाणे 3,216 मीटर जुनी पाईपलाईन काढल्याबाबत नमूद केले आहे व बाब क्रमांक 2 प्रमाणे 1,608 मीटर नवीन पाईप पुरवठा केल्याबाबत नमूद आहे. तथापि, बाब क्रमांक 3 मध्ये मात्र केवळ 1,608 मीटरच पाईप अंथरुण बसविल्याबाबत नमूद आहे. म्हणजेच 1,608 मीटर जादा जुनी पाईपलाईन काढल्याचे दर्शविले आहे. सबब जादा 1,608 मीटर जुनी पाईपलाईन काढलेचा दर 81 प्रमाणे रक्कम रूपये 1,30,248/-चे जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदान रक्कम रूपये 1,30,248/- सबंधित कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

7) लॉगबुकवर दिनांक नमूद नसल्याने तसेच महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिसारण मंडळ यांचे परिपत्रक क्रमांक पापु-2/तांशा-2/350-अ/2016, दिनांक 07/10/1995 नुसार विहिरीतील गाळ काढून व खोदकाम करून 600 बीएचपी पाणी उपसण्यायोग्य लागल्याचे भूजल विकास व सर्वेक्षण यंत्रणेचे प्रमाणपत्र संचिकेत नाही. तसेच सोबत जोडलेल्या लॉगबुक नुसार दररोज सकाळी 6:00 ते 8:00 (दोन तास) व दुपारी 3:00 ते सकाळी 4:00 (तेरा तास) 5 एचपीच्या दोन मोटारीने पाणी उपसा केल्याचे दर्शविले आहे. म्हणजे चोवीस तास पैकी 15 तास 5 एचपीच्या दोन मोटारीने उपसा होण्याइतके पाणी मे व जून महिन्यात होते, तर विहिरीत गाळ होता वा पाणी कमी होते, असे दुरुस्तीवेळी म्हणता येणार नाही. सबब सदर बाबीवरील खर्च समर्थनीय वाटत नाही. तरी नियमबाह्य प्रदान केलेली रक्कम रूपये 36,000/- संबंधितांकडून वसूल करून ती शासन खाती भरणा करावी.

8) सदरील कामात पंपिंग मशिनरीमध्ये बाब क्रमांक 3 मध्ये 50mm व्यासाचा लोखंडी पाईपपुरवठा करणे 20 मीटर दर रूपये 342/- प्रमाणे रूपये 6,840/- प्रस्तावित असून त्याप्रमाणे मूल्यांकनात 20 मीटर लोखंडी पाईपपुरवठा करून रूपये 342/- दराने रूपये 6,840/-रक्कम प्रदान केलेली आहे. परंतु, मूल्यांकनात सदर लोखंडी पाईप बसविलेची (बसविणेचा दर 59 X 20मीटर = 1,180) बाब नमूद नाही. तसेच अंदाजपत्रकात देखील सदर बसविणेची बाब नमूद नाही. तरी जादा प्रदान रक्कम संबंधितांकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. तसेच यावरून प्रत्यक्षात काम केले नसताना केलेचे दर्शवून रक्कम अदा केली असल्याने संबंधितावर कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

9) सदरील दुरुस्तीच्या कामात 15 एचपी मोटार 1 नग रूपये 55,914/- पुरवठा करून बसविलेचे दर्शविले आहे. परंतु, सदर मोटार खरेदीची पावती, टेस्ट रिपोर्ट, ताबा पावती संचिकेत नाही. तसेच जुने पंप नादुरुस्त

असलेबाबत उपअभियंता (यांत्रिकी) यांचे प्रमाणपत्र नाही. जुना पंप, जुने वायर,लोखंडी पाईप इत्यादी साहित्य उपविभागाकडे जमा केलेले नाही. त्यामुळे नवीन पंप खरेदीबाबत सत्यता पटत नाही. तरी सदरील अभिलेखे दर्शवावीत अन्यथा सदर रक्कम 55,914/- वसूल करून शासन खाती रक्कम भरणा दर्शवावी.

**3.552 विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना वझुर तालुका पूर्णाच्या कामातील अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणीच्या सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात विभागाने 2245-नैसर्गिक आपत्ती टंचाई अंतर्गत विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना वझुर तालुका पूर्णा येथील कामावर रूपये11,33,532/-चा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146 अन्वये कंत्राटदारासोबत करारनामा करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने संचिकेतील करारनामा तपासला असता करारनाम्यावर कंत्राटदाराच्या व साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या दिसून आल्या नाहीत.

2) विभागाने रूपये 100/- मूल्यांच्या मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. तरी कमी रक्कम रूपये 200/- संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) कामाच्या मूल्याच्या 1 टक्के दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. परंतु, कंत्राटदाराने विमा उतरविला नसल्याने संबंधित कंत्राटदाराकडून रूपये 11,335/- वसूल करून विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे.

4) सदर अंदाजपत्रकात विहीर खोलीकरणाचा अंतर्भाव असून अंदाजपत्रकातील विहिरीच्या कामात बाब क्रमांक 3 मध्ये विहीर क्रमांक 1 चे खोदकाम 7.50 ते 18 मीटर तसेच विहीर क्रमांक 2 चे 6 ते 18 मीटर पर्यंत करणेचे प्रस्तावित होते. परंतु, प्रत्यक्ष कामामध्ये विहीर क्रमांक 1चे 7.50 ते 18 मीटर खोदकाम केलेले नाही. तसेच विहीर क्रमांक 2 चे 15 मीटर पर्यंतच खोदकाम केलेले आहे. संचिकेत पूर्ण खोदकाम न करण्याची कारणमिमांसा नमूद केलेली नाही. तसेच याबाबत भूजल विकास व सर्वेक्षण यंत्रणेचे अभिप्राय देखिल नमूद नसून कोणत्या प्राधिकाराअन्वये विहिरीचे खोदकाम कमी केले, याबाबतची अभिलेखे संचिकेत दिसून आली नाहीत.

5) अंदाजपत्रकातील विहिरीच्या कामात बाब क्रमांक 3 मध्ये विहीर क्रमांक 2 चे 6 ते 18 मीटर पर्यंत खोदकाम करणेचे प्रस्तावित होते. त्यानुषंगाने अंदाजपत्रकात बाब क्रमांक 4 मध्ये विहीर क्रमांक 2 साठी 900 बीएचपी पाणी उपसणेचे प्रस्तावित होते. परंतु, प्रत्यक्ष कामात विहीर क्रमांक 2 चे खोदकाम हे 18 मीटर ऐवजी 15 मीटरच केले. तीन मीटर खोदकाम कमी केले, तेंव्हा पाणी उपसणे ही बाब 900 बीएचपी पेक्षा कमी येणे अपेक्षित होते. परंतु, तीन मीटर कमी खोदूनही 900 बीएचपी ऐवजी 2,530 बीएचपी पाणी उपसलेचे दर्शविले आहे. 900 बीएचपी ऐवजी 2,530 बीएचपी पाणी उपसलेची मोजमापे मोजमाप पुस्तिकेत व लॉगबुक मध्ये नमूद करणे संयुक्तिक नाही. सबब 2,530 (-) 900 = 1,630 बीएचपीची मोजमापे ही केवळ कंत्राटदराचा आर्थिक फायदा करण्याच्या उद्देशाने दर्शविलेली आहेत. तेंव्हा जादा परिमाण 1630 बीएचपीचे नियमबाह्यरित्या प्रदान केलेले आहे. तरी 1,630 बीएचपी चे रूपये 60/- रुपये दराने 97,800/- ची जादा प्रदान झालेली रक्कम संबंधितांकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6) अंदाजपत्रकातील रायझिंग मेन कामात बाब क्रमांक 3 मध्ये 150mm व्यासाचा ISI D.I. पाईपपुरवठा करणे 90 मीटर प्रस्तावित असून त्यासाठी बाब क्रमांक 4 मध्ये 63 घ.मी. खोदकाम देखील प्रस्तावित होते. त्यानुषंगाने प्रत्यक्ष कामात 150mm व्यासाचा ISI D.I.पाईपपुरवठा 90 मीटर रूपये 1,338/- या दराने दर्शवून रक्कम रूपये 1,20,420/-चे प्रदान केलेले आहे. मात्र सदर पाईपसाठी खोदकाम ही बाब केलेली नाही. तसेच तो पाईप अंथरून बसविणेसाठी (90 मीटर X बसविणे दर 70 = 6,300) अंदाजपत्रकात तरतूद देखील केलेली नाही आणि प्रत्यक्ष कामात देखील तो पाईप अंथरून बसविलेला नाही. तर मग 90 मीटर D.I. पाईपपुरवठा करणेचे प्रयोजन

काय? सबब पुरवठा केलेला पाईप बसविला नसल्याने रक्कम रूपये 1,20,420/-चे जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदान रक्कम संबंधितांकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

7) हायड्रोलिक टेस्ट झाल्यानंतरच देयकाची 10 टक्के रक्कम देण्यात यावी. परंतु, हायड्रोलिक टेस्ट न घेता सदरील बाबींचे 100 टक्के दराने नियमबाह्य प्रदान केलेले आहे.

8) सदरील कामात 40mm व्यासाचे एअर वॉल्व असल्याने एअर वॉल्व शाफ्टची आवश्यकता नाही. 25mm व्यासाचे एअर वॉल्व बसविणेचा दर रूपये 180/-आहे. त्यामुळे निष्कारण खर्च झालेला आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम रूपये 9,750/- संबंधितांकडून वसूल करून शासन खाती भरणा करावी.

9) सदरील कामात पाईपलाईनचे काम 480 मीटर आहे. तेंव्हा 1 नग एअर वॉल्व बसविणेची आवश्यकता होती. परंतु, मूल्यांकनात 2 नग एअर वॉल्व बसविलेले आहेत. त्यामुळे 1नग एअर वॉल्वचे रूपये 6,077/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदान रक्कम रूपये 6,077/- सबंधित कंत्राटदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

10) सदरील कामात पपिंग मशिनरीमध्ये बाब क्रमांक 4 63mm व्यासाचा H.D.P.E.पाईप 60 मीटर रूपये 92/- या दराने रूपये 5,520/-चे प्रदान केलेले आहे. परंतु, अंदाजपत्रकात तो बसविणेची (60 मीटर X दर 37= 2,220) तरतूद केलेली नाही. तसेच प्रत्यक्ष कामात देखील तो बसविलेला नाही. त्यामुळे रुपये 5,520/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदान रक्कम सबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

11) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक शासन राजपत्र असाधारण-67, दिनांक 11/05/2015 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या गौण खानिजामधून स्वामित्व धनाची रुक्कम रुपये 2,640/- वसूल करणे आवश्यक आहे. तेंव्हा स्वामित्व धनाची रक्कम कपात करणे आवश्यक होते. परंतु, अशी कार्यवाही झालेली नाही. सबब कमी कपात केलेली रक्कम रूपये 2,640/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

12) अंदाजपत्रकाची तपासणी केली असता प्यानल बोर्ड बसविणेसाठी (As per Rate Analysis) रूपये 10,324/-दर दर्शविलेला आहे. परंतु, सदरील बाबीचा दर सीएसआरमध्ये नमूद नाही. तसेच सदरील बाबीचे दर पृथःकरण अंदाजपत्रकासोबत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 105(ब) नुसार ज्या बाबीसाठी डीएसआर मध्ये दर नमूद नाहीत, त्या बाबतीत दर पृथःकरण करून त्यास स्थाई समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु, अशी मान्यता घेतलेली नाही. मान्यता न घेता केलेले प्रदान हे नियमबाह्य आहे.

13) संचिकेत कमी-जादा खर्चाचे विवरण आहे. परंतु, त्यासोबत कमी-जादाची कारणे किंवा निरीक्षण टिप्पणी जोडलेली नाही. तसेच सदरील बदलास सक्षम तांत्रिक अधिकारी यांची पूर्वमंजुरी घेतलेली नाही महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 153(1) अन्वये अंदाजपत्रकाप्रमाणे काम पूर्ण करून घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता व कामावरील संबंधित अभियंता यांची आहे. परंतु, सदरील काम अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण केलेले नाही. त्यामुळे केलेली कार्यवाही नियमबाह्य ठरते. तेंव्हा अंदाजपत्रकापेक्षा जादा केलेला खर्च रूपये 2,12,449/- व बचत केलेली रक्कम रूपये 3,19,769/- ही कोणत्या प्राधिकाराअन्वये करण्यात आली, हे स्पष्ट करण्यात यावे.

### 3.553 ग्रामीण पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती निधी अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना दुरुस्ती कौडगाव तालुका पूर्णाच्या कामातील अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद परभणीच्या सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात विभागाने ग्रामीण पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती निधी अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना दुरुस्ती कौडगाव तालुका पूर्णाच्या कामावर रक्कम रुपये4,79,555/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील कामाच्या पंपिंग मशिनरीमध्ये बाब क्रमांक 4 विहिरीसाठी 50mm व्यासाचा लोखंडी पाईपपुरवठा 12 मीटर दर्शवून रूपये 342/- या दराने रूपये 4,104/- चे प्रदान केलेले आहे. परंतु, अंदाजपत्रकात तो बसविणेची (12 मीटर X दर 59 = 708) तरतूद केलेली नाही. तसेच मुल्यांकनावरून प्रत्यक्ष कामात देखील तो

बसविलेला नाही. त्यामुळे रुपये 4,104/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदान रक्कम सबंधिताकडून वसूल करावी.

2) सदरील कामाच्या पाईपलाईन कामामध्ये बाब क्रमांक 6 मध्ये DF Sluice Valve 65mm व्यासाचा 1 नग व 80mm व्यासाचा 1 नग पुरवठा करून अनुक्रमे रूपये 4,985/- व 5,116/- चे प्रदान केलेले आहे. परंतु, मोजमाप पुस्तिकेत सदर वॉल्व बसविलेची नोंद नाही. तसेच ते वॉल्व बसविणेसाठी अंदाजपत्रकात तरतूद देखील केली नाही. तो बसविणेचा दर 65mm व्यासासाठी रूपये 1,036/- व 80mm व्यासासाठी रूपये 1,440/-असा आहे. यावरून दिसून येते की, विभागातील तांत्रिक शाखेकडून अचूक अंदाजपत्रके तयार केली जात नाहीत. त्यामुळे जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम रूपये 10,101/- तसेच बी.बी.चेंबरची रक्कम रूपये 9,582/- अशी एकूण रक्कम रूपये 19,683/- सबंधिताकडून वसूल करावी.

3) सदरील कामाच्या देयकातून महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, अधिसूचना क्रमांक शासन राजपत्र असाधारण-67, दिनांक 11/05/2015 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या गौण खानिजामधून स्वामित्व धनाची रक्कम रूपये 8,179/- कपात करून ती शासन खाती भरणा करणे आवश्यक होते. परंतु, अशी कार्यवाही झालेली नाही. सबब जादा प्रदान केलेली रक्कम रूपये 8,179/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

4) मुल्यांकनाबाबतची मोजमाप पुस्तिका क्रमाक 120 ची तपासणी केली असता त्यातील पाईपलाईन कामामध्ये बाब क्रमांक 1 प्रमाणे 612 मीटर जुनी पाईपलाईन काढल्याबाबत नमूद केले आहे व बाब क्रमांक 4 प्रमाणे 306 मीटर नवीन पाईप पुरवठा केल्याबाबत नमूद आहे. तथापि, बाब क्रमांक 8 मध्ये मात्र केवळ 306 मीटरच पाईप अंथरुण बसविल्याबाबत नमूद आहे. म्हणजेच 306 मीटर जुनी पाईपलाईन काढल्याचे जादा दर्शविलेले आहे. सबब जादा 306 मीटर जुनी पाईपलाईन काढलेचा दर रूपये 122/- प्रमाणे रक्कम रूपये 37,332/-चे जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदान रक्कम रूपये 37,332/- सबंधित कंत्राटदाराकडून वसूल करावी.

5) सदरील कामाच्या वाटर टँकमधील बाब क्रमांक 7 मध्ये 5,000 लिटर क्षमतेची पीव्हीसी पाण्याची टाकी पुवरठा करून बसविणेसाठी 8.50 पैसे प्रती लिटर या दराने रूपये 42,500/- चे प्रदान केलेचे दर्शविलेले आहे. सदर कामासाठी सन 2012-2013 ची दरसूची वापरलेली आहे. सन 2012-2013 व 2013-2014 या वर्षाची दरसूची तपासली असता पाणीपुरवठा व स्वच्छता फिटींगस मधील बाब क्रमांक बिडीव्ही-47 प्रमाणे 3,000 लिटरचे वर साठी रूपये 7 प्रती लिटर दर देणे आवश्यक आहे. परंतु, 8.50 पैसे प्रती लिटर दराने प्रदान केलेले आहे. त्यामुळे सदरील बाबीमध्ये जादा दर रूपये 1.50 पैसे ने 5,000 लिटरसाठी रक्कम रूपये 7,500/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम सबंधिताकडून वसूल करून देखभाल व दुरुस्ती निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

6) विहीर दुरुस्तीच्या कामात बाब क्रमांक 3 मध्ये विहिरीतील 200 बीएचपी पाणी उपसणेसाठी रूपये 60/- दराने रूपये 12,000/- चे प्रदान केलेले आहे. तसेच मोजमाप पुस्तिकेत लॉग बुक मधील नोंदीप्रमाणे 200 बीएचपी असा उल्लेख आहे. मोजमाप पुस्तिकेत सविस्तर मोजमापे नोंदविलेली नाहीत. तसेच पंपाचे लॉग बुक ठेवलेले नाही. त्यामुळे पंप किती एचपीचा किती तास किती दिवस चालला ते नमूद नाही. त्यामुळे अभिलेख्याअभावी केलेले प्रदान समर्थनीय ठरत नाही. सबब सदर बाबीवरील खर्च रूपये 12,000/- संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

**3.554 विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना पाथरगव्हाण तालुका पाथरीच्या कामातील अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 37) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणीच्या सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात विभागाने 2245-नैसर्गिक आपत्ती टंचाई अंतर्गत विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना पाथरगव्हाण तालुका पाथरीच्या कामावर रक्कम रूपये 4,62,650/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 146 अन्वये कंत्राटदारासोबत करारनामा करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने संचिकेतील करारनामा तपासला असता करारनाम्यावर कंत्राटदाराच्या व साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या दिसून आल्या नाहीत.

2) सदरील कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक 27/06/2016 चे असून त्यात कामाची मुदत ही दिनांक 30/06/2016 दर्शविली आहे. कामाची मुदत ही फक्त तीन दिवस दिलेली आहे. सदरील कामाची प्रक्रिया ही तीन दिवसात कशी होते, याबाबत विभागाने स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. तेंव्हा विभागाने दिलेली कामाची मुदत ही संयुक्तिक नसून वित्तीय औचीत्यास अनुसरून नाही तसेच काम मात्र प्रत्यक्षात 25/07/2016 रोजी पूर्ण झालेले असून विभागाने कामास मुदतवाढ देखिल मंजूर केलेली नाही.

3) हायड्रोलिक टेस्ट (जलदाब चाचणी) झाल्यानंतरच देयकाची 10 टक्के रक्कम देण्यात यावी. परंतु, हायड्रोलिक टेस्ट (जलदाब चाचणी) न घेता सदरील बाबींचे 100 टक्के दराने नियमबाह्य प्रदान केलेले आहे.

4) मोजमाप पुस्तिकेत विहीर दुरुस्तीच्या कामात बाब क्रमांक 4 मध्ये विहिरीचे पाणी उपसणे या बाबीचे परिमाण 490 बीएचपीचे रुपये 60/- दराने रूपये 29,400/- चे प्रदान केलेले आहे. संचिकेची तपासणी केली असता लॉग बुकमध्ये दिनांक नमूद केलेल्या नाहीत. अनुक्रमांक 1 ते 14 या रकान्यात पाच एचपी मोटार दर्शवून 490 बीएचपी पाणी उपसलेचे दर्शविले आहे. परंतु, त्यात दिनांक नमूद नाहीत. तसेच लॉगबुक विवरणपत्रात संबंधित अभियंता व उपविभागीय अभियंता, सेलू यांनी त्यावर स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत. जर लॉगबुकमध्ये दिनांक नमूद नसतील तर लॉगबुक वर कोणत्या आधारे संबंधित अभियंता व उपविभागीय अभियंता यांनी स्वाक्षऱ्या करून देयक पुढील कार्यवाहीसाठी विभागास सादर केले, याबाबत स्पष्टीकरण करावे. सबब लॉगबुकवर दिनांक नमूद नसल्याने तसेच महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळ यांचे परिपत्रक क्रमांक पापु-2/तांशा-2/350-अ/2016, दिनांक 07/10/1995 नुसार विहिरीतील गाळ काढून व खोदकाम करून 490 बीएचपी पाणी उपसण्यायोग्य लागल्याचे भूजल विकास व सर्वेक्षण यंत्रणेचे प्रमाणपत्र संचिकेत नसल्याने सदर बाब लेखापरीक्षणात अनुज्ञेय नाही. त्यामुळे नियमबाह्य प्रदान केलेली रक्कम रूपये 29,400/- संबंधितांकडून वसूल करून ती शासन खाती भरणा करावी.

5) सदरील कामात 25mm व्यासाचे एअर वॉल्व असल्याने एअर वॉल्व शाफ्टची आवश्यकता नाही. 25mm व्यासाचे एअर वॉल्व बसविणेचा दर रूपये 180/-आहे. त्यामुळे निष्कारण खर्च झालेला आहे. सबब जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम रूपये 15,936/- संबंधितांकडून वसूल करून शासन खाती भरणा करावी.

6) कामावर वापरण्यात आलेल्या गौण खानिजामधून स्वामित्व धनाची रुक्कम रूपये 344/- कपात करून ती शासन खाती भरणा करणे आवश्यक होते. परंतु, अशी कार्यवाही झालेली नाही. सबब जादा प्रदान केलेली रुक्कम रूपये 344/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

7) सदर कामाची ग्रामपंचायत पाथरगव्हाणची ताबा पावतीची तपासणी मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेल्या मुल्यांकनासोबत केली असता त्यात तफावत दिसून आली. त्यामुळे जादा प्रदान झाल्याचे स्पष्ट होते. तरी जादा प्रदान झालेली रक्कम रूपये 10,244/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

**3.555 विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना वालूर तालुका सेलूच्या कामातील अनियमिततेबाबत व जादा प्रदानाबाबत**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 51) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणीच्या सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात विभागाने 2245-नैसर्गिक आपत्ती टंचाई अंतर्गत विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना वालूर तालुका सेलूच्या कामावर रक्कम रूपये 1,93,333/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 अन्वये कंत्राटदारासोबत करारनामा करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने संचिकेतील करारनामा तपासला असता करारनाम्यावर कंत्राटदार व साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या दिसून आल्या नाहीत.

2) सदर कामाच्या अंदाजपत्रकात बाब क्रमांक 11 मध्ये Removing and Re-erection-15hp 8 stage 2 नग दर रूपये 8,112/- प्रमाणे रूपये 16,624/- करणेचे प्रस्तावित होते. परंतु, मोजमाप पुस्तिका क्रमांक 28 मध्ये पृष्ठ क्रमांक 10 वर बाब क्रमांक 11 Removing and Re-erection-15hp 8 stage-ही बाब Nil दर्शविलेली आहे. म्हणजेच सदरील बाब ही केलेली नाही. मात्र सदरील बाबीवर कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के तपासणी केलेबाबतची स्वाक्षरी आहे. तेंव्हा कार्यकारी अभियंता यांनी कामाच्या प्रत्यक्ष स्थळी जाऊन कोणते निकष लावून सदर बाबीची तपासणी केली याचा उलगडा लेखापरीक्षणात कळू शकला नाही. त्यामुळे नियमबाह्यता झालेली असून लेखासंहिता 1968 मधिल नियम 168 चे उल्लंघन झालेले आहे.

3) सदर कामाची संचिका तपासली असता भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी योजनेची तपासणी करून काम करण्याची शिफारस केलेबाबतचे विहित नमुन्यातील प्रपत्र-ब अंदाजपत्रकासोबत आहे. त्यात त्यांनी उपविहीर क्रमांक 1 व 2 मधिल गाळ काढण्याचे प्रस्तावित केले होते. त्या अनुषंगाने अंदाजपत्रकात बाब क्रमांक 3 मध्ये उपविहीर क्रमांक 1 व 2 मधिल गाळ काढण्याची तरतूद केलेली होती. त्याप्रमाणे कामाची मुल्यांकनाबाबतची मोजमाप पुस्तिका तपासली असता उपविहीर क्रमांक 1 व 2 मधिल गाळ काढलेला आहे. परंतू, बाब क्रमांक 3 मध्ये उपविहीर क्रमांक 3 मधिल (Lift 0.00 to 9.00mtr) गाळ काढलेला असून त्याचे परिमाण 32.49 घ.मी. दर्शवून रूपये 599/- या दराने रूपये 19,461/- चे प्रदान केलेचे दर्शविले आहे. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी शिफारस केलेली नसताना तसेच अंदाजपत्रकात बाब नमूद नसताना नियमबाह्य जादा खर्च नोंदविलेला आहे. जादा खर्चाबाबतची कारणमीमांसा संचिकेत नमूद नाही. तसेच सदरील बाबीस कार्यकारी अभियंता यांचे चेक मेजरमेंट नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118 नुसार कामात कांही फेरबदल करावयाचे असतील, तर त्यासाठी कार्यकारी अभियंता यांची पूर्व मंजुरी घेऊन नियम 122 नुसार तोंडी आदेश दिले असतील, तर ते नियम 124 मधिल आदेश पुस्तकात लेखी नोंदवून नियम 155 अन्वये त्यास मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केलेली नाही. अंदाजपत्रकात बाब समाविष्ठ नसताना नियमबाह्य रूपये 19,461/- खर्च केलेला आहे. त्यामुळे केलेली कृती ही नियमबाह्य असून ती वित्तीय औचित्यास अनुसरून नाही.

4) सदरील कामाच्या अंदाजपत्रकात मेन विहीर व उपविहीर क्रमांक 1 व 2 मधिल गाळ काढून बाब क्रमांक 11 अन्वये त्यातील बंद पडलेल्या 15HP च्या दोन मोटार दुरुस्ती करून त्यावर रूपये 16,224/- चा खर्च प्रस्तावित करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे प्रस्तावित होते. तथापि, कामाच्या मूल्यांकनात दोन नग मोटार दुरुस्ती केलेल्या नाहीत. तेंव्हा जर मोटारींची दुरुस्ती केलीच नसेल, तर पाणीपुरवठा सुरळीत कसा झाला. तसेच ताबा पावतीत सुद्धा मोटार दुरुस्तींचा उल्लेख नाही. तसेच मोजमाप पुस्तिकेत मोटारी दुरुस्ती ही बाब केलेली नसताना कार्यकारी अभियंता हे 5 टक्के तपासणी केल्याचे नोंदवितात. सदरील काम टंचाई अंतर्गत आहे. परंतु, मोटारीच दुरुस्त केलेल्या नाहीत. त्यामुळे पाणी टंचाई दूर करणे हा दुरुस्तीचा मूळ उद्देश सफल झाला आहे असे म्हणता येत नाही. त्यामुळे अर्धवट केलेला खर्च निष्फळ ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 153(1) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम पूर्ण करून घेण्याची जबाबदारी कामावरील सबंधित अभियंता व कार्यकारी अभियंता यांची आहे. परंतु, अशी कार्यवाही झालेली नाही.

5) सदरील कामाच्या देयकातून महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, अधिसूचना क्रमांक शासन राजपत्र असाधारण 67 दिनांक 11/05/2015 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या गौण खानिजामधून स्वामित्व धनाची रुक्कम रूपये 320/- कपात करून ती शासन खाती भरणा करणे आवश्यक होते. परंतु, अशी कार्यवाही झालेली नाही. सबब जादा प्रदान केलेली रक्कम रूपये 320/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

6) अंदाजपत्रकाप्रमाणे काम पूर्ण करून घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता व कामावरील संबंधित अभियंता यांची आहे. परंतु, सदरील काम अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण केलेले नाही. त्यामुळे केलेली कार्यवाही नियमबाह्य ठरते. तेंव्हा अंदाजपत्रकापेक्षा जादा केलेला खर्च रूपये 29,609/- व बचत केलेली रक्कम रूपये 1,07,615/- ही कोणत्या प्राधिकारान्वये करण्यात आली, हे स्पष्ट करण्यात यावे.

**3.556 ग्रामीण पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती निधी अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना दुरुस्ती खरबडा तालुका पूर्णाच्या कामातील अनियमिततेबाबत व जादा प्रदानाबाबत**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 52) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणीच्या सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात विभागाने ग्रामीण पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती निधी अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना दुरुस्तीखरबडा तालुका पूर्णाच्या कामावर रक्कम रुपये 8,18,836/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील कामात विहीर कामामध्ये बाब क्रमांक 6 विहिरीसाठी 50mm व्यासाचा लोखंडी पाईपपुरवठा 30 मीटर दर्शवून रूपये 342/- या दराने रूपये 10,260/- चे प्रदान केलेले आहे. परंतु, अंदाजपत्रकात तो बसविणेची (30 मीटर X दर 59 =1,770) तरतूद केलेली नाही. तसेच मुल्यांकनावरून प्रत्यक्ष कामात देखील तो बसविलेला नाही. तसेच विहिरीची खोली ही 18 मीटरच असताना पाईपपुरवठा मात्र 30 मीटर दर्शविलेला आहे. जर जादा पाईपची आवश्यकता असेल, तर अंदाजपत्रकात विहिरीसाठी 18 मीटर व बाहेरील उपंगासाठी 12 मीटर अशी तरतूद करणे आवश्यक होते. परंतु, अशी कार्यवाही केलेली नाही. विसंगतीबाबत स्पष्टीकरण करावे. सबब केलेली कृती ही नियमबाह्य असून त्यामुळे रुपये 10,260/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदान रक्कम सबंधिताकडून वसूल करून देखभाल व दुरुस्ती निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

2) सदरील कामाच्या देयकातून महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक शासन राजपत्र असाधारण-67, दिनांक 11/05/2015 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या गौण खानिजामधून स्वामित्वधनाची रुक्कम रूपये 14,929/- कपात करून ती शासन खाती भरणा करणे आवश्यक होते. परंतु, अशी कार्यवाही झालेली नाही. सबब जादा प्रदान केलेली रक्कम रूपये 14,929/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

3) मूल्यांकनात उपांग-4 मधील बाबींपैकी फक्त ओटा बांधकाम केलेले असून त्यावर रक्कम रूपये 1,17,660/- ईतका खर्च नोंदविला आहे. त्यातील 5,000 लिटरच्या 2 नग पीव्हीसी टाकी, तोट्या बसविणे या बाबी केलेल्या नाहीत. तर ओटा बांधकाम करायची काय गरज होती?

तसेच कामात जर पाण्याच्या टाक्याच बसविल्या नाहीत, तर गावात पाणीपुरवठा सुरळीत कसा झाला? कामात कार्यकारी अभियंता यांची मोजमाप पुस्तिकेत पंपिंग मशिनरीची5 टक्के तपासणी केलेबाबतची स्वाक्षरी आहे. तेंव्हा जर काम पूर्णच झाले नसेल, तर कार्यकारी अभियंता यांनी कामाच्या प्रत्यक्ष स्थळी जाऊन कोणते निकष लावून सदर बाबीची तपासणी केली याचा उलगडा लेखापरीक्षणात कळू शकला नाही. त्यामुळे नियमबाह्यता झालेली असून लेखासंहिता 1968 मधिल नियम 168 चे उल्लंघन झालेले आहे. तसेच या कामाच्या दुरुस्तीचा मूळ उद्देश पाणी टंचाई दूर करणे हा आहे. परंतु, पाणी टंचाई दूर करणे हा दुरुस्तीचा मूळ उद्देश सफल झाला आहे असे म्हणता येत नाही. कारण वाटर टँक कामातील ओटा बांधकामावरील अर्धवट केलेला खर्च रूपये 1,17,660/- निष्फळ ठरलेला आहे. तरी निष्फळ ठरलेल्या खर्चाची जबाबदारी संबंधितांवर निश्चित करून निष्फळ केलेला खर्च रूपये 1,17,660/- संबंधितांकडून वसूल करून रक्कम जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) विहीर दुरुस्तीच्या कामात बाब क्रमांक 4 मध्ये विहिरीतील 600 बीएचपी पाणी उपसणेसाठी रूपये 60/- दराने रूपये 36,000/- चे प्रदान केलेले आहे. तसेच मोजमाप पुस्तिकेत लॉग बुक मधील नोंदीप्रमाणे 600 बीएचपी असा उल्लेख आहे. मोजमाप पुस्तिकेत सविस्तर मोजमापे नोंदविलेली नाहीत. तसेच पंपाचे लॉग बुक ठेवलेले नाही. त्यामुळे पंप किती एचपीचा किती तास किती दिवस चालला, ते नमूद नाही. त्यामुळे अभिलेख्या अभावी केलेले प्रदान समर्थनीय ठरत नाही. सबब सदर बाबीवरील खर्च रूपये 36,000/- संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

5) सदरील कामाच्या संचिकेत काम पूर्ण झालेबाबतचे काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही

**3.557 विंधन विहीरींवर हातपंप उभारणी करणे बाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** विंधन विहीरींवर हातपंप उभारणी करणेकरिता प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 28/12/2016 अन्वये रक्कम रूपये 16,51,102/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 147 अन्वये प्रत्येक करार, नमुना क्रमांक 48 मधील नोंदवहीत नोंदवून गुत्तेदाराला अदा केलेल्या रकमांची नोंद घेणे आवश्यक असताना नमुना क्रमांक 48 लेखापरीक्षणास पहावयास मिळाली नाही.

2) कार्यारंभ आदेश क्रमांक 273, दिनांक 05/10/2016 मध्ये नमूद एकूण 34 ठिकाणी कामे करण्यात आली. देयकासोबत मोटारी खरेदीबाबत पावती (bill) संलग्न नाही. काम पूर्ण झाल्यामुळे सदरील मालमत्ता जिल्हा परिषदेच्या मालकीची झाल्यामुळे मालमत्ता पुस्तकात नोंद घेणे आवश्यक असताना अशा प्रकारे नोंद घेण्यात आली नाही.

3) निधी वितरण आदेश क्रमांक 293, दिनांक 04/03/2016 मधील अट क्रमांक 8 मध्ये नमूद केल्याप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

4) पाणी पातळी विचारात न घेता सरसकट 205 एच.पी. मोटार वापरण्यात आल्याचे मोजमाप पुस्तिकेवरून दिसून येते. पाणी पातळी तपासणी अहवाल ( G S D A ) नस्तीत संलग्न नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 161 (i) अन्वये 34 कामांपैकी कार्यकारी अभियंता कमीतकमी 5% तपासणी केल्याची दिसून येत नाही.

6) सुखापूर, ब्राह्मणवाडा तांडा इत्यादी वगळता इतर 32 गावांची मागणी संचिकेत संलग्न नाही.

7) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28, दिनांक 19 ऑगस्ट 1998, अन्वये निविदा कामाच्या 1% प्रमाणे कामाचा विमा उतरविणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नाही. देयकातून कमी कपात करण्यात आलेली विमा रक्कम रूपये 16,511/- कपात करून विमा संचालनालयाकडे भरणा करून अनुपालन सादर करावे.

8) निधी वितरण आदेश क्रमांक 293, दिनांक 04/03/2016 मधील अट क्रमांक 18 अन्वये सदरील खर्च सन 2015-16 या वित्तीय कालावधीत खर्च करणे बंधनकारक असताना त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 197 नुसार पूर्ण झालेल्या बांधकामांची नोंद नमुना क्रमांक 69 मध्ये घेणे आवश्यक असताना अशा नोंदी न घेतल्यामुळे पूर्ण झालेल्या कामांचा तपशील समजून येत नाही.

**3.558 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत मौ.दांडेगाव ता.कळमनुरी नळ पाणी पुरवठा योजनेतील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत मौ.दांडेगाव तालुका कळमनुरी नळ पाणी पुरवठा योजनेकरिता रक्कम रूपये 63,06,000/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

1) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतून योजना प्रस्तावित करतांना शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 17/03/2010 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार (क्रमांक 19) मागील तीन वर्षात टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेल्या गावांना प्राधान्य देण्याचे निर्देश असतांना असा प्राधान्यक्रम दिल्याचे दिसून येत नाही.

2) शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दिनांक 02/11/2006 नुसार रूपये 50 लक्ष वरील निविदांसाठी निविदा सूचना कालावधी 25 दिवसांचा देणे आवश्यक असतांना सदर प्रकरणी फक्त 07 दिवसांचा कालावधी देण्यात आलेला आहे.

3) सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-9/05/प्र.क्र.381/इमारती-2, दिनांक 15/05/2007 नुसार रूपये 50 लक्ष वरील निविदांसाठी निविदा फी रूपये 5,000/- घेणे आवश्यक असतांना सदर प्रकरणी ती रूपये

1,000/- घेण्यात आलेली आहे. त्यामुळे प्राप्त 3 निविदांसाठी एकूण रूपये 12,000/- चे ग्रामपंचायतीचे नुकसान झाले आहे ते संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

4) उदभव श्वाश्वत पूर्णपणे विकसित झाला असल्याची खात्री वरिष्ठ भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद हिंगोली यांनी व्यक्तिश केल्या नंतरच उर्वरित योजनेच्या उपांगाची कामे हाती घ्यावयाची असतांना अशी खात्री न करताच योजना राबविल्याचे दिसून येते.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 187 (ए) टीप 6 नुसार 10% पेक्षा जास्त प्राप्त दराबाबतचे कार्यकारी अभियंता यांनी समर्थन करणे आवश्यक आहे. विभागाने बाब निहाय चालू दरसूचीशी तुलना करून (Tendor evaluation) दर खरोखर वाढल्याबाबत शहानिशा केलेली नाही. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 139 (1)(2) नुसार वाढीव दराबाबत करावयाची कार्यवाही नमूद असतांना वाढीव दर मंजुरीसाठी शासनास प्रस्ताव पाठविला असल्याबाबत टिपणीत नमूद आहे मात्र प्रत्यक्ष अशा प्रस्तावासंबधी अभिलेखे संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

6) शासन परिपत्रक पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 30/08/2010 नुसार 5% लोकवर्गणी समिती खात्यावर जमा केल्यानंतरच शासन पहिला हप्ता व उर्वरित 5% लोकवर्गणी भरल्यानंतर दुसरा हप्ता अनुज्ञेय असतांना लोकवर्गणी समिती खात्यावर भरल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.

7) सदर योजनेच्या 30% प्रथम अग्रीमासाठी प्रस्तावित टिपणी क्रमांक 31 वर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी नसतांना केलेले प्रदान अनियमित आहे.

8) सदर गावात जुनी व सुस्थितीत पाणी पुरवठा योजना कार्यान्वित असल्याचे संचिकेतील अभिलेख्यावरून निदर्शनास आले. तथापि प्रस्तावित योजना राबवितांना जुनी योजना विचारात घेतल्याचे दिसून येत नाही.

9) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग कमांक ग्रापाधो-1114/प्र.क्र.22/पापु-07, दिनांक-09/07/14 मधील मुद्दा क्रमांक 04 नुसार सदर योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक असतांना तसे तांत्रिक परीक्षण केलेले दिसून येत नाही.

10) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. Swich Room याउपांगात बाब क्रमांक 11 अन्वये 324.99 घन मीटर व Rising Main याउपांगात 1421.12 घन मीटर Rifilling trenches या बाबींची अशी एकूण 1746.11 घन मीटरची रूपये 70.67/- प्रति घन मीटर दराने रूपये 1,23,398/- रॉयल्टीची रक्कम वसूल करावी.

11) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.जिपर 2000/प्र.क्र.837/पंरा 8, दिनांक 13 फेब्रुवारी 2006 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापी शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही. त्यामुळे 1% विम्याची रक्कम रूपये 93,260/- वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

12) शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. बिसिए 2009 /प्र.क्र.108/कामगार 7-अ दिनांक 17/06/2010 नुसार देयकातून बांधकाम मूल्याच्या 1% कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक आहे. सदर योजनेच्या देयकातून रुपये 63,060/- कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक होते. तरी कामगार कल्याण उपकाराची रक्कम रूपये 63,060/- संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

13) सदर योजनेसाठी देण्यात आलेल्या एकूण तीन हप्त्यातून 2% कार्यकंत्राट कर रूपये 42,040/- कपात करण्यात आलेला नाही. तरी सदर रक्कम संबंधिताकडून वसूल करून करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

14) सदर योजनेसाठी देण्यात आलेल्या एकूण तीन हप्त्यातून आयकर अधिनियमाचे कलम 194 नुसार 2% आयकर कपात केलेला नाही. तरी आयकराची रक्कम रूपये 42,040/- संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

15) सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही. त्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी अदृश्य मोजमापे 100% व इतर मोजमापे 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह केल्याबाबत खात्री करता आली नाही.

**3.559 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत भगवती ता.सेनगाव नळ पाणी पुरवठा योजनेतील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत भगवती तालुका सेनगाव नळ पाणी पुरवठा योजनेकरिता रक्कम रूपये 29,88,405/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34, दिनांक 31/08/2009 नुसार कामाची निविदा “ब” वर्ग दैनिकात व साप्ताहिक मध्ये प्रसिध्द करणे आवश्यक असतांना सदर निर्देशाचे पालन झालेले नाही. त्यामुळे निविदेस व्यापक प्रसिध्दी न मिळून स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नाहीत. तसेच निविदा सूचनेत ठेकेदाराचा वर्ग नमूद केलेला नाही

2) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतून योजना प्रस्तावित करतांना शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 17/03/2010 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार (क्रमांक 19) मागील तीन वर्षात टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेल्या गावांना प्राधान्य देण्याचे निर्देश असतांना असा प्राधान्यक्रम दिल्याचे दिसून येत नाही.

3) कार्यकारी अभियंता पत्र दिनांक 01/06/2012 नुसार विहिरीचे खोदकाम 21 फुटापर्यंत झाले असून अद्यापही पाणी लागले नसल्याचे नमूद आहे. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 17/03/2010 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार उद्भव शाश्वत पूर्णपणे विकसित झाला असल्याची खात्री वरिष्ठ भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा यांनी व्यक्तिशः केल्या नंतरच उर्वरित योजनेच्या उपांगाची कामे हाती घ्यावयाची असतांना शाश्वत उद्भव नसतांना योजना राबविल्याचे दिसून येते.

4) Chief Bacteriologist, District Health Laboratory परभणी यांचे दिनांक 19/01/2013 चे अहवालानुसार पाणी पिण्यास योग्य नसल्याचे नमूद आहे असे असतांना योजना राबविण्यात आली आहे. त्यामुळे योजनेवरील खर्च निष्फळ ठरल्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) शासन परिपत्रक पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 30/08/2010 नुसार 5% लोकवर्गणी समिती खात्यावर जमा केल्यानंतरच शासन पहिला हप्ता व उर्वरित 5% लोकवर्गणी भरल्यानंतर दुसरा हप्ता अनुज्ञेय असतांना लोकवर्गणी समिती खात्यावर भरल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.

6) सदर गावात जुनी व सुस्थितीत पाणी पुरवठा योजना कार्यान्वित असल्याचे संचिकेतील अभिलेख्यावरून निदर्शनास आले. तथापि प्रस्तावित योजना राबवितांना जुनी योजना विचारात घेतल्याचे दिसून येत नाही.

7) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापाधो-1114/प्र.क्र.22/पापु-07, दिनांक 09/07/2014 मधील मुद्दा क्रमांक 04 नुसार सदर योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक असतांना तसे तांत्रिक परीक्षण केलेले दिसून येत नाही.

8) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. उदभव विहीर याउपांगात बाब क्रमांक 11 अन्वये 464.43 घन मीटर, Rising Main याउपांगात 525.28 घन मीटर व वितरण व्यवस्था याउपांगात 1505.85 घन मीटर Rifilling trenches या बाबींची अशी एकूण 2495.56 घन मीटरची रूपये 70.67/- प्रति घन मीटर दराने रूपये 1,76,361/- रॉयल्टीची रक्कम वसूल करून “853 गौण खनिज” या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

9) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.जिपर 2000/प्र.क्र.837/पंरा 8, दिनांक 13 फेब्रुवारी 2006 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापी शासकीय विमा

निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही. योजनेच्या प्रथम देयक रूपये 8,90,928/- मधून 1% विम्याची रक्कम रूपये 8,909/- वसूल केलेली नाही. ती वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

10) शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक बिसिए 2009 /प्र.क्र.108/कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार देयकातून बांधकाम मूल्याच्या 1% कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक आहे. सदर योजनेच्या प्रथम देयकातून रूपये 8,909/- कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक होते. तरी कामगार कल्याण उपकाराची रक्कम रूपये 8,909/- संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

11) सदर योजनेसाठी देण्यात आलेल्या एकूण चार हप्त्यापैकी दुसऱ्या हप्त्यातून 2.24% आयकर कपात केलेला आहे. आयकर अधिनियमाचे कलम 194 (जे) नुसार 20% आयकर कपात करणे आवश्यक आहे. तरी उर्वरित आयकराची रक्कम रूपये 5,77,724/- संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

### 3.560 भारत निर्माण कार्यक्रम अंतर्गत मौ.जाम (आंध) ता.सेनगाव नळ पाणी पुरवठा योजनेतील अनियमितता बाबत.

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर बाबत रक्कम रूपये 21,44,470/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेस प्रशासकीय मान्यता दिनांक 07/11/2006 रोजी व तांत्रिक मान्यता दिनांक 09/02/2007 रोजी देण्यात आली असतांना उपविभागीय अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली यांचे दिनांक 28/03/2011 चे अहवाला नुसार

(अ) अंदाजपत्रकानुसार विहिरीची खोली पूर्ण करण्यात आलेली नाही

(ब) पंप घराचे काम अद्याप सुरु नाही.

(क) विहिरीवर एकच पंप बसविला आहे.

(ड) उध्दरण नलीकेवर Air Valve बसविलेला नाही.

यावरून स्पष्ट होते की, सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यता मिळून साडेचार वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटूनही योजनेचे 50% पेक्षा कमी काम झालेले आहे. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झालेला नाही. तसेच सदर अहवालानुसार समितीस अद्यापपर्यंत रूपये 21,36,513/- एवढा निधी वितरीत केला असून समितीच्या बँक खात्यात फक्त रूपये 2,368/- शिल्लक असून कामाचे मुल्यांकन रूपये 13,51,832/- एवढे झाले आहे. म्हणजेच मुल्यांकनापेक्षा रूपये 7,87,049/- अतिरिक्त समिती खात्यातून उचल केली आहे. सदर बाब अतिशय गंभीर असून शासन निधीचा अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) सदर योजनेच्या उदभव विहिरीतील पाणी उपसणे या बाबीपोटी (बाब क्रमांक 08) 3140 BHP चे रूपये 19/- दराने रूपये 59,660/- एवढा खर्च नोंदवला आहे. संचिकेत संलग्न Log Book चे अवलोकन केले असता दिनांक 04/03/2007 ते 26/05/2013 या कालावधीत पाणी उपसणे बाबत आकडेवारी नमूद आहे. तथापि मोजमाप पुस्तिकेनुसार (पान क्रमांक 760023) उदभव विहिरीचे काम दिनांक 22/06/2007 रोजी पूर्ण झाले आहे. त्यामुळे दिनांक 13/01/2008 ते 26/05/2013 या कालावधीचे 1100 BHP चे रूपये 19/- दराने रूपये 20,900/- जादा प्रदान केले आहे. सदर रक्कम समितीकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) सदर योजना दिनांक 02/10/2013 ला ग्राम पंचायातीस हस्तांतरित केली आहे. तथापि हस्तांतरण पावतीवर सबमर्सिबल पंप किती अश्वशक्तीचे व कोणत्या कंपनीचे आहे याचा उल्लेख नाही. मोघम हस्तांतरण पावती केल्याचे यावरून दिसून येते.

4) शासन परिपत्रक पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 30/08/2010 नुसार 5% लोकवर्गणी समिती खात्यावर जमा केल्यानंतरच शासन पहिला हप्ता व उर्वरित 5% लोकवर्गणी भरल्यानंतर दुसरा हप्ता अनुज्ञेय असतांना लोकवर्गणी समिती खात्यावर भरल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.

5) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापाधो-1114/प्र.क्र.22/पापु-07, दिनांक 09/07/2014 मधील मुद्दा क्रमांक 04 नुसार सदर योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक असतांना तसे तांत्रिक परीक्षण केलेले दिसून येत नाही.

6) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. उदभव विहीर याउपांगात बाब क्रमांक 12 अन्वये 174.58 घनमीटर Rising Main याउपांगात 224.41 घन मीटर व वितरण व्यवस्था याउपांगात 1184.85 घन मीटर Rifilling trenches या बाबींची अशी एकूण 1583.84 घन मीटर ची रूपये 70.67/- प्रति घन मीटर दराने रूपये 1,11,930/- रॉयल्टीची रक्कम वसूल करून “853 गौण खनिज” या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

7) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक जिपर 2000/प्र.क्र.837/पंरा 8, दिनांक 13 फेब्रुवारी 2006 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापी शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही. योजनेचे अंतीम देयक वगळता इतर देयकातून 1% विम्याची रक्कम रूपये 20,005/- वसूल केलेली नाही, ती वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

8) शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक बिसिए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार देयकातून बांधकाम मूल्याच्या 1% कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक आहे. सदर योजनेचे अंतीम देयक वगळता इतर देयकातून 1% कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक होते. तरी कामगार कल्याण उपकाराची रक्कम रूपये 20,005/- संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

10) योजनेच्या अंतीम देयका व्यतिरिक्त इतर देयकातून 4% कार्यकंत्राट कर वसूल केलेला नाही. तरी कार्यकंत्राटकराची रक्कम रूपये 80,021/- संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

## 3.561 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत मौ.धार ता.औंढा (ना) नवीन नळ पाणी पुरवठा योजनेतील अनियमितताबाबत.

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर बाबत रक्कम रूपये 24,28,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर गावात सन 2002-2003 मध्ये किमान गरजा कार्यक्रम अंतर्गत पाणी पुरवठा योजना घेण्यात आली होती. तथापि उदभवास पाणी कमी असल्यामुळे सहाय्यक भूवैज्ञानिक यांनी नवीन उदभावावरून सदर योजना प्रस्तावित केली आहे. तथापि नवीन उदभवास पुरेसे पाणी उपलब्ध असल्याबाबत अभिलेखे संचिकेत निदर्शनास आले नाहीत. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतून योजना प्रस्तावित करतांना शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 17/03/2010 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार पुरेशा उदभवाशिवाय योजनेचे पुढील कामे प्रस्तवित न करण्याचे निर्देश आहेत. तथापि सदर निर्देशाचे पालन केलेले दिसून येत नाही. तसेच तांत्रिक माण्यतेतील अट क्रमांक 01 नुसार अस्तित्वात असलेल्या उपांगाचा वापर करणे बंधनकारक असतांना असा वापर केलेला दिसत नाही.

2) सदर योजनेच्या उदभव विहिरीतील पाणी उपसणे या बाबीपोटी 1200 BHP चे रूपये 60 दराने रूपये 72000 एवढा खर्च नोंदवला आहे. संचिकेत संलग्न Log Book चे अवलोकन केले असता दिनांक 10/07/2015 ते 30/07/2013 या कालावधीत पाणी उपसणे बाबत आकडेवारी नमूद आहे. तथापि मोजमाप पुस्तिकेत दिनांक 10/06/2015 रोजी सदर बाबीचे परिमाणे नोंदविले आहेत. त्यामुळे सदर खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. तरी सदर रक्कम रूपये 72,000/- समितीकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) शासन परिपत्रक पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 30/08/2010 नुसार 5% लोकवर्गणी समिती खात्यावर जमा केल्यानंतरच शासन पहिला हप्ता व उर्वरित 5% लोकवर्गणी भरल्यानंतर दुसरा हप्ता अनुज्ञेय असतांना लोकवर्गणी समिती खात्यावर भरल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.

4) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापाधो-1114/प्र.क्र.22/पापु-07, दिनांक 09/07/14 मधील मुद्दा क्रमांक 04 नुसार सदर योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक असतांना तसे तांत्रिक परीक्षण केलेले दिसून येत नाही.

5) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. उदभव विहीर याउपांगात बाब क्रमांक 13 अन्वये 709.96 घन मीटर Rifilling trenches या बाबींची रूपये 70.67/- प्रति घन मीटर दराने रूपये 50,173/- रॉयल्टीची रक्कम वसूल करून “853 गौण खनिज” या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

6) दुसरे धावते देयक/मोजमाप पुस्तिकेवर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. संबंधिताच्या स्वाक्षऱ्या नसतांना केलेली अदाई अनियमित आहे.

7) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी अदृश्य मोजमापे 100% व इतर मोजमापे 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. तथापि या नुसार कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

**3.562 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत मौ.सुकळीवीर ता.कळमनुरी ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेतील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रूपये 46,28,509/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेच्या ई-निविदा प्रसिध्दी व दर स्विकृती बाबत अभिलेखे लेखापरीक्षणाचेवेळी उपलब्ध झाले नाहीत.त्यामुळे निविदेस व्यापक प्रसिध्दी व स्पर्धात्मक दर प्राप्त झाले बाबत खात्री करता आली नाही.

2) सदर योजनेची काम करण्याची मुदत 24 महिने दिनांक 29/02/2016 पर्यंत होती. तथापि महाराष्ट्र विद्युत मंडळाकडून कोटेशन पावती न मिळाल्याच्या सबबी खाली दिनांक 31/08/2016 पर्यंत योजनेस मुदतवाढ देण्यात आली आहे. मुदतवाढीसाठी देण्यात आलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. विलंबाबाबत ठेकेदारावर बी-1 निविदेतील क्लॉज 02 नुसार दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक होते.

3) Chief Bacteriologist,District Health Laboratory परभणी यांचे पत्र क्रमांक 1650/2014, दिनांक 02/06/2014 चे अहवालानुसार पाणी पिण्यास योग्य नसल्याचे नमूद आहे असे असतांना योजना राबविण्यात आली आहे. त्यामुळे योजनेवरील खर्च निष्फळ ठरल्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतून योजना प्रस्तावित करतांना शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 17/03/2010 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार पुरेशा उदभावा शिवाय योजनेचे पुढील कामे प्रस्तावित न करण्याचे निर्देश आहेत. तथापि सदर निर्देशाचे पालन केलेले दिसून येत नाही.

5) शासन परिपत्रक पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक-30.08.2010 नुसार 5% लोकवर्गणी समिती खात्यावर जमा केल्यानंतरच शासन पहिला हप्ता व उर्वरित 5% लोकवर्गणी भरल्यानंतर दुसरा हप्ता अनुज्ञेय असतांना लोकवर्गणी समिती खात्यावर भरल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.

6) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापाधो-1114/प्र.क्र.22/पापु-07, दिनांक 09/07/2014 मधील मुद्दा क्रमांक 04 नुसार सदर योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक असतांना तसे तांत्रिक परीक्षण केलेले दिसून येत नाही.

7) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. उदभव विहीर याउपांगात बाब क्रमांक 11 अन्वये 280.14 घन मीटर Rising Main या उपांगात 949.46 घन मीटर व वितरण वाहिनी या उपांगात 719.36 घन मीटर अशी एकूण

1948.96 घन मीटर Rifilling trenches या बाबींची रूपये 70.67/- प्रति घन मीटर दराने रूपये 1,37,733/- रॉयल्टीची रक्कम वसूल करून “853 गौण खनिज” या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

8) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.जिपर 2000/प्र.क्र.837/पंरा 8 दिनांक-13 फेब्रुवारी 2006 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे तथापी शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही.योजनेचे अंतीम देयक वगळता इतर देयकातून 1% विम्याची रक्कम रूपये 42,051/- वसूल केलेली नाही ती वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

9) शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक बिसिए 2009 /प्र.क्र.108/कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार देयकातून बांधकाम मूल्याच्या 1% कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक आहे. सदर योजनेचे अंतीम देयक वगळता इतर देयकातून 1% कामगार कल्याण उपकर वसूल करणे आवश्यक होते. तरी कामगार कल्याण उपकाराची रक्कम रूपये 42,051/- संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

10) आयकर अधिनियमाचे कलम 194 नुसार देयकातून 2% आयकर कपात करणे आवश्यक होते. अंतीम देयक वगळता आयकराची रक्कम रूपये 84,102/- संबंधिताकडून वसूल केलेली नसल्यामुळे ती वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

11) योजनेच्या अंतीम देयका व्यतिरिक्त इतर देयकातून 4% कार्यकंत्राट कर वसूल केलेला नाही. तरी कार्यकंत्राटकराची रक्कम रूपये 1,68,204/- संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

12) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी अदृश्य मोजमापे 100% व इतर मोजमापे 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक आहे. तथापि या नुसार कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

**3.563 टंचाई अंतर्गत नळ योजना विशेष दुरुस्ती बरडशेवाला तालुका हदगांव कामातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** नैसर्गिक आपत्ती टंचाई अंतर्गत विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना मौजे बरडशेवाला येथील कामावर रूपये 4,25,003/- चा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीएं-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टीप 1 नुसार-विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्वीकारलेची माहिती पुढील स्थायी समिती व विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे. परंतु, अशी कार्यवाही केल्याचे ठराव संचिकेत नाही.

2) सदर कामाची संचिकेची तपासणी केली असता प्राप्त तीन निविदांपैकी बापू कन्स्ट्रक्शन, हदगांव यांचे सर्वात कमी दर असल्याने अंदाजपत्रकीय दराने दिनांक 11/07/2016 रोजी रक्कम रूपये 4,98,643/- च्या निविदेस मंजूरी दिलेली आहे. कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांचे कार्यारंभ आदेश दिनांक 15/07/2016 रोजीचे असतांना शाखा अभियंता व उपअभियंता उपविभाग, हदगांव यांनी दिनांक 22/06/2016 रोजी काम पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच सरपंच / सचिव ग्रामपंचायत, बरडशेवाला यांनी दिनांक 23/06/2016 पासून गावाला सुरळीत पाणीपुरवठा होत असल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. यावरून निविदा मंजूरी व कार्यारंभ आदेश मिळण्यापूर्वीच कामच झालेले नसतांना कामपूर्ण होवून पाणी पुरवठा सुरळीत चालू असल्याचे खोटे प्रमाणपत्र सादर करुन देयक सादर केलेली असतांना विभागातील तांत्रिक शाखा व लेखा शाखेने देयक तपासणी न करता कसे पारित केले, याबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3) संचिकेची तपासणी केली असता नळयोजना विशेष दुरुस्तीसाठी अंदाजपत्रकासोबतचे उपभियंता यांचे विवरण पत्र-1, तालुका समिती व सहाय्यक भुवैधानिक यांचे प्रपत्र “ब” नुसार विहीर खोलीकरण, पाईप लाईन बदलणे व चार आडवे बोअर करनेची शिफारस केलेली आहे. मूळ अंदाजपत्रक व प्रपत्र “ब“ नुसार विहिरीची खोली 11 मीटर

पर्यंत आहे. त्यापुढे 5 मीटरने खोली वाढवीने व 4 आड्वे बोअर घेणे प्रस्तावित केलेले आहे. परंतु, प्रत्यक्ष काम करतांना lift 7 ते 9 मी.गाळ काढणेचे मूल्यांकन नोंदवून रक्कम रूपये 24,210/- प्रदान केलेले आहे. विहिर खोली करण व चार आडवे बोअरची काम केलेले नसतांना टंचाई अंतर्गत पाणी पुरवठा कसे करण्यात आले. महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळ यांचे परिपत्रक क्रमांक पापु-2/तांशा-2/350-अ/2016, दिनांक 07/10/1995 नुसार ग्रामीण नळ योजनांच्या बाबतीत भूजल विकास व सर्वेक्षण यंत्रणेने सुचविलेल्या खोलीपेक्षा कमी खोलीवर अधिक पाणी लागले, तर अशा विहिरींच्याबाबतीत भूजल विकास व सर्वेक्षण यंत्रणेचा पुन्हा सल्ला घेवूनच पुढील काम करणेबाबतचे अथवा बंद करणेबाबतचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. तसेच सदरील परिपत्रकाचे उल्लंघन झाल्यांस संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी, असे स्पष्ट निर्देश आहेत. परंतु, विभागाने भूजल विकास व सर्वेक्षण यंत्रणेचे जादा पाणी लागलेबाबतचे व विहिरीचे पुढील काम बंद करणेबाबतचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. विभागाने प्रमाणपत्र न घेता विहिर खोलीकरणाचे व चार आडवे बोअर न घेण्याचे काम कोणाच्या निर्देशांन्वये केले नाही. याबाबत खुलासा करावा.

4) सहाय्यक भुवैधानिक, जिल्हा परिषद, नांदेड यांचे प्रपत्र “ब" व पाणी उपलब्धतेचा गोषवारानुसार नळ पाणी पुरवठा योंजनेचे विद्युत पंप चालू असून 10,000 lit पाणी उपलब्ध होत असल्याचे अहवालावरुन दिसून येते. नळ योजनेचे अस्तित्वातील विद्युतपंप चालू असतांना बाब क्रमांक 13 नुसार 3hp सिंगल फेजचे 2 पंप दर रूपये 28,902/- एकूण रूपये 57,804/- बाब क्रमांक 14 नुसार 10bhp 8 स्टेज 1 नग रूपये 44,351/- व पॅनल बोर्ड रूपये 20,074/- असे एकूण रक्कम रूपये 1,22,229/- चा अनावश्यक खर्च केलेला आहे. नळ योजनेचे विद्युतपंप चालू असतांना पुन्हा 3 विद्युतपंपची आवश्यकता का भासली, याबाबत तांत्रिक शाखेची टिप्पणी व कोणतेही कारणमिमांसा दिलेले नाही. तसेच मोजमाप पुस्तिकेत खरेदी केलेल्या पंपाचे सीरियल नंबर, वारंटी कार्ड नसल्यामुले अनावश्यक खर्च नोंदविल्याचे स्पष्ट होते.

5) अंदाजपत्रकातील रायझिंग मेन कामात बाब क्रमांक 1 व 2 नुसार 390 मीटर 110mm पिव्हिसी पाईप व 114 मीटर 100mm dia GI पाईप असे एकूण 504 मीटर नवीन पाईप पुरवठा केलेली असून बाब क्रमांक 5 नुसार 390 मीटर पिव्हिसी व 114 मीटर लोखंडी GI पाईपसाठी खोदकाम करून एकूण 504 मीटर नवीन पाईप लाईन अंथरून बसविलेली आहे. परंतु, 114 मीटर लोखंडी GI पाईप नाला क्रॉसिंग अथवा रोड क्रासिंगसाठी वापरले याबाबत कोणतेही तांत्रिक टिप्पणी नमूद नाही. त्यामुळे लोखंडी GI पाईची आवश्यकता नसतांना पुरवठा करुन बसविल्याचे मोजमाप मूल्यांकन नोंद्विल्याचे दिसून येते. परंतु, पिव्हिसी पाईप व लोखंडी GI पाईप पुरवठ्यावर एकूण 1,60,518/- चा खर्च केलेला आहे. जर पूर्ण 504 मीटर पाईपलाईनसाठी पिव्हिसी पाईप वापरले असते, तर 504 मी. x दर रूपये 180.40 प्रमाणे रूपये 90,921/- चा खर्च झाला असता अनावश्यक लोखंडी GI पाईप पुरवठा केल्यामुले रक्कम रूपये 69,597/- जादा खर्च झालेला आहे.

6) सदरील कामामध्ये 40mm व्यासाचे 7 एअर वॉल्व दर प्रती नग रूपये 1,228/- दर्शवून प्रदान केलेले आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापू-1093/सीआर-625/39-A, दिनांक 25/01/1994 नुसार 80 ते 150 mm व्यासाच्या पाईपसाठी 25mm व्यासाचा एअर वॉल्व आवश्यक आहे. सदरील पाईपलाईन 110mm व्यासाची असल्यामुळे 25mm व्यासाचे एअर वॉल्व आवश्यक असताना 40mm व्यासाचे एअर वॉल्व बसविलेले आहेत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

7) सदरील कामामध्ये बाब क्रमांक 14- एअर वॉल्व शाफ्ट बसविणे 7 नग प्रती दर रूपये 4,636/- दर्शवून रक्कम रूपये 32,452/- चे प्रदान केलेले आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापू-1093/सीआर-625/39-A, दिनांक 25/01/1994 नुसार 80mm व 100mm व्यासाचेच एअर वॉल्व हे एअर शाफ्ट करून बसवायचे आहेत. त्याखालील व्यासाचे एअर वॉल्व हे Saddle Pieces द्वारे बसवायचे आहेत. सदरील कामात 40mm व्यासाचे एअर वॉल्व असल्याने एअर वॉल्व शाफ्टची आवश्यकता नाही. तसेच ते Saddle Pieces द्वारे (बाब क्रमांक 12) बसविलेले आहेत. एअर वॉल्व शाफ्टची आवशकता नसताना निष्कारण खर्च केलेला आहे. सबब निष्कारण खर्चाची रक्कम रूपये 32,452/- वसूल करून ती शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

8) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापू-1098/प्र.क्रं.245/पापु-7, दिनांक 11/01/1999 मधिल सूचना क्रमांक 22 नुसार नळ योजनेची दाब नलिका व गुरुत्ववाहिनी विश्वासार्ह रितीने काम करण्यासाठी एअर वॉल्वची आवशकता आहे. त्यासाठी पाईपलाईनच्या प्रत्येकी 500 मीटर अंतराला 1 एअर वॉल्वची आवशकता असते. सदरील कामात पाईपलाईनचे काम 504 मिटर आहे. तेंव्हा 1 नग एअर वॉल्व बसविणेची आवशकता होती. परंतु, मूल्यांकनात 7 नग एअर वॉल्व बसविलेले आहेत. त्यामुळे जादा 6 नग एअर वॉल्व पुरवठा 6 x दर रूपये 1,228/- प्रमाणे रूपये 7,368/- व बसविणेचे 6 x दर रूपये 213/- प्रमाणे रूपये 1,278/- असे एकूण रूपये 8,646/- जादा प्रदान रक्कम सबंधितांकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

9) सदरील पाणीपुरवठा योजनेसाठी GI पाईप 114 मीटर दर रूपये 790.90 रूपये 90162/- व पीव्हीसी पाईप पुरवठा 390 मीटर दर्शवून रूपये 180.40 या दराने रूपये 70,356/- असे एकूण रूपये 1,60,518/- चे प्रदान केलेले आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापू-1093/सीआर-625/39-A, दिनांक 25/01/1994 व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सी.एस.आर.) मधील सर्वसाधारण नोटीस क्रमांक19 नुसार हायड्रोलिक टेस्टसाठी (जलदाब चाचणी) 10 टक्के रक्कम राखून ठेवून 90 टक्के रक्कम प्रदान करावयास पाहिजे. (excavation, bedding, laying, chamber, valves, cost of pipe या रकमेच्या 10 टक्के रक्कम) हायड्रोलिक टेस्ट (जलदाब चाचणी) झाल्यानंतरच देयकाची 10 टक्के रक्कम देण्यात यावी. परंतु, हायड्रोलिक टेस्ट (जलदाब चाचणी) न घेता सदरील बाबींचे 100 टक्के दराने नियमबाह्य प्रदान केलेले आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

10) अंदाजपत्रकाची तपासणी केली असता प्यानल बोर्ड बसविणेसाठी रूपये 20,074/- दर दर्शविलेला आहे. परंतु, सदरील बाबीचा दर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सीएसआर मध्ये नमूद नाही. तसेच सदरील बाबीचे दर पृथःकरण अंदाजपत्रकासोबत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 105 (ब) नुसार ज्या बाबीसाठी डीएसआरमध्ये दर नमूद नाहीत, त्याबाबतीत दर पृथःकरण करून त्यास स्थाई समितीची मान्यता घेणे आवशक आहे. परंतु, अशी मान्यता घेतलेली नाही. मान्यता न घेता केलेले प्रदान हे नियमबाह्य आहे.

11) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापू-1098/प्र.क्रं.245/पापु-7, दिनांक 11/01/1999 मधिल सूचना क्रमांक 10 (अ:) नुसार नळ योजनेच्या जागेवर योग्य त्या ठिकाणी कामाचा तपशिल निर्देशिनारा फलक लावण्यात येवून सदरील बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना अंदाजपत्रकात माहिती दर्शक फलकाची तरतुद केलेली नसून मोजमाप पुस्तिकेवरूनसुध्दा माहिती दर्शक फलक बसविलेचे दिसून आले नाही.

12) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापू-1098/प्र.क्रं.245/पापु-7, दिनांक 11/01/1999 मधिल सूचना क्रमांक 28 नुसार विहीर/बोअरला पाणी लागताच ते पिण्यायोग्य आहे किंवा नाही, याची आरोग्य प्रयोगशाळेकडून चाचणी घेण्यात यावी. तसेच प्रकल्पित लोकसंख्येस पुरेल इतके पाणी उपलब्ध असल्याचे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने प्रमाणित केल्यानंतरच योजनेच्या अन्य उपांगाची कामे करावीत, असे स्पष्ट निर्देश असताना अशाप्रकारची कार्यवाही झालेली नाही.

13) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 168 अन्वये कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, कार्यकारी अभियंता यांनी अशी कामाची तपासणी केलेली नाही.

**3.564 टंचाई अंतर्गत विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना विशेष दुरुस्ती मौजे सकनुर तालुका मुखेडच्या कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** नैसर्गिक आपत्ती टंचाई अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना विशेष दुरुस्ती मौजे सकनुर तालुका मुखेड येथील कामावर रूपये 2,82,484/- चा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीएं-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टीप 1 नुसार-विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्विकारलेची माहिती पुढील स्थायी समिती व विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे. परंतु, अशी कार्यवाही केलेली नाही.

2) सदर कामाची तपासणी केली असता सहाय्यक भुवैधानिक यांचे प्रपत्र “ब” नुसार केलेल्या शिफारसीनुसार मूळ अंदाजपत्रक व शेड्यूल “ब” नुसार पम्पिंग मशिनरी, पाईप लाईन व विहिरीचे खोली 7.50 मीटरच्या पुढे 8 मीटरने वाढविणे प्रस्तावित असून त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. परंतु, मूळ अंदाजपत्रक व शेड्यूल “ब” नुसार काम न करता कामात बदल करुन पाईप लाईनचे काम जादा व विहिर खोलीकरणाचे काम कमी केलेले आहे. कामात झालेल्या बदलाबाबत कोणतेही कारणमिमांसा न देता कामपूर्ण केल्यानंतर कार्यकारी अभियंता यांनी Working estimate ला मंजूरी देवून नियमबाह्य देयक प्रदान केलेली आहे.

पाईप लाईनचे काम मूळ अंदाजपत्रकापेक्षा रक्कम रूपये 60,545/- जादाचे केले व विहीर खोदकाम रूपये 1,02,276/- ने कमी काम केलेले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118 (1) नुसार कार्यकारी अभियंता यांचे पूर्व मंजूरीशिवाय जादा/कमी खर्च लागेल असा कोणताही बदल करता येत नाही. तसेच लेखा संहिता नियम 153 (1) अन्वये अंदाजपत्रकाप्रमाणे कामपूर्ण करून घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता व कामावरील संबंधित अभियंता यांची आहे. परंतु, सदरील काम अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण केलेले नाही. त्यामुळे कामाची गुणवत्ता राहीली नाही.

3) सदर कामाची तपासणी केली असता बाब क्रमांक 1 नुसार 90mm 6kg pvc जुनी पाईप लाईन 540 rmt dismentling केलेले आहे. dismentling केलेल्या जुन्या पाईप लाईनमधून निघालेल्या पाईपापैकी 50 टक्के जूने पाईप 270 rmt दुरुस्ती कामावर वापरणे आवश्यक असतांना 540 rmt pvc नवीन पाईप कामावर वापर केलेले आहे. dismentling मधून निघालेल्या वापरण्यायोग्य पाईपाचे कोणतेही तपशिल अथवा कारणमिमांसा न देता 270 rmt pvc पाईप कामावर जादा वापरलेले आहे. यावरून चुकीचे अंदाजपत्रक केल्यामुले 270 rmt पाईपाचे दर 130.90 प्रमाणे रक्कम रूपये 35,343/-चा कंत्राटदारास जादा प्रदान झालेले आहे.

4) मोजमाप पुस्तिका व अंदाजपत्रकाची तपासणी केली असता 90mm 6kg pvc पाईप dismentling चे दर रूपये 70/- असतांना 540rmt pvc पाईप लाईन dismentling चे दर रूपये 80/- प्रमाणे प्रदान केल्यामुळे 540 rmt चे रूपये 10/- प्रमाणे रूपये 5,400/- जादा प्रदान झालेले आहे. सदर रक्कम वसूल करुण शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

5) अंदाजपत्रकाची तपासणी केली असता प्यानल बोर्ड बसविणेसाठी रूपये 11,003/- दर दर्शविलेला आहे. परंतु, सदरील बाबीचा दर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सीएसआरमध्ये नमूद नाही. तसेच सदरील बाबीचे दर पृथःकरण अंदाजपत्रकासोबत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 105 (ब) नुसार ज्या बाबीसाठी डीएसआरमध्ये दर नमूद नाहीत. त्याबाबतीत दर पृथःकरण करून त्यास स्थाई समितीची मान्यता घेणे आवशक आहे. परंतु, अशी मान्यता घेतलेली नाही. मान्यता न घेता केलेले प्रदान हे नियमबाह्य आहे.

6) सदरील पाणीपुरवठा योजनेसाठी पीव्हीसी पाईप (90mm 6kg) 540 मीटर पुरवठा दर्शवून रूपये 130.59 या दराने रूपये 69,978/- चे प्रदान केलेले आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापू-1093 /सीआर-625/39-A, दिनांक 25/01/1994 व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सी.एस.आर.) मधील सर्वसाधारण नोटीस क्रमांक 19 नुसार हायड्रोलिक टेस्टसाठी (जलदाब चाचणी) 10टक्के रक्कम राखून ठेवून 90 टक्के रक्कम प्रदान करावयास पाहिजे. परंतु, (excavation, bedding, laying, chamber, valves, cost of pipe या रकमेच्या 10 टक्के रक्कम) हायड्रोलिक टेस्ट (जलदाब) चाचणी न घेता सदरील बाबींचे 100 टक्के दराने नियमबाहय प्रदान केलेले आहे. याबाबत संबधित तांत्रिक अधिकारी / कर्मचारी यांचा खुलासा घेणे आवश्यक आहे.

7) सदरील कामाचे बाब क्रमांक 6 मध्ये विहिरीचे पाणी उपसणे या बाबीचे परिमाण 300 बीएचपीचे रूपये 60/- रुपये दराने रूपये 18,000/- चे प्रदान केलेले आहे. परंतु, संचिकेची तपासणी केली असता पाणी उपसणेबाबतचे लॉग बुक संचिका संलग्न नाही. तसेच महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळ यांचे परिपत्रक क्रमांक पापु-2/

तांशा-2/ 350-अ/2016, दिनांक 07/10/1995 नुसार विहिरीतील गाळ काढून व खोदकाम करून 300 बीएचपी पाणी उपसण्या योग्य लागल्याचे भूजल विकास व सर्वेक्षण यंत्रणेचे प्रमाणपत्र नाही. त्यामुले नोंदविलेल्या खर्चाची सत्यता पटत नाही.

8) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापू-1098/प्र.क्रं.211/पापु-7, दिनांक 14/12/1998 तसेच महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापू-1098/ प्र.क्रं.245/ पापु-7, दिनांक 11/01/1999 मधील सूचना क्रमांक 29 नुसार जिल्हयातील प्रत्येक पूर्ण झालेल्या नळ योजनांची / दुरुस्तीच्या कामांची एक स्वतंत्र इतिहास पुस्तिका (हिस्ट्रीशीट) परिशिष्ट-17 च्या नमुन्यात ठेवण्यात येवून त्यात नोंदी घेणे आवशक आहे. परंतु, अशी इतिहास पुस्तिका (हिस्ट्रीशीट) ठेवण्यात आलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापू-1098/प्र.क्रं.245/पापु-7, दिनांक 11/01/1999 मधिल सूचना क्रमांक 10 (अ) नुसार नळ योजनेच्या जागेवर योग्य त्या ठिकाणी कामाचा तपशिल निर्देशनास फलक लावण्यात येवून सदरील बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना अंदाजपत्रकात माहिती दर्शक फलकाची तरतुद केलेली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 168 अन्वये कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, कार्यकारी अभियंता यांनी अशी कामाची तपासणी केलेली नाही.

**3.565 टंचाई अंतर्गत विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना मेथी तालुका मुखेडच्या कामातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** नैसर्गिक आपत्ती टंचाई अंतर्गत विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना मौजे मेथी येथील कामावर रूपये 2,90,893/- चा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीएं-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टीप 1 नुसार-विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्वीकारलेची माहिती पुढील स्थायी समिती व विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे. परंतु, अशी कार्यवाही केल्याचे ठराव संचिकेत नाही.

2) संचिकेची तपासणी केली असता टंचाई अंतर्गत तालुका समिती तहसिलदार, गटविकास अधिकारी, उपभियंता व उपविभागीय अधिकारी (महसूल) यांचे स्थळ निरिक्षण अहवालानुसार उपविभागीय अधिकारी (महसूल) यांनी उर्वरित टंचाई कालावधीसाठी नळयोजना विशेष दुरुस्ती या उपाय योजना एवजी अधिग्रहण / टँकर कमी खर्चाची उपाययोजना योग्य आहे, असे अहवालात स्पष्ट नमूद केलेले आहे. परंतु, टंचाई कालावधीत कमी खर्चाची उपाय योजना करणे आवश्यक असतांना विभागाने नळयोजना विशेष दुरुस्तीवर खर्च करण्याचे प्रयोजन काय?

3) सदर कामाची अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता पाईप लाईनचे काम करतांना बाब क्रमांक 1 व 2 नुसार लोखंडी GI pipe खरेदी 12rmt व पिव्हिसी पाईप खरेदी 750rmt असे एकूण 762rmt पाईप खरेदीवर रक्कम रूपये 73,083/- चा खर्च नोंदविलेला आहे. परंतु, बाब क्रमांक 3 नुसार 750 rmt पिव्हिसी पाईपचेच खोदकाम व बुजविनेचे काम केलेले आहे. त्यामुळे लोखंडी GI pipe 12rmt दर रूपये 384/- एकूण रूपये 4,608/- ची आवश्यकता नसतांना खरेदीवर केलेला खर्च रक्कम रूपये 4,608/- वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, राजपत्र विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुबंई अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार उक्त अधिसुचनेच्या अनुसूची 1 स्तंभ (3) मध्ये विक्रीकर चार टक्के ऐवजी 5 टक्के केलेले असुन सदर कामाच्या देयकातुन 5 टक्के प्रमाणे रूपये 14,544/- कपात करून शासन खाती भरणा करणे आवश्यक असताना कपात करून भरणा केलेली नाही. त्यामुळे रूपये 14,544/- संबधीताकडून वसुल करून शासन खाती भरणा करावी व अनुपालन दर्शवावे.

5) आयकर अधिनियम 1961 चे नियम 194 (c) नुसार देयकातुन 2 टक्के रक्कम रूपये 6,807/- कपात करून शासन खाती भरणा करणे आवश्यक असताना कपात करून भरणा केलेली नाही. त्यामुळे रूपये 6,807/- संबधीताकडून वसुल करून शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

6) सदरील पाणीपुरवठा योजनेसाठी पीव्हीसी पाईप पुरवठा 750 मीटर दर्शवून रूपये 91.30/- या दराने रूपये 68,475/- चे प्रदान केलेले आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापू-1093/ सीआर-625/39-A, दिनांक 25/01/1994 व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सी.एस.आर.) मधील सर्वसाधारण नोटीस क्रमांक 19 नुसार हायड्रोलिक टेस्टसाठी (जलदाब चाचणी) 10 टक्के रक्कम राखून ठेवून 90 टक्के रक्कम प्रदान करावयास पाहिजे. (excavation, bedding, laying, chamber, valves, cost of pipe या रकमेच्या 10 टक्के रक्कम) हायड्रोलिक टेस्ट (जलदाब चाचणी) झाल्यानंतरच देयकाची 10टक्के रक्कम देण्यात यावी. परंतु, हायड्रोलिक टेस्ट (जलदाब चाचणी) न घेता सदरील बाबींचे 100 टक्के दराने नियमबाह्य प्रदान केलेले आहे.

7) अंदाजपत्रकाची तपासणी केली असता प्यानल बोर्ड बसविणेसाठी रूपये 11,979/- दर दर्शविलेला आहे. परंतु, सदरील बाबीचा दर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सीएसआरमध्ये नमूद नाही. तसेच सदरील बाबीचे दर पृथःकरण अंदाजपत्रकासोबत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 105 (ब) नुसार ज्या बाबीसाठी डीएसआर मध्ये दर नमूद नाहीत. त्याबाबतीत दर पृथःकरण करून त्यास स्थाई समितीची मान्यता घेणे आवशक आहे. परंतु, अशी मान्यता घेतलेली नाही. मान्यता न घेता केलेले प्रदान हे नियमबाह्य आहे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 168 अन्वये कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्या मध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, कार्यकारी अभियंता यांनी अशी कामाची तपासणी केलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापू-1098/प्र.क्रं.211/पापु-7, दिनांक 14/12/1998 तसेच महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापू-1098/ प्र.क्रं.245 / पापु-7, दिनांक 11/01/1999 मधिल सूचना क्रमांक 29 नुसार जिल्हयातील प्रत्येक पूर्ण झालेल्या नळ योजनांची / दुरुस्तीच्या कामांची एक स्वतंत्र इतिहास पुस्तिका(हिस्ट्रीशीट) परिशिष्ट-17 च्या नमुन्यात ठेवण्यात येवून त्यात नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु, अशी इतिहास पुस्तिका (हिस्ट्रीशीट) ठेवण्यात आलेली नाही.

10) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापू-1098/प्र.क्रं.245/पापु-7, दिनांक 11/01/1999 मधील सूचना क्रमांक 10 (अः) नुसार नळ योजनेच्या जागेवर योग्य त्या ठिकाणी कामाचा तपशिल दर्शविणारा फलक लावण्यात येवून सदरील बाबीचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना अंदाजपत्रकात माहिती दर्शक फलकाची तरतुद केलेली नसून मोजमाप पुस्तिकेवरूनसुध्दा माहिती दर्शक फलक बसविलेचे दिसून आले नाही.

### 3.566 टंचाई अंतर्गत विशेष दुरुस्ती नळपाणीपुरवठा योजना भगनुरवाड़ी तालुका मुखेडच्या कामातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत.

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** नैसर्गिक आपत्ती टंचाई अंतर्गत विशेष दुरुस्ती नळ पाणीपुरवठा योजना मौजे भगनुरवाड़ी येथील कामावर रूपये 2,99,792/- चा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीएं-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टीप 1 नुसार-विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्वीकारलेची माहिती पुढील स्थायी समिती व विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे. परंतु, अशी कार्यवाही केल्याचे ठराव संचिकेत नाही.

2) सदर कामाची संचिकेचीतील कनिष्ठ / सहाय्यक भुवैधानिक, जिल्हा परिषद, नांदेड यांचे प्रपत्र “ब” नुसार सादर केलेल्या अहवालानुसार विहिरीचे अस्तित्वातील खोली 9 मीटर असून सदर विहिरीत भेगायुक्त खडक असल्याने गाळ काढने व त्यापुढे 4 मीटरने खोलीकरण करने व पाईप लाईनचे काम करणेची शिफारशी केलेली आहे. सहाय्यक

भुवैधानिक यांनी केलेल्या शिफारशी नुसार अंदाजपत्रक तयार करुन काम करने आवश्यक असतांना संचिकेत मूळ अंदाजपत्रक नसून झेराक्स प्रत अंदाजपत्रकावर व्हाइटनर लावून खाडाखोड करुन विहिर खोलीकरणाचे काम न करता फक्त पाईप लाईनचे काम केलेले आहे. यावरून झेराक्स प्रत व चुकीचे अंदाजपत्रक नुसार प्रस्तावित केलेले विहीर खोलीकरणाचे काम न करता पाईप लाईनचेच काम केल्यामुळे टंचाई कालावधीत पाणीपुरवठा झाले नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे केलेला सर्व खर्च निष्फळ झाल्याचे दिसून येते.

3) सदर कामाची अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता 1,400 मीटर डेड पाईप लाईन काढने (विहीर ते पाण्याची टाकीपर्यंत 1,000 मी व वितरण व्यवस्था 400 मी dismentling) ची काम केलेले आहे. परंतु, बाब क्रमांक 1 नुसार कामासाठी 90mm 6kg चे 900 मी व 4kg चे 300 मी. असे एकूण 1,200 मिटर नवीन पिव्हिसी पाईप पुरवठा केलेले आहे. dismentling केलेल्या जुन्या पाईप लाईनमधून निघालेल्या पाईपापैकी 50 टक्के जूने पाईप म्हणजेच 90mm 6kg चे 500 मी व 90mm 4kg चे 200 मी असे एकूण 700 मी. दुरुस्ती कामावर वापरणे आवश्यक असतांना 1,200 मी. नवीन पिव्हिसी पाईप कामावर वापर केलेले आहे. dismentling मधून निघालेल्या वापरण्यायोग्य पाईपाचे कोणतेही तपशिल अथवा कारणमिमांसा न देता एकूण 500 मीटर पिव्हिसी पाईप कामावर जादा वापरलेले आहे. यावरून चुकीचे अंदाजपत्रक केल्यामुले जादा 500 मी पाईपावर एकूण रक्कम रूपये 61,390/- चा कंत्राटदारास जादा प्रदान झालेले आहे.

4) मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता स्लूस व्हाल्व, रिफ्लुक्स व्हाल्व व एयर व्हाल्व पुरवठा केल्याचे मोजमाप मूल्यांकन नोंदविलेले आहे. परंतु, पुरवठा केलेल्या व्हाल्व बसविणे (lowring) चे मूल्यांकन मोजमाप पुस्तिकेत नाही. त्यामुळे पुरवठा केलेले साहित्य कामावर वापरले नाही. याबाबत जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करावी व रक्कम रूपये 30,367/- वसूल करुन शासन खाती भरणा करावी.

5) महाराष्ट्र शासन राजपत्र विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य मुबंई अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार उक्त अधिसुचनेच्या अनुसूची 1 स्तंभ (3) मध्ये विक्रीकर चार टक्के ऐवजी 5 टक्के केलेले असुन सदर कामाच्या देयकातुन 5 टक्के प्रमाणे रूपये 14,989/- कपात करून शासन खाती भरणा करणे आवश्यक असताना कपात करून भरणा केलेली नाही. त्यामुळे रूपये 14,989/- संबधीताकडून वसुल करून शासन खाती भरणा करावी व अनुपालन दर्शवावे.

6) आयकर अधिनियम 1961 चे नियम 194 (c) नुसार देयकातुन 2 टक्के रक्कम रूपये 7,015/- आयकर कपात करून शासन खाती भरणा करणे आवश्यक असताना आयकर कपात करून भरणा केलेली नाही. त्यामुळे रूपये 7,015/- संबधीताकडून वसुल करून शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 168 अन्वये कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्या मध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, कार्यकारी अभियंता यांनी अशी कामाची तपासणी केलेली नाही.

**3.567 कंत्राटी अभियन्ता मानधन व भत्तेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वार्षिक कृती आराखडा तयार करुन प्रशासकीय खर्चाच्या रक्कमेची तरतूद केलेली नसतांना नियमबाह्य सुपरव्हिजन चार्जेसमधून कंत्राटी मानधन व भत्ते प्रदान केलेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 40) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेडचे सन 2016-2017 या कालावधीचे लेखापरीक्षणात कंत्राटी अभियंता मानधन व भत्तेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वार्षिक कृती आराखडा तयार करून 4 टक्के प्रशासकीय खर्चाच्या रक्कमेची तरतूद केलेली नसतांना 2 व 5 टक्के निधीतुन रक्कम रूपये 17,75,132/- शासन नियमाचे पालन न करता नियमबाह्य कंत्राटी अभियंता मानधन व भत्ते प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) फेब्रुवारी 2015 अन्वये जिल्हा परिषदेकडील ग्रामीण पाणी पुरवठा योजनाची प्राकलने व आराखड़े तयार करण्यासाठी असलेल्या 2 टक्के निधीची योजनेच्या प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सल्यासाठी असलेल्या 5 टक्के निधीची व प्रशासकीय खर्चासाठी असलेल्या 2 टक्के निधीची तरतूद या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहे.

या बाबीद्वारे जिल्हा परिषदेकड़े शिल्लक असलेला संपूर्ण निधी हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत पाणी पुरवठा योजनाच्या अमलबजावणीसाठी वापरण्यात यावा. शिल्लक असलेल्या निधीचा खर्च अन्य कोणत्याही बाबीसाठी देय राहणार नाही, असे स्पष्ट केलेले असतांना व कंत्राटी अभियंता मानधन व भत्तेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वार्षिक कृती आराखडा तयार करुन प्रशासकीय खर्चाच्या रक्कमेची तरतूद केलेली नसतांना शासन नियमाचे पालन न करता 2 टक्के व 5 टक्के सुपव्हीजन चार्जेसमधून खर्च केलेला आहे. तरतुदीशिवाय केलेला खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. याबाबत संबधित जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचेवर कार्यवाही करावी व रक्कम रूपये 17,75,132/- वसूल करुन संबंधित खाते भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 37(1) अन्वये परिषदेच्या करण्यात आलेली प्रत्येक मागणीचे पैसे चुकते करण्यापुर्वी वित्त विभागात तपासण्यात येईल. वित्त विभागात अशी तपासणी न केल्यामुळे नियमबाह्य प्रदान झालेली आहे.

**3.568 ग्रामीण पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती योजनेंतर्गत सिमेंट काँक्रीट स्लैटेड पाईप गॅलरी व पाण्याची क्षमता वाढवीने मौजे अलुर/नेरली येथील एकाच कामाचे दोनवेळेस एकसारखे मूल्यांकन नोंदवून प्रदान केलेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 43) -** ग्रामिण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेडचे सन 2016-2017 या कालावधीचे लेखापरीक्षणास उपविभाग उमरी अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती योजनेंतर्गत सिमेंट काँक्रीट स्लैटेड पाईप गॅलरी करुन पाण्याची क्षमता वाढवीने मौजे अलुर/नेरली तालुका धर्माबाद कामाची तपासणी केली असता एकाच कामाचे दोन भाग करुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांची प्रशासकीय मान्यता न घेता नियमबाह्य कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांचे स्तरावर मंजूरी घेवुन उपविभाग स्तरावर एकाच कामाचे सारखे मूल्यांकन नोंदवून रक्कम रुपये 5,94,983/- प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामीण पाणी पुरवठा देखभाल-दुरुस्ती निधी अंतर्गत कामाचे सनियंत्रण व प्रशासकीय मान्यता देणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात असतांना कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) जिल्हा परिषद, नांदेड यांनी प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक 31 व 28 दिनांक 04/10/2016 अन्वये वरील दोन कामास सहयोग कन्ट्रकशन, नांदेड यांना रूपये 2.99 लक्ष मर्यादेत कामाचे विभाजन करुन आपल्या अधिकारात नसतांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-1093/प्र.क्र.1516 (भाग-1)/33, दिनांक 27/04/2000 अन्वये कोणत्याही परिस्थितीत कामाचे विभाजन करण्यात येऊ नये, संबधीत सक्षम अधिकाऱ्यांनी बांधकामाला तांत्रिक मान्यता देतेवेळी व तसेच निविदा मागविण्यापुर्वी कामाची विभागणी केलेली नाही. याची तपासणी करावी. कामाची विभागणी शासनाची पूर्व अनुमती न घेता केली असल्याचे आढळल्यास त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा, असे स्पष्ट केलेले आहे. केवळ ई-निविदा टाळन्यासाठी कामाचे तुकडे पाडून दिलेली मान्यता शासन नियमाचे विसंगत व नियमबाह्य आहे.

2) उपरोक्त आरसीसी स्लैटेड पाईप ग्यालरी व पाण्याची क्षमता वाढवीने मौजे अलुर/नेरली येथील कामाचे शासन नियमानुसार विहित केलेल्या वर्तमान पत्रात निविदा सूचना व व्यापक प्रसिद्धी न देता सहयोग कन्ट्रकशन, नांदेड यांना मंजूर केली आहे. मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता मोजमाप पुस्तक क्रमांक 239 पृष्ठ क्रमांक 39 व 46 वर दोन्ही कामाचे मोजमाप मूल्यांकन एक सारखेच असून निविदा मंजूरी दिनांक 29/11/2016 ची असतांना करारनामा त्यापुर्वीच दिनांक 26/07/2016 रोजीचा आहे. तसेच भूजल प्रमाणपत्र व ग्रामपंचायत ठराव एकच असतांना दोन कामाचे सारखे अंदाजपत्रक व मोजमाप मूल्यांकन नोंदवून रक्कम रूपये 5,94,983/- प्रदान केलेले आहे. त्यामुळे एकाच कामाचे दुबार प्रदान केल्याचे दिसून येते याबाबत अर्धसमासपत्र 30 दिनांक 27/12/2017 अन्वये खुलासा करणेबाबत लेखी कळवुनही अर्धसमास पत्र अनुत्तरीत ठेवण्यात आले.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1114/प्र.क्र.52/पापु-07, दिनांक 17/10/2014 मार्गदर्शक सूचना 5 (3) नुसार ग्रामीण पाणीपुरवठा योजनाचे देखभाल-दुरुस्तीच्या प्रशासकीय मान्यतेचे योजनानिहाय आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत निर्गमित करणे

आवश्यक असतांना कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी मान्यता दिलेली आहे. त्यामुळे केलेले प्रदान नियमबाह्य आहे.

**3.569 जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत यांत्रिकी उपविभागाचे हातपंप दुरुस्तीसाठी जी.आय.पाईप खरेदी मधील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामीण पाणी पूरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद सन 2016-17 या वित्तीय वर्षात जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत यांत्रिकी उपविभागाचे हातपंप दुरुस्तीसाठी आवश्यक जी.आय.पाईप खरेदीवर रक्कम रुपये 9,99,145/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मा. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे निधी वितरण आदेश क्रमांक 1707, दिनांक 11/03/2016 अन्वये मंजुर केलेले आहे. वर्षाचे सुरुवातीस निधी उपलब्ध असतांना व सदर खर्चास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिनांक 12/08/2016 रोजी मंजुर असतांना, ई-निविदा प्रक्रीया जानेवारी 2017 मध्ये विलंबाने प्रसिध्दी केलेली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) जिल्हास्तरीय खरेदी समितीने जी.आय. पाईप खरेदी करण्यास शासन निर्णय दिनांक 31/10/2015 मधील नियम 3.2.3 नुसार कार्यवाही करून साहित्याची खरेदी वैद्य दरकरारावर करणेस समितीने सर्वानुमते मान्यता दिलेली आहे. संचिकेत शासन दरकरारनुसार मे. निर्पोन टयुबस् लि., दिल्ली यांचे 32mm Med class, ISI Marked G.I. Pipes screwed & socketed in 3 mtr. Length चे दर प्रतीनग रुपये 462/- आहे. विभागाने शासन दरकराराप्रमाणे जी.आय पाईपची खरेदी न करता ई-निविदा मागवुन जी.आय. पाईप दर रुपये 570.94 प्रतीनग प्रमाणे खरेदी केलेले आहे. त्यामुळे 108.94 प्रमाणे 1750 नगा करीता रुपये 1,90,645/- चे जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदान रुपये 1,90,645/- रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

3) विभागाने दिनांक 09/01/2017 रोजी प्रथम दिनांक 13/03/2017 रोजी व्दितीय मुदवाढ ई-निविदा महाटेंडर्स.गव्ह.इन. या संकेतस्थावर प्रसिध्दी करुन ऑन लाईन नविदा मागविण्यात आले आहेत, विहीत कालावधीत दोन निविदा प्राप्त झाले, उक्त कालावधीत जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक आदर्श अचारसंहिता लागू झाल्याने विहीत वेळेत मुदतवाढ देता आली नाही असे संचिकेत नमुद आहे. महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/ प्र.क्र. 82/ भाग-III/उद्योग-4, दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील परिच्छेद क्रमांक 4.4.3.1 रुपये दहा (10) लाखापेक्षा कमीरकमेची निविदा असल्यास फक्त एकदाच मुदवाढ देण्यात यावी. कामाची पुर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील) 3 निविदा पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमूद करेल. अशा प्रसंगी किमंतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल, परंतु विभागाने अशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. ई-निविदा प्रमाणे प्राप्त झालेले दर खरेदी समितीस सादर केलेले नाही, व खरेदी समितीची मंजुरी घेतलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/ प्र.क्र. 82/ भाग-III/उद्योग-4, दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील परिच्छेद क्रमांक 3.1.2.1 नुसार खरेदीदार विभागांनी वर्षभरात लागणाऱ्या खरेदीचे नियोजन शक्यतो त्या वर्षाच्या 31 मे पर्यंत पुर्ण करावे. अनावश्यक खरेदी टाळण्ययासाठी खरेदीदार विभागाने तिमाही किंवा सहामाही आढावा घेऊन आवश्यकतेनुसार तिमाही किंवा सहामाही खरेदी करावी. परंतु याप्रमाणे विभागाने कार्यवाही केलेली नाही. पंचायत समिती कडील मागणी विचारात न घेता वार्षिक एकदाच खरेदी केलेली आहे. उपविभाग यांत्रिकी यांचे कडील जिल्हयात एकूण किती विद्युतपंप व हातपंप आहेत, किती विद्युतपंप व हातपंपा करीता जी.आय. पाईपची आवश्यकता आहे याबाबत संचिकेत अहवाल दिसून आला नाही. लेखापरीक्षण दिनांका पर्यंत जी.आय. पाईप 1414 नग शिल्लक असल्याचे दिसून आले, जी.आय. पाईप ऐवढ्या मोठ्या प्रमाणावर शिल्लक असल्यामुळे विभागास मागणी नसतांना मोठया प्रमाणावर जी.आय. पाईप खरेदी करुन ठेवलेली आहे.

5) महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/ प्र.क्र. 82/ भाग-III/उद्योग-4, दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील परिच्छेद क्रमांक 2.13 नुसार प्रशासकीय मान्यता आदेशात खरेदीची आवश्यकता व खरेदी केलेल्या वस्तूचा विनियोग तातडीने केला जाईअसे प्रमाणित करणे आवश्यक असतांना असे प्रमाणीकरण केलेले नाही.

6) उक्त शासन निर्णयातील 3.1.2.2 प्रमाणे किंमतीचा आधार खरेदी करावयाच्या वस्तूच्या किंमतीचा अंदाज, विभागाने केलेली शेवटी खरेदी किंमत, व्यावसायिक अधिकाऱ्यांने केलेले मूल्यांकन, एक किंवा अधिक संभाव्य विक्रेत्याकडून घेण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील भाव/किंमत, बाजारपेठेचे सर्वेक्षण या पध्दतीने संख्या आणि किंमत विचारात घेणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.570 राष्ट्रीय पेयजल योजनेतुन पाच टक्के प्रशासकीय निधी मधुन संगणक खरेदीतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर बाबत रक्कम रुपये 467250/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-2014/प्र.क्र.82/ भाग-III/ उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील 3.2.3 नुसार दरपत्रकाच्या आधारे खरेदीची किंमत रुपये 3.00 लक्ष पर्यंत आहे. 3.00 लक्ष किंमतीच्या पुढे ई-निविदा प्रक्रिमार्फतच खरेदी करण्यात यावी असे स्पष्ट असतांना या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-2014/प्र.क्र.82/ भाग-III/ उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील 3.4.2 नुसार दोन लिफाफे पध्दतीचा अवलंब केलेला नाही. तीन दरपत्रके प्रात झाली असुन फक्त दराचा लिफाफाच संचिकेत आहेत. तांत्रिक लिफाफा संचिकेत नाही. तसेच विभागाने Specification न ठरवताच दरपत्रके मागविली आहेत. विभागाने दिनांक 01/02/2016 रोजीच्या नोटीस नुसार दरपत्रक आमंत्रण पत्रात संगणकाचे कोणतेही Specification नमूद केले नाहीत.

3) ज्या तीन पुरवठाधारकाकडून दरपत्रके मागविली आहेत ते सदर वस्तूचे अधिकृत वितरक/ पुरवठाधारक / विक्रेता असल्याबाबत कोणतेही प्रमाणपत्र/ नोंदणी प्रमाणपत्र विभागाने दरासोबत मागविले नाही. विभागाने अशा खरेदीची नोटीस विभागाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करणे आवश्यक होते. तसेच देकार सादर करण्यासाठी किमान सात दिवसाचा कालावधी देणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही. दरपत्रक सादर करणाऱ्या निविदाकारांचे खरेदी कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध नसल्याबाबतचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक होते. विभागाने असे प्रमाणपत्र पुरवठाधारकांकडून मागविले नाही.

4) विभागाने दर आमंत्रित करताना लागू असलेल्या सर्व कर, इतर कर व शुल्क / वाहतूक खर्च वस्तूच्या किमंतीपासून वेगवेगळे दाखवण्याची सूचना दरपत्रकात करणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही झाली नाही.

5) दरपत्रका प्रमाणे प्राप्त झालेले दर खरेदी समिती कडून दरास मान्यता घेणे आवश्यक असताना अशी दरास मान्यता विभागाने घेतलेली नाही. ई निविदा प्रक्रिया न करता स्थानिक दरपत्रकाच्या आधारे खरेदी करण्यात आल्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही. त्यामुळे प्राप्त दर हे बाजारातील सर्वात कमी दर असल्याची व जिल्हा परिषेचे नुकसान झाले नाही याची खात्री करता येत नाही. तसेच संपूर्ण खरेदी ही नियमबाह्यपणे करण्यात आली आहे.

**3.571 राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम अंतर्गत पाणी पूरवठा योजना नाईकनगर (मुरुम), तालुका उमरगा कामाबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात वरील प्रमाणकानुसार राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम अंतर्गत नाईकनगर (मुरुम), तालुका उमरगा पाणी पूरवठा योजना कामावर रक्कम रुपये 13,87,068/- तिसरा हप्ता प्रमाणे खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तुत कामाचे तिसरा हप्त्या पर्यंत मोजमाप पुस्तीका क्रमांक 310 मध्ये कामाचे मुल्यांकन रुपये 14,74,683/- झालेले असतांना तिसरा हप्त्या पर्यंत वरील तपशीला प्रमाणे रक्कम रुपये 13,87,068 + लोकावाटा रुपये 1,34,944/- असे एकूण रुपये 15,22,012/- प्रदान केले आहे. त्यामुळे समितीस रुपये 47,329/- मुल्यांकनापेक्षा जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदानाची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे. समितीच्या बँक खात्यावर बँक व्याज व कपातीची अनुक्रमे 25893+ 132722= एकूण रुपये 2,05,944/- शिल्लक असल्याचे दिसून येते. मुल्याकंनापेक्षा जादा प्रदान रक्कम रुपये 47,329/- अध्यक्ष / सचिव यांनी परस्पर हातावर ठेवल्याचे दिसून येते, जादा प्रदान संबधीताकडून त्वरीत वसूलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

2) सदरल कामाचे देयकातुन आयकर, मुल्यवर्धीकर, विमा, उपकर रुपये 29494+73734+14747+14747= एकूण रक्कम रुपये 1,32,722/- तिसरा हप्त्यामधुन कपात करुन समितीस प्रदान केलेले आहे. सदरील रक्कम समितीच्या बँक खात्यावर जमा असल्याचे संचिकेतील बँक पास बुकाचे झेरॉक्स प्रतीवरुन दिसून येते. सदरील कपातीच्या रक्कमा ज्या त्या शिर्षाखाली भरणा केलेल्या नाहीत. रक्कम रुपये 1,32,722/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) उक्त शासन निर्णयातील 2.4 प्रमाणे जिल्हा परिषद व राज्यस्तरावर तांत्रिक/प्रशासकीय मान्यता मिळालेल्या योजना जिल्हा व राज्य आराखडयामध्ये समाविष्ट करण्यात येतील व जिल्हा आराखडयाला राज्यस्तरीय मान्यता समितीची मान्यता मिळाल्यानंतरच योजनांची अंमलबजावणी सुरु करता येईल. परंतु याप्रमाणे मान्यता मिल्याबाबत संचिकेत कोणतीच कागदपत्रे उपलब्ध नाहीत.

4) योजना पूर्ण झाल्यानंतर ती यशस्वीरित्या पूर्ण झालेली आहे, हे पडताळण्यासाठी ग्रामपंचायतीने / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने संबधित ठेकेदाराशी करारनामा करताना त्यामध्ये ही अट घालावी की, योजना पुर्ण झाल्यानंतर ठेकेदार किमान 1 वर्ष ही योजना चालवेल. परंतु या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक 1008, दिनांक 11 जानेवारी 1999 मधील परि.40 नुसार वापरलेल्या साहित्याची प्रयोग शाळेतुन तपासणी करुन घेण्यात आलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/275/ प्र.क्र.172/परा 7, दिनांक 29/10/2011 नुसार निविदा प्रक्रिया ही ई-निविदा पध्दतीने करणे आवश्यक आहे. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने ई-निविदा प्रक्रिया केलेले सर्व अभिलेखे संचिकेत जोडलेले नाही. प्रस्तुत योजने बँक पासबुक लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नसल्यामुळे आर्थिक व्यवहार, प्राप्त अनुदाना इतका किंवा बँक खातेवर प्राप्त झालेले अनुदान शिल्लक व शिल्लक असलेली रक्कम याबाबतची तपासणी करता आली नाही.

### 3.572 जलस्वराज्य व भारत निर्माण मध्ये पाणी पुरवठा योजना मधील अपहारीत रक्कम रुपये 3,15,75,510/- वसुल न करणे व योजनेवर योग्य संनियत्रंण न ठेवणेबाबत.

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 29) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद सन 2016-17 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात जलस्वराज्य योजनेत एकूण 16 प्रकरणात सन 2007 ते 2011 पर्यत रक्कम रुपये 1,28,09,260/- व भारत निर्माण योजनेत एकूण 27 प्रकरणात सन 2007 ते 2015 पर्यंत रक्कम रुपये 1,87,66,250/- असे एकूण 43 प्रकरणात रक्कम रुपये 3,15,75,510/- अपहारित रक्कम असल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जलस्वराज्य योजना व भारत निर्माण कार्यक्रम योजनेत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष/सचिव यांनी झालेल्या मुल्यांकनापेक्षा जास्तीची रक्कम उचलेली वसुलपात्रक रक्कम समितीच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने कळवून देखील रक्कम जमा केलेल्या नाही. त्यामुळे संबधी गावांचे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्यो अध्यक्ष/सचिव यांचे विरुध्द अपहारीत रक्कमेबाबत पोलीस गुन्हा दाखल केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणाची संचिका लेखापरीक्षणात उपलब्ध करुन देण्यांत आलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 36(1) नुसार अपहार किंवा अफरातफर उघडकीस येईल तेंव्हा याबाबतची वस्तुस्थिती तात्काळ संविधिक लेखापरीक्षक यांना कळविण्यात येईल असे स्पष्ट नियम असतांना अशा प्रकारची कार्यवाही विभागाने व जिल्हा परिषदेकडून केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग परिपत्रक क्रमांक-जस्वप्र-2007/वित्तीय सल्लागार/प्र.क्र.1/पापु-11, दिनांक 6 डिसेंबर 2007 अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समितीवर अंमलबजावणी व नियत्रणांची जबाबदारी सोपविलेली आहे. पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी प्राप्त शासकीय अनुदान व लोकवर्गणी हा जनतेचा पैसा असल्याने त्यामधुन केलेला खर्च तो काटेकोरपणी व आर्थिक शिस्तीचे पालन करुन व तसेच जबाबदारी व त्यांचे उत्तरदायित्व स्विकारुन पारदर्शक पध्दतीने केला पाहिजे, त्यासाठी शासनाने वेळोवेळी शासना मार्फत परिपत्रकाव्दारे सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचे काटेकारपणे पालन होते किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी व कर्तव्य जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिका-यावर प्रस्तुत शासन परिपत्रकानुसार नेमुन दिले आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेतील संबधीत विभागाने आपली जबाबदारी व कर्तव्य पार पाडलेले नाही.

4) प्रकल्पाचा निधी हा ग्रामपंचायत निधीचा भाग असल्याने त्याच्या जमा व खर्चाची तपासणी सुध्दा ग्रामपंचायत अधिनियमानुसार होणे बंधनकारक आहे, त्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे व्हावा व निधी हाताळतांना एखादी गंभीर अनियमितता/अपहार/ अफरातफर घडू नये यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांचे मार्फत तपासणी करुन आवश्यक कारवाई करणे आपेक्षीत आहे. तसेच कार्यकारी अभियंता व अधिनस्त तांत्रिक कर्मचा-याकडून कामाचा दर्जा व मुल्यमापन योग्य असल्याची नियमीत तपासणी करणे बंधनकारक आहे. जबाबदार अधिका-यांनी नियमित तपासणी न केल्यास त्यांचे विरुध्द आवश्यक ती कारवाई मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी करावी अशा स्पष्ट सूचना आहेत. प्रस्तुत प्रकरणात अशा प्रकारे कारवाई केले असल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणात उपलब्ध केलेली नाहीत. त्यामुळे अशा प्रकरणात योग्य नियत्रंण ठेवणे व निधीचा विनियोग योग्य प्रकारे करणेसाठीच्या आवश्यक जबाबदा-या पार पाडल्याची खातरजमा होऊ शकत नाही. या नियत्रंणा अभावी अपहार, अनियमितता, गैरव्यवहार होण्यास वाव मिळाला असे स्पष्ट होते.

5) प्रस्तुत प्रकरणात अपहारीत रक्कम रुपये 3,15,75,510/- तात्काळ वसुल करावी, त्यासाठी जबाबदर समित्या, तांत्रिक सेवा पुरवठादार, सरपंच, ग्रामसेवक व इतर व्यक्ती इत्यादी विरुध्द आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करावी व यावर योग्य नियत्रंण न ठेवणा-या जबाबदार अधिकारी व कर्मचा-या विरुध्द आवश्यक ती कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

**3.573 मौजे खरोसा, ता औसा येथिल तात्पुरती पूरक नळ योजनेच्या कामाच्या खर्चातील अनियमिततेबात.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी सन 2016-2017 या वित्तिय वर्षाच्या लेखापरीक्षणात नैसर्गिक आपत्ती लेखाशिर्षांतर्गत प्रमाणक क्रमांक 4, दिनांक 03/12/2016 अन्वये रक्कम रुपये 73,785/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त काम दोन भागांमध्ये विभागलेले आहे. अ) ग्रामपंचायत बोअरवेल साठी pumping machinory रुपये 79,000/- ब) Rising Main-90 mg 6 kg/cm2 pvc, pipeline and volve रुपये 1,63,380/- असे एकूण रक्कम रुपये 2,42,380/- चे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 चा नियम 153(1)(2), 156 प्रमाणे मंजूर आराखडयाप्रमाणे काम करणे आवश्यक असतांना तसे काम केलेले नाही. उपरोक्त बाबींवरुन सदरचे काम 50% ही झालेले नसलेने उक्त काम मंजूर अंदाजपत्रकांप्रमाणे व आराखाडयांप्रमाणे झालेले नाही हे दिसून येते एखादे काम सुरु करण्यांपूर्वी त्या जागेचे सर्वेक्षण करुन त्याचा प्राथमिक सर्वसाधारण अहवाल तयार केला जातो व त्यानुसार अंदाजपत्रक तयार केले जाते. तथापि, वरील कामांमध्ये प्राथमिक सर्वसाधारण अहवाल गांभिर्याने व वस्तुनिष्ठ स्वरुपात केला नसलेने काम पुर्ण न करताच आहे त्या स्थितीमध्ये अंतिम केले आहे.

3) संचिकेतिल ग्रामपंचायत ठराव नक्कल ग्रा. प. 95 दिनांक 26/01/.2015 अन्वये, समाजमंदिराच्या जागेत पाडलेल्या बोअर वर पाणी मुबलक असलेने नविन विदयुतपंप बसविणे व पाईप लाईन करणे या कामांना मंजूरी देणेत आलेली आहे. तसेच सहाय्यक भूवैज्ञानिक ग्रामिण पाणी पुरवठा लातूर तहसिलदार औसा, गट विकास अधिकारी औसा, उपविभागीय अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा /लघुपाटबंधारे उपविभाग औसा इत्यांदीनी तात्पुरती पूरक नळ पाणी पुरवठा योजना अंदाजपत्रकासोबत जोडावयाचे प्रपत्र ब पत्रकांवर कामासंबंधी अभिप्राय दिलेले आहेत असे असतांना संचिकेतिल ग्रामपंचायत ठराव दिनांक 15/08/2015 अन्वये, समाजमंदिर जागेतिल विंधन विहीरीवर विदयुत पंप संच बसविण्यात आला तसेच विंधन विहिीचे पाणी संपल्याने पाईप लाईन केली नाही असे ठराव पत्रकांवर नमूद करुन काम अंतिम केले आहे. अहवालाप्रमाणे मुबलक पाणी पुरवठा असताही पुढील काम न करता काम आहे त्या स्थितीत अंतिम केले आहे. त्यामुळे योजनेचा मूळ उद्देश साध्य झालेला नाही. काम आहे त्या स्थितीत अंतिम करणेबाबतची एका साध्या ठरावाव्यतिरिक्त कोणतेही कारणे, अभिलेख संचिकेत नाहीत. त्यामुळे उक्त कामांवरील खर्च रक्कम रुपये 73,785/- निष्फळ ठरला आहे. याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. सदरची रक्कम वसूलात आणून अनुपालन दर्शवावे

4) सदर गावांमध्ये ही योजना अस्तित्वात येण्यांपूर्वी असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या साहित्याचा/भागाचा पुनर्वापर सदर योजनेमध्ये करणे आवश्यक होते. तथापि पूर्वीच्या योजनेतील साहित्याचा/भागाचा पुनर्वापर केला नसलेने शासनाचे नुकसान झालेले आहे.

5) पहिल्या देयकांतून आयकर रक्कम रुपये 1,697/- ही वसूल केलेला नाही. त्यामुळे सदरची रक्कम आयकर खाती भरणा केलेबाबत पूर्तता अहवाल दर्शवावा.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 चे नियम 197 नुसार नमुना 69 मध्ये पूर्ण केलेल्या बांधकामाची नोंदवही ठेवणे व त्यातील संपूर्ण रकाने भरणे आवश्यक आहे. तथापि, अशी नोंदवही ठेवून पूर्ण केलेल्या कामाच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे एकाच कामांवर वारंवार खर्च केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र. क्र.680 / वित्त-9, दिनांक 19 मार्च 2012 मधील टीपांनुसार विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्वीकारलेची माहिती स्थायी समिती व विषय समिती बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे आणि प्रत्येक विभागांनी कामाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करावयास पाहिजे परंतु अशी कार्यवाही झालेचे दिसून आले नाही.

8) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31 डिसेंबर 2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहीती दर्शविणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि, जिल्हा परिषदेने अंदाजपत्रकात नामफलकाची तरतुद केलेली नाही व नामफलक बसविलेला नाही. त्यामुळे उक्त कामाची तपशिलवार माहिती जनतेस होऊ शकली नाही.

**3.574 मौ.चिखली ता अहमदपूर येथिल तात्पुरती पाणी पुरवठा नळ योजनेच्या कामांतील अनियमिततेबाबत जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी सन 2016-2017 या वित्तिय वर्षाच्या लेखापरीक्षणात निवड महिन्यांत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 21,03,137/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बाब क्रमांक 01 नुसार, Pro & supplying in std Length ISI mark pipes खरेदी व प्रत्यक्षात कामावर वापराबाबतची तफावत आहे. त्यामुळे आवश्यकतेपेक्षा जादाची पाईप खरेदी केलेमुळे शासनाचे रक्कम रुपये 27,192/- चे नुकसान झालेले आहे. त्यामुळे सदरची रक्कम वसूली होणे आवश्यक आहे.

2) निविदा सूचना क्रमांक -17 सन 2016-17 मधिल अट क्रमांक 08 नुसार कोणत्याही परिस्थितीत कार्यारंभ आदेश मिळालेल्या तारखेपासून एक दिवसाच्या आत कामास सुरुवात केली पाहिजे अन्यथा सुरक्षा ठेवीची रक्कम जप्त करुन निविदाची पुढील कार्यवाही करण्यात येईल असे नमूद आहे त्यानुसार कामाचे आदेश दिनांक

03/06/2016 रोजी देणेत आलेले असतांना प्रत्यक्षात काम दिनांक दिनांक 18/06/2016 रोजी सुरु करण्यात आलेचे मोजमाप पुस्तिका क्रमांक 527 पान क्रमांक 26, 27, व 29 वरील नोंदीवरुन दिसून येते. म्हणजेच सदरचे काम टंचाई काळातील तातडिचे व महत्वाचे असतांनासुध्दा काम विलंबाने सुरु केलेले आहे. त्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार सुरक्षा रक्कम निविदा किंमतीच्या 4% प्रमाणे रुपये 88,555/- जप्त करुन शासन भरणा केलेचे अनुपालन दर्शवावे.

3) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक ग्रासयो 2008/प्र.क्र.75/यो.9, दिनांक 29 मे 2008 व क्रमांक परास/1089/प्र.क्र.14525/35, दिनांक 15/02/1990 नुसार जिल्हा परिषद योजनेच्या कामावर वापरलेल्या सर्व साहित्याचे चाचणी/तपासणी अहवाल पंतप्रधान ग्रामीण रोजगार योजना यांचे प्रयोगशाळेत करावयाचे असताना SGS India Private Limited Mumbai या खाजगी संस्थेकडे केवळ पी. व्ही. सी. पाईप यांची चाचणी तपासणी केलेली आहे. इतर कोणत्याही साहित्याची तपासणी केलेली नाही. कामांवर वापरण्यात आलेल्या साहित्यांची तपासणी शासकीय प्रयोगशाळेकडून घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे कामांवर वापरलेल्या साहित्याचा दर्जा व गुणवत्ता योग्य असलेविषयी खातरजमा करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई -2016/ प्र.क्र,95 /पा.पु-14, दिनांक 28/03/2016 नुसार तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा कार्यालयांने पाठवलेला मूळ प्रस्ताव लेखापरिक्षणास तपासणीसाठी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे मूळ पाण्याचा स्तोत्र, त्याची क्षमता, पाईप लाईन होण्यापूर्वि चिखली गावांत पिण्याच्या पाण्याची सोय कशी होती व इतर बाबी तपासता आल्या नाहीत. तरी मूळ प्रस्ताव दर्शवून अनुपालन सादर करावे

5) सदर गावांमध्ये ही योजना अस्तित्वात येण्यांपूर्वी असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या साहित्याचा/भागाचा पुनर्वापर सदर योजनेमध्ये करणे आवश्यक होते. तथापि पूर्वीच्या योजनेतील साहित्याचा/भागाचा पुर्नवापर केला नसलेने शासनाचे नुकसान झालेले आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 चे नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना नंबर 23 मध्ये नोंदी घेणे आवश्यक असताना नमुना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

7) तांत्रिक मान्यता आदेशांतील अट क्रमांक 10 नुसार 5% लोकवर्गणी कपात करण्यात आलेली नाही. संबंधितांकडून वसूल करून शासन खाती भरणा करुन आनुपालन दर्शवावे.

8) कामाच्या करारनाम्यांवर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 चे नियम 197 नुसार नमुना 69 मध्ये पूर्ण केलेल्या बांधकामाची नोंदवही ठेवणे व त्यातील संपूर्ण रकाने भरणे आवश्यक आहे तथापि, अशी नोंदवही ठेवून पूर्ण केलेल्या कामाच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे एकाच कामांवर वारंवार खर्च केल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी यांबाबत पूर्तता अनुपालन सादर करावे.

**3.575 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत निधी वितरणातील अनियमितेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18 व 19) -** पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद लातूरचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षण अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत निधी वितरणबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत

1) ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी असलेले मार्गदर्शक आदेश क्रमांक पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-1019/ प्रक्र.104(अ) / पापु07 दिनांक 17/03/2010 मधील अनुक्रमांक 1.9 नुसार, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत निवडलेल्या सर्व ग्रामपंचायती सदरील योजनेच्या अंमलबाजीवणीच्या निकषानुसार प्राधान्यक्रम दिलेबाबत लेखापरीक्षणास कागदपत्राअभावी खात्री करता आली नाही. उक्त योजनेची अंमलबाजावणी ही टॅंकर्स मुक्त गावात केल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत कागदोपत्री खुलासा करावा व योजना मागील तीन वर्षात ज्या गावांना पाणीपुरवठा हा टॅंकर्सने झालेला आहे अशी गावे या

योजनेत घेतले नसलेबाबतची कागदोपत्री खात्री पटवावी. तसेच उपरोक्त 1 मध्ये नमुद शासन निर्णयातील अनुक्रमांक 2.1 नुसार योजनेच्या गाव कृती आराखड्यास व अंदापत्रकास ग्रामसभेचा ठराव पारीत झाल्यावर सक्षम प्राधिकरणाची प्रथमत: तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतुसंबंधित कार्यालयांनी प्रशासकीय मान्यता प्रथम घेूवन शासन निर्णयतील तरतूदीचे उल्लघंन केलेले आहे.

2) उपरोक्त अनुक्रमांक 1 मधील शासन निर्णयातील अनुक्रमांक 2 च्या 7.2 नुसार योजनेच्या अंमलबाजवणीच्या वेळी सदरील योजना ही संबंधित ग्रामपंचायतीस देताना ज्या गावात प्रादेशिक योजना किंवा स्वतंत्र योजना अस्तित्वात आहे. परंतु पाणीपट्टीची वसुली न झाल्यामुळे ती योजना चालू बंद असल्याबाबतचे कुठलेही कागदपत्रे लेखापरीक्षण दरम्यान सादर केले नाहीत. त्यामुळे अशा स्वरुपाची योजना अस्तीत्वात असतानाही संबंधित ग्रामपंचायतीस सदरील योजनेचा लाभ दिला किंवा कसे याबाबतची लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

3) सदर योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींच्या निवडी बाबत कागदपत्राच्या आधारे खात्री पटवावी. तसेच ग्रमापंचायतींना प्रथम हप्ता लोकसहभागाची रक्कम जमा झाले नंतरच प्रदान केल्याबाबत कागदोपत्री खात्री पटवून तसे अनुपालन दर्शवावे.

4) 24 ग्रामपंचायतीना अनुदान वितरण रक्कम रुपये 2,63,79,743/- केले आहे.

5. अर्धसमास पत्र क्रमांक 04, दिनांक 11/12/2017 अन्वये मागणी करुन देखील सदर वितरीत करण्यात आलेल्या निधीचे अनुषंगाने लेखे/अभिलेखे सादर न केल्याने त्याबाबत खात्री करता आली नाही.